Impact Factor 6.168
www.sjifactor.com

p-ISSN 2349-9370
e-ISSN 2582-4848

# Research Journal of India

Print and Online
www.researchjournal.net.in
www.indiramahavidyalaya.com

Peer Reviewed Multi-Disciplinary
Annual National Indexed Research Journal
Published as per UGC (India) Guidelines

Vol. 10 Issue 2
Oct. 2023
Regular Issue 2




Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (INDIA)

Impact Factor 6.168 p-ISSN 2349-9370 e-ISSN 2582-4848

# RESEARCH JOURNAL OF INDIA

Peer Reviewed Annual National Research Journal for
Multi-Disciplinary Studies since 2014

Volume 10 Issue 2 October 2023 Regular Issue 2

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Principal, Indira Mahavidyalaya & Chairman, DBMRC
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati

**Associate Editor**
**Dr. Veera Mandavkar**
Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre (DBMRC)

**---- Editorial Board ----**

**Prof. R.M. Wath** **Prof. N.V. Narule** **Prof. S.Y. Lakhadive**
**Dr. K.R. Nemade** **Dr.D.M. Chavhan**

**Invited Editors**

1. **Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
2. **Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
3. **Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
4. **Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

**Mrs. Sonali Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**Dr. J. Prabhash,** Former Pro-VC, Uni. of Kerala, Thiruvananthpuram, Director General of State institute of parliamentary affairs, Visiting fellow of diff. Uni. Australia, USA
**Dr. Ramesh Mangal,** NAAC Assessor, Ex. Principal, MKHS Guj. College & Director SVCC, Indore, M.P.
**Dr. Rajesh Vyas,** NAAC Assessor, Principal, Christian Eminent College, Indore, M.P.
**Dr. K.M. Kulkarni,** Former Director of Higher Education, Maharashtra State
**Dr. Anil Gajbhiye,** Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
**Dr. Shashikant Sawant,** Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.
**Dr. Dineshkumar Joshi,** Ex. Registrar, S.G.B. Amravati University, Amravati
**Dr. P.W. Kale,** Ex. Dean, Faculty of Commerce, S.G.B. Amravati University, Amravati
**Dr. R.A. Mishra,** Principal, Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal

**Publisher: Dr. Mrs. Veera Mandavkar,** Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401(India)
E mail – researchjournalofindia@gmail.com Alternate mail id – **marathipradhyapak@gmail.com**
Telephone: 07201-226147, 226129, Mob. Chief Editor: 9422867658, Director & Publisher: 9403014885
Websites: www.researchjournal.net.in **www.indiramahavidyalaya.com**
**Printer: Seva Prakashan,** Vijay Colony, Rukmini Nagar, Amravati, Maharashtra 444 606
**Cover Page Design & Computer Work: Dr. Pavan Mandavkar**

**Online Access: Free / Subscription for hard copy for a year including special issues Rs. 500/-**
by Cheque/DD/netbanking in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre,** A/c No. 60175373000, Bank of Maharashtra, Branch - Azad Maidan Road, Yavatmal, IFSC - MAHB0000047

# From the Bench of Editor

On behalf of the Board of the editors of **'Research Journal of India' (RJI)**, I am glad to present the Volume 10, Issue 2 of the journal with expectation of a warmed welcome from the researchers and educationist.

The journal established in 2014. The journal is now getting popular throughout India by different academic forums. Average download per article is increasing day by day. All these are promising signs. We could reach this stage through the constant support of Board Members and intellectual generosity of the readers and contributors (authors and reviewers).

Research draws its power from the fact that it is empirical, rather than merely theorizing about what might be effective or what could work, researchers go out into the field and design studies that give policymakers hard data on which they can base their decisions. Furthermore, good research produces results that are examinable by peers, methodologies that can be replicated, and knowledge that can be applied to real-world situations. Researchers work as a team to enhance our knowledge of how to best address the world's problems.

The spectacular success of India's moon mission, Chandrayaan-3, is a major milestone in the country's space history. India is only the fourth country in the world to achieve a soft-landing on the lunar surface and the only one to do so on the moon's icy South Pole. Moon is thought to hold important minerals but one of the major goals of Chandrayaan-3 is to hunt for water - scientists say the huge craters in the south pole region which are permanently in shadow hold ice which could support human habitation on the Moon in future.

ISRO's mission objectives for the Chandrayaan-3 mission are: 1. Engineering and implementing a lander to land safely and softly on the surface of the Moon. 2. Observing and demonstrating the rover's driving capabilities on the Moon. 3. Conducting and observing experiments on the materials available on the lunar surface to better understand the composition of the Moon.

Top United Nations leadership congratulated India on the success of its lunar mission Chandrayaan-3, describing it as a "giant step" for humanity and a "great achievement".

- **Dr. Pavan Mandavkar**
Chief Editor, RJI

## Important Links

**UGC Checklist Criteria**

https://www.researchjournal.net.in/pdf_page.php?p=UGC%20Checklist%20Criteria%20-%20RJ

**UGC-CARE Format**

https://www.researchjournal.net.in/pdf_page.php?p=CARE%20format%20-%20RJI

**Instructions To Authors**

https://www.researchjournal.net.in/text_page.php?p=Instructions%20to%20Authors

**Journal Ethics**

https://www.researchjournal.net.in/text_page.php?p=Journal%20Ethics

**Journal Evaluation Method**

https://www.researchjournal.net.in/text_page.php?p=Journal%20Evaluation%20Method

**Instructions To Reviewers**

https://www.researchjournal.net.in/text_page.php?p=Instructions%20to%20Reviewers

**Plagiarism Policy**

https://www.researchjournal.net.in/text_page.php?p=Plagiarism%20Policy%20and%20Report

(**Note:** All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| | From the Bench of Editor | Dr. Pavan Mandavkar | 2 |
| | Index | | 3 |
| 1 | स्त्रियांच्या दुःखाची वेदना : लढाई अस्तित्वाची | प्रा.डॉ मिलिंद कांबळे | 4-8 |
| 2 | ग्लोबल वार्मिंग आणि भारतापुढील आव्हाने | प्रा. एन. व्ही. नरुले | 9-12 |
| 3 | कुष्ठरोगी आणि आदिवासी यांच्या जडणघडणीतील क्रांतीसूर्य - थोर समाजसेवक बाबा आमटे | प्रो. डॉ. बाळासाहेब शेळके | 13-21 |
| 4 | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या साहित्यातील जीवनमूल्ये | डॉ. दुष्यंत शिंदे | 22-25 |
| 5 | बसव तत्त्वज्ञान आणि आचारधर्म | रुचिरा रमेशराव कापसे | 26-32 |
| 6 | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील जीवनमूल्यांचा शोध | डॉ. विजयकुमार शिवदास ढोले | 33-36 |
| 7 | लोकसाहित्यातील स्त्री-प्रतिमा | प्रा. भैरवी कावरे | 37-41 |
| 8 | सावित्रीबाई फुले यांचे विचार आजच्या काळाची गरज | प्रा.कु. ज्ञानू शालीग्राम राऊत | 42-46 |
| 9 | महिलांचे मानवी अधिकार आणि कौटुंबिक हिंसाचार | प्रा. डॉ. सुधीर मारोतराव गोटे | 47-48 |
| 10 | जागतिकीकरणाचा वंचित महिलांवर झालेला प्रभाव | प्रा. संतोष एल. जाधव | 49-52 |
| 11 | ‘सर्व प्रश्न अनिवार्य’ कादंबरीतील भाषिक सौंदर्य | प्रा. पुरुषोत्तम एस. निर्मळ | 53-56 |
| 12 | नोकरी करणाऱ्या महिलांचा दर्जा, कार्यस्थिती व सोयीसुविधा | प्रा. डॉ. महेंद्र अजाबराव पखाले | 57-61 |
| 13 | विदर्भातील रामदासी संप्रदायाचे स्वरूप व कार्य | डॉ. प्रगती संजय ढोक | 62-67 |
| 14 | मराठी व्रतकथांचे समाजजीवनात महत्त्व | प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर | 68-73 |
| 15 | शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबऱ्या | प्रा. डॉ. विजयकुमार खंदारे | 74-75 |
| 16 | विठ्ठल वाघांची अस्सल वऱ्हाडी ग्रामीण कविता | डॉ. गजानन भाऊराव घोंगटे | 76-80 |
| 17 | मानवी जीवनाच्या समृद्धतेसाठी वैज्ञानिक दृष्टीकोनाची मौलिकता विशद करणारा विज्ञान काव्यसंग्रह : ‘जीवनाचे गणित’ | डॉ. भगवान जालमसिंग साबळे | 81-86 |
| 18 | दलित कवितेतील: नकार, विद्रोह आणि आत्मशोध | प्रा. डॉ. साजिद के. शाह | 87-91 |
| 19 | ‘मराठी कथा दर्शन’ मधील विज्ञान कथा | डॉ. नांगरे कार्तिकी विजयकुमार | 92-95 |
| 20 | साठोत्तरी मराठी ग्रामीण साहित्याचे विशेष | प्रा. डॉ. सुषमा शंकरराव प्रधान | 96-100 |
| 21 | 'लाल फुलांचं झाड : आशयसूत्र' | डॉ. गोविंद काळे | 101-105 |
| 22 | समकालीन मराठी भाषा | सौ. तनुजा सुरेश मुळे | 106-108 |
| 23 | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार | प्रा. निलेश अरूण दूर्गे | 109-112 |
| 24 | वर्तमान संदर्भात संत गाडगेबाबा यांचे सामाजिक विचार | प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके | 113-116 |

# स्त्रियांच्या दुःखाची वेदना : लढाई अस्तित्वाची

**प्रा. डॉ मिलिंद भिवाजी कांबळे**
मराठी ,विभाग विद्या विकास महाविद्यालय, समुद्रपूर, जिल्हा वर्धा
Mob.No.9765768832 milindkamble777@gmail.com

## प्रस्तावना :

भारतीय समाजव्यवस्था वर्ण व्यवस्थेने आतून आणि बाहेरून पोखरली आहे ब्राह्मण ,क्षेत्रीय ,वैश्य आणि शूद्र या चार वर्णात स्त्रियांचे स्थान म्हणजे फक्त भोग घेण्याची वस्तू कोणीही यावे आणि आपला भोग घ्यावा हाच मापदंड इथल्या पुरुषप्रधान संस्कृतीत आहे त्यांना दुय्यम स्थान इथल्या व्यवस्थेने दिले आहे माणूस म्हणून तिचे सर्व हक्क इथल्या परंपरेने रुढी आणि इथल्या मनुवादी विचारसरणीने नाकारले आहेत स्त्रियांच्या वेदनेचा आलेख लढाई अस्तित्वाची या काव्यसंग्रहात छाया बेले यांनी मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे लढाई अस्तित्वाची ही स्त्रियांच्या समग्र दुःखाची वेदना माणसाला हादरून सोडते स्त्रियांचे जगणे त्यांचे स्त्री आणि माणूस म्हणून असणारे प्रश्न या काव्यसंग्रहात टोकदारपणे शब्दांकित झाले आहेत प्रस्तुत स्त्रियांच्या दुःखाची वेदना लढाई अस्तित्वाची या शोध निबंधातून स्त्रियांच्या वेदनेचा आणि त्यांच्या अस्तित्वाचा शोध घेता येईल

"आई म्हणाली गर्भाला
माफ कर ग बाळे मला
जन्मदात्यांनीच परवानगी
नाकारली आहे तुझ्या जन्माला
समजू नकोस पाषाण हृदयी
किंवा दुष्टही मला
खूप यातना होत आहेत
तरीही निघाले काळीज कापून काढायला
मी भोगले जे दुःख"[१]

बाईपणाचे दुःख खूप वाईट असते या समाजाने तिचे व्यक्ती स्वातंत्र्य नाकारले आहे स्त्रीला गर्भातच मारले जाते आई म्हणून तिचे स्वातंत्र्य हिरावले जाते गर्भातच स्त्रीभ्रूण हत्याचे पातक समाजात केली जाते तिचा या नव्या जगात आईची इच्छा असताना ही येऊ दिले जात नाही कारण ती मादी असते ही व्यवस्था स्त्रीचे शोषण करत असते असे कवियत्री सांगत आहे.

"स्त्रीचा हा जन्म तुझा त्यास तू सार्थ कर
अर्थ नाही तुला इथे
तोच तो प्राप्त कर सीतेचा त्याग तुझ्यात
सावित्रीची शक्ती तू सतीचा स्वाभिमान
अन् मीरेची भक्ती तू"[२]

वरील काव्यातून छाया बेले स्त्री ही सक्षम आहे तिला सीतेचा सावित्रीचा आणि मिरे चा त्याग आहे त्याचा वारसा आहे असे सांगतात म्हणून स्त्रीमध्ये जग बदलण्याची क्षमता आहे यासाठी तीन स्वतःचे अस्तित्व ओळखले पाहिजे स्त्रीचा बाईपणा तिला नेहमी वेदना देत असतो स्त्री सासरी आणि माहेरी कशी निराधार असते म्हणून निराधार या कवितेत छाया बेले यांनी सांगितले,

"वाली मजला कुणी न असती
निराधार मी या जगती

माहेर असे माझे परके
अन सासरी आश्रित मी
प्रेमाने न्हाऊ घातले सर्वांना
अन अश्रूत भिजते मी
माया देते सर्व जगाला
मायविन झुरते मी"[३]

छाया बेले यांची आई तुझ्यासाठी या कवितेत आईच्या वाट्याला आलेले दुःख त्यांनी मांडले आहे आईच्या दुःखाच्या क्षणी तिला साथ द्यायला आपण असायला होते पण आपण नव्हतो याची खंत या कवितेत त्या व्यक्त करतात आईजवळ असताना आणि जवळ नसताना याची वेदना काव्यात येते त्या ओळी पहा,

"देव तुला छळताना
तू अश्रू ढळताना
डोळे पुसून हळूच
तुला आधार द्यायला
मी जवळ असायला हवी होते
तू अंधारात चाचपडताना
तोल जाऊन पडताना
आधारासाठी धडपडताना
तुला अलगद सावरायला
मी जवळ असायला हवी होते"[४]

मुक्या वेदना या कवितेत छाया बेले यांनी स्त्रीचा कोंडमारा शब्दांकित केला अनादी काळापासून श्री पुरुषप्रधान संस्कृतीत मुक्याचे जीवन जगत आहे हे त्यांनी या कवितेत व्यक्त केले आहे,

"जगण्यासाठी रोजच मरणे
मरण न येथे आम्हा नवे
सगळेच वेदना देऊनही जाती
कुणी ना विचारी तुझं काय हवे
कुणाला दिसला अश्रू पिऊन
हृदयात दाटलेला सागर
कुणा ना दिसली वादळे उठलेली
मनाच्या वाळवंटावर
कोणी न वाचणार ती शिल्पे
जी दुःखने कोरली या काळजावर "[५]

छायाबेली यांची होरपळ कविता स्त्रीच्या आतील अगतिकता व्यक्त करते तिला स्वतःतून आणि जीवनातून मुक्त व्हावे वाटते इतका तिला या जीवनाचा आणि इथल्या पुरुषप्रधान समाज व्यवस्थेचा कंटाळा आला आहे तो कंटाळा त्यांनी होरपळ मधून व्यक्त केला'

"जीवना सोड रे साथ
माझी आता तू
थकले पुरती मी
दरीवरती बांधूनी सेतू
त्राणही सरले

आसही सरली
हुरहुर ही परी
मनात उरली"[६]

तसेच छाया बेले यांनी नरक या कवितेत स्त्रीच्या वाट्याला आलेला भोगवटा सांगितला आहे स्त्रीच्या वाट्याला आलेले एकटेपण आणि सभोवताली पसरलेली अ मानवी गर्दी यातून तिची कशी घुसमट होते आणि नरक यातनेला सामोरे जावे लागते याचे वर्णन नरक कवितेत आले आहे.

"नरक काय असतो?
विचारा मला
मेल्यावरच पाहिला आहे कुणी
जिवंतपणी मी भोगलाय
तिरस्काराचे गरम प्याले
द्वेषाच्या ज्वालात जळले
सुखी होते सारे आजूबाजूला
एकटेपणाची घाई होती
माझ्याच वाट्याला
अंधारलेली कोठडी होती
ज्यात बंदीवान मी"[७]

छाया बेली या भाऊक कवियत्री आहेत माणसाच्या जगात राहून त्या एकट्या असल्याची भावना त्यांच्या शोध कवितेत येते मग त्या अबोल मनाने माणसांचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात त्यांचा शोध कधी संपत नाही तो सतत चालू असतो

"माणसाच्या या जगात मी
माणुसकी शोधत आहे
आपल्यांच्या अंतरात मी
आपुलकी शोधत आहे
मातापित्यांच्या घरात
मी माहेर शोधत आहे
या चार भिंतीमध्ये
माझे घर शोधत आहे
नात्यागोत्यांमध्ये मी
जिव्हाळा शोधत आहे"[८]

छाया बेले यांचा लढाई अस्तित्वाची कविता संग्रह त्यांच्या पोरके पणाची आणि आई नसलेपणाची माहेर नसलेपणाची वेदना मांडते आईसाठी त्यांचे मन आतुन तुटते आईसाठी त्यांच्या मनात तून शब्द दुखरी वेदना घेऊन येतात आणि त्या आतल्या आत धुमसत जातात कारण त्यांना आईची उणीव भासताना दिसते आणि मग त्यांचे मन रडू लागते शब्दाचा सहारा घेत संपली संवेदना काव्यातील मनाची तगमग अशी व्यक्त झाली ती पहा,

"मनातील भावना मारताना
मनही माझे मरून गेले
जीवनाच्या सुरुवातीलाच
जीवन माझे सरून गेले
सुखाने ना आनंद येईल

ना कळे दुःखाची वेदना
शरीर हे जिवंत आहे
मात्र संपली संवेदना
कधी वाटते खूप रडावे
अश्रूंना न मजला साथ देती"[९]

छाया बेले यांच्या नकोशी या कवितेतून जीवनाचे फार मोठे तत्त्वज्ञान आलेले आहे या कवितेत तिचा प्रवास आला आहे तिच्या जगण्याची धडपड आली आहे ती जीवनावर व माणसावर प्रेम करणारी आहे तिच्या वाट्याला आलेल्या वेदना ती व्यक्त करताना हळूवारपणे स्वतःला सिद्ध करताना दिसते आहे.

"मी वाढले नकोशी
मीरुच्या कुशीमध्ये
मी निवडुंग जशी
नाही मायेचा ओलावा
अश्रू पिऊन वाढले
दुःखाची काटेरी शाल
अंगावरून ओढले
कित्येक युगे संपून गेली
एकसारखेच होते दाखले"[१०]

असाच स्वर त्यांच्या स्पंदन याही कवितेतून डोकवताना दिसतो ती कविता खालील प्रमाणे आहे पहा,

"आयुष्याचा नाही भरोसा म्हणून
स्पंदन तपासून बघावी लागतात
मरणाच्या प्रतीक्षेतच आम्हाला
जीवनाच्या यातना भोगावे लागतात
चालरिती या सैतान बनवून
रोज आम्हाला छळत असतात
कित्येक निरापराध जीव येथे
जिवंतपणी जळत असतात
परंपरेच्या नावाखाली जीवनाच्या
सगळ्याच वाटा बंद होतात
अंधाऱ्या कोठडीतच आम्हाला
शेवटचे श्वास मोजावे लागतात
जिवंतपणीच्या जाणिवा संपतात
जेव्हा काळजावर घाव बसतात
दुखऱ्या आठवणींचे क्षण डंख
मारून असतात"[११]

छाया बेले यांच्या वाट्याला लहानपणी संघर्ष आला आणि लग्नानंतर ही संघर्ष वाढत गेला त्या या संघर्षाला प्रतिकार करतात आणि जीवनाची नवी वाट चोखाळताना दिसतात त्यांच्याजवळ असणारा संयम त्यांना या संघर्षाला हरवण्यासाठी साथ देतो आणि त्या आयुष्याच्या आणि एका अस्तित्वाच्या लढाईत विजयी होतात त्यांची संघर्ष ही कविता पहा,

"आगीची त्यास भीती कशाला
जन्मताच ज्याच्या हाती निखारे ?

वादळास या रोखतील कसे
वाहणारे हे जगाचे उलटे वारे ?
तळाशीच नाव थांबवली ही माझी
हिणवणार काय मला हे किनारे ?
तुमच्याशी युद्ध जिंकले मी आता"[१२]

## निष्कर्ष:--

१ स्त्री अस्तित्वाच्या मूल्यांचा शोध जाणवला
२ स्त्रीच्या भावनिकपणाचा पदर उघडला
३ या कविता संग्रहाणे स्त्रीच्यावादाच्या कक्षा रुंदावल्या आहेत
४ भाषा आणि आशय संपन्नता काव्यातून पूजाघर होते
५ स्त्री वेदनेचा गाभा म्हणजे हा कवितासंग्रह होय.
६ छाया बेले यांच्या आत दडलेली भूतकाळातील दुःखद भाव कंगोरे कवितेत जाणवतात
७ छाया बेले यांची कविता परिवर्तनाच्या वाटेवर जाताना दिसते
८ छाया बेले यांचा हा कवितासंग्रह मराठी कवितेला एका वेगळ्या उंचीवर नेतो व मराठी कवितेला समृद्ध करताना दिसतो
९ जीवनाचा आणि माणसाचा शोध कविता घेते.

## सारांश:--

छाया बेले यांचा लढाई अस्तित्वाची हा पहिलाच कवितासंग्रह समग्र स्त्री विश्वास च्या वेदना मांडताना दिसतो अनादी काळापासून भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आले आहे तिला समाजात माणूस म्हणून किंमत शून्य देण्यात आली आहे छाया बेले यांनी स्त्रीची घुसमट तिच्या आत दळलेली भावनिक हळवी स्री उभी केली आहे त्यांच्या काव्यात वेदनेचा निखारा आला आहे पुरुषप्रधान संस्कृतीला धक्का देण्याचे काम त्यांनी कवितेतून केले आहे स्त्री ही या विश्वाची निर्मिती आहे आणि या निर्मितीला माणूस म्हणून स्वीकारावे हीच भूमिका त्यांच्या काव्यातून ठळकपणे आपणाला दिसते

## संदर्भ ग्रंथ:--

१) लढाई अस्तित्वाची, छाया बेले ,साद प्रकाशन औरंगाबाद ,पहिली आवृत्ती ,२०१२पृष्ठ क्रमांक ,१६
२) तत्रैव, पृष्ठ क्रमांक,२४
३) तत्रैव, प्रष्ठ क्रमांक,३५
४) तत्रैव,पृष्ठ क्रमांक, ३८
५) तत्रैव ,पृष्ठ क्रमांक,४३
६) तत्रैव ,पृष्ठ क्रमांक,५२
७) तत्रैव, पृष्ठ क्रमांक,५६
८) तत्रैव,पृष्ठ क्रमांक, ५८
९) तत्रैव,पृष्ठ क्रमांक, ६२
१०) तत्रैव,पृष्ठ,क्रमांक, ६८
११) तत्रैव,पृष्ठ क्रमांक, ७०
१२) तत्रैव, पृष्ठ क्रमांक, २८

❖❖❖

# ग्लोबल वार्मिंग आणि भारतापुढील आव्हाने

## Global warming and Challenges against India

प्रा. एन. व्ही. नरुले
(भूगोल विभाग प्रमूख)
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ.
संपर्क क्र. – ९९२३९०९२९६ Mail Id- narulenilkantha3@gmail.com

### सारांशः–

पृथ्वीवर सजीवांची निर्मिती झाल्यावर सर्वात शेवटी मनुष्य उत्क्रांत झाला. प्राथमिक अवस्थेत सभोवतालच्या पर्यावरणाशी समायोजन करुन मनुष्याने हळूहळू आपली प्रगती केली. आपल्या बुध्दीसामर्थ्यावर मनुष्याने अनेकविध शोध लावले व आपल्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणले. परंतु मनुष्याच्या वातावरणातील हस्तक्षेपामुळे झालेला सर्वात गंभीर दुष्परिणाम म्हणजेच वातावरणाचे प्रदूषण होय. मोठया प्रमाणावर केलेली जंगलतोड, वाढलेले औद्योगिकरण, वाढलेली वाहनांची संख्या यासारख्या अनेक कारणांमुळे वातावरणात विविध हानिकारक द्रव्ये मिसळली जातात. त्यामुळे वातावरणाचे संघटन बिघडते. प्लॅस्टिक सारख्या हजारो वर्षे विघटित न होऊ शकणाऱ्या वस्तू, अनेक इलेक्ट्रानिक्स वस्तू यामुळे सुध्दा वातावरणाचे प्रदूषण होत आहे, म्हणूनच पृथ्वीच्या सरासरी तापमानात वाढ होताना दिसून येते. यालाच आपण ग्लोबल वार्मिंग असे संबोधतो. म्हणूनच ग्लोबल वार्मिंग आणि भारतापुढील आव्हाने हा विषय घेतलेला आहे.

### बीजसंज्ञाः–

पर्यावरण, तापमान, औद्योगिकरण, जंगलतोड, ग्लोबल वार्मिंग.

### प्रस्तावनाः–

पृथ्वीच्या सरासरी तापमानातील अलिकडच्या दशकातील वाढ आणि भविष्यात होणारी वाढ ही संज्ञा ग्लोबल वार्मिंग व मानवी संबध स्पष्ट करते. पृथ्वीच्या भूपृष्ठाचे व सागरजलाचे तापमान नजिकच्या काळात झपाट्याने वाढत आहे. १९०५ ते २००५ या कालावधीत पृथ्वीची सरासरी तापमान वाढ ०.७४ ते १.३३ फॅ. इतकी दिसून येते, याचाच अर्थ हरितगृह वायुत मोठया प्रमाणात झालेली वाढ होय.

पृथ्वीच्या तापमान वाढीसाठी काही नैसर्गिक कारणेही जबाबदार आहेत, तरी मानवाच्या विविध क्रिया हे तापमान वाढीचे महत्वाचे कारण आाहे. वातावरणातील कार्बन डाय आक्सॉईड वायुच्या वाढीमुळे सुर्याची उष्णता पृथ्वीच्या पृष्ठभागाकडे मोठया प्रमाणात पोहचते, हरितगृहांमधून जास्तीत जास्त प्रमाणात कार्बन डाय आक्सॉईड वातावरणात सोडला जातो. त्याचबरोबर इंधनाचे ज्वलन कोळशाचे ज्वलन या क्रियातूनही कार्बन डाय आक्सॉईड वातावरणात सोडला जातो. ज्यामुळे वैश्विक तापमान वाढ झालेली आहे.

तापमानातील वाढ जर याच प्रमाणात होत राहिली तर सागराच्या हालचाली, रोगप्रसार, शेतीची नापिकी या समस्या मोठया प्रमाणावर उद्भवतील.

''विविध नैसर्गिक व मानवी कृतींमूळे भूपृष्ठाच्या व सागरजलाच्या सरासरी तापमानात होणारी वाढ जी सर्व सजीवसृष्टीच्या विनाशास कारणीभूत ठरते. यालाच ग्लोबल वार्मिंग अथवा वैश्विक तापमान वाढ असे म्हणतात.''

### ग्लोबल वार्मिंगची कारणेः–

आपली पृथ्वी ही अनेक वायुंच्या आवरणांनी आच्छादलेली आहे. ज्यामध्ये नायट्रोजन ८१ टक्के, ऑक्सिजन २१ टक्के असे प्रमाण आहे. याशिवाय पृथ्वीवर कार्बन डाय आक्सॉईड व मिथेन या वायुंचेही अस्तित्व आहे. जे ग्रीन हाउस गॅसेस म्हणून ओळखले जातात. खालील कारणे वैश्विक तापमान वाढीसाठी कारणीभूत आहेत.

१) उर्जा निर्मिती केंद्रातून निघणारा कार्बनडाय आक्सॉईड.
२) विमानातून निघणारा कार्बनडाय आक्सॉईड.

३) इमारतींची रचना.
४) मिथेन.
५) वातावरणातील पाण्याची वाफ.
६) नायट्रस आक्सॉईड.
७) वाळवंटीकरण.
८) शहरातील वाहतूक कोंडी.
९) वातावरणातील व समुद्रातील कार्बनडाय आक्सॉईड.
१०) गोठित मृदा.
११) टुंड्रा प्रदेश.
१२) क्लोरोफलुरोकार्बन व ओझोनचे क्षरण.
१३) हरितगृह परिणाम.

## ग्लोबल वार्मिंगचे परिणामः—

मानवजातीच्या व पृथ्वीच्या विनाशासाठी 'ग्लोबल वार्मिंग' हे एक महत्वाचे कारण ठरेल व त्याचे परिणाम पुढील घटकांवर दिसून येतील. 'ग्लोबल वार्मिंग' चा परिणाम पिकांच्या वाढीवर, हवामानाच्या स्थितीवर, समुद्र पातळीवर, बर्फाच्या वितळण्यावर आणि वैश्विक हवामानावर दिसून येईल. खालील परिणाम वैश्विक तापमान वाढीमुळे निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे.

१) रोगांचा प्रसार.
२) उष्ण सागरजलाच्या लाटा.
३) हिमनद्यांचे वितळणे.
४) जागृत ज्वालामुखीच्या संख्येत वाढ.
५) भूकंपाच्या संख्येत वाढ.
६) वातावरणावर परिणाम.
७) तापमाण वाढ
८) हवामान बदल.
९) शेतीवरील परिणाम.
१०) स्थलांतर.
११) विकासावरील परिणाम.
१२) जैविक व्यवस्थेवरील परिणाम.
१३) जल सुरक्षेवरील परिणाम.

## भारतापुढील आव्हानेः—

जगातील सर्वात मोठी लोकशाही, सर्वाधिक लोकसंख्या असलेले दुसऱ्या क्रमांकाचे विकसनशील राष्ट्र, झपाटयाने होणारा विकास, व वाढती लोकसंख्या यामुळे पर्यावरणाच्या समस्यांकडे वाटचाल करणारे राष्ट्र ही आपली ओळख आहे.

मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या 'ग्लोबल वार्मिंग' या महत्वाच्या पर्यावरण प्रश्नाकडे इ.स. १९९२ साली रियो इथे भरलेल्या 'आंतरराष्ट्रीय पृथ्वी परिषद' मध्ये प्रथम विचार प्रगट करण्यात आलेत. ग्लोबल वार्मिंग विरोधात उभे राहण्यासाठी भारताला पुढील महत्वाच्या समस्यांना तोंड द्यावे लागेल.

### १) नुतनीकरणक्षम उर्जासाधनांच्या वापरासाठी प्रयत्नः—

भारतातील ग्रामीण भागात आजही इंधन म्हणून लाकडांचा वापर केला जातो. ज्यामुळे कार्बनडाय आक्सॉईड सारखे ग्लोबल वार्मिंग वाढवणारे वायू उत्पन्न होतात. सौरउर्जा, पवनउर्जा, बायो—डिझेल, इत्यादीपासून उर्जा निर्मिती भारतात सध्या तरी खर्चिक आहे. उर्जेचा दरडोई खर्च कमी करण्यासाठी नुतनीकरणक्षम साधनांचा प्रचार प्रसार करणे गरजेचे आहे.

२) पडीक जमिनीचा विकास:—

भारतात हजारो हेक्टर जमिन आजही पडीक अवस्थेत आहे. तर काही भागात स्थंलातरीत शेतीसाठी वृक्षतोड होत आहे. हा विरोधाभास दूर करण्यासाठी पडीक जमिन जास्तीत जास्त उत्पादनक्षम करण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

३) वनीकरण:—

प्रदुषणमुक्त पर्यावरणासाठी किमान ३३ टक्के जमिन वनांखाली असणे गरजेचे आहे. भारतात सध्या २३ टक्के जमिन वनांखाली आहे. ही तफावत दूर करण्यसाठी केवळ शासकीयच नाही तर सामाजिक स्तरावरुन प्रयत्न व्हायला हवेत. वृक्षतोड थांबविणे अत्यंत गरजेचे आहे, आणि वृक्ष लागवड करणे ही महत्वाचे आहेत.

४) अधिवासांचे रक्षण:—

वनक्षेत्र कमी झाल्यामुळे वनांवर अवलंबून असणाऱ्या प्राण्यांचे, पक्ष्यांचे अधिवास नष्ठ होत आहे. त्यामुळे ते इतर ठिकाणी स्थंलातरीत होत आहेत, ज्यामुळे अन्नसाखळी धोक्यात येत आहे. प्राण्यांच्या व पक्ष्यांच्या अधिवासांचे रक्षण हे आज भारतासमोरील एक आव्हान आहे.

५) जलव्यवस्थापन:—

भारतातील पर्जन्याचे वितरण असमान आहे. इथे ओला व कोरडा दुष्काळ एकाचवेळी अनुभवता येतो. वाहून जाणाऱ्या पाण्यांचे योग्य व्यवस्थापन करुन दुष्काळाचा सामना करणे जलव्यवस्थापनाची मोठी समस्या अलिकडच्या काळात उद्भवणार आहे. शास्त्रज्ञांचे हवामानाचे अंदाज चुकत आहेत ही 'ग्लोबल वार्मिंग' च्याच भयानकतेची सुरुवात म्हणायला हरकत नाही.

६) शिकार प्रतिबंध:—

शिकारीमुळे वनक्षेत्र व प्राणीजीवन ध्योक्यात येत आहे. कधी शिकार वृक्षतोड करण्यासाठी केली जाते तर कधी हौस म्हणून, परिणाम मात्र वनक्षेत्र व प्राणीजीवन दोन्ही धोक्यात येत आहे. आजही मोठयाप्रमाणावर शिकार होते ती पूर्णपणे थांबविणे गरजेचे आहे.

७) लोकसंख्याा वाढीवर नियंत्रण:—

इतर क्षेत्रात भारत विकसनशील असला तरी लोकसंख्यावाढ या क्षेत्रात मात्र आघाडीवर आहे. भारताची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १३० कोटीच्या जवळपास पोचली आहे. भारतातील सर्व समस्यांचे मूळ लोकसंख्यावाढ हेच आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी प्रदुषण वाढत आहे. त्यामुळे लोकसंख्यावाढीवर नियंत्रण आजचे महत्वाचे आव्हान आहे.

८) पर्जन्य विभागांचे स्थलांतर:—

वनक्षेत्रांचा ऱ्हास, प्रदुषण यामूळे भारतातील पर्जन्य विभाग प्रभावित झालेले आहेत. हे पर्जन्य विभाग नजिकच्या काळात स्थंलातरीत होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. पर्जन्याचे वितरण असमान असेल तर पिकपध्दती व लोकसंख्या वितरणावर परिणाम होतो.

९) पूर, दुष्काळ व सागरी लाटा:—

हिमालयातून उगम पावणाऱ्या नद्यांना मोठया प्रमाणावर हिमनद्यांपासून जलपुरवठा होतो. ग्लोबल वार्मिंगमुळे या हिमनद्या अधिकाधिक वितळतील व उत्तर भारतात मोठे पूर येतील. दक्षिण भारताला तिन्ही बाजूने सागराने वेढलेले आहे. सागरजलाच्या पातळीतील वाढ किनारपट्टयावर मोठा आघात करु शकेल. त्यामुळेच 'ग्लोबल वार्मिंग' विरोधी आघाडीत भारताने सामिल होणे गरजेचे आहे.१०) कृषीयोग्य जमिनीचा ऱ्हास:—

वाढते मरुस्थलीकरण, महापूर, इत्यादींमुळे कृषीयोग्य जमिन झापाटयांने कमी होत आहे, व त्यातच भर म्हणजे उत्पादन वाढीसाठी चुकीच्या सिंचनपध्दती, रासायनिक खतांचा बेसुमार वापर, जलसंधारणाची कमतरता इत्यादींमुळे कृषीयोग्य जमिनीचा ऱ्हास होत आहे. हा ऱ्हास टाळणे हे महत्वाचे आव्हान आहे.

११) पर्यावरण शिक्षण:—

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले आहे. विकासाच्या अनेक वाटा चोखाळत असतांना अनेक पर्यावरण समस्या देखील उद्भवल्या आहेत. या समस्यांना तोंड देण्यासाठी पर्यावरण विषयाचा अंतर्भाव अभ्यासक्रमात केला आहे. पर्यावरण शिक्षणासाठी अधिक व्यापक स्वरुपात प्रयत्न करणे आजची गरज आहे.

## निष्कर्ष:—

ग्लोबल वार्मिंग मुळे अनेक समस्या निर्माण होवू पहात आहे. भारताचा विचार केल्यास भारत हा जगाच्या तुलनेत हरितगृह वायू केवळ ५ टक्के उत्सर्जीत करतो, तरी भारत झपाटयाने विकसीत होणऱ्या राष्ट्रांमध्ये आघाडीवर आहे. भारतातील प्रदुषणात होणारी वाढ लक्षणीय आहे. भारताचा ग्लोबल वार्मिंग वाढीतील वाटा वाढण्याआधी सावध होवून भारतातील प्रत्येक नागरिकाने पावले उचलायला हवीत.

## संदर्भ सूची :—


| | |
|---|---|
| पर्यावरणशास्त्र — | ए. भरूचा, ऑरिएंट लॉगमन |
| पर्यावरणशास्त्र— | प्रा. डॉ. सुर्यवंशी, श्री. विद्या प्रकाशन, पुणे. |
| पर्यावरण प्रदुषण— आणि ग्लोबल वार्मिंग | श्री. रमेश बालवाड, विद्याभारती प्रकाशन, लातूर. |
| पर्यावरण शिक्षण— | प्रा. नीला पाथरे, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर. |
| पर्यावरण समस्या— | डॉ. श्रीकांत कार्लेकर, डायमंड पब्लिकेशन, पुणे. |
| पर्यावरण अभ्यास— | डॉ. सुरेश फुले, विद्याभारती प्रकाशन, लातूर. |


❖❖❖

# कुष्ठरोगी आणि आदिवासी यांच्या जडणघडणीतील क्रांतीसूर्य - थोर समाजसेवक बाबा आमटे

**प्रो. डॉ. बाळासाहेब शेळके**
मराठी विभाग प्रमुख
मराठी अध्ययन व संशोधन केंद्र
रा.ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर 9405553512

**प्रास्ताविक:**

महाराष्ट्र हे समाजसुधारकांचे राज्य म्हणून ओळखले जाते. या महाराष्ट्रामध्ये थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर छत्रपती राजश्री शाहू महाराज महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व कर्मवीर भाऊराव पाटील या सर्वांनी दीन, दलित बहुजन समाजाला शिक्षण देऊन त्यांना समाजात माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून दिला. जे शिक्षण मूठभर वर्गापुरते मर्यादित होते, शिक्षणाचा अधिकार सर्वसामान्यांना नव्हता असे शिक्षण या पीडित समाजाला या समाजसुधारकांनी दिल्यामुळे त्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश आला या प्रकाशामुळेच १८ विश्व दारिद्र्यात कितपत पडलेला व गुलामीचे जीवन जगणारा हा बहुजन समाज माणूस म्हणून जगू लागला याचे सर्व श्रेय हे वरील समाज सुधारकांना जाते.

वरील समाज सुधारकांप्रमाणेच महाराष्ट्राच्या मातीत थोर समाजसेवक बाबा आमटे यांचा जन्म झाल्यामुळे कुष्ठरोगी आणि आदिवासी यांच्या जीवनाला माणूसपणाचे रूप आले. बाबा आमटे यांच्या आयुष्यात आले नसते तर या समाजाचे जीवन उध्वस्त झाले असते .'कुत्र्याच्या जीवणाला तरी रया आहे, पण माणसाच्या जीवनाला अजिबात रया राहिली नाही. ही वस्तुस्थिती कुष्ठरोगी आणि आदिवासी यांच्या बाबतीत होती, पण बाबा आमटे यांनी त्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून दिला. अशा या महामानवाचा जन्म २६ डिसेंबर १९१४ रोजी महाराष्ट्राच्या वर्धा जिल्ह्यात हिंगणघाट येथे एका सणातनी कुटुंबात झाला. लहानपणापासूनच आई-वडिलांचे त्यांच्यावर उत्तम संस्कार झालेले आहे. वडिलांपेक्षा आई नेहमी त्यांना आपल्यातील आत्मविश्वासाचे बळ किती प्रबळ असते हे नेहमी सांगायची म्हणून ती त्याला म्हणते'अरे आयुष्यात असेच पराभवाचे भुईसपाट होण्याचे प्रसंग येतील ,पण भीऊ नकोस, शरम वाटून घेऊ नकोस ,हरले तरी माणसासारखे लढणे हेच जीवनाचे दुसरे नाव आहे'आईची संस्कारित ही शिकवण बाबा आमटे यांना पुढे भविष्यकालीन वाटचालीत लाख मोलाचे ठरली आहे. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतीनिकेतनला भेट दिली होती .या भेटीतील सर्व अनुभव त्यांनी जवळून पाहिले होते. याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिगत जीवनावर फार मोठा झालेला होता. पुढे वडिलांच्या आग्रहामुळे त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला, परंतु या वकिली व्यवसायात त्यांना फारसा रस नव्हता कारण या व्यवसायात सर्वसामान्यांना न्याय मिळत नव्हता. म्हणून त्यांनी वकिली व्यवसायाचा धिक्कार करून समाजसेवेचा मार्ग अवलंबिला. यामध्ये महात्मा गांधीजींची प्रमुख प्रेरणा त्यांना कारणीभूत ठरलेली आहे. कुष्ठरोगी व आदिवासी यांची सेवा करण्यासाठी बाबा आमटे यांनी आपले संपूर्ण आयुष्य त्यासाठी खर्च केले. यामध्ये त्यांची सौभाग्यवती पत्नी साधनाताई आमटे यांनी त्यांना फार मोठी साथ दिली. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या संत तुकारामांच्या म्हणीप्रमाणे आज तागायत बाबा आमटे यांच्या तीन पिढ्या चार

दशकापासून कुष्ठरोगी आणि आदिवासी यांची अविरत सेवा करत आहे. त्यामध्ये पहिली पिढी बाबा आमटे व साधनाताई, दुसरी पिढी विकास आमटे, डॉ.प्रकाश आमटे, डॉ.मंदा आमटे, डॉ. भारती आमटे, तिसरी पिढी श्री. कौस्तुभ, डॉ. दिंगत,डॉ. अनघा, डॉ. शितल श्री.अनिकेत या सर्वांनी समाजसेवेचा वसा स्वीकारलेला आहे.

## १. श्रम हेच प्रभावी मूल्य:

श्रम हेच प्रभावी मूल्य बाबा आमटे यांनी आपल्या आयुष्यामध्ये मानलेले आहे. कारण आपले हात हे उगरण्यासाठी नसून उभारण्यासाठी असतात. आणि या हातानेच समाजाची उभारणी करायची असते. म्हणून वकिली व्यवसायाचां त्याग केल्यावर प्रथम बाबा आमटे यांनी रस्त्यात रखरखत्या फुफाट्यात पडलेल्या कुष्ठरोग्याला आपल्या खांद्यावर उचलून घरी आणले. त्याला आंघोळ घातली स्वच्छ केले आपल्या हाताने त्याला अन्नाचे घास भरविले 'जनसेवा हीच ईश्वर सेवा 'हे वृत्त त्यांनी मनापासून मानले. महार मांग, चांभार ,ढोर ,कोष्टी, आदिवासी या सर्व जाती जमातींच्या लोकांना त्यांनी एकत्रित करून त्यांची सेवा तर केलीच ,पण त्याचबरोबर श्रमाचे महत्त्व त्यांना पटवून दिले. बाबा आमटे यांनी नेहमीच समाजाचा विचार केला नोकरीची त्यांना मिळणारी पेन्शन सुद्धा त्यांनी कुष्ठरोगी आणि आदिवासी यांच्यासाठी खर्च केली. परंतु त्यातील एक पैसा देखील त्यांनी आपल्या स्वतःच्या मुलांबाळासाठी खर्च केलेला नाही. श्रमाचे महत्व त्यांनी आपल्या मुलांना देखील पटवून दिले .म्हणून पुढे मेडिकलचे महाविद्यालयीन शिक्षण घेताना ही दोन्ही मुले वर्धा व नागपूर या ठिकाणी आश्रमात राहून पडेल ती कामे करून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. बाबांनी आपल्या आयुष्यामध्ये जातीपातीला कधीच थारा दिला नाही. जात-पात तोडण्याच्या प्रयोगामुळे बाबांचे सर्व नातलग नाराज झाले. त्यामुळे बाबांनी आपल्या वडिलोपार्जित संपत्ती वरील हक्क सोडून दिला होता. कमाईचे साधन नव्हते म्हणून त्यांनी महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्या साहित्य ग्रंथाची विक्री केली. दिवसभर हिंडूनही पैसे मिळत नव्हते. १८ घंटे काम करूनही योग्य तो आर्थिक लाभ मिळत नव्हता, तरीही बाबा खचले नाही. शेतीत पिकलेला भाजीपाला देखील बाबांनी बाजारात विकला. त्यासाठी साधनाताई यांनी भाज्यांच्या टोपल्या विणण्याचे काम देखील केले होते. श्रम हा बाबांच्या जीवनाचा मूलमंत्र होता. त्यांनी अपार कष्ट घेऊन विहिरी खोदल्या जमिनीची मशागत केली .नांगर धरला आणि साधनाताईंनी पेरणी केली. त्यांनी कुष्ठरोगाबद्दलची सविस्तर माहिती व प्रशिक्षण घेऊन निर्भयपणे कुष्ठरोग्यांची सेवा सुरू केली. त्यामुळे त्यांच्या मुलांना निर्भयतेचे धडे आपोआपच मिळाले. महारोगांच्या ढासळलेल्या आत्मविश्वासावर व पुरुषार्थावर उपचार केले. तसेच आपल्या मुलांनाही त्या वातावरणात ताऊन सुलाखून उत्तम डॉक्टर करून दाखवले. मातृत्वाच्या विशाल भावनेने अनाथ मुलांनाही प्रेम देऊन आनंदवनात गोकुळ निर्माण केले .स्वतः साधनाताई या गोकुळाची माता आहेत. सहसंवेदना हा आनंदवन रहिवाशांचा धर्म आहे .आणि हीच आमटे कुटुंबाची शिकवण देखील आहे. प्रत्येक मोठ्या पुरुषांच्या जीवनात व कर्तृत्वात स्त्रीचा फार मोठा वाटा असतो. हे साधनाताईंच्या बाबतीत तंतोतंत खरे ठरले आहे. कारण त्यांनी बाबांच्या जीवन साधनेत केवळ हातभार लावला नाही, तर त्यांना प्रेरणा देण्याचे कार्य केले आहे. बाबांसारख्या बेभान माणसाला दिशा देण्याचे बिकट काम त्यांनी केले आहे .त्यांच्या प्रत्येक जीव घेणे आजारात साधना ताईंना अनेक संकटांना सामोरे जावे लागले आहे. पण त्यांची ईश्वरनिष्ठा समाज निष्ठा व पतीनिष्ठा त्यांना आगळेच मानसिक बळ देऊन जाते. हे साधना ताईंच्या कर्तुत्वातून दिसून येते.

## २. समाजसेवेची प्रेरणा:

कोणतीही व्यक्ती ही परिस्थितीच अपत्य असते .ज्या परिस्थितीत ती जन्मते ,जगते, अनुभवते, उपभोक्ते त्याचा परिणाम त्या व्यक्तीवर होत असतो. त्याचबरोबर माणसाला कोणतीही गोष्ट करण्याला

काहीतरी प्रेरणा ह्या कारणीभूत ठरत असतात .थोर समाजसेवक बाबा आमटे यांना सुद्धा अनेक प्रेरणा कारणीभूत ठरलेल्या आहेत. कुष्ठरोग्याच्या बाबतीत बोलायचे झाले ,तर कुष्ठरोगी हा समाजात जगत असताना त्याला कोणीच जवळ करत नव्हते. जन्म देणारी मुलं सुद्धा त्यांना सांभाळत नव्हती. या महारोग्याची घृणा ही जगाच्या इतकीच जुनी आहे. माणूस म्हणून त्याला कोणीच जगू देत नव्हते, पण जेव्हा या दुर्धर रोगाने विकलांग झालेल्या परचुरे शास्त्रींना महात्मा गांधींनी जवळ केले. आपल्या कुटीजवळ निवारा दिला. तेव्हा त्यांनी समाजाच्या करुणेच्या कुशीत दुर्दैवी महारोग्याला स्थान मिळवून दिले .म्हणून बाबा आमटे यांची मूळ प्रेरणा ही महात्मा गांधी आहे. कारण त्यांचीच प्रेरणा घेऊन बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांची सेवा अविरतपणे चालू ठेवली. महात्मा गांधींच्या प्रेरणेप्रमाणेच बाबा आमटे यांना विनोबा भावे यांची देखील प्रेरणा प्रमुख कारणीभूत ठरलेली दिसते. बाबा म्हणतात 'विनोबा हे गांधीजींच्या एक पाऊल पुढेच होते 'म्हणून त्यांच्या प्रेरणेने बाबांनी कुष्ठरोग्याच्या प्रत्यक्ष सेवेला आरंभ केला होता. एकदा बाबा विनोबांना भेटण्यासाठी गेले तेव्हा विनोबा म्हणाले," बाबा ,तुम्ही कवी ,लेखक की सेवक?. यावर बाबा म्हणाले, "मी शेतकरी आहे" विनोबा म्हणाले खरंच आहे, तुम्ही शेतकरी आहात म्हणूनच उत्तम साहित्य लिहू शकता व पुढे म्हणाले ,"इतकी संकटे, दुःखे सहन करूनही तुमच्या चेह-यावर हास्य कसे ?"बाबा म्हणाले, "तुमच्याच गीताईचे दूध प्यालो आहे, त्यावरच पोसलो आहे, तेच वारे कानात शिरले आहे," यावरून बाबा आमटे यांच्यात विनोबांची प्रेरणा कशी नसानसात भिणलेली होती याचा साक्षात्कार या ठिकाणी होतो.

## ३. कुष्ठरोग्यांसाठी आनंदवनाची निर्मिती:

जन्मदात्यांनी आणि समाजाने कुष्ठरोग्याना वाळीत टाकल्यामुळे या कुष्ठरोग्याला कोणीच आधार देत नव्हते ,त्यामुळे या कुष्ठरोग्याच्या हालआपेष्ठा पहावत नव्हत्या. म्हणून बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्याना जिथे माणूस म्हणून वागणूक मिळेल, अशा ठिकाणी आनंदवनाची निर्मिती केली. मुळातच बाबा आमटे हे अतिशय सदन व उच्च  श्रीमंत घराण्यातील असून देखील त्यांनी कधी कुष्ठरोग्यांचा तिरस्कार केला नाही. १९४२ साली महात्मा गांधींचे विचार ऐकून ते पूर्णपणे बदलले आणि तेव्हापासून कुष्ठरोगी हा त्यांच्या जीवनाचा जिवलग घटक बनला. कुष्ठरोग्याना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार बाबा आमटे यांनी मिळवून दिला आहे. म्हणून बाबा आमटे हे केवळ बोलके समाज सुधारक नव्हते, तर कृतीप्रवण महापुरुष होते .हे त्यांच्या कार्यातून आपल्या लक्षात येते. त्याचबरोबर कुष्ठरोग्यांचा धिक्कार करणाऱ्-या समाजाला त्यांनी हे निक्षून सांगितले की ,कुष्ठरोग हा संसर्गजन्य रोग नाही. त्यामुळे कुष्ठरोग्याना माणूस म्हणून जगू द्या. अशी कळकळीची विनंती बाबांनी समाजाला केली होती, पण तरीदेखील त्यांच्या या बोलण्याचा समाजावर काहीच परिणाम झाला नाही. श्रीमंतीचा बाबा आमटे यांना कधीच गर्व नव्हता. स्वतः त्यांनी डोक्यावरून मैला देखील वाहिला आहे .सर्व जाती-धर्मांच्या मुलांबरोबर ते जगत राहिले. पुढे हेच संस्कार घेऊन डॉ.प्रकाश व विकास यांनी कुष्ठरोग्यांची सेवा सुरू केली. हा समाजसेवेचा वसा त्यांनी मनापासून स्वीकारला. कुष्ठरोग्यांसाठी काम करणे म्हणजे फक्त त्यांची सुश्रुषा करणे ,त्यांच्यावर उपचार करणे, एवढेच बाबांना अपेक्षित नव्हते ,तर कुष्ठरोग्यांचा जो आत्मविश्वास खचला होता. तो त्यांना परत मिळवून द्यायचा होता. आपणही सर्वसामान्यांसारखे काम करू शकतो. पैसे मिळवू शकतो. सामान्य आयुष्य जगू शकतो .हे त्यांना पटवून द्यायची गरज होती ,पण हे फार कठीण काम बाबांनी स्वतः ताकतीने पेलले आहे. त्यांनी कुष्ठरोग्यांना सहानुभूती दाखवली नाही, पण प्रेमाने विश्वास मात्र त्यांना दिला. त्यामुळेच आज आनंदवन उभे राहू शकले. असे आपल्याला ठामपणे सांगावे

लागते. आनंदवन या नावापूर्वी संस्थेची स्थापना १९४९ रोजी महारोगी सेवा समिती या नावाने झाली होती ,पण आधीच कुष्ठरोगी समाजातून बहिष्कृत समजून त्यांच्यावर शिक्का मारल्यासारखे व्हायचे, हे बहिष्कृतपण पुसून टाकण्यासाठी बाबा आमटे यांनी आश्रमाला आनंदवन हे नाव दिले. हे आनंदवन पूर्वी माळरान होते. दगड धोंड्यांनी व्यापलेली जागा होती, पण बाबांनी साधना ताईंनी व प्रकल्पावरच्या लोकांनी कष्ट करून ही जागा स्वच्छ केली होती .कुष्ठरोग्यांमध्ये राहून बाबांनी काम सुरू केले होते. त्यामुळे समाजाने आमटे कुटुंबियांना देखील बहिष्कृत ठरविले होते. अशा स्थितीत प्रकाश व विकास यांना अतिशय खडतर प्रवास करावा लागला. पण ते जरा भी डगमगले नाही. विषारी साप ,वाघ, विंचू, अस्वल, हरीण, मगर हे सर्व प्राणी त्यांचे मित्रच बनले होते. परिस्थितीच माणसाला शहाणपण शिकवते. याचा ज्वलंत अनुभव आमटे कुटुंबाला आनंदवनामध्ये आला होता.

पुढे १९५५-ते ५६ सालीआनंदवनात दोन कॅम्प झाले .या कॅम्पमध्ये २२ देशातून कार्यकर्ते आले होते .येथील सर्व परिसर पाहून त्यांनी आनंदवनात कौलारू घरे बांधून दिली. जेवढी मदत करता येईल तेवढी मदत त्यांनी केली. त्याचबरोबर बाबा आमटे यांनी आलेली रक्कम सर्व आनंदवनासाठी वापरली .एवढेच नव्हे, तर कोरगावकर ट्रस्ट तर्फे बाबांना जे १५० रुपये मानधन मिळायचे ते सुद्‌धा त्यांनी आपल्या मुलांच्या चैनीसाठी न वापरता कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी वापरले .स्वतःच्या मुलांना चैनी परिस्थिती असून देखील उंची वस्त्र, उंची पकवाने त्यांनी कधीच दिली नाही .भात, पोळी ,भाजी असे साधे जेवण त्यांच्या कुटुंबांचे असायचे .याचा अर्थ त्यांच्याकडे आर्थिक सुबत्ता नव्हती ,असे नाही सुबत्ता होती, पण ती त्यांनी चांगल्या कामासाठी वापरली आहे .आनंदवनामध्ये पिकलेला भाजीपाला ते स्वतः बाजारामध्ये विक्रीला आणायचे, पण हा भाजीपाला कुष्ठरोग्यानी पिकवला असल्यामुळे तो भाजीपाला कोणी खरेदी करत नव्हते. कारण कुष्ठरोग्यांचा स्पर्श त्या भाजीपाल्याला झाल्यामुळे तो भाजीपाला तसाच शिल्लक राहायचा. आपल्या दोन्हीही मुलांचे प्राथमिक शिक्षण त्यांनी आनंदवनातच केले. हे शिक्षण कुष्ठरोग्याच्या सहवासात झाले. बाबांचा विश्वास देवावर कधीच नव्हता, तो फक्त कर्मावर होता.आनंदवनाला देणगी म्हणून येणारा पैसा बाबांनी अतिशय काटकसरीने वापरला. कधीच उधळपट्टी केली नाही .लोकांनी आपल्यावर विश्वास टाकून दिलेला हा सार्वजनिक पैसा आहे .त्याचा विनीयोग योग्य रीतीनेच झाला पाहिजे, असा बाबांचा विचार होता .आणि हाच त्यांचा विचार पुढे प्रकाश व विकास यांच्यामध्ये खोलवर रुजलेला आहे.

बाबा आमटे हे महान प्रयोगवीर आहेत .माझ्या देहात महारोग्याची लस घालून पहा म्हणून बाबा आमटे यांनी निर्भयपणे आपले शरीर सामोरे केले .आणि ती लस टोचून घेतली. एका माणसाने दोन लहान मुले बायको असणा-या व्यक्तीने दाखवलेले हे धाडस खरोखरच अपूर्वअसे होते, की बाबांच्या जीवनातील ही एक अद्‌भुत घटना होती. आयुष्यातील फक्त फावल्या वेळी महारोगांविषयी विचार करणारा सामान्य माणूस अशा नुसत्या कल्पनेने सुद्‌धा भयभीत होतो, पण बाबांची कुष्ठरोग्या विषयांची सेवा ही खरोखरच उल्लेखनीय होती. ते महारोग्याला शरीराने व मनाने बरा करायचे त्यांची करुणा रोग्याचे पांगळे पण सुरक्षित ठेवण्यापूर्ती मर्यादित नाही, तर महारोग्यामध्ये जगण्याची इच्छा, आत्मविश्वास निर्माण व्हावा म्हणून झटणारी आहे.'निरोगी शरीरात निरोगी मन' ही आपली पारंपारिक धारणा बाबांनी दूर सारली व रोगी ,शरीर आणि निरोगी मन झालेल्या या महारोग्याकडून सुद्‌धा समाजाने शिकावे अशी परिस्थिती निर्माण केली. शरीराचा नव्हे, तर समाजाचा मनाचा महारोग अधिक भयंकर आहे यावर बाबांचा पूर्ण विश्वास आहे. अशा या बहिष्कृत कुष्ठरोग्याला प्रेम, ममता, जिव्हाळा ,आपुलकी देण्याचे काम बाबा आमटे यांनी केले आहे.

बाबा आमटे यांच्या सेवेचे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे ते महारोग्यानाच महारोग्याची सेवा करण्यास शिकवितात. हळूहळू जुने रोगी बरे होतात व नव्यांची सेवा करू लागतात. महारोगी म्हणून दाखल झालेला माणूस दोन-तीन वर्षांनी परिचारक म्हणून काम करू लागतो. त्यांच्यासाठी बाहेरून येणा-या पगारदार नोकरांची गरज भासू नये अशी बाबांची प्रमुख धारणा होती. बाबांच्या सेवा व करुणा या शब्दांना नवा अर्थ देण्याच्या कल्पनेमुळेच लोक त्यांना वंदनीय समजतात. या सेवेचे स्फूर्तीस्थान मानतात. बाबांची ही क्रांतिकारी भूमिका महारोग्याना व सामान्य जनतेला सुद्धा प्रेरणादायी वाटणारी आहे.' त्यांच्या दृष्टीने आपल्या देशात आदिवासी आगर कुष्ठरोगी यांची सेवा म्हणजे केवळ पुनर्वसन नव्हे, तर निराशेचे असेच रूपांतर करण्याचे ते अभियान आहे. एक नुसता माणूस म्हणून नव्हे, तर समाजातील एक सक्रिय घटक म्हणून बाबांनी महारोग्याला समाज जीवनात ताठ मानेने जगायला शिकवले.

आनंदवनातील बरे झालेल्या महारोग्यांना बाबा आमटे यांनी शेती कशी पिकवायची याचे उत्तम धडे दिले. जमिनीची मशागत कशी करायची, बीज पेरणी कशी करायची, अवजार कशी हकायची ,ही सर्व कामे बाबांनी स्वतः त्यांच्याबरोबर केली. त्यामुळे हळूहळू महारोगी शेती उत्तम पिकू लागला. त्यामुळे बाबा आनंदी झाले महारोगी सोने पिकू शकतो. ही बाबांची इच्छा फलदायी ठरली. रोग्याच्या चेह-यावरील आनंद पाहून बाबांनी देखील आपल्या या प्रकल्पाचे नाव आनंदवनच ठेवले. आनंद वनातील शेतात कापणीला आलेले पहिले पीक पाहून बाबांना फार मोठा आनंद झाला .यावर कुष्ठरोगी बाबांना म्हणाले, 'बाबा आम्हाला वाटत होते हातापायाची बोटे जडली, की फक्त मरायचंच शिल्लक राहतं ,पण तुम्ही आमच्या हातातून सोनं पिकविले. खरोखरच तुम्ही धन्य आहात. १९५४ पासून आनंदवन सर्व तऱ्हेने फळूफुलू लागले. तेथे तेलघाणी सुरू झाले. आनंदवनाचे स्वरूप असे पालटतच गेले .हिरवीगार शेते भाज्यांचे घनदाट वापरे, फुला फळांची झाडे ,खणलेल्या विहिरी, झोपड्यांची दाट वसाहत महारोग्याच्या पुनर्वसनासाठी मूलभूत व प्राथमिक गरजांबाबत असलेली दक्षता. सारे विलक्षण वाटतच होते ,पण त्यातल्या त्यात कुष्ठरोग्यांची वेगळी मनवृत्ती बघून नजर हरकून जात होती. आपल्या कुरुपतेबद्दल होणारी हेळसांड, शोक याचा मागमूस दिसत नव्हता. रोग्यानी आपल्यातले सर्वस्व देण्याची  धडपडच तिथे दिसून येत होती. रोग्याची आपापसातील सहानुभूती पाहून बाबांना फार बरे वाटत होते. म्हणून बाबा म्हणतात आनंदवनाने खरोखरच महारोग्याचे व्यक्तिमत्व घडविले होते. त्यांचे माणूसपण जागे केले होते. हे मान्यच करावे लागते. बाबा आमटे यांचे कुष्ठरोग्यांबाबतचे हे कार्य पाहून त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले या पुरस्काराला उत्तर देताना ते म्हणाले,' कुष्ठरोग्याला माणूस म्हणून समान वागणूक व प्रतिष्ठा मिळणे हा त्याचा अधिकार आहे. त्याचा यंत्र म्हणून उपयोग करणे गुन्हा आहे .म्हणूनच एखाद्या कुष्ठरोग्याच्या चेह-यावर व्यक्त होणारा आनंद, त्यांचे हास्य हाच माझा पुरस्कार आहे.' असे ते ठामपणे सांगतात .याच आनंदवनाची जबाबदारी पुढे बाबा आमटे यांनी आपला मुलगा डॉक्टर विकास आमटे व सून डॉक्टर भारती आमटे यांच्यावर सोपविली होती. आणि ही जबाबदारी या दोघांनी उत्तमपणे पुढे सांभाळलेली आहे.

## ४. आदिवासींसाठी हेमलकसामध्ये लोकबिरादरी प्रकल्पाची उभारणी:

बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्याच्या सामाजिक सेवेबरोबरच डोगर दऱ्याखो-यातील आदिवासी साठी देखील महत्त्वाचे काम केले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा या ठिकाणी त्यांनी आदिवासींसाठी २३ डिसेंबर १९७३ रोजी लोक बिरादरी प्रकल्पाची स्थापना केली. हा प्रकल्प उभा करण्यामागची भूमिका म्हणजे 'आदिवासींना मुख्य प्रवाहात आणावं, त्यांची पिळवणूक थांबावी, आणि त्यांना माणूस म्हणून जगण्याची संधी मिळवून द्यावी' हा एकमेव उद्देश बाबा आमटे यांचा होता. हा प्रकल्प जेव्हा सुरू झाला तेव्हा येथील

आदिवासी खूप मोठ्या संकटात सापडलेला होता. भामरगडच्या जंगलापलीकडचे जग त्यांना माहीत नव्हते, जगाच्या चालीरीती कायदे कानून त्यांच्या ओळखीचे नव्हते, वाहणा-या नद्या व जंगली जनावरे यांच्या आवाजापलीकडे तिसरा आवाज या भागात ऐकू येत नव्हता, जगापासून तुटलेल्या या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम बाबा आमटे यांनी केले. त्यामुळे आज हेमलकशाला चाळीस खाटांचे हॉस्पिटल आहे. तिथे उपचार घ्यायला लोक लांबून येतात. इथल्या आदिवासींची मुलं आज शिकून बाहेरच्या जगात जाऊन नोकऱ्या करत आहेत. येथे हिरवीगार शेती पिकते, येथील जंगलाला पक्षांच्या किलबिलाटांना व माणसांच्या चाहूलिने त्याला चैतन्य आले आहेत. दळणवळणाच्या साधनांनी हेमलकसा व बाकीचे जग यामध्ये एक पूल बांधला गेला आहे. सगळा प्रवास अंधाराकडून उजाडाकडे असा होता. इथला आदिवासी जेव्हा ख-या अर्थाने स्वयंपूर्ण होईल, त्याला इतरांच्या कुठल्याच मदतीची गरज पडणार नाही, तेव्हाच इथलं काम पूर्ण होईल असं आमटे परिवारांना सारखं वाटत होतं.

हेमलकसा या ठिकाणी बाबा आमटे यांनी आदिवासींसाठी आपले अविरत काम चालू ठेवले या कामांमध्ये त्यांना प्रकाश आमटे यांनी खूप मोठी साथ दिली. यानंतर पुढे बाबा आमटे यांनी या हेमलकशाची जबाबदारी प्रकाश आमटे व त्यांची पत्नी मंदा आमटे यांच्यावर सोपविली होती. नुकतेच दोघांचे लग्न झाल्यावर त्यांना त्या ठिकाणी बाबा आमटे यांनी पाठवले होते. या दोघांना कोणताच अनुभव या ठिकाणी नव्हता परंतु बाबांचे संस्कार आणि आदिवासींची सेवा करण्यासाठी स्वीकारलेले व्रत यामुळे प्रकाश व मंदा यांना या ठिकाणी आदिवासींसाठी काम करताना फार संकटांना तोंड द्यावे लागले. इथली संपूर्ण जागा बाबांनी व त्यांच्या सहका-यानी स्वच्छ केली इथला परिसर म्हणजे नुसतं घनदाट जंगल मोठमोठी झाडी सूर्यप्रकाश कधीच आत येत नाही, फक्त वन्य प्राण्यांचे व नद्यांचे पाण्याचे आवाज साप व विंचू यांचे अस्तित्व पावला पावलावर गाव शहरापासून पूर्ण तुटलेले, प्रकल्प उभा करण्याच्या दृष्टीने अतिशय प्रतिकूल हा भाग होता. आरोग्यसेवा नाही. अशा खडतर परिस्थितीत येथे काम करणे फार अवघड होते. शिवाय आजूबाजूला माणसं नाही.वीज नाही ,पाणी नाही ,राहायची जागा नाही ,होत फक्त जंगल आणि त्यात लपून बसलेले आदिवासी व प्राणी होते.' यावरून हेमलकशातील वस्तुस्थितीचा आवाका लक्षात येतो. बाबांच्या संस्काराची प्रेरणा घेऊन हेमल कशामध्ये जगन मचकले ,दादा पांचाळ, विलास मनोहर, गोपाळ फडणीस, शरद कुलकर्णी, मुकुंद दिक्षित ,जगदीश गोडबोले, ही सर्व कार्यकर्ते मंडळी आपले छोटे-मोठे उद्योग व नोकरी सोडून या ठिकाणी आली होती. हे सर्वजण या जंगलात झोपडी करून राहिले. सर्वकाही शून्यातून निर्माण करायचे होते .आनंदवनातील बरे झालेले कुष्ठरोगी हेमल कशाच्या मदतीसाठी बाबांनी पाठवले होते. या सर्वांनी या ठिकाणी खूप मेहनत केली .उदा.खोदाई करणे ,कच्चे रस्ते तयार करणे, झाडाझुडपं तोडणे या ठिकाणचे हवामान एकदम टोकाचे उन्हाळा खूप कडक ,थंडी खूप, पावसाळा धो धो असा हा भाग होता .हेमलकसा हे उंचावरचे ठिकाण होते. पावसाळ्यात एकमेकांच्या गाठीभेटी चार ते सहा महिने होत नव्हत्या. हेमलकशात एकदा आलेला माणूस नैसर्गिक संकटामुळे बाहेर पडत नव्हता. अशा या भयावह स्थितीत बाबा आनंदवनातून हेमलकशात यायचे यासाठी डोंगे किंवा होडी याचा वापर केला जायचा. या सर्वांचे जीवन आनंदवनावर अवलंबून होते .कारण येथे कोणत्याच सोयीसुविधा नव्हत्या ,जीवनावश्यक लागणाऱ्या सर्व वस्तू त्यांना आनंदवनातून मिळत होत्या .धान्य ,सामान, भाजीपाला ,औषध इत्यादी आनंदवनाच्या मदतीशिवाय हेमलकसा चालू शकत नव्हतं .या ठिकाणचे आदिवासी पिकवलेले धान्य खायचे नाहीत ,तर कंदमुळे आणि प्राणी मारून खाणं हाच त्यांचा आहार होता. या ठिकाणी कुठलाही सणवार नाही .साधी पोळी देखील इथे खायला मिळत नव्हती .वरण भातावर जगाव लागायचे.

हेमलकसा या ठिकाणी सर्वांना अस्वस्थ करणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्यांच्यासाठी या जंगलात आमटे परिवार व सहकारी आले होते, ते आदिवासी जराही उभे राहत नव्हते. यामध्ये त्यांची काहीच चूक नव्हती. कारण त्यांच्या भाषा कळत नव्हत्या. आपली भाषा त्यांना समजत नव्हती. त्यांची भाषा शिकल्याशिवाय त्यांच्याशी जवळीक साधता येत नव्हती. म्हणून आदिवासींची भाषा ही या ठिकाणी सर्व कार्यकर्त्यांना शिकावी लागली. गोंड आणि माडिया भाषांचा आदिवासींना समजावण्यासाठी आधार घ्यावा लागला. येथील आदिवासींचे मुख्य आजार म्हणजे मलेरिया, सेरीब्रल हे होते. तसेच झाडावरून पडून हातपाय मोडणे सर्पदंश व आस्वालाच्या हल्ल्यात जखमी होणे, हे नेहमीचे आजार होते. माडिया व गोंड अंगावर फारसे कपडे वापरत नाही. कमरेला बांधलेला एक फडक ,लहान मुले तर नागडीच ऊन वारा व थंडीत त्यांचा हाच पोशाख होता .आदिवासींचा हा पोशाख पाहून प्रकाशला गहिवरून आले. आणि त्यांनी सुद्‌धा स्वतः हाफ पॅन्ट आणि बनियन घालायला सुरुवात केली. आदिवासींमध्ये अंधश्रद्‌धेचे फार मोठे खूळ होते. त्यांच्या आजारावर रामबाण उपाय म्हणून प्रत्येक जण मांत्रीकाकडे अंगारे धुपारे करून यायचा. येतील पेशंटच्या जखमा पाहत नव्हत्या .या जखमांमध्ये आळ्या व पु होणे हे नित्याचेच होते. पंधरा ते वीस किलोमीटर अंतरावरून पेशंट जोडीच्या साह्याने प्रकल्पावर आणली जात होती आदिवासींचा प्रकल्पावरचा विश्वास वाढवण्यासाठी पेशंटला बरे करणे ही फार मोठी जबाबदारी प्रकाशवर होती. कंदीलाच्या उजाडात आदिवासींवर उपचार केले जात होते. पेशंट बरे होण्याचे प्रमाण वाढल्यामुळे पेशंटची संख्या वाढत गेली .पेशंट प्रकल्पावर मुक्काम करू लागली. पेशंट कडून उपचारासाठी एक पैसाही घेतला जात नव्हता. औषध मोफत दिली जात होती. डॉक्टर मंदा यांनी या कामात फार मोठी भर घातली त्यांनी बँडेज तयार केले .त्याचबरोबर येथील महिलांसाठी गाऊन शिवून दिले. त्याचबरोबर येथील सर्व आदिवासीं पेशंटचे रेकॉर्ड मेंटेन केले. माडिया आणि गोंड ही जमात जास्त मागासलेली होती. त्यांना शिक्षणाचा गंध नव्हता .दारिद्र्य व दुःख त्यांच्या पाचवीला पुजलेले होते. माडिया पापभीरू, प्रामाणिक व निरागस आहेत, पण त्यांना दारू व तंबाखूचे मोठे व्यसन होते .अशा अवघड प्रसंगी त्यातून त्यांना बाहेर काढण्याचे काम बाबा आमटे व प्रकाश यांनी केले. येथे सरकारी शाळा फक्त कागदोपत्री होत्या. कोणीच त्यांना शिक्षणाचे धडे देत नव्हते ,पण प्रकाश आणि त्यांच्या सहका-यानी या आदिवासी मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. आपल्याच कुटुंबातील त्यांना घटक मानले. शेवटी कष्टाचे चीज झाले. कारण स्विसएड या परदेशी कंपनीने व तिच्या कार्यकर्त्यांनी हेमलकशाची वस्तुस्थिती पाहून फार मोठी आर्थिक मदत केली. त्यामुळे हेमलकशात पक्की घरे, दवाखाने निर्माण झाले .आता पावसाळ्यात सुद्‌धा पेशंटला चांगला निवारा मिळू लागला.खेड्यापाड्यातली सर्व आदिवासी उपचार घेण्यासाठी लोकबिरादरी प्रकल्पावर येतहोती.म्हणून प्रकाश म्हणतो आता खऱ्या अर्थाने हेमलकशाने मला स्वीकारले आहे.

हेमलकशात बालमृत्यूचे प्रमाण खूप होते .कारण बाळाला जन्म देणारी आईच अनिमिक होती. गरोदरपणात या महिलांना कधीच विश्रांती मिळत नव्हती ,परंतु प्रकल्पावर दवाखाना झाल्यामुळे या अडलेल्या महिला प्रकल्पावर मुक्काम करू लागल्या. त्यांना हक्काचे दवाखान्यारूपी घर मिळाले होते. लोक बिरादरीचा प्रकल्प त्यांना आपला असा वाटू लागला. येथील डॉक्टर त्यांना आई-वडील वाटू लागले. पुढे वैद्‌यकीय सेवेचा विस्तार प्रकल्पावर वाढत चालला होता .दररोज शंभर पेशंट या ठिकाणी यायची. दिवस रात्र कुठल्याही क्षणी पेशंटला बघितले जायचे कधीच सुट्‌टी न घेतल्यामुळे आमटे परिवारांवर खूप ताण पडायचा ,पण याबाबत त्यांनी कुठेच तक्रार केली नाही. वैद्‌यकीय सेवेचा विस्तार करण्यामध्ये नागपूरच्या तज्ञ डॉक्टरांचा आणि अमेरिकेतील रोटरी क्लबचा फार मोठा वाटा आहे. आदिवासींसाठी या ठिकाणी दरवर्षी कॅम्प घेतले जायचे या कॅम्पमध्ये ३०० ते ४०० डॉक्टर् लोक बिरादरी प्रकल्पाशी जोडले गेले होते.१५० ते

२०० शस्त्रक्रिया या ठिकाणी केल्या जात होत्या. आदिवासींची सेवा करत असताना आमटे परिवारावर जीवावर बेतणारे अनेक प्रसंग आले पण त्यातून ते सुखरूप बाहेर पडले. आमटे परिवाराने हेमलकशामध्ये आदिवासींसाठी फक्त आरोग्यसेवाच दिली नाही, तर आदिवासींच्या परिवर्तनासाठी शाळेची देखील त्यांनी या ठिकाणी स्थापना केली. माडिया ,गोंड, भिल्ल, कातकरी, कोळी या सर्व आदिवासी समाजातील मुलांना त्यांनी शिकवले, त्यामुळे आदिवासी यांच्यामधील अंधश्रद्धा भोळी समजूत दूर झाली .त्यांच्यामध्ये नव आचार विचारांचे परिवर्तन होण्यासाठी त्यांना शिक्षण देणे ही काळाची गरज होती. हे केले तरच, ते माणूस म्हणून जगेल अन्यथा जंगली प्राणी व त्यांच्यात काहीच फरक पडणार नाही.  हे ओळखून तेथे शाळा सुरू करण्यात आली. अज्ञानामुळे येथील आदिवासींचे लवकर लग्न व्हायची त्यामुळे येथील तरुण-तरुणी लवकरच आजोबा आजी बनलेले असायचे. कुपोषण आणि मोहाची दारू यामुळे त्यांचा चेहरा व आयुष्य सुरकुतलेले होते. पिढ्यान पिढ्या याच अवस्थेत येत होत्या .ही जाणीव ठेवून या ठिकाणी शाळेचे उभारणी करण्यात आली. शिक्षणाच्या माध्यमातून येथील मुलांना जंगला पलीकडचे जग दाखवायचे होते. या शिक्षणामुळे आदिवासी पाड्यातील कन्नामडावी, पांडुरंग पुंगाटी,कोमटी दुर्वा, सुधाकर हे सगळे डॉक्टर झाले.  यानंतर पुढे काहीजण शिक्षक झाले, काही फॉरेस्ट अधिकारी झाले, काही वकील, तर काही वेगवेगळ्या क्षेत्रात नोकरी करू लागले .शाळेमुळे या आदिवासी मुलांचे जीवनच बदलून गेले.

आदिवासींना  शिक्षणाबरोबरच आधुनिक शेती कशी करायची याचे देखील शिक्षण आमटे परिवाराने त्यांना दिले. शेती पिकवून अन्न मिळवणे ही पद्धत त्यांना माहीत नव्हती. जमीन कशी नांगरायची ,बी कसे पेरायचे, फळभाज्यांची लागवड कशी करायची, याचे कोणतेच ज्ञान त्यांना नव्हते. तेल व पीठ हे पदार्थ त्यांच्या जेवणात कधीच आले नाही. गाईचे दूध काढणे त्यांच्यात निसिद्ध मानले जात होते. त्यामुळे त्यांच्या जेवणात कधी दूध आलेच नाही. स्वतःच्या अन्नासाठी माडियांनी जसे खूप प्राणी मारले तसेच अंधश्रद्धेपोटी प्राण्यांचे बळी घेतले .या दोन्ही कारणामुळे जंगलातले प्राणी संपत चालले होते. याचा परिणाम अन्न कमी झाले आणि अन्न कमी झाल्यामुळे त्यांच्यातील कुपोषणाचे प्रमाण वाढत गेले .त्यांना चांगला आहार मिळणे जरुरीचे होते. म्हणून आमटे परिवाराने येथील आदिवासींना शेती ,भाजीपाला कसा पिकवायचा हे प्रथम शिकवले. यासाठी धान्य बँक उघडली. या बँकेमार्फत आदिवासींना बीज पुरवण्यात आले. त्यामुळे सुधारित भाताच्या उत्पन्नात वाढ झाली. त्यांच्या हातात रोख पैसे येऊ लागले. पोषक आहाराची सोय झाली. आणि दुसरे म्हणजे वन्य प्राण्यांची हत्या थांबली. नंतर बी बियाणे आदिवासींना शासनाकडून मिळू लागली. त्याचबरोबर व्यापारी लोकांकडून येथील आदिवासी लोकांची फसवणूक व होणारी लुबाडणूक देखील प्रकाश आमटे यांनी थांबविली. थोडक्यात आदिवासींच्या कल्याणासाठी जे जे प्रयोग ,ज्या ज्या गोष्टी करण्यासारख्या आहे ,त्या त्या सर्व गोष्टी आमटे परिवाराने आदिवासींसाठी केल्या .त्यामुळे आदिवासींचा उत्तम प्रकारे सर्वांगीण दृष्ट्या विकास होत गेला.

बाबा आमटे यांनी हेमलकशामध्ये उभारलेला हा लोकबिरादरी प्रकल्प शून्यातून उभा राहणारा प्रकल्प आहे. आमटे यांच्या तीनही पिढ्यांनी या प्रकल्पाला मोठे योगदान दिले आहे. या प्रकल्पाची सुरुवात पहिली तर हा प्रकल्प येथे विकसित करणे अतिशय अवघड काम होते .सगळ्या गोष्टीचे नाटक करता येते ,पण पैसा या घटकाचे नाटक करता येत नाही .या प्रकल्पाला आर्थिक मदत मिळण्यासाठी किती कसरती करावी लागल्या. त्याचबरोबर येणारे नैसर्गिक संकटे देखील किती ताकतीने पेलावे लागली याचा प्रत्यय येथे काम करताना त्यांना आलेला आहे. या सामाजिक कामाची प्रचिती सर्व दूर पोहोचल्यामुळे आमटे परिवारांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले त्यामध्ये मॅगसेस पुरस्कार हा पुरस्कार आशियाचा नोबेल म्हणून ओळखला जातो .त्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली आहे .कुसुमाग्रज पुरस्कार, पद्मश्री पुरस्कार,

या विविध पुरस्कारामुळे हेमलकशातील आदिवासींची जगाला ओळख झाली. हेमलकशातील लोक बिरादरी प्रकल्प हा खरोखरच जगन्नाथाचा रथ होता. अनेकांचे मदतीचे हात या रथाला लागले आहे. चंद्र जसा कले कलेने वाढत जातो तसा हा प्रकल्प आर्थिक मदत करणाऱ्यांच्या रूपाने वाढत होता. याचे सर्वस्वी श्रेय बाबा आमटे यांना जाते.

## ५. बाबा आमटे यांच्या सामाजिक कार्याचा समारोप:

कुष्ठरोगी आणि आदिवासी यांच्याबाबतचे बाबा आमटे यांचे सामाजिक कार्य शब्दात व्यक्त होणारे नाही. या कार्याची उंची पहाडा एवढी आहे. हे मान्य करावे लागते. बाबा आमटे यांच्या तीनही पिढ्यांनी यामध्ये फार मोठे योगदान दिलेले आहे .त्यांच्या कार्याचे मूल्यमापन अवाक्या बाहेरचे आहे. त्यांची आदिवासी समाजाविषयीची तळमळ, त्यांची भविष्यकालीन स्वप्न, त्यांच्या मुलांनी जिद्दीने व कष्टाने सत्यात उतरून दाखविली आहे. स्वतः श्रम केल्याशिवाय श्रमजीवी लोकांची दुःख कळत नाही. ऊन व सावलीतला भेद समजत नाही .याची बाबांना जाणीव होती. या संस्काराचे बीजारोपण त्यांच्या मुलांमध्ये झालेले आहे. 'मोठ्या वृक्षाजवळची छोटी झाड वाढत नाही. असं म्हणतात, पण इतके कर्तुत्ववान वडील असूनही दोघं मुलं आमच्या पद्धतीने काम करू शकलो, याचे श्रेय बाबांचे आहे'. आदिवासींच्या सामाजिक कार्याविषयी प्रकाश म्हणतो, 'आमचं अजून काम बाकी आहे, आदिवासी आता स्वतंत्र होतोय, पण त्याला बाहेरून येऊन कोणी मदत करण्याची गरज भासणार नाही. इतका तो स्वयंपूर्ण व्हावा. अशी इच्छा आहे .त्याला वाटेवर आणून सोडायचे काम आम्ही केलेच, पुढची वाटचाल जेव्हा तो निर्भयपणे, आत्मविश्वासाने, स्वतःच्या बळावर करेल, तेव्हा इथलं काम पूर्ण झालं असं मला वाटेल' प्रकाशचे हे विधान आदिवासी समाजाबाबत योग्य मूल्यमापन करणारे आहे. बाबा आमटे यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन समग्र आहे. तसाच तो उपयुक्तता व सौंदर्य या दोन्हींचा समतोल साधणारा आहे. सामाजिक कार्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय ,राष्ट्रीय ,प्रादेशिक स्तरावर पुरस्कार, सन्मान मिळाले ,पण बाबा कधी गर्वाने फुलून गेले नाहीत, सारे पुरस्काराचे पैसे त्यांनी आनंदवनला देऊन टाकले. आणि नम्रतेने सांगितले ,की हा सन्मान आनंदवनाच्या रहिवाशांनी केलेल्या पराक्रमाचा, त्यांच्या समृद्ध जीवनाचा हा सन्मान आहे. यातून बाबांचे विचार किती आकाशाएवढे होते याची जाणीव होते. 'कुष्ठरोगी आणि आदिवासी यांना माणूस म्हणून जगण्याची नवी उर्मी, नवी संजीवनी देणारे बाबा आमटे हे खरोखरच त्यांच्या जीवनातले आदर्श क्रांतीसुर्य होते हे त्यांच्या कार्यातून सूचकतेने स्पष्ट झाले आहे'.

## ६. संदर्भ व टिपा:

१. डॉ.प्रकाश आमटे- प्रकाशवाटा, समकालीन प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे.
२. डॉ. तुषार चांदवडकर -प्रकाशवाटा स्वरूप आणि चिंतन, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
३. डॉ. अतुल चौरे -प्रकाश वाटा: एक आकलन, अक्षर वाङ्मय प्रकाशन, पुणे.
४. तारा धर्माधिकारी- बाबा आमटे, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली.

❖❖❖

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या साहित्यातील जीवनमूल्ये

**डॉ. दुष्यंत शिंदे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख,
आझाद महाविद्यालय, औसा,
ता. औसा, जि. लातूर 9421366782

19 व्या शतकात आधुनिक भारताच्या जडणघडणीत ज्या महत्वाच्या सुधारकांनी आपले योगदान दिले त्यात महर्षी रामजी शिंदे यांचा उल्लेख आदराने करावा लागतो. त्यांच्या समकालीन महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, नारायण लोखंडे यासारख्या समाजधुरिणांनी आपापल्या परीने तत्कालीन परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. समाजातील जातीसंस्था, अस्पृश्यता, बालविवाह, बहुपत्नीत्व, विधवांचे केशवपन, सती प्रथा, वर्णव्यवस्था, आर्थिक, सामाजिक, धार्मिक जीवनातील कमालीचे शोषण यासारख्या कितीतरी अनिष्ट रूढी प्रथांचा त्यांनी आपल्या कृती, उक्ती आणि लेखनातून वाचा फोडली. महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केलेले प्रयत्न वादातीत आहेत. प्रस्तुत लेखात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत दिलेले योगदान तसेच त्यांनी लिहिलेल्या साहित्यातून अभिव्यक्त जीवन मूल्यांचा सारांश रुपाने विचार करू.

## उद्दिष्टे -

1. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे जीवन थोडक्यात समजून घेणे.
2. त्यांनी केलेले समाज सुधारणावादी कार्याचा आढावा घेणे.
3. त्यांनी लिहिलेल्या साहित्यातील जीवन मूल्यांचा विचार करणे.

## गृहितके -

1. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे योगदान वादातीत आहे.
2. त्यांचे साहित्य समकालीन सुधारणावादी विचार व कार्याचे फलित आहे.
3. समकालीन तसेच सद्यकालीन समाजसुधाणेच्या दृष्टीने त्यांचे लेखन अत्यंत महत्त्वाचे आहे.

## विषय प्रवेश -

आदिम काळापासून मानवी जीवनमूल्य पायदळी तुडविणारी यंत्रणा समाजजीवनात प्रचलित आहे. आधुनिक काळात या शोषण यंत्रणेस छेद देऊन पुन्हा नव्याने समाजाची बांधणी करणारे समाज सुधारक पुढे आले. विठ्ठल रामजी शिंदे त्यापैकीच एक होते. पुढीलप्रमाणे त्यांनी केलेल्या कार्य तसेच लेखनाचा संक्षेपाने विचार करू.

## अ) जीवनपट -

23 एप्रिल 1873 रोजी जामखंडी संस्थान जिल्हा विजापूर येथे त्यांचा जन्म झाला. त्यांना एकूण वीस भावंडं होती त्यातील केवळ पाच जगली. त्यापैकी एक भाऊ आणि तीन बहिणी होत्या. मुळात विठ्ठल रामजी शिंदे यांचे घराणे श्रीमंत होते. पण आई वडील साधू, बैरागी यांच्या नादी लागल्यामुळे कामधंदा सोडून ते कर्मकांडाच्या मागे लागले. परिणामी हळूहळू गरीबी येत गेली. विठ्ठल रामजी शिंदे यांना

शिक्षणासाठी प्रचंड कष्ट उपसावे लागले. विद्यार्थिदशेत त्यांच्याकडे पुस्तक घेण्याइतकी ऐपत नसल्यामुळे ते मित्रांच्या पुस्तकावर अभ्यास करत. ते अतिशय बुद्धिमान, हुशार असल्यामुळे जवळपास प्रत्येक परीक्षेत ते चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत. 1898 मध्ये विठ्ठल रामजी शिंदे बी.ए. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. मराठी, संस्कृत, इंग्रजी या विषयाचा त्यांनी विशेष अभ्यास केला. आपल्या वैचारिक भूमिकेबाबत खुद्द विठ्ठल रामजी शिंदे नमूद करतात, "माझ्या घरी आई वडिलांनी जे संस्कार माझ्यावर घडवले तेथेच माझ्या कार्याचा योग्यप्रकारे पाया घातला गेला. म्हणूनच यावर उभी असलेली इमारत टिकू शकली."[1] आपल्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीचे श्रेय त्यांनी आपल्या आई वडिलांनी केलेल्या संस्कारांना दिले आहे, हे इथे स्पष्टपणे दिसते.

## ब) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची ग्रंथसंपदा -

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारांवर महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, मॅक्समुलर तसेच प्रार्थना समाजाच्या मूलतत्वाचा त्यांचा विचार व कार्यावर प्रभाव होता. घरचे वातावरण वारकरी संप्रदायाचे असल्यामुळे बालपणापासूनच त्ये त्यांच्यावर तसे संस्कार झाले. इथूनच धर्मभावनेचा आदर केल्याशिवाय भारतीय समाजाची पुनर्बांधणी होऊ शकत नाही, अशी त्यांची पक्की धारणा होत गेली. आपल्या 'माझ्या आठवणी व अनुभव' या आत्मचरित्रपर पुस्तकात त्यांनी याबद्दल लिहिले आहे. 'धर्मभावनाही माझ्या चरित्राचा आत्मा आहे व माझ्या आयुष्याची दिशा त्यामुळे बदलली. धर्मभावना हीच सर्व कर्तृत्वाच्या मुळाशी असते.'[2] सामाजिक कार्य, राजकारण किंवा धर्म ह्या सांस्कृतिक बाबतीतील मूलभूत गोष्टींच्या प्रतिपादनामागे धर्मभावना असतेच असे त्यांचे स्पष्ट मत होत गेले. परिणामी त्यांच्या लेखनात धर्मचिंतनाला विशेष प्राधान्य असण्याचे हेच मुख्य कारण आहे.

1. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न
2. History of parihars
3. माझ्या आठवणी व अनुभव
4. भागवत धर्माचा विकास
5. मराठ्यांची पूर्वपीठिका
6. कानडी मराठी संबंध
7. कोकणी मराठी संबंध [3]

उपरोक्त त्यांची ग्रंथसंपदा आहे. तत्कालीन समाज, भाषा, धर्म अशा कितीतरी मूलभूत विषयांना त्यांनी हात घातला आहे. मुळातच तत्वज्ञान, भाषा, इतिहास हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय होते. आपल्या ग्रंथामध्ये त्यांनी एका चिकित्सकाच्या भूमिकेतून विचार मांडले आहेत. विशेषत्वे ग्रामीण भागात अशिक्षित समाजात कर्मकांड, अंधश्रद्धा, अज्ञान, परंपराप्रियता, पाप पुण्य अशा खुळचट कल्पनांना अधिक प्राधान्य होते. धर्माच्या नावाखाली प्रचलित असलेले ब्रह्मप्राबल्य अधिक होते. त्याला कमी करण्यासाठी त्यातील फोलपणा स्पष्ट करणारी सैद्धांतिक मांडणी करून त्यांनी धर्मशास्त्राचे खरे स्वरूप समाजासमोर मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यांच्या दृष्टीने धर्म नाकारून सुधारणा करण्यापेक्षा धर्म स्वीकारून त्यात उचित सुधारणा करून समाजात अपेक्षित बदल घडवून आणणे अधिक उपकारक होते.

## क) विठ्ठल रामजी शिंदे यांच्या लेखनातील जीवनमूल्ये -

भारतीय समाजजीवनात अस्पृश्यता, वर्णश्रेष्ठता याला अनन्य साधारण महत्त्व आहे. आदिम काळापासून ही यंत्रणा समाजजीवनात रूढ आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील ब्राम्हण तसेच उच्चवर्णीयवर्गाने

जातीय उतरंड टिकवून ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केला. त्यासाठी उपयुक्त ठरतील असे पूरक धर्मग्रंथ लिहिले. विविध व्रत - वैकल्य, पूजा विधी, सण समारंभ सांगून बहुजनांना सतत कर्मकांडात गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न केला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समाजाची ही अतिशय नकारात्मक, विषमतावादी बाजू सप्रमाण मांडून त्यात सुधारणा घडविण्याची गरज व्यक्त केली आहे.

1. होळीच्या सणास आलेले हिडीस स्वरूप, शिव्या देणे, दारू पिणे, अंगाला शेंदूर राख लावणे हे पूर्णपणे चुकीचे असून हे धर्माचे खरे रूप नसल्याचे त्यांनी व्यक्त केले.
2. मुरळी, जोगतीन, भावीण, देवदासी या प्रथा स्त्रीचे अस्तित्व नाकारतात. मुरळी प्रथा बंद करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.
3. शिक्षणाच्या बाबतीत मुलींची असलेलीअनास्था या सर्व अनिष्ट प्रथांचे मूळ आहे.
4. 16 ऑक्टोंबर 1906 रोजी All India Depressed Class Mission ची स्थापना ही घटना अस्पृश्यता निवारणाच्या कार्यातील अत्यंत महत्त्वाची बाब आहे.
5. अस्पृश्यांसाठी मंदिरप्रवेश हा क्रांतिकारी विचार मांडून त्यांनी पुण्याच्या पर्वती मंदिरात सर्वांना प्रवेश देण्यासाठी सत्याग्रह केला.
6. 13 ऑक्टोबर 1930 रोजी अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊन सत्याग्रह केला.
7. 'ज्ञानप्रकाश' अंकातून लिहिलेल्या लेखमालेत त्यांनी पुणे पालिकेने मुलींना सक्तीचे शिक्षण द्यावे असा ठराव पास करावा असे सुचवले आहे.
8. मद्यपानाची प्रथा बंद होण्यासाठी व्याख्याने दिली. दारूचा व्यापार बंदीसाठी सरकारकडे मागणी केली.
9. 1920 साली बहुजन पक्षाची स्थापना करून बहुजनांना राजकारणात प्रवेश दिला.

वरीलप्रमाणे त्यांच्या सामाजिक सुधारणांचा विचार करता येईल. 'महर्षी शिंदेंनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहून 1933 साली प्रकाशित केला. या ग्रंथात महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यतेच्या उगमापासून ते अस्पृश्यतेच्या निर्मूलनापर्यंत सर्व बाबींचे चिंतन केले आहे. हा ग्रंथ अस्पृश्यतेचा मांडणी करणारा भारतातील सर्वात पहिला अभ्यासपूर्ण ग्रंथ आहे.'[4] त्यांच्या एकूण लेखनातील हा अत्यंत महत्त्वाचे ग्रंथ आहे.

महर्षी शिंदे यांचा समकालीन महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता निवारणासाठी आपापले योगदान दिले आहे. महात्मा गांधींना वर्णव्यवस्था मान्य होती. सवर्णांच्या मनातून अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी हरिजन असा शब्द प्रयोग केला तर डॉ. आंबेडकर यांनी येथील समाजव्यवस्था शूद्र जनतेस त्यांचे न्याय हक्क सहज देणार नाही म्हणून शूद्रांना स्वतः आपल्या हक्क रक्षणासाठी संघर्ष करावा अशी मांडणी केली. या दोघांच्या तुलनेत अधिक सामंजस्याची भूमिका महर्षी शिंदे यांनी मांडली आहे. इथे तुसंनी धर्मभावनेचा आदर करून समाजातील सर्व प्रकारची विषमता नष्ट करण्याचा योग्य आणि सहज अनुकरणीय मार्ग सुचविला. गो. मा. पवार यांनी म्हटल्याप्रमाणे, "धर्म साधना करणे, धर्मप्रसार करणे आणि समाजाची धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक उन्नती करणे या गोष्टीचे त्यांच्या धर्मविचारांमध्ये ऐक्य झाल्याचे दिसते. महर्षी शिंदे यांनी केलेल्या सामाजिक सुधारणेला आणि लेखन कार्याला त्यांच्या उन्नत अशा धर्मभावनेचे अधिष्ठान होते असे दिसते."[5]

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक उन्नतीचा मार्ग त्यांनी धर्मभावनेच्या स्वीकारातून जातो असे त्यांना सुचवायचे आहे. परंपरेपासून महाराष्ट्रातील जनतेच्या मनावर धर्माचा असलेला पगडा पूर्णतः पुसून टाकून सुधारणा करणे शक्य होणार नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

कोणतीही टोकाची भूमिका न स्वीकारता त्यात समन्वय साधणे केव्हाही सोईचे असे त्यांना वाटत असे. या कारणामुळे त्यांचे विचार व कार्य इतर सुधारकांच्या बाबतीत काहीसे भिन्न आहे.

## ड) समारोप -

आधुनिक महाराष्ट्राच्या जडघडणीत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे योगदान उल्लेखनीय आहे. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ते समकालीन असून त्यांनी आपली स्वतंत्र समन्वयाची भूमिका मांडली, हे विशेष आहे. पुढील प्रमाणे काही महत्त्वाचे निष्कर्ष नोंदवू.

1. धर्मभावनेचा डोळसपणे स्वीकार करणे महर्षी शिंदे यांच्या लेखन, कार्य व विचाराचे मुख्य सूत्र होते.
2. मानवाच्या सांस्कृतिक उन्नतीसाठी आवश्यक इतिहास, धर्म, तत्वज्ञान, भाषा बाबतचे सखोल चिंतन त्यांच्या लेखनाचे प्राणतत्त्व आहे.
3. महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, मॅक्समुलर, महात्मा गांधी यांच्या विचार व कार्याचा प्रभाव त्याच्या व्यक्तिमत्त्वावर होता.
4. घरातील वारकरी संप्रदायाची परंपरा त्यांच्या धर्मभावनेच्या मुळाशी आहे.
5. त्यांनी धर्म स्वीकारला पण त्यातील कर्मकांड, अनिष्ट रूढी, प्रथा याला जोरकसपणे विरोध केला.
6. विज्ञाननिष्ठा हा त्यांच्या विचार आणि कार्याचा गाभा आहे.
7. अस्पृश्यता हा भारतीय समाजाला लागलेली कीड आहे. त्याचा शेवट झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही हा विचार केवळ भावनिक अंगाने नव्हे तर तात्त्विक अंगाने मांडला.
8. स्त्री शिक्षण, दारूबंदी, अस्पृश्याना मंदिर प्रवेश, मुरळी प्रथा बंदी, पूरग्रस्तांना मदत यासारख्या समकालीन महत्त्वाच्या विषयावरही त्यांनी आपले विचार मांडले आहेत.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचे स्वरूप एखाद्या नंदादीपासारखे संयमी आहे. मूलभूत विचारांची मांडणी करून समाजाला प्रगतीचा मार्ग आणण्याचा अनुकरणीय मार्ग त्यांनी स्वीकारला आहे. त्यांच्या विचार, लेखन व प्रत्यक्ष कार्यात कुठेही अभिनिवेश वा आक्रस्ताळेपणा आढळत नाही. एकूण आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य अत्यंत मोलाचे होते आणि आहे, यात शंका नाही. त्यांचे लेखन समकालीन धार्मिक, सामजिक, राजकीय, आर्थिक जीवन समजून घेण्यासाठी जितके महत्त्वाचे तितकेच ते भाषा आणि संस्कृती समजून घेण्यासाठी ही महत्त्वाचे आहे.

## संदर्भ सूची -


1. प्राचार्य डॉ. एस. एस. गाठाळ - आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारक - कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद - प्र. आ. जुलै 2018 - पृ. 91.
2. विठ्ठल रामजी शिंदे - माझ्या आठवणी व अनुभव - भाग 1, 2 व 3 - श्री लेखन वाचन भांडार, पुणे - 1958 - पृ. 67.
3. उनि. - आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारक - पृ. 93.
4. मा. प. मंगुडकर व इतर (संपा.) - भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न - विठ्ठल रामजी शिंदे - समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, मुंबई - 1976 - प्रस्तावना - पृष्ठ 7.
5. गो. मा. पवार - महर्षी विठ्ठल रामजी शिंदे: जीवन व कार्य - लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई - 2004 - पृ. 491.


❖❖❖

# बसव तत्त्वज्ञान आणि आचारधर्म

रुचिरा रमेशराव कापसे
यवतमाळ, महाराष्ट्र मो.क्र. ९४०४२४२५०४

महात्मा बसवण्णांनी स्थापन केलेल्या लिंगायत धर्माचे तत्वज्ञान अष्टावरण, पंचाचार आणि षट्स्थल या तीन घटकांमध्ये अंतर्भूत केलेले आहे. अष्टावरण म्हणजे अंग किंवा शरीर. पंचाचार म्हणजे प्राण आणि षट्स्थल म्हणजे आत्मा होय. वेगळ्या दृष्टीने विचार केल्यास अष्टावरण सामाजिक विभाग, पंचाचार नैतिक विभाग आणि षट्स्थल तात्विक विभाग आहे.

अष्टावरणाशी आपल्या अंतरंगातील सद्‌गुणांच्या विकासाची सांगड घातली आहे. या बाह्य अष्टावरणांव्दारे अंतरिक विकास साधला जातो. अंतरंगामध्ये गुरु म्हणजे ज्ञानोदय, लिंग म्हणजे त्या ज्ञानाचा अनुभव, जंगम म्हणजे त्या अनुभवातून निर्माण होणारा आनंद होय. विभूती म्हणजे शिवाचे तेज, रुद्राक्ष म्हणजे ज्ञाननेत्र आणि मंत्र म्हणजे शिवस्वरुपाचे ज्ञान होय. पादोदक म्हणजे करुणा व प्रसाद म्हणजे प्रसन्नता, अर्पण भाव होय. अष्टावरणामुळे समाज नीतिमान होतो आणि राष्ट्राचा विकास होण्यास मदत होते. म्हणून प्रत्येकाने या अष्टावरणाचे आचरण करावे.

अष्टावरण ही लिंगायताची धार्मिक आचारसंहिता होय. यामध्ये गुरु, लिंग, जंगम, विभूती, रुद्राक्ष, मंत्र, पादोदक आणि प्रसाद,या आठ आवरणांचा समावेश होतो. लिंगायत धर्मात वरील प्रत्येक आवरणाला वेगळे महत्व आहे. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वचन साहित्यातून वरील आवरणांचे आपल्या भाषेत स्पष्टीकरण देऊन त्या आवरणाचा मानवी जीवनाशी कसा संबंध आहे, तसेच या आठ आवरणांचे मानवी जीवनावर काय परिणाम होतात ते सांगितले आहे.

- गुरु :

भारतामधील धार्मिक इतिहासात गुरुला दिलेला गौरव हा प्राचीन काळापासून चालत आला आहे. महात्मा बसवेश्वरांनीही शिवशरणांनी गुरुचे असलेले श्रेष्ठ स्थान, महत्व मान्य केले आहे. गुरुउपदेशाशिवाय लिंगधारण व त्याची पूजाअर्चा भ्रष्ट आणि फोल ठरते म्हणून गुरुपदेश बसवण्णांनी महत्वाचा मानला. परंतु बसवेश्वरांना अपेक्षित असलेला गुरु मात्र मठात व पीठात बसून शास्त्र सांगणारा, मंत्र—तंत्राने सुख—दु:ख आणून देणारा नव्हता, तर ज्ञानी, सदाचारी मनुष्यांमध्ये भेद न मानणारा, स्वकायक करणारा व आपल्या कृतीने शिष्यांपुढे आदर्श ठेवणारा असा होता.

गुरु आपल्या आंतरिक अज्ञानाचा नाश करतो. गुरु हा ज्ञानी असावा. वचन साहित्याचे ज्ञान त्यांनी संपादन केले पाहिजे. गुरु कुठल्याही जातीचा असू शकतो, त्याला जातीचे बंधन नाही. ज्ञान क्रिया व आत्मज्ञानाची अनुभूती असलेल्यास गुरु होता येते, त्याची दृष्टी विशाल असावयास हवी. गुरु आपल्या शिष्यात उच्च—नीच, गरीब—श्रीमंत असा भेदभाव करीत नाही. त्याला केवळ आपल्या शिष्याच्या अंतरी असलेली शुद्‌ध भक्ती संपदा दिसावी.

नरजन्म नष्ट करुनी हरजन्म दिलेल्या गुरुराया
भवबंधन निरसूनी परमसुख दाविलेल्या गुरुराया
भवी ऐसे न म्हणविता भक्त केलेल्या गुरुराया
श्री गुरु चेन्नमल्लिकार्जुनासी मम करस्थली
आणून दिलेल्या गुरुराया तुज शरणु शरणार्थी ।। .... अक्क महादेवी

- लिंग :

समस्त विश्वाची उत्पत्ती, स्थिती, लय ज्याच्या ठायी व ज्याच्या आधारे घडते ते एकमेव अनादि, अनंत, सच्चिदानंद, नित्य व परिपूर्ण लक्षणयुक्त तत्व म्हणजे लिंग. लिंग म्हणजेच इष्टलिंग असून ते शिवशक्तीचे (आत्मस्वरुपाचा संकेत असलेले) छोटे स्वरुप आहे. इष्टलिंग हे लिंगायत धर्माचे प्रतीक आहे. इष्टलिंग म्हणजे लिंगायत धर्माचा देव, ज्ञानाचा प्रतिक, जात—पात नष्ट करणारे, स्वत:ला जाणण्याचे माध्यम आहे. आपले डोळे साऱ्या जगास पाहतात, परंतु स्वत:चे डोळे पाहण्यासाठी आरस हवा, याप्रकारे इष्टलिंग एक प्रकारचा आरसा आहे. इष्टलिंगामुळे आपल्याला आपल्या अंतरंगाचे दर्शन घडते.

या इष्टलिंगामध्येच श्रध्दा दृढ करुन त्याच्याविषयीचे ज्ञान देणारा गुरु मानला जातो. या इष्टलिंग पूजेमध्ये शिवशक्तीची उपासना आहे. यातूनच ईश्वराशी एकरुप होत असतांना समाजाशीही एकरुप होता येते. कारण इष्टलिंग धारणेसाठी स्त्री—पुरुष, जात—धर्म, गरीब—श्रीमंत, स्पृश्य—अस्पृश्य अशा कोणत्याही स्वरुपाच्या भेदभेदावर आधारित अटीचे बंधन नसते.

इष्टलिंग सर्वजण समानतेने राहून सर्वांना प्रेममय, आनंदमय जीवन जगण्यास शिकवते. सर्वजण आपलेच आहेत, कोणीही परके नाहीत अशी जाणीव देते. मानव जातीस एकत्र आणण्याचे एकमेव साधन म्हणजे इष्टलिंग होय.

जगविस्तार नभोविस्तार विस्तारातील तवविस्तार
पाताळातील तव श्रीचरण
ब्रह्मांडातील तव श्रीमुकुट
अगम्य, अगोचर, अप्रतिम हे लिंगा
कूडलसंगमदेवा मम करस्थली येऊनी झालास तू इवलासा ।।

....बसवण्णा

● जंगम :

निराकार लिंगाचे साकार स्वरुप म्हणजे जंगम ! सदासर्वकाळ संचार करीत धर्मानुयायांच्या आध्यात्मिक साधनेसाठी उपदेश, मार्गदर्शन करणाऱ्यांस जंगम असे म्हणतात. स्वयं जंगम, चर जंगम व पर जंगम असे जंगमात तीन प्रकार आहेत.

१) स्वय जंगम :

स्वय म्हणजे स्थानिक. स्वय जंगम हा एकाच स्थानी राहून धर्म, संस्कृती, आचार—विचारांचा प्रचार—प्रसार करतो.

२) चर जंगम :

गावात एक रात्र, शहरात पाच रात्र राहत सतत संचार करत लिंगायत धर्म, संस्कृती लिंग तत्वाचा प्रसार करणाऱ्यास चर जंगम म्हणतात.

३) पर जंगम :

पर जंगम हा शिवयोगात निष्णात असतो. लिंगाग सामरस्याचा अनुभविक असतो. स्वयं जंगम व पर जंगमांना लिंगाग सामरस्याविषयी उपदेश, मार्गदर्शन करणारा पर जंगम म्हणवतो.

***"Guru is a teacher, Linga is a education and Jungama is a master."***

आजच्या भाषेत सांगायचे तर जंगम म्हणजे पूर्ण वेळ समाजसेवेला वाहून घेतलेले जनसेवक होत, ज्याने आपल्या देहाचे देवालय करुन लिंगांग सामरस्य साधले व जगतकल्याणासाठी सर्व 'स्व' त्यागले असे ज्ञानमुर्ती म्हणजे जंगम ! बाराव्या शतकातील हे जंगम धर्मप्रसारार्थ प्रापंचिक आसक्ती दूर सारुन निरहंकारी नि:स्वार्थ वृत्तीने आपले जीवनच समाजासाठी अर्पित करीत असत. अशा जंगमांसाठी, त्यांच्या धर्मकार्यासाठी लिंगायतांनी आपल्या स्वअर्जित धनातील काही भाग अर्पित करावा, अशा भक्त आणि जंगमांच्या सांघिक प्रयत्नाने समाजाची व्यवस्था परिवर्तित होऊ शकते असा शरणांचा विश्वास होता. म्हणूनच बसवेश्वरांनी गुरु व लिंगापेक्षा जंगमाला अधिक महत्व दिले आहे.

निंदा केल्यास कष्टी होणारा जंगम नव्हे
वंदिल्यास प्रसन्न होणारा जंगम नव्हे
आदरातिथ्य केल्यास संतुष्ट होणारा जंगम नव्हे
काहीही न अर्पिल्यास क्षुब्ध होणारा जंगम नव्हे
इंदुधर (परमात्मा) कपिल सिद्‌ध मल्लेशाच म्हणेन ऐसा असल्यास जंगम ।।

....सिद्‌धरामेश्वर

● विभूती :

विभूती ही आपल्या अंतरंगातील तेजाचे प्रतीक आहे. आपल्यातील दुर्गुणांचा नाश होऊन सद्‌गुणांचा प्रादुर्भाव व्हावा हाच विभूती धारणेच्या मागील उद्देश आहे. प्रत्येक मंगल कार्यात विभूतीचा उपयोग करावा. विभूती धारण केलेल्या व्यक्तीबद्दल आपल्यात सात्विक भाव उत्पन्न होतो. एखाद्या स्त्रीच्या कपाली भस्म पाहता, आपल्यात तिच्या विषयी आपसुकच सात्विक भाव उत्पन्न होते. दैवी गुणांच्या जागृतीसाठी व ती प्रज्वलीत

राहण्यासाठी आपल्याला विभूती पाहिजे. विभूती हे लिंगायत धर्माचे बहिर्गत व दृश्य स्वरुपाचे प्रतीक आहे. या विभूती धारणेवरुन देखील लिंगायतांच्या समानतेचे तत्व लक्षात येते. कारण लिंगायतांमध्ये स्त्री–पुरुष, लहान–थोर असा भेद न करता सर्वांसाठी तीन आडव्या पट्यांची विभूती धारणा आवश्यक मानली जाते. भस्म स्नान म्हणजे दोन्ही तळहातांना भस्म लावून अंगभर पुसून घेणे व भस्मधारणा म्हणजे तिन्ही बोटांनी कपाळ, कंठ, हृदय, इत्यादी स्थानी भस्म लावून घेणे. शरीरावरील सोळा ठिकाणी, बत्तीस स्थानी भस्म लावून घेण्याचे नियम आहे.

आरोग्याच्या दृष्टीने भस्मधारण अती उत्तम आहे. याने चर्मरोग होत नाही. विभूती धारणेने सहज सौंदर्य प्राप्त होते. अंगठा व करंगळी सोडून मधल्या तिन्ही बोटांनी भस्म धारण करावे. 'अ' कार, 'उ' कार, 'म' कार संकेत असलेल्या तिन्ही बोटांनी आपण रोज विभूती धारण करावी.

धारण करा हो धारण करा हो सर्व मर्त्यमानवांनो
न विसरता श्री महाभसित
असंख्य तीर्थस्थान करुनी मिळणाऱ्या पुण्यापेक्षाही
कोट्यावधी पटीने श्रेष्ठ असे
धारण करा हो धारण करा हो सर्व मर्त्यमानवांनो
न विसरता श्री महाभसित
असंख्य यज्ञ केल्याच्या फळाहूनही
कोट्यावधी पटीने श्रेष्ठ असे
धारण करा हो धारण करा हो सर्व मर्त्यमानवांनो
न विसरता श्री महाभसित
आमुच्या कलिदेवांचे निजचरण पाहण्यास
श्री महाभसितच साधन असे पहा ।।

....मडिबाळ माचीदेव

- रुद्राक्ष :

'रुद्र' याचा अर्थ शिव आणि 'अक्ष' याचा अर्थ दृष्टी आहे. त्यानुसार रुद्राक्ष म्हणजे शिवदृष्टी, म्हणजे सर्व विश्वात समानता पाहणारी दृष्टी जी संकुचित स्वार्थप्रेरित नाही. शरीरावरील रुद्राक्षधारणा हे समृध्दीचे प्रतीक आहे. रुद्राक्ष धारणेच्या माध्यमातून आरोग्यविषयक, सामाजिक दृष्टीविषयक, नैतिक व मानसिक लाभ होत असल्याचे लिंगायतांचे मत आहे. रुद्राक्षामुळे सुज्ञानरुपी नेत्र प्राप्त होऊन जन्म मरणातून मुक्त होऊन परमसुखी होतो. रुद्राक्षाने पाप नाश पावतात, पंचमहापातक नष्ट होतात. असे रुद्राक्ष सर्वांनी धारण करुन सद्गुणी बनावे असे त्यांचे म्हणणे आहे. रुद्राक्षाची एखादी माळ घालावी, नाही तर कमीतकमी एक तरी रुद्राक्ष अंगावर असावयास हवे. सर्वांनी रुद्राक्ष धारण करावा. जात, वर्ग, वर्ण, लिंग, पंथ, मत असा भेदाभेद न करता सर्वांना रुद्राक्ष धारणास मुभा आहे.

हस्त अलंकाराहून श्रेष्ठ पहा देणे न घेणे
बाहूस बाजूबंदाहून श्रेष्ठ पहा परवधूस न अलिंगणे
कानास कर्णफुलाहून श्रेष्ठ पहा शिवनिंदा न ऐकणे
कंठास कंठमाळाहून श्रेष्ठ पहा अन्य देवतास शरण न जाणे
सदासर्वदा तुम्हा स्मरुनी कुडलसंगमदेवा
तुम्हा पुजूनी सदा सन्निहित ऐसे लिंग शिखामणी देवा ।।

- पादोदक :

पादोदक म्हणजे तीर्थ किंवा पवित्र पाणी होय. डॉ. मल्लेदेवरु पादोदकाबाबत म्हणतात की, 'पा' म्हणजे सर्वोच्च ज्ञान, 'दो' म्हणजे सर्व दोषांचा परिहार, 'द' म्हणजे जन्म व मरण यांच्या चक्रातून मुक्ती आणि 'क' म्हणजे कर्मबंधनातून सुटका होय. पादोदकाचे गुरु पादोदक, लिंग पादोदक आणि जंगम पादोदक असे तीन प्रकार आहेत. यातील लिंग पादोदक लिंगायतांमये सध्या प्रचलित असून गुरु व जंगम पादोदकाचा वापर धार्मिक विधीप्रसंगीच केला जातो आहे. विधीनुसार इष्टलिंग पादोदक सेवन केल्यास भक्तांचे शारीरिक व मानसिक दोष दूर होऊ शकतात, असा बसवेश्वरांचा संदेश होता. दोन प्रकारचे पादोदक स्वीकारल्या जातात. एक सहजाचरण व दुसरे संबंधाचरण पादोदक घेणे व देणे हा एक व्यवहार वा ही एक औपचारिकतेची बाब नव्हे, ही एक ज्यांची त्यांची

आंतरिक निष्ठेची बाब आहे. पादोदक–प्रसाद अष्टावरणातील पूजेचे फळ आहेत असे गणले जातात. सद्‌गुरु शिष्याला पादोदक–प्रसादाव्दारे अनुग्रह करतो. पादोदक म्हणजे पाय धुवून पाणी पिणे नव्हे. सद्‌गुरु वाटीत पाणी घेवून ते पाणी मंत्रोच्चाराने शुद्‌ध करुन परिशुद्‌ध भावाने देतात. त्यालाच पादोदक (मंत्रोदक) असे म्हणतात. वचन साहित्यात दहा प्रकारच्या पादोदकांचे उल्लेख सापडतात.

| | |
|---|---|
| १) गुरु पादोदक | २) लिंग पादोदक |
| ३) जंगम पादोदक | ४) स्पर्श पादोदक |
| ५) अवधानोदक | ६) अप्यायनोदक |
| ७) हस्तोदक | ८) परिणामोदक |
| ९) निर्नामोदक | १०) सत्योदक |

पादोदकात श्रद्‌धाभक्ती असणे महत्वाचे आहे. गुरु बसवण्णा वचनात म्हणतात –

सज्जन शरणांना पाहूनी मन माझे उल्हासित झाले
पहा देवा, श्रीगुरु चरण धरुनी पावन झालो देवा
पादोदक प्रसादाने भवपाश नाश झाले कूडलसंगमदेवा ।।

- प्रसाद :

साधकाने प्रथम गुरु, लिंग आणि जंगम यांना खाद्यवस्तू अर्पण करावयाच्या असतात आणि त्यानंतर त्यांच्या कृपेने परत मिळणारे अन्न–पाणी प्रसन्न मनाने साधकाने प्रसाद स्वरुपात स्वीकार करावयाची असते. पादोदक आणि प्रसादाच्या निमित्ताने साधक एकत्र सहभागी होतात. त्यामुळे जातीभेद, वर्णभेद, उच्च–नीचता भेद विसरुन यांच्यात समभाव निर्माण होण्यास मदत होते. ज्याने प्रसन्नता मिळते तोच प्रसाद होय. प्रसाद म्हणजे चैतन्य पदार्थ होय. प्रसाद तयार करणाऱ्यांनी पण परिशुद्ध भावनेने केले पाहिजे. प्रसाद तयार झाल्यानंतर व्यवस्थित झाकून ठेवले पाहिजे. उघडे ठेवल्यास त्यात पाली, माशी पडण्याची शक्यता असते. ह्या देवाच्या नावानी, त्या देवाच्या नावानी उपवास करु नये, उपवास करणे बसव सस्कृतीत नाही.

प्रसादतत्वाची एकादश नावे पाहू या –

| | |
|---|---|
| १) शुद्ध प्रसाद | २) सिद्ध प्रसाद |
| ३) प्रसिद्ध प्रसाद | ४) आप्यायान प्रसाद |
| ५) समय प्रसाद | ६) पंचेंद्रिये विरहित प्रसाद |
| ७) अंत:करण चतुष्ट्यविरहित प्रसाद | ८) प्रसादीय प्रसाद |
| ९) सद्‌भाव प्रसाद | १०) समता प्रसाद |
| ११) ज्ञान प्रसाद | |

कायक हस्त स्पर्शाने इष्टलिंगास वचन
रुप अर्पिल्यास शुद्ध प्रसाद झाले
मन हस्त स्पर्शाने प्राणलिंगास
स्वाद (रुची) अर्पिल्यास सिद्ध प्रसाद बनले
भाव हस्त स्पर्शाने भावलिंगास
तृप्ती अर्पिल्यास प्रसिद्ध प्रसाद झाले
अशा शुद्ध, सिद्ध, प्रसिद्ध प्रसादीस दावूनी
उध्दारावा मज देवा अखंडेश्वरा ।।

- मंत्र :

अष्टावरणातील हे शेवटचे आवरण आहे. मंत्र याचा अर्थ पवित्र शब्द असा होतो. 'नम:शिवाय' हा पंचाक्षरी तर 'ॐ नम: शिवाय' हा षड्क्षरी मंत्र होय. महात्मा बसवेश्वरांनी वेद, पुराण, मंत्र, तंत्र यांचे पठण करण्यापेक्षा 'ॐ नम: शिवाय' या मंत्राचा जप महत्वाचा मानला. पवित्रता, भरभराट, संपन्नता, परिपूर्ण ज्ञानप्राप्ती, मनोधैर्य, मानसिक समाधान ही या मंत्राची निष्पत्ती आहे. महत्वाचे म्हणजे गुरु–शिष्य, गरीब–श्रीमंत, बालक–तरुण या सर्वांसाठी हा एकच मंत्र असल्याने तो धार्मिक आणि सामाजिक समतेचे द्योतक आहे.

मंत्रात दैवीशक्ती आहे. मंत्र जपाने आपल्याला मानसिक शांती, समाधान लाभते, अंतरी तृप्ती वाढते. १) मानस जप, २) वाचक जप व ३) उपांशिक जप असे मंत्रजपात तीन प्रकार आहेत.

१) मानस जप :

एकाग्रचित्ताने मनात मंत्र जप करण्यास मानस जप असे म्हणतात.

२) वाचक जप :

मंत्र दुसऱ्यांना ऐकू जाण्यासारखे जोरात म्हणणे म्हणजेच वाचक जप होय

३) उपांशिक जप :

ओठातल्या ओठात पुटपुटत केवळ आपल्यालाच ऐकू येण्यासारखे मंत्रोच्चार करणे उपांशिक जप होय.

हत्ती भितो लहानशा अंकुशास पहा
पर्वत घाबरतो वज्रास पहा
अंध:कार भितो ज्योतीस पहा
पंचमहापातक घाबरतात
कूडलसंगमदेवाच्या नामास पहा ।।

- षट्स्थल :

लिंगायत धर्माचे जे तत्वज्ञान आहे ते प्रत्यक्षात आचरणात आणण्यासाठी षट्स्थल मार्ग महत्वाचा ठरतो. त्यामध्ये शिव आणि जीवाचे ऐक्य साधण्यासाठी (१) भक्त, (२) माहेश्वर, (३) प्रसादी, (४) प्राणलिंगी, (५) शरण आणि (६) ऐक्य अशा सहा पायऱ्या सांगितल्या आहेत. शेवटच्या सहाव्या स्थलामध्ये साधकाला आत्मज्ञानप्राप्ती होते.

(१) भक्तस्थल (श्रध्दाभक्ती) :

भक्तस्थल ही व्यक्तीच्या अंतरंग आणि बहिरंग शुध्दी मार्गातील पहिली पायरी आहे. सृष्टिनिर्मात्याच्या प्रती लीन होवून, कामक्रोधादी षड्विकारांवर मात करण्यासाठी इष्टलिंगार्चना करणे यानुसार स्वत: करीत असलेले कर्म, श्रम शिवास व शिवमय संसारास अर्पित असा भाव साधकामध्ये निर्माण होतो. बसवेश्वरांनी ज्याच्या हृदयात प्रेम आहे, ज्याच्या हातात सत्य शुद्ध कायम आहे, ज्याच्या घरात नित्य दासोह चालतो, त्याला खरा भक्त मानले होते.

(२) महेशस्थल (निष्ठाभक्ती) :

या स्थलामध्ये श्रध्देचे रुपांतर दृढ निष्ठा व ठाम भक्तीमध्ये होते. उज्ज्वल भक्ति—साधना गुरु, लिंग, जंगमाच्या पूजेने, लोकसेवेने भक्त माहेश्वर बनू शकतो. या लोकसेवेचेच व्रत बसवण्णाने घेतले होते. परदैवत, परधन, परसती नाकारण्याचा निश्चय हे माहेश्वर स्थलांचे लक्षण होय.

(३) प्रसादी स्थल (अवधान भक्ती) :

सत्य, शुध्द कायकाव्दारे प्राप्त झालेले सर्व सुख—दु:खांसहित आपला देह सुध्दा प्रसादस्वरुप मानून आपले सर्वस्व लिंगार्पित करणे. महात्मा बसवेश्वरांनी या स्थलाच्या माध्यमातून समाजात दायित्वाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

(४) प्राणलिंगी स्थल (अनुभाव भक्ती) :

या स्थलातील साधकाला आपले आचार—अवचार शिवस्वरुपी दिसू लागतात. शिवाशी आपल्या एकरुपत्वाचा सुखानुभाव येण्यास प्रारंभ होतो. मी सुद्धा परमात्म्याचा एक अंश आहे असे प्राणलिंगी समजतो. त्याप्रमाणे सकल जीवराशीत ईश्वर असल्याचे तो पाहतो.

(५) शरणस्थल (आंनद भक्ती) :

शरण, सती—लिंग, पती अशा भक्तिभावनेने लिंगांग सामरस्य प्राप्त करु पाहणाऱ्या भक्ताची कायाच कैलास होते. या स्थलात शरण षड्रिपूंवर मात करु शकतो.

(६) ऐक्यस्थल (समरस भक्ती) :

ह्या अंतिम स्थितीत लिंगांग सामरस्याचा अनुभव प्राप्त होतो, अंग लिगस्वरुप होऊन जाते. जीव—शिव भेद गळून पडतो. या षट्स्थलाबाबत सारांशरुपाने महत्व सांगतांना श्री सिध्देश्वर स्वामीजी म्हणतात, ‘‘हृदयात प्रेमाची ज्योती प्रज्वलित केलेलाच भक्त त्या प्रेमाच्या ज्योतिला त्यागाचे तेल घालणारच. माहेश्वर, जगातील सर्वच गोष्टी, परमात्म्याची करुणा समजणाराच प्रसादी, जगातील अनुरेणूत परमात्मा असलेला पाहणाराच प्राणलिंगी, जीवभाव—देवभाव समजून सदानंदात राहणाराच शरण, जगात राहून परमात्म्यात विलीन होवून जाणाराच

ऐक्य होय.'' महात्मा बसवेश्वरांनी या षट्स्थल सिध्दांन्ताचे आध्यात्मिक व सामाजिक महत्व जाणून याचा पुरस्कार केला होता.

'स्थल' म्हणजे स्थान किंवा परब्रह्म. लिंगायत सिद्धांतात या पारिभाषिक शब्दाचा अर्थ पराशिव होतो. पराशिव जीवात्म्याच्या उद्धारासाठी आपले प्रतिक जीवासमोर ठेऊन त्यांना उद्धारण्याचा मार्ग दाखवितो. या हेतूनेच तो आपल्या इच्छाशक्तीव्दारे दोन भागात विभागल्या जातो.

लिंगांग सामरस्य :

'लिंगांग सामरस्य' ही लिंगायतांच्या विचारविश्वातील एक महत्वपूर्ण संज्ञा आहे. या संज्ञेचे लिंग, अंग व सामरस्य असे तीन घटक आहेत. लिंग म्हणजे शिव, अंग म्हणजे जीव, तर जीवाचे शिवाशी जे ऐक्य घडते ते लिंगांग सामरस्य होय.

दर्शनकारांनी षट्स्थानी अंगस्थले ४४ व लिंगस्थले ५७ अशी एकूण (१०१) शतस्थले म्हटलेली आहेत. लिंगांग सामरस्याचे ज्ञान लिंगायत सिद्धांतामध्ये मोक्षास मूलकारण आहे. लिंग व अंगाचे सामरस्य हे षट्स्थल मार्गावर आधारलेले दिसते. शिव–जीवात, उपास्य–उपासक नाते व्दैती भावनेने भरलेले असले तरी सामरस्याच्या ऐक्य स्थळात ही अवस्था अव्दैती बनते हे विसरता येणार नाही. अंतिम उद्धाराचा मार्ग कसा व कोणता हे षट्स्थल सिद्धांताव्दारे सांगण्याचे कार्य 'लिंगांग सामरस्य' करते. षट्स्थल म्हणजे जीवाची शिवाकडे जी वाटचाल घडते, त्या वाटचालीतील सहा टप्पे होत. हा सहा पायऱ्यांचा सोपान उल्लंघिल्यानंतर जीवाचे शिवाशी संपूर्ण ऐक्य घडते. म्हणजेच लिंगांग सामरस्याचे ध्येय गाठले जाते.

पंचाचार :

शिवमय जगाच्या रचनेसाठी षट्स्थलाचा तात्विक विचार दिलेल्या शरणांनी आपल्या धर्मास व समाजाच आधार देण्यासाठी शील व नीतीने परिपूर्ण पाच आचार सांगितले. या पाच आचारांना महात्मा बसवेश्वरांनी विशेष महत्व दिले. पंचाचाराला सामाजिक, नैतिक आचारसंहिता मानली जाते. (१) लिंगाचार, (२) सदाचार, (३) शिवाचार, (४) गणाचार, (५) भृत्याचार

(१) लिंगाचार :

गुरुप्रदत्त इष्टलिंगाखेरीज अन्य देवतांची कोणत्याही स्वरुपात उपासना न करणे हा लिंगाचार सृष्टिनिर्माता देव हा एकच असून तो प्रत्येक जीवात सामावलेला आहे. त्यामुळे तो प्रत्येक मानवामध्ये सामावलेला आहे. म्हणून देहालाच देवालय बनविण्याचा बसवेश्वरांनी उपदेश केला. म्हणून स्थावर लिंगाऐवजी इष्टलिंगाचीच उपासना बसवेश्वरांनी महत्वाची मानली, यालाच लिंगाचार म्हणतात.

(२) सदाचार :

सत्य, शुद्ध व दासोहाचे आचरण म्हणजे सदाचार. सदाचार म्हणजे शुद्ध आचार होय. व्यक्तीने आपली वर्तणूक चांगली ठेवून नीतिशील मार्गाने अर्थार्जन करणे व त्याचा काही भाग समाजाच्या आणि राष्ट्राच्या कल्याणासाठी खर्च करणे होय. महात्मा बसवेश्वरांनी सांगितले चोरी करु नको, हत्या करु नको, खोटे बोलू नको, राग मानू नको, व्देष करु नको, आत्मस्तुती नको, परनिंदा नको, ह्या सात कसोट्या सांगितल्या आहेत.

(३) शिवाचार :

सर्व शिवभक्तांना समान लेखून त्यांच्याशी रोटी–बेटी व्यवहार करणे हा शिवाचार प्रपंचही सत्य आहे व शिवही सत्य आहे असा विश्वास ठेवून आपल्या सर्व क्रिया समाजाला अर्पण करुनही न केल्यासारखे राहणे म्हणजे शिवाचार होय. माता महादेवी म्हणतात, ''सामाजिक दृष्ट्या समता भावनेने वागणे आणि विश्वबंधुत्व पाळणे म्हणजे शिवाचार होय.''

(४) गणाचार (अन्यायाचा प्रतिकार) :

हे अन्यायाचे परिमार्जन व उत्साह यांचे प्रतीक मानले जाते. विषमता शोषण अनैतिकता, क्रौर्य, हिंसाचार, भ्रष्टाचार, इ. अंतरंग व बहिरंगातील दुष्ट प्रवृत्तीचा प्रतिकार करणे, मानवतावादी, कल्याणकारी, जीवनमूल्यांच्या प्रस्थापनेसाठी तत्वनिष्ठ राहून संघर्ष करणे, नेहमी सत्याची व न्यायाची पाठराखण करणे, धर्मरक्षणार्थ तत्पर असणे म्हणजे गणाचार होय.

(५) भृत्याचार (विनम्र सेवाभाव) :

भृत्याचार म्हणजे सर्वांविषयी दया, मानवता व नम्रता भावनेने वर्तन करण्यास प्रवृत्त करणे होय. डॉ. व्ही. के. मुर्ती म्हणतात, ''भृत्याचार म्हणजे विशाल अर्थाने विश्वबंधुत्ववाद होय.'' महात्मा बसवेश्वरांनीही करुणा, दया, ममता व्यक्ती व सर्व प्राणीमात्रांविषयी महत्वाची मानली.

व्यक्तीपेक्षा समाज श्रेष्ठ आहे. व्यक्तीपेक्षा देश मोठा आहे. या विशाल भावनेने विनम्र होऊन सर्वच प्राणीमात्रांप्रती दयाभाव बाळगून सेवा करणे म्हणजे भृत्याचार होय. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यांचा अहंगंड न बाळगता हे सर्व त्या परशिवाची कृपा म्हणून समर्पित वृत्तीने विनय भावनेने राहणे म्हणजे भृत्याचार होय. विनयाने झालेले सामाजिक परिवर्तन हे दीर्घकाळ टिकणारे असते. विनयाने सामाजिक सामरस्य, परस्पर सहकार्याची भावना वृद्धीस लागते. संयमाने शांती व समाधान प्राप्त होते. एकंदरीत भृत्याचारात व्यक्तिगत नैतिकतेवर अधिक भर देण्यात आला आहे.

- इष्टलिंग :

इष्टलिंग शिवलिंगाचे प्रतिक आहे, ते स्थावर लिंगाचे सुक्ष्म रुप मानले जाते. हे इष्टलिंग शिव, शरण, शक्ती व सृष्टी या चार गोष्टीचे आंगठ्या ऐवढे प्रतिक असून त्यावर सुगंधमय रासायनिक द्रव्याने काळी तुळतुळीत झकाकी आणल्या जाते. इष्ट देवतेच्या रुपाने इष्ट प्राप्ती होते ते इष्टलिंग होय. चरण लिंगाचे पार्थिक, वाण, तांत्रिक व इष्टलिंग असे चार प्रकार केले जातात. इष्टलिंग हे विधीपूर्ण रितीने गुरुवर्याकडून धारण केले जात असल्याने या संस्कारात महत्व आहे. कारण या संस्काराने मनुष्याला दुसरा ईश्वरी जीव प्राप्त होतो. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांनी २१ दिक्षा प्रकारांपैकी ३ दिक्षा प्रकारांचे वर्णन केले आहे. लिंगपुराणात हेच शिवदिक्षेचे प्रकार सांगितले आहे. डॉ. सुधाकार मोगलेवार इष्टलिंग विधिविषयी सांगतांना लिहितात ''सदाशिव, ईश्वर, महेश्वर आणि रुद्र यास परशिवाने लिंगायत धर्माचा उपदेश केला व यापासून रेवणसिद्ध, मरुळसिद्ध, येकोराम, पंडिताराध्य हे पृथ्वीवर सदर चार देवता व मधले पात्र म्हणजे परशिव अशा पाच देवतांच्या नावाने ही कलशस्थापना केली जाते. मग तो चौरंगावर, पाटावर व उच्चासनावर बसतो. मूल जन्मल्यानंतर सात अथवा बारावे दिवशी हा विधी पार पाडणे अपरिहार्य आहे. त्यावेळी उपरोक्त कलशपूजा लिंगायत माहेश्वराकडून मांडली जाते. नंतर गुरुचे पाय एका ताटात ठेवून धुतात व ते पाणी पादोदक म्हणून हजर असलेल्या भक्तांच्या अंगाला लावतात. नंतर माहेश्वराचे अंगठे एका पेल्यातील अथवा ताटातील पाण्यात बुडवून त्यात स्वतःचे इष्टलिंग बुडवितो. जंगम ते पाणी तीर्थ म्हणून स्वतः घेऊन इतरांना दिले जाते. या विधीस चरणा म्हणतात. नंतर मुलास प्रदान करावयाचे इष्टलिंग त्या पादोदकात बुडवून ते मुलाच्या गळ्यात शुद्ध रेशमी वस्त्रात गुंडाळून बांधतात. पंचकलश पूजेनंतर मुलास प्रदान करणाऱ्या इष्टलिंगावर मंत्राभिषेक, विभूतीलेपण, षोडषोपचारे, पूजा, आरती, नमस्कार, इ. विधी जंगम करतात. लहान बालकाकडून मंत्रोपचार अशक्य म्हणून ते देव्हाऱ्यात ठेवून पूजिले जाते. कर्नाटकात मात्र हे इष्टलिंग मुलाच्या गळ्यात नेहमीसाठी बांधून ठेवतात, तर विदर्भात किंवा उर्वरीत महाराष्ट्रात चांदीच्या शालूंकेत ठेवून गळ्यात किंवा देवघरात ठेवतात.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१) ईश्वरन हिरेमल्लूर – लिंगायत धर्म, संस्कृती व समाज.

२) जिरोबे राजेंद्र – वचनामृत बसवेश्वरी, श्री. व्ही. बी. पाटील, श्री. मृत्यंजय शरण साहित्य प्रचारक संघ, हिराबाग, मुंबई.

३) पाटील बाळासाहेब म. (संपा) – बसव पंथ मराठी व्दैमासिक, जुलै–ऑगस्ट २०१०.

५) स्वामी कुमार – Kumar Swamiji Mirror of Veershaivism.

६) करडीगुद्दी राजशेखर – लिंगायत तत्वज्ञान व आचरण, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी.

७) घुगरे सुर्यकांत – वीरशैव व इतर धर्म आणि समाज, साधना बुक स्टॉल, गडहिंग्लज, १९९९.

८) दोडमनी शालिनीताई – शरण संदेश.

९) Malledevaru H. P. & Essentials of Veershaivism Bhartiya Vidya-Bhavana, Mumbai, 1976.


❖❖❖

# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील जीवनमूल्यांचा शोध

**डॉ. विजयकुमार शिवदास ढोले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
संजीवनी महाविद्यालय, चापोली,
ता. चाकूर, जि. लातूर. 9975471574

उच्च कोटीची जीवनमूल्ये व्यक्त करणारे साहित्य अण्णा भाऊ साठे यांनी लिहिले आहे. मागील सात आठ दशकं त्याचे साहित्य वाचकांना भुरळ घालत आहे. त्यांच्या साहित्यातील कामगारांचे प्रश्न, मार्क्सवादी विचार, स्वातंत्र्याचा विचार महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाचे संदर्भ सापडतात यावरून अण्णा भाऊंच्या कार्यकर्तृत्वाचे मोठेपण सहजपणे लक्षात येते. वाटेगावसारख्या छोट्याशा गावात जन्म, अतिशय नगण्य शिक्षण ते साहित्यसम्राट अशी त्यांची ओळख आहे. ही अण्णाभाऊंची झेप थक्क करणारी आहे. आज त्यांच्या नावावर विपुल लेखन आहे. समाजातील विषमता नष्ट करून समता, स्वातंत्र्य, बंधुता प्रस्थापित करण्यासाठी मार्क्सप्रणित साम्यवाद विचार रुजविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. आयुष्यभर ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी लेखन आहे. पुढील प्रमाणे त्यांच्या लेखनातील जीवनमूल्यांचा संक्षेपाने विचार करू.

## उद्दिष्टे -

1. अण्णा भाऊ साठे यांचा जीवन प्रवास समजून घेणे.
2. अण्णा भाऊ साठे यांच्या एकंदर साहित्याचा परिचय करून घेणे.
3. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून व्यक्त झालेल्या जीवन मूल्यांचा विचार करणे.

## गृहितके -

1. अण्णा भाऊ साठे मराठीतील दर्जेदार लेखक आहेत.
2. त्यांनी विविध साहित्य प्रकार लीलया हाताळून विपुल लेखन केले आहे.
3. त्यांच्या साहित्यातील जीवनमूल्ये आजही मार्गदर्शक आहेत.

## अ) अण्णा भाऊ : जीवन परिचय -

'अण्णा भाऊ साठे यांचा जन्म 1 ऑगस्ट 1920 रोजी वाटेगावच्या मांगवाड्यात झाला. वाटेगाव हे खेडे सध्याच्या सांगली जिल्ह्याच्या (पूर्वीचा दक्षिण सातारा जिल्हा) वाळवा तालुक्यात, पुणे - बंगलोर महामार्गावरील कासेगावच्या तीन मैल पूर्वेला आहे.'[1] तत्कालीन ब्रिटिशांनी गुन्हेगार ठरविलेल्या मांग या जातीत वालूबाई आणि भाऊ साठे यांच्या पोटी अण्णा भाऊंचा जन्म झाला. त्यांना एकूण चार भावंडे होती. अण्णा भाऊंचे मूळ नाव तुकाराम होते. ज्येष्ठ व्यक्तीला आदराने अण्णा म्हणतात म्हणून पुढील काळात 'अण्णा' हेच नाव प्रचलित झाले.

अण्णा भाऊंचे बालपण अतिशय हलाखीत गेले. मुळात गुन्हेगार ठरवलेली जात, त्यातून दलितपणाच्या अनुभवामुळे त्यांच्या बालमनावर परिणाम होत गेला. अभ्यासक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे म्हटल्याप्रमाणे,

"बालपणापासूनच अण्णा भाऊ साठे यांना दारिद्र्याचे आणि सामाजिक विषमतेचे चटके सहन करावे लागले. बालपणातील दाहक अनुभव यामुळे त्यांचे मन बंडखोर बनत गेले. याची अनेक उदाहरणे त्यांच्या चरित्रात सापडतात. जीवनावर, माणूसपणावर प्रचंड निष्ठा असल्यामुळे अण्णा भाऊ साठे संघर्षासाठी सदैव तयार असत. या जीवनसंघर्षात आलेले अनुभवच शब्दरूप घेऊन रसिकांसमोर येतात."[2] वाटेगाव ते मुंबई हा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. रूढ अर्थाने फारच कमी शिक्षण झालेल्या अण्णांनी साहित्य विश्वात स्वतःचे अढळ स्थान निर्माण केले हे नाकारता येत नाही.

## ब) अण्णा भाऊंची साहित्य संपदा -

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून अन्यायाविरुद्ध बंड करणारा विचार मांडला आहे. त्यांनी आपल्या परिसरातील सर्व सामान्य माणूस यांना नायक-नायिका म्हणून आपल्या साहित्याच्या केंद्रस्थानी आणले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात समता, बंधुता, स्वातंत्र्य प्रस्थापित करणारे, माणुसकी प्रस्थापित करणारे लेखन अण्णांनी केले. त्यांच्या साहित्यात जीवनमूल्यांना विशेष स्थान दिले आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक, प्रवास वर्णन अशा साहित्याच्या विविध प्रकारात त्यांनी विपुल लेखन केले आहे.

अण्णा भाऊंचे साहित्य रसिकांच्या मनाचा ठाव घेते याचे महत्त्वाचे कारण त्यात सर्वसामान्य लोकांच्या जगण्यातील रेषा अतिशय ताकदीने त्यांनी मांडल्या आहेत. आजही वाचकांना अण्णाभाऊंचे साहित्य आपलेसे वाटते यावरून त्यांच्या लेखनाचे मोठेपण लक्षात येते. डॉ. बाबुराव गुरव यांनी म्हटल्याप्रमाणे "अण्णांच्या कथा रसिकांच्या मनाच्या गाभाऱ्यात खोलवर व्यथा शोधत राहिल्या आहेत. कारण एखादी कथा अण्णांनी लिहिले की त्वरितच शेजारी - पाजारी मित्रमंडळींना ऐकवली जायची. तिच्यातील घटना, प्रसंग, कृतीबद्दल त्वरितच अभिप्राय मिळायचे. म्हणजेच अण्णांच्या कथालेखकात व वाचकात अंतर नव्हते. वाचकांच्या परीक्षेतून हे कथालेखन उत्तीर्ण व्हायचे त्यामुळे अण्णांच्या कथेचे स्वरूप हे त्रिकालाबाधित सत्यासारखे अबाधित व रसिकप्रिय होत होते."[3] वाचक हा अण्णाभाऊंच्या लिखाणाचा केंद्रबिंदू असल्यामुळे त्यांचे लेखन आपोआपच रसिकप्रिय होत गेले. पुढील प्रमाणे त्यांच्या साहित्य समजून घेऊ.

**अ) कादंबरी** -

चित्रा, वारणेचा वाघ, फकिरा, मकडीचा माळ, वैजयंता, रूपा, आवडी, पाझर, चिखलातील कमळ, रत्ना, गुलाम इत्यादी.

**ब) नाटके** -

नामदार, पेंग्याचं लगीन, सुलतान.

**क) कथासंग्रह** -

निखारा, फरारी, जिवंत काडतूस, खुळवाडी, नवती, पिसाळलेला माणूस, आबा, गजाआड, बरबाद्या कंजारी, चिरानगरची भुतं, कृष्णाकाठच्या कथा.

**ड) लोकनाट्य** -

अकलेची गोष्ट, शेटजींचे इलेक्शन, पुढारी मिळाला, माझी मुंबई, मूक मिरवणूक, देशभक्त घोटाळे, बेकायदेशीर, लोकमंत्र्यांचा दौरा, खापऱ्या चोर.

**इ) प्रवास वर्णन** -

कविता आणि माझा रशियाचा प्रवास.

**ई) काव्य** -

अण्णा भाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या.

वरीलप्रमाणे अण्णा भाऊंच्या साहित्यकृतीची नुसती यादी जरी वाचली तरी एक साहित्यिक म्हणून त्याचे मोठेपण सहज अधोरेखित होते. अण्णा भाऊंच्या बऱ्याच कथा, कादंबऱ्यांवर मराठीत अत्यंत लोकप्रिय चित्रपट निर्माण झाले आहेत. त्यातील काही चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. यावरून अण्णा भाऊंना रसिक मनाची नेमकी नाडी कळलेली होते, हे लक्षात येते. जवळ जवळ तीस कादंबऱ्या, अडीचशे ते तीनशे कथा लिहून आपला वचक वर्गाची सतत सेवा करणारे अण्णा मराठी काही मोजक्या दर्जेदार लेखकापैकी एक आहेत. शिक्षण कमी असले तरी त्यांचे भाषेवर प्रभुत्व होते. जीवनमूल्यांचा विचार मांडून त्यांनी आपल्या साहित्याला मानवीय मूल्यांची जोड दिली आहे.

## अण्णा भाऊ आणि कामगार जीवन -

मुंबईत आल्यानंतर उदरनिर्वाहासाठी अण्णा भाऊ मुंबईच्या भायखळा उपनगरात स्थिरावले. भायखळ्यातील मशिदीच्या पश्चिमेला तत्कालीन चांदबीबी चाळीत अण्णा राहत असत. हाती लागेल ते एक काम करून आपला चरितार्थ चालवणे यावर त्यांचा भर होता. चौदा पंधरा वर्षे वयाच्या अण्णांनी येथील कामगार वस्त्यांमधील संप, बंद, मोर्चे यांचे बारकाईने निरीक्षण केले. त्यांच्या आजूबाजूला घडणाऱ्या नकारात्मक व सकारात्मक घटना प्रसंगांचा परिणाम त्यांच्यावर मनावर खोलवर होत गेला. पोटाचा प्रश्न सोडविणारे म्हणून अण्णा आपल्या कुटुंबासह मुंबईत स्थिरावले. 'अण्णा भाऊ सुरुवातीला कापडाच्या एका फिरत्या विक्रेत्यासाठी डोक्यावर जुन्या-नव्या कपड्यांची पेटी घेऊन त्या कपड्यांची जाहिरात, विक्री करीत असत.'[4] मुंबईत विविध ठिकाणी राष्ट्रीय, राजकीय, सामाजिक महत्त्वाच्या विषयावर होणाऱ्या चर्चा घडत. अण्णा भाऊना त्या आवर्जून ऐकण्यात रस वाटत असे. हळूहळू अण्णा विविध राजकीय संघटनात सक्रिय सहभाग घेऊ लागले. कम्युनिस्ट पार्टीच्या सभांचे आयोजन, त्यासाठीची प्रचार पत्रके वाटणे, भिंतीवर घोषणा लिहिणे, मोर्चासाठी घोषणा फलक रंगविणे याप्रमाणे सर्वच जबाबदारी अण्णा अतिशय आवडीने आपल्या खांद्यावर घेऊ लागले. इथे इतर कार्यकर्ता मित्रांशी त्यांची ओळख होऊन त्यांच्या धारणा अधिक पक्क्या होत गेल्या. शाहीर अमर शेख, श्री. दिनकर, राम नगरकर या तरुणांमध्ये अण्णाची बैठक वाढून त्यातून गाणी, पोवाडे रचणे व त्याचे बहारदार सादरीकरण करणे यात त्यांना रस वाटू लागला. 'लाल बावटा' या कलापथकाच्या निमित्ताने विविध ठिकाणी अण्णांनी आपल्या गाण्याचे सादरीकरण केले आहे. त्यापैकी 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा' तेव्हा कामगारवर्गामध्ये खूप लोकप्रिय होता. अण्णा भाऊंनी लिहिलेले गाणे शाहीर अमर शेख यांनी आपल्या उंच आवाजात सादर करीत असत.

## अण्णाभाऊ साठे आणि भारत छोडो आंदोलन -

हा स्वातंत्र्यपूर्व काळातील 1940 च्या आसपासचा कालखंड होता. जगात दुसरे महायुध्द पेटले होते. भारत इग्रजांच्या बाजूने युद्धात सहभागी झाला होता. दरम्यान भारतात सर्वत्र स्वातंत्र्यप्राप्तीचे वारे वाहत होते. महात्मा गांधीनी 'चले जाव' चळवळीमुळे ब्रिटिशांच्या विरोधात सर्वसामान्य नागरिकांना रस्त्यावर उतरण्याचे आदेश दिले होते. ब्रिटिश सरकार आक्रमक असले तरीही सरकारच्याविरुद्ध भारतीयांचे स्वातंत्र्यासाठी प्रयत्न चालूच होते. अण्णानी स्वातंत्र्य संग्रामात सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्याविरुद्ध अटक वॉरंटही निघाले होते. डोंगरदऱ्यात लपून काही काळ ते भूमिगत राहिले. त्यांच्या लेखनात वरील स्थितीचे चित्रण विविध माध्यमातून आले आहे.

## 'फकिरा'मधील अस्तित्वाची लढाई -

फकिरा ही अण्णा भाऊंची अजरामर कलाकृती आहे. दलित असल्याच्या वेदना सोबत घेऊन स्वताच्या अस्तित्वासाठी संघर्ष करणारे तरुण प्रस्तुत कादंबरीतून वाचकांसमोर येतात. "पाऊस लागला की सर्वजण एकत्र जमून हत्यारे काढीत आणि भर पावसात, भर मध्यान रात्री घराबाहेर पडत. दूर दूर दुसऱ्याच्या शिवारात शिरत आणि जे हाती लागेल ते ओरबाडून अगदी जीवावर उदार होऊन लुटत. नि परत येऊन त्याला भुकेच्या जबड्यात लोटीत."[5] ही स्थिती प्रत्येक गावातील, प्रत्येक दलित वस्तीत पहावयास मिळणारी आहे. भुकेचा प्रश्न अतिशय गंभीर असताना, घरात अन्नाचा कण नसताना, भुकेने लहान मुले मरण पंथाला लागलेली असताना प्रस्तुत कादंबरीचा नायक आहात मिळतील ती हत्यारे घेऊन शेतातील धान्य आणण्यासाठी पावसात तरुणांना घेऊन बाहेर पडतात. फकिरा स्वातंत्र्याचा झेंडा हाती घेऊन संघर्ष करतो. फकिरा मधील जीवन संघर्ष केवळ भुकेसाठी नसून अस्तित्वाचा लढा आहे.

## समारोप -

अण्णा भाऊ साठे यांचा जीवन अतिशय रोमांचक, संघर्षपूर्ण राहिले आहे. वाटेगावसारख्या छोट्याशा खेड्यातून मायानगरी मुंबईमध्ये वास्तव्यास येणे, कामगारांच्या चळवळीत स्वतःला झोकून देणे, स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होणे, उत्तम दर्जाचे साहित्य लिहिणे ही प्रक्रिया सोपी नव्हती. साहित्याच्या क्षेत्रातील तत्कालीन प्रस्थापितांची एकाधिकारशाही मोडीत काढून स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणे, सर्वसामान्य जनतेस साहित्य वाचण्यास भाग पाडणे, सर्व सामान्यांच्या जगण्यास साहित्याच्या केंद्रस्थानी आणणे हे अण्णांनी सहजतेने केले आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता, लोकशाही मूल्यांची जपणूक ही अण्णांच्या साहित्याची बलस्थाने आहेत. आजही त्यांचे साहित्य वाचनीय अजून उपेक्षितांच्या जगण्याचे वास्तव चित्रण करणारे आहे. त्यांना दृक श्राव्य माध्यमाची उत्तम जाण असल्याने त्यांच्या अनेक कलाकृतीवर मराठीत चित्रपट निर्माण झाले आहेत, हे विशेष. एकूण एक सर्वोत्तम जीवन मूल्य, मानवीय मूल्य जपणारा, जोपासणारा साहित्यिक म्हणून अण्णांचा विचार आदराने करावा लागतो, हे नाकारता येत नाही.

## संदर्भ सूची -


1. साहित्यप्रतिभेचा सूर्य : अण्णा भाऊ साठे - संपा. डॉ. शिवशंकर कसबे व डॉ. संग्राम टेकले - शौर्य पब्लिकेशन, लातूर - प्रथमावृत्ती 1 जानेवारी 2019 - पृ. 8.
2. विद्रोही कलावंत : अण्णा भाऊ साठे - डॉ. राजेश्वर दुडूकनाळे - लोकायत प्रकाशन, सातारा - प्रथमावृत्ती 2015 - पृ. 13.
3. अण्णा भाऊ साठे - डॉ. बाबुराव गुरव - लोक वाङ्मयगृह, मुंबई - प्रथमावृत्ती 1994 - पृ. 32.
4. उनि. - साहित्यप्रतिभेचा सूर्य : अण्णा भाऊ साठे - पृ. 12.
5. अर्जुन डांगळे व इतर (संपा) - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाङ्मय - - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई - प्रथम आवृत्ती 1 ऑगस्ट 1998 - पृ. 877.


❖❖❖

# लोकसाहित्यातील स्त्री-प्रतिमा

**प्रा. भैरवी कावरे**
मराठी विभाग
आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे, जि. अमरावती
9146813555

लोकसाहित्य हे आंपली सांस्कृतिक ठेव आहे. लोकसाहित्याला सांस्कृतिक मानसशास्त्राची पार्श्वभूमी आहे. लोकसाहित्य हा मुळातच सांस्कृतिक मानवशास्त्राचा एक भाग आहे, ही सांस्कृतिक मानवशास्त्राची सामग्री अनेक दृष्टीने अभ्यासयुक्त आहे. तत्कालीन सामाजिक धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब या लोकसाहित्यातून उमटलेले दिसते.

मराठीत या संस्थेसाठी लोकसाहित्य ही संज्ञा रूढ केली आहे, दुर्गा भागवत यांनी, प्रथम लोकसाहीत्य ही संज्ञा वापरली आहे. लोकसाहीत्याचा अनेक अभ्यासकांनी व्याख्या केल्या आहे या सर्व व्याख्ये मधून लोकसाहीत्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे लक्षात येते मौखिक परंपरेने आलेले ज्यामध्ये लोकमानस व्यक्त झाले आहे ज्याला लोकांच्या जीवनाचा संदर्भ आहे असे वाड्.मय होय.

लोकसाहित्यामध्ये लोककला, लोकनाट्य, म्हणी, लोकगीते इ. गोष्टी येतात या सर्व साहित्यामधून लोकमनाचे लोकमानसाचे दर्शन यातून घडते यालाच आपण आपली लोकसंस्कृती मानतो.

## लोकनाट्य आणि स्त्री

लोकसाहित्यामधील लोकनाट्य यामध्ये लावणी, तमाशा, पोवाडा यांचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान लोकनाट्यमध्ये आहे. लोकनाटयामधील आपण लावणीचा जर विचार केला तर लावणी जेव्हा प्रथम निर्माण करण्यात येऊ लागली तेव्हा तिला समाजात प्रतिष्ठा नव्हती शिष्ट समाजाची रचना म्हणूनच ती प्रसिद्ध होती तरी पण ती रूष्ट झाली नाही पुढे लोकशाहीच्या उदय झाल्यानंतर ती लोकनाट्यातून अविष्कृत होऊन राज मान्य झाली लावणी म्हटले की, तमाशात म्हटली जाणारी शृंगारिक लावणी नसून त्यास मनोरंजन सोबत आध्यात्मिकताही दिसून येते. एकूण अनेक विषयावर लावण्या आढळतात लावणीचे विविध प्रकार आहेत लावणी हा दृकश्राव्य, काव्यप्रकार आहे. या काळात संगीत अभिव्यक्ती आणि विषय या तीन घटकांना महत्त्व होते.

## लावणी या लोक नाट्यातून व्यक्त होणारी स्त्री

लावणी हा शब्द उच्चारला की नजरेसमोर येते ती तमाशातील नर्तकी डफ तुणतुणा, ढोलकीच्या तालावर नाचत आहे प्रेक्षक अश्लिल चाळे करून तिला खुणावत आहेत तिच्याकडे पैसे फेकत आहे. असे काही तिचे स्वरूप परंतु अलीकडे लावणीला दर्जा प्राप्त झालेला दिसतो, महाराष्ट्राची लावणी मराठी मनावर अधिराज्य गाजवित आहे. म्हणूनच लावणी मधील स्त्री प्रतिमेचेही विचार होणे गरजेचे आहे स्त्री म्हटली की तिला विविध भूमिका पार पाडाव्या लागतात विविध नाती निभवावी लागतात, त्या विविध नात्यांनी ती कशी बांधली जाते तिची मानसिकता तीचे दुःख तिची घुसमट या संदर्भात लावणी मधून व्यक्त होणारी स्त्री प्रतिमा.

संसारी तिचा पती मुलूकखागीरीवर गेलेला असताना ती त्याच्या विरहात दिवस काढीत असते, परंतू एक दिवस तिला शुभशकुन होतो आणि ही भावना ती आपल्या मैत्रिणीजवळच बोलून दाखविते

।वामनेत्र आज नखे लावू लागला

उगवता दिवस बाई आज चांगला
माडिया ग नज्यावरी का ग बोलतो
हाच शकुन साक्ष पती मार्ग चालतो.।

अशा शब्दांत होनाजीने स्त्रीच्या मनाचे चित्र रेखाटले आहे,कावळ्याचे ओरडणे डोळा लवणे हे शुभ संकेत मानण्याची प्रथा होती दूर देशी गेलेला पती परत येण्याचा संकेत तिला मिळतो. संसारी स्त्रिला पती खूप दिवस घर सोडून जाऊ नये यातून चित्रित होते. काही दिवसानंतर जागाचे स्वरुप पालटते, रुपवती स्त्रीचे वर्णन करतांना परशराम म्हणतो की,

।छबीदार सुरत फाकडी बुंद राखडी जडून वरखडे।
गुंफिणी वेणी नागिनी लढा गालावर दोन्हीकडे
अटकर बांधा लहान हरपले पाहून भूकतहान ।

यातून परशरामाने आकर्षण चेहऱ्याची रेखीव अशी स्त्री चित्रीत केली आहे. वेणीला नागिणीची उपमा, तीची हळुवार चाल, तिचा अटकर बांधाही परशुरामाच्या नजरेतून सुटत नाही. काही लावण्या मधून कार्यक्षम नायिका सुद्धा प्रगट केलेली आहे.

।उठा उठा हलवीते आता पहा पहा पहाट फारच झाली
व्हा जागृत प्रियकरा कुचाजी खरी नौबत वाजून राहीली ।

पती साखर झोपेत आहे त्याला उठवू नये असे तिला वाटते, पण ‘कुचाची नौबत’ वाजू लागल्याने ती पतीला जागे करीत आहे मोहिमेवर जाण्याची घाई करीत आहे. पारंपारिक नायिके पेक्षा या नायीकेत वेगळेपणा दिसून येतो. अशी कर्तव्यदक्ष नायिका ते रेखाटतात.

काही काव्यांमध्ये व्यभिचारी स्त्रीची प्रतिमा रेखाटली आहे,
।घरी व्रत आहे बीजवर कोण सक्त एक पकडली।
तो लपट तीजवर मी म्हणून खूप तूजवर।

अशी जशासतसी नायिका या लावणीतून दिसते संक्रातीत तिळगुळ देण्याच्या निमित्याने बोलावून त्याच्याशी प्रेमभावनेचा अविष्कार करण्याचा वाममार्गाने जाणाच्या व्यभिचारिणी स्त्रिया शाहिरी वाङ्‌मयात आढळतात. जिथे सर्व समाजच अवनतीच्या मार्गाने जात होता, तिथे स्त्रियांनाही त्याची थोडी झळ लागावी यात आश्चर्य नाही असे मःना अदवंत यांचे विधान महत्त्वाचे आहे.

## लोकगीत आणि स्त्री

लोकसाहित्यामधील महत्त्वाचा भाग म्हणजे लोकगीत यातून स्त्री लोकगीताची निर्मिती अनेक शतकापूर्वी होऊन मौखिक परंपरेने लोक जीवनात विशेषता स्त्री जीवनात प्रचलित झाली आणि प्रत्येक पिढीतील लोकांनी भर घालून पुढच्या पिढीला दिली. लोकगीतातून स्त्री गीतांचे स्वरूप जसे सुचले तसे म्हटले असे असले तरी जीवन जगत असताना जे अनुभवले ते भावले जे वाट्याला आले व अंतर आत्म्यातून आलेत ते व्यक्त झालेले आहे व्यक्त झाल्यामुळे जो मोकळेपणा आला व त्यातूनच जे स्वाभाविक समाधान मिळत असे, ते स्त्री लोकगीतातून दिसून येते निसर्गानेच बहाल केलेल्या जीवनातून व आतून संसारिक झालेल्या तिच्या मनातून जे बाहेर आले ते स्त्री लोकगीतातून व्यक्त होताना दिसते, म्हणूनच आशय आणि अभिव्यक्तीचे एक वेगळेपण या स्त्री लोकगीतातून आले, म्हणूनच या गीताला स्त्री गीते म्हणजे स्त्री जीवनाची गाथा मनाला भावणारी भावगंगा असे म्हटले जाते. आनंद वेगळा याबरोबर स्त्री आपले दुःख भावना श्रम परिहार या गोष्टी लोकगीतातून व्यक्त करताना स्त्री दिसते

लोकगीतातून स्त्रियांचे जीवन अनुभव मनोगत व्यक्त झालेले आहे लोक मनाचे लोक माणसाचे दर्शन यातून घडते, लग्नविधी, कुळाचार, सण उत्सव इत्यादी प्रसंगी गाणी म्हणण्याची प्रथा बऱ्याच लोक समुदायात होती नागपंचमीचे गाणी, मंगळागौरीची गाणी, पिंगा, फुगडी, उखाणे, जात्यावरच्या ओव्या इत्यादी मधून तत्कालीन स्त्री जीवनात प्रसंगानुरूप व्यक्त झालेले आहे. जात्यावरच्या ओव्या हा लोक गीतातील अमोल ठेवा आहे, लोकगीतात स्त्री गीते विपुल व विविध प्रमाणात आहे.

लोकगीताच्या घडणीत स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे लोकगीतातील स्त्री गीतांमध्ये स्त्रियांच्या विविध पैलू यांचे उत्कृष्ट दर्शन घडते साने गुरुजी ''स्त्रियांनी आपला संपूर्ण आत्मा या गीतात ओतला आहे' असे म्हणतात. अशिक्षित व ग्रामीण भागातील स्त्री जीवनात आजही या गीतांना स्थान असल्याचे पाहायला मिळते. स्त्री ही मुळातच संवेदनशील वृत्तीची हळव्या मनाची, तिच्या मनावर जीवनावर झालेल्या अनुभवांचे भावनांचे संस्कारांचे ठसे सहजपणे स्त्री लोकगीतातून उमटलेले दिसतात अनेक गीतांमधून ती स्त्री जन्माला नकार देत म्हणते,

।लेकीच्या गत जन्म घातला कुन्या येड्यांन ।<br>परायाच्या घरी घरी बैल राहते भाड्यान ।।1।।

या गीताचा जर आपण आढावा घेतला तर आपल्याला एकूण समाज व्यवस्थेत स्त्री उपेक्षितच राहिलेली आहे असे दिसते. तिच्या मनाची फारशी दखल समाजाने घेतलेली दिसत नाही.

।लेकीचा जलम जलम घालून चुकला ।<br>बैल घाण्याले जुंपला जन्म देती ।।2।।

रात्रंदिवस कुटुंबासाठी कुटुंबाच्या सुखदुःखासाठी झटणारी स्त्री या लोकगीतातून समोर येते व समाजात कुटुंबात वाट्याला आलेला जीवन आणि संवेदनशील मन यामुळे तिच्या मनाची अवस्था गुदमरलेली घुसमटलेली स्त्री लोकगीतातून दिसून येते

।हसू नको नारी हाशाचा भरम मोठा।<br>अस्तुरीचा जन्म खोटा लागेल बट्टा ।

किंवा

आई बाप बोलत्याती तिचे खाली बघून चाल बेटा।<br>अस्तुरीचा जन्म खोटा पुरुषाला नाही बट्टा।

संस्कार हे वरवरचे नाहीत तर तिच्या मनात जास्तीत जास्त खोलवर रुजवलेले आहेत, तिला माणूस म्हणून वागणूक न देता लहानपणापासून तिच्यावर स्त्रीपणाची संस्कार केले जातात. फ्रेंच लेखिका सिमॉन दि बीव्हा आपल्या सेकंड सेक्स या पुस्तकात म्हणतात की, स्त्री ही स्त्रीत्व घेऊन जन्म घेत नाही, तर उठता बसता चालता-बोलता प्रत्येक बाबतीत तिच्यावर बंधने लादून तिला माणूस म्हणून वागणूक न देता स्त्रीपणाची एक विशिष्ट भूमिका समाज प्रदान करते. ही पारंपारिकता लोकगीतातून व्यक्त होताना दिसतात.

## लोककला आणि स्त्री

मराठी लोक रंगभूमी मराठी लोक जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे; या रंगभूमीला कित्येक शतकाची परंपरा लाभलेली असून पारंपरिक तेचा वारसा असलेला लोक कलाकारांनी ही रंगभूमी आपल्या कलागुणांनी संपन्न आणि समृद्ध केलेली आहे. कीर्तन, गोंधळ, जागरण, भारूड यासारख्या लोकधर्मी नाट्यात लोक जीवनातील धर्म श्रद्धा आजही जतन करून ठेवलेल्या दिसतात. पंचमी किंवा बोहाडा यासारख्या नाट्यप्रयोगांना देव देवतांच्या उत्सवात आजही महत्त्व आहे. जागरणा सारखी विधिनामध्ये जीवनात प्रचलित झालेली वासुदेव, गोंधळी, वाघ्या-

मुरळी आदी उपसकानी मराठी लोक धर्मी नाट्याची जोपासना करून लोक जीवनात त्यांना मोलाचे स्थान प्राप्त करून दिलेले आहे.

मराठी लोक जीवनात खंडोबा या लोक देवतांच्या उपासना विधीतवाद्य वाघ्या-मुरळीचे जागरण यांना अनन्य साधरण महत्त्व आहे. धार्मिक अध्यात्मिक आणि सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने जागरणाचे महत्त्वाचे स्थान जनमनात आहे. महाराष्ट्रा प्रमाणेच कर्नाटक, आंध्र प्रदेश या दक्षिण भागात खंडोबाची मैलार ओळखली जाते. खंडोबाच्या महाराष्ट्रातील जेजुरीला सर्व स्थानांत विशेष महत्त्व आहे.खंडोबाच्या उपासनेत वाघ्या-मुरळी ला महत्त्वाचे स्थान आहे खंडोबाच्या नवसाने झालेले मुलगा किंवा मुलगी खंडोबाच्या उपासनेसाठी खंडोबाला अर्पण करतात त्यातील मुलगा वाघ्या बनतो व मुलगी मुरळी बनते.

शरद व्यवहाराने यांच्या मते, देवाला मूल वाहण्याच्या प्रथेतून वाघ्या-मुरळीची परंपरा प्रचलित झाली असे म्हणता येते. मुरळ्या खंडोबाची उपासना करताना वैश्या वृतीने किंवा भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करीत, त्याचे लग्न खंडोबाची लावलेले असते अशी श्रद्धा असल्यामुळेच मुरळयांना लग्न करून प्रपंच करण्याचा अधिकार नसतो, वाघ्या-मुरळी मध्ये सध्या फक्त वाघ्याला मराठी लोक जीवनात आदर्श स्थान आहे, परंतु मुरळीचे लग्न खंडोबाची विधिवत लावण्याची प्रथा ही काही वर्षांपूर्वी होती मुरळी बनणाऱ्या मुलीस पिवळे पातळ नेसून तिचे खंडोबाशी लग्न लावतात व तिच्या स्वीकार करण्याची विनंती खंडोबाला करून, देवावर भंडारा उधळला जातो. मुरळी बनलेली मुलगी मोठी होईपर्यंत आपल्या घरी राहते मोठी झाल्यावर पुन्हा मिरवणुकीने तिला खंडोबाची देवळी पाठवले जाते, त्यानतंर तिचे वास्तव जेजुरी येथे किंवा अन्य कुठल्याही ठाण्याजवळ असते. मुरळीच्या व पारंपारिक पोषाख म्हणजे नऊवार लुगडे, कपाळी हळदीचा मळवट, गळ्यात कवड्याच्या माळा,हातात घाटी आणि जागरणाप्रसंगी पायात घुंगरांची चाळ असा असतो धार्मिक अधिष्ठान लाभलेल्या मुरळीचे स्वतःचे उदरनिर्वाहासाठी वैश्यावृत्ती पत्कारावी लागते असावी आणि त्यामुळे भोग वस्तू झाली असावी, मुळातच आपल्या समाजात अजही मुलगी झाल्यावर नाक मुरडणारी आणि तीरस्कार करणारी माणसे आहेत. मुरळीना लग्न करून प्रपंच करण्याचा अधिकार नसतो. मुरळी ज्या खंडोबाची भक्ती करते, त्या खंडोबाने दोन बायका केलेल्या या समाजाला चालतात आणि जी मुरळी आयुष्यभर त्यांच्या उपासनेची शपथ घेते. तिला लग्न करण्याचा अधिकार का नाही? अध्यात्माच्या नावावर भोगलालसा करणे सहज सुलभ व्हावे म्हणून देवदेवतांची भीती घालुन देवदेवतेला मुली सोडणे. देवदेवतांसोबत तरूण मुलींचे लग्न लावणे हे प्रकार सुरू झाले, अधंश्रद्धेच्या नावावर माणसाने स्वतःची सोय केली आणि ती कायम राहावी म्हणून मुरळी किंवा देवदासींना लोककलावंतीन म्हणुन मान्यता देवून ती प्रथा आजही सुरू रहावी म्हणून प्रयत्न केले जात आहे. या प्रथानी मानवी जिवनाला कलंकीत केले पण आता या प्रथाना लोककला म्हणून त्याचे उदात्तीकरण करू नये. या प्रथा नष्ट करून यातील माणसांना मुक्त करून त्यांना समाजामध्ये माणुस म्हणून सन्मानाने जगता यावे यासाठी संशोधकानी आणि शासनाने प्रयत्न करावे.

## निष्कर्षः

लोकसाहित्यामधुन विविध संस्कृतीचे दर्शन घडते, यातच लोकनाट्यामधून लावणी या संस्कृतीचे दर्शन घडते. लावणीतील स्त्री ही आपल्याला मराठमोळी वृत्तीची दिसते. लावणीतील स्त्री प्रतीमा मधून ती मनोरंजन करत असली तरी विविध नाती जपताना दिसते.

पारंपारिक स्त्री लोकगीतांतुन स्त्रीमनातील व जीवनातील विविध अनुभव तरळपणे, उत्कटपणे व्यक्त झालेले आहे. स्त्री मनातील सुखदुःखे, भावभावना, अनुभव यांचे मिश्रण गीतांतुन उमटलेले दिसते. तत्कालीन सामाजिक धार्मिक व सांस्कृतीक जीवनाचे प्रतिबिंब या स्त्रीलोकगीतांतुन बघायला मिळते.

लोककला यातुन आपली कला दाखवून उदरनिर्वाह करणारे कलावंत आहेत यातंच मुरळीचे स्थान यात महत्त्वपुर्ण सांगीतले आहे. मुरळी म्हणजेच देवाला वाहीलेली मुलगी तिच्या वाटयाला आलेले देवदासी जीवन, या प्रथेमधुन स्त्रीचे आगळे-वेगळे रूप मुरळी, देवदासी बनून प्रथेच्या माध्यमातुन लोककलेमध्ये आपल्याला बघायला मिळते.

## संदर्भः


1) क. श्री. रं. ओवी ते लावणी

2) अदवंत म. ना. पैजण

3) डॉ. बाबर सरोजिनी, मराठीतील स्त्रीवन

4) संकलित ओवीगीते

5) डॉ. व्यवहारे स्त्रीगीतांची सामाजिक सांस्कृतीक पार्श्वभूमी

6) लोकसंस्कृतीचा अतःप्रवाह डॉ. शरद व्यवहारे


❖❖❖

# सावित्रीबाई फुले यांचे विचार आजच्या काळाची गरज

**प्रा.कु. ज्ञानू शालीग्राम राऊत**
सी.एच.बी. प्राध्यापक (मराठी)
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती.
भ्रमणध्वनी-८९७५१४०५९२ ईमेल- dnyanusraut123@gmail.com

## सारांश :-

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले हे नाव म्हणजे एक क्रांतिपर्व, एक धगधगता आविष्कार, स्त्री जातीचा हुंकार, जगण्यासाठी लागणारा प्राणवायू, काल्पनिक मातेपेक्षा जीवनातील अंधकार मिटवणारी साक्षात एक दिव्य मशाल, एका विशाल मनात सामावून घेणारी, सक्षम करणारी, सशक्त करणारी, स्त्री जातीला ताठ मानेने स्वतंत्रपणे अधिकार समजावून आपल्या काळजातून या असंख्य लेकींना तळमळून सांगणारी, माता, जननी, विद्धेचे आराध्य दैवत आणि हे केवळ सांगितलेच नाही तर आपल्या कृतीमधून खरं करून दाखविलं त्या म्हणजे भारतातील थोर शिक्षिका, मुख्याध्यापिका स्त्री मुक्ती चळवळीच्या आद्यप्रवर्तक, सत्यशोधक समाजाचा आधारस्तंभ सावित्रीबाई ह्या एकोणिसाव्या शतकातील स्त्री रत्न असून त्यांनी स्त्री-पुरुष समानता, समाजाचा स्त्रियांप्रती असलेला संकुचित दृष्टीकोण, प्रतिगामी विचार बदलून त्या ठिकाणी नवविचारांचे बीजारोपण करण्याचे कार्य त्यांनी केले. स्त्री ही एक मानव आहे आणि पुरुषांइतकीच कर्तबगारी ती करू शकते हे सावित्रीबाईंनी स्वतःच्या कार्यकृतीतून सिद्ध करून दाखविले. डॉ.बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही."१ त्याच प्रमाणे सावित्रीबाई फुले यांनी सुद्धा आपल्या कार्य कर्तृत्वातून दाखवून दिले की शिक्षणाशिवाय स्त्रियांमध्ये आणि समाजामध्ये परिवर्तन घडणे अशक्य आहे.

स्त्री सुद्धा माणूस आहे पुरुषाप्रमाणेच तिला बुद्धी, मन, भावना आणि स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे हे समाजाला लक्षात आणून देऊन त्यांनी शिक्षणाच्या प्रसार प्रचारासाठी आपले आयुष्य चंदनाप्रमाणे झिजविले. या त्यांच्या कार्याची जाणीव ठेवून प्रत्येक घर-घरांमधून सावित्री निर्माण झाली पाहिजे माणूस विविध क्षेत्रांमध्ये प्रगती करीत आहे, परंतु अजूनही स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलला नाही मानसिक परिवर्तन होणे खूप आवश्यक आहे. नुकताच भारतातल्या मणिपूर राज्यातून ४ मे २०२३ ला जो हिंसाचार झाला त्या हिंसक जमावाने दोन नग्न महिलांची धिंड काढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केला ही मानवतेला काळिमा फासणारी घटना आहे आपण एकीकडे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करतो आणि एकीकडे स्त्रियांना आपण अजूनही गुलाम करून ठेवलं आहे ही लज्जास्पद बाब आहे. अशा अनेक ज्या घटना समाजात घडतात हे अतिशय घृणास्पद आहे. यावर प्रामाणिकपणे विचार करण्याची गरज आहे. ठोस पाऊल उचलण्याची अत्यंत आवश्यकता आहे. या सावित्रीच्या लेकींना सुध्दा तुम्हा पुरुषांप्रमाणेच स्वतंत्रपणे जगू द्या तो तिचा पुरुषांप्रमाणेच मुलभूत अधिकार आहे. अशाप्रसंगी सावित्रींच्या विचारांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून प्रत्येक घरांमधून सावित्री निर्माण झाली पाहिजे प्रत्येक आई –वडिलांनी मुलींबरोबर मुलांवर सुद्धा सावित्रीबाईंच्या विचारांचे संस्कार टाकले पाहिजे म्हणजे कुठेच वाईट घडणार नाही समाज जागृत झाला पाहिजे, जगा आणि जगू द्या, विचार बदला, दृष्टीकोण बदला ही आजच्या काळाची गरज आहे.

**बीजशब्द-** आविष्कार, आद्यप्रवर्तक, बीजारोपण, प्राशन, अव्वल इंग्रजी.

## प्रस्तावना :-

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ मध्ये लक्ष्मी खंडोजी नेवासे पाटील यांच्या पोटी या कन्यारत्नाचा जन्म झाला प्राचीन कवी श्रीधराच्या काव्यभाषेत सांगायचे झाल्यास.

" जयासी भाग्य येणार बहुत २
त्याची चिन्ह आधीच दिसत||
सूर्याआधी उगवत| अरुण जैशा परेने ||"

या प्रमाणे सावित्रीचे बालपणीचे वागणे जाणवत होते भय किंवा भीती याचा लवलेशही त्यांच्यात नव्हता या निर्भीड कन्यारत्नाने स्त्रीशक्तीचे व्यापक विशाल रुपच स्वकर्तृत्वाने पुढे समाजाला दाखवून दिले. तत्कालीन प्रथेप्रमाणे ई.स.१८४० मध्ये सावित्रीबाई ९ वर्षाच्या आणि ज्योतीराव १३ वर्षाचे असतांना सावित्रीबाई ज्योतीरावांशी विवाहबद्ध झाल्या आणि येथूनच फुले दाम्पतीच्या युगप्रवर्तक क्रांतीकार्याचा शुभारंभ झाला.

सावित्रीबाई फुले यांनी ज्या कालखंडात सामाजिक, शैक्षणिक कार्य आपल्या कृतीतून केले त्या तत्कालीन समाजामध्ये भीषण अज्ञान, कर्मकांड, वर्णभेद, जातीभेद, केशवपन, बालविवाह, सतीची चाल इत्यादी व्याधी महाव्याधींनी महाराष्ट्र आणि संपूर्ण देश ग्रासलेला होता स्त्री समाजाची स्थिती पाहून तर अंगावर शहारे यावेत असाच तो काळ होता समाजातील ही संकुचित परीस्थिती, ही व्याधी कायम दूर करायची असेल तर फक्त शिक्षण या औषधानेच होवू शकते हे त्यांनी जाणले होते यासाठी त्यांनी पुण्याच्या सनातन्यांच्या पंचक्रोशीमध्ये शाळांची निर्मिती केली क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई यांच्या कृतीशील प्रेरणेने, क्रियाशील मदतीने हे शक्य झाले. ज्योतीरावांप्रमाणेच सगुणाबाई क्षीरसागर व फातिमा शेख यांच्या विचारांचाही सावित्रीबाईंच्या मनावर खोल ठसा उमटला होता. या साध्वीने शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणूनच काम केले नाही तर शाळांच्या व्यवस्थेचे व निरीक्षणाचे काम सुद्धा त्या पाहत होत्या त्यांनी हे कार्य एक पैसा न घेता त्यागबुद्धीने व सेवाभावाने केले आहे हे पवित्र कार्य करतांना समाजकंटकांनी भटभिक्षुकांनी त्यांचा किती छळ केला हे सर्वश्रूतच आहे. सावित्रीबाई व त्यांच्या सहकारी फातिमा शेख यांनी शूद्र व अतिशूद्र मुलींची शाळा चालविली आणि खऱ्या तळमळीने शिक्षणाचे कार्य केले.

स्त्री शूद्रांच्या हक्कासाठी आणि उद्धारासाठी १९ व्या शतकात ज्योतीराव आणि सावित्रीबाई या दोन अलौकिक विभूतींनी जे कार्य केले. त्यास भारताच्या इतिहासात तोड नाही एका स्थितप्रज्ञाचे जीवन त्या जगल्या एका महात्म्याची पत्नी म्हणून कोठे मिरविण्याची हौस नाही की, सत्काराचे हार मिळण्याची लालसा नाही आपण काही मोठे केले आहे म्हणून प्रसिद्धीची अभिलाषा नाही, त्यांच्या प्रत्येक कृतीत सागराचे गांभीर्य व हिमालयाची उत्तुंगता होती आणि आज आपण मान–सन्मानासाठी स्वतःच्या स्वार्थासाठी सूडबुद्धीने, अहंकाराने वागत असतो म्हणून आज स्वतःमध्ये परिवर्तन करण्याची गरज आहे सावित्रीचे विचार सदैव समाजातील विविध स्तरामध्ये रुजविण्याची गरज आहे. १ जानेवारी १८४८ मध्ये फुले दाम्पत्यांनी पहिली मुलींची शाळा आणि १८५१ मध्ये शुद्रांसाठी शाळा चालू करून सनातन्यांच्या बालेकिल्ल्याला पुणे इथे जोरदार धक्का दिला १८४८ ते १८५२ या अव्वल इंग्रजी कालखंडात २० शाळा काढून ब्रिटीश सरकारलाही जागृत केले सर्व स्तरातील मुला –मुलींना शिक्षण देणे हे फुले दाम्पत्याने ओळखले होते समाजातील प्रचंड विरोधाला सामोरे जात असतांना शिव्याशाप, दगडधोंडे, अपमान सहन करत त्यांनी समाजहित साधले स्वतःच्या जीवाची पर्वा न करता समाजात परिवर्तन करण्याचा विडा त्यांनी उचलला आणि आपल्या कृतीतून यशस्वी केला. समाजामध्ये सामाजिक, शैक्षणिक व वैचारिक, राजकीय क्रांतीची

गरज असते ती खरी क्रांती फुले दाम्पत्यांनी केली. त्यांनी केलेल्या युगप्रवर्तक शैक्षणिक कार्यामुळे जागतिक इतिहासाच्या दृष्टीकोनातून १८४८ हे वर्ष क्रांतिकारक ठरले.

पेशवाईच्या काळातील स्त्री आणि शूद्र यांची पशूपेक्षाही हीन- दीन अवस्था, क्रूर वागणूक उच्चवर्णीयांनी कशी केली हे 'बावनकशी सुबोध रत्नाकर' या कवितासंग्रहातून तत्कालीन परिस्थितीचे अचूक दर्शन घडते.

"पुढे पेशवाई तिने राज्य केले३
अनाचार देखी अतिशूद्र भ्याले
स्वथुकी थुकाया मडके गडी ते
खुणा पुसाया ढुंगणी झाप होते
तुला बोलवी बाजी शौरी धनी ग
स्वपत्नीस धाडे निलाजरा पती ग
अशा ब्राम्हणीला छळे स्त्रैणशाही
मुखा बोलती त्या जळो पेशवाई"

भटभिक्षुकांनी देवाधर्माच्या नावाखाली स्वतःच्या स्वार्थासाठी स्त्री आणि शूद्र ही माणसेच नाहीत अशी समजूत केली होती स्त्री म्हणजे नरकद्वार, स्त्री म्हणजे पापाचे माहेर घर, स्त्री म्हणजे पुरुषांच्या कामवासना त्यांच्या इच्छेप्रमाणे भागविणारे एक साधन, ती एक दैनंदिन उपयोगी पडणारी वस्तू मानले जाई तिलाही भावना, आशा, आकांक्षा, मन, स्वतंत्र व्यक्तिमत्व असू शकते हे मनुपासून पुढील सर्व पुराणकारांनी, भटभिक्षुकांनी, मान्य करण्यास साफ नकारच दिला आहे यामुळे हिंदू धर्मात स्त्री आणि शूद्रांचा जेवढा छळ झाला आहे तेवढा जगातील कोणत्याही धर्मात झाला नसेल. तेव्हा शिक्षण ही सुद्धा धार्मिक बाब मानली जाई, या धर्माप्रमाणे ब्राम्हणांना म्हणजे पुरुष ब्राम्हणांनाच विद्धेचा अधिकार आहे, स्त्रियांना, शूद्रांना विद्धेचा अधिकार धर्मानेच नाकारला आहे, धर्म हा परमेश्वर निर्मित असून त्याविरुद्ध वर्तन करणारे नरकात जातात अशी भोंदू किळसवाणी शिकवण दिली जाई. या देशात हजारो वर्षांपासून ते १९ व्या शतकातील अव्वल इंग्रजी काळापर्यंत स्त्रियांना आणि शूद्रांना विद्धेपासून वंचित ठेवण्यात आले, त्यांचे अस्तित्व ओरबाळून, हिसकावून घेण्यात आले हे १८१८ पेशवाईच्या काळ्याकुट्ट कालखंडापर्यंत स्त्री शुद्रांची अशी अवेहलना, अवस्था करण्यात आली म्हणून या जाचक नरकातून बाहेर पडण्यास शिक्षण हेच रामबाण औषध आहे हे फुले दाम्पत्यांनी ओळखून समाजसुधारणेचे कार्य शिक्षणाने आरंभिले. शूद्र, स्त्री, अतिशुद्रांना शिक्षणाची कास धरल्याशिवाय गत्यंतर नाही हे सांगतांना काव्यरचनेत सावित्रीबाई म्हणतात.

"शूद्र आणि अतिशूद्र अज्ञानाने पछाडले४
देवधर्म स्व ही आचरी अज्ञानाने पछाडले
सुखाची नसती हाव दुःखास सुख मानती
विधाते ठेविले जैसे बोध सांगती
दोन हजार वर्षाचे दुखणे त्यास लागले
ब्रम्हविहीत सेवेचे भूदेवांनी पछाडले
अवस्था पाहुनी त्यांची 'हाय' शब्द मनी उठे
सुलभ मार्ग कोणता काय विचारे बुद्धी ही अटे
शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षणमार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हारते पहा."

अशाप्रकारे शिक्षणानेच परिवर्तन घडू शकते हे सावित्रीबाईंनी ओळखले होते, शिक्षण हे वरिष्ठ वर्गातून झिरपत-झिरपत कनिष्ठ वर्गात पोहचेल या मतलबी सिद्धांताला आव्हान देणारे पहिले भारतीय म्हणजे फुले दाम्पत्य होय.

१ जानेवारी १८४८ पासून स्त्री व शूद्रांच्या शिक्षणासाठी टाहो फोडणारे, या देशातील पहिले कैवारी सावित्रीबाई आणि महात्मा फुले होय. त्यांच्या अपार कष्टातून आज स्त्री आणि शूद्रांचे जीवन सुखमय झालेत. B.S.F (बॉर्डर सिक्युरिटी फोर्स) पासून तर अनेक क्षेत्रांमध्ये स्त्रिया पोहचल्या राष्ट्रपती पदापर्यंत आदिवासी समाजातील २५ जुलै २०२२ मध्ये १५ व्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू झाल्या यापेक्षा दुसरं मोठं उदाहरण ते काय? हे सर्व सावित्रीच्या पुण्याईने, म्हणून आज सावित्रीच्या कार्यातला भारत बनण्याची गरज आहे त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून कर्मकांड, जातीभेद, वर्णभेद, अंधश्रद्धा नष्ट करून शिक्षणाने मानसिक, सामाजिक, बौद्धिक, वैचारिक परिवर्तन होण्याची गरज आहे सावित्रीची पेटती मशाल होण्याची गरज आहे. सावित्रीबाई फुले यांनी समाजातील अनेक वाईट प्रथांचे उच्चाटन करण्यासाठी स्त्री संघटन कार्याची स्थापना केली होती. त्यामध्ये स्त्री जीवनाच्या समस्यांवर विचारविनिमय होत असे. १८४८ सालापासून स्त्री शिक्षणाबाबत पुढाकार घेतलेल्या सावित्रीबाईंना शूद्र,अतिशूद्र भगिनींची चांगली साथ मिळाली त्यामध्ये सामुदायिक हळदी कुंकवाचे कार्यक्रम होवू लागले अशा प्रकारच्या उच्चवर्णीयांच्या संघटना अस्तित्वातच नव्हत्या, या संघटनांच्या मार्फत प्रौढ स्त्रियांचे शिक्षण, कुमारी माता, परित्यक्ता, विधवा विवाह, बालहत्या, बालजरठ विवाह, अस्पृश्यता निवारण अनेक विषयांवर चर्चा होत असे स्त्रियांना आपल्या समस्या मांडण्यास बोलके करण्यास सावित्रीबाईंचा पुढाकार कारणीभूत होता त्यामुळे सावित्रीबाई ह्या स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या एकमेव गंगोत्री आहे.

डॉ. लीना सतीश निकम यांच्या ३ जानेवारी २०२० महाराष्ट्र टाईम्स मधील 'अरे पुन्हा सावित्रीच्या पेटवा मशाली '५ या त्यांच्या लेखामध्ये त्या म्हणतात जग बरेच बदललेय, स्त्री विश्वात तर प्रचंड बदल झालाय, स्त्रियांचे जगणे बदलविण्यात सिंहाचा वाटा असलेले एक जगणे आपण कसे विसरणार? जस–जसे दिवस जात आहे तस-तसे हे जगणे मनात पुसट होण्याऐवजी आणखी गडद होत जात आहे ते नाव आहे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जवळपास पावणे दोनशे वर्षापूर्वी ज्योतिबा आणि सावित्रीबाई या दोन विधायक शक्ती एकत्र आल्यात आणि आपल्या आयुष्यातील काट्यांची फुले करून गेल्यात त्या म्हणतात, एक शिक्षिका या नावाने मी जेव्हा सावित्रीबाई कडे बघते तेव्हा तर त्या आभाळा एवढया वाटायला लागतात सावित्रीबाईंनी मुलींना शिकविलेच नाही तर त्यांना निर्भय बनायला, स्वतंत्र विचार करायला, स्वतंत्र निर्णय घ्यायला शिकविले. त्यांची विद्यार्थिनी मुक्ता साळवे हिने एका निबंधात म्हटले "हे भगवंता, जर आम्हास धर्म पुस्तक पाहण्याची मोकळीक नाही तर आम्ही धर्मरहित आहोत, असे साफ दिसते की नाही बरं?"६ असे निर्भीड मत मांडले. आजच्या शिक्षण पद्धतीत स्वतंत्र विचार करणे, स्वतंत्र निर्णय घेणे शिकवायला शिक्षकाला वेळ आहे की नाही हा अभ्यासाचा विषय आहे बोटावर मोजता येतील एवढे शिक्षक सोडले तर बरेच शिक्षक इकडून-तिकडून निव्वळ व्हाट्सअॅप युजर्स आहेत असे खेदाने म्हणावे लागते. परंतु सावित्रीची धुरा आज प्रत्येक शिक्षकांनी सांभाळली पाहिजे कारण शिक्षकच समाजात सावित्री निर्माण करू शकतात आणि ही काळाची अत्यंत गरज आहे.

सावित्रीबाईंनी त्या काळात महिला सेवा मंडळ स्थापन केले होते, त्यामध्ये त्या सूतकताई पासून हळदी कुंकवापर्यंत अनेक उपक्रम त्या घ्यायच्या पारंपारिक सणांमधून सुद्धा सामाजिक परिवर्तनाचा संदेश देता येतो हे सावित्रीबाईंनी दाखवून दिले आहे. आजही हळदीकुंकू, लग्न समारंभातून विधवा स्त्रियांना वगळलं जातं यामुळे त्यांच्या मनावर जो ओरखडा उमटवला जातो ती गोष्ट अमानवीय आहे, या संदर्भात एका मैत्रिणीचे विधान डॉ .लीना निकम यांनी सांगितले की, पती निधनाचे दु:ख वेगळे आणि ह्या चालीरीतींचे ओरखडे वेगळे संक्रांत आली म्हणजे माझ्या अंगावार काटा उभा राहतो, मी फार मोठा गुन्हा केला आहे असं उगाचच वाटायला लागतं यावरून जातीधर्म, भेदभाव, सधवा –विधवा यापलीकडे जावून माणूसपणाचा विचार सणा-समारंभातून व्हायला पाहिजे. आज महापुरुष, सण, समारंभ आणि हळदी कुंकू सुद्धा जातिधर्मात वाटले गेले आहे प्रत्येक जातीत वेगळाच चातुर्वर्ण्य निर्माण झाला आहे, मग ते आर्थिक, सामाजिक असो की शैक्षणिक या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई मात्र पुन्हा –पुन्हा आठवत

राहतात थोडाफार बदल होतोय पण त्या काळी माणूस म्हणून विचार करणाऱ्या, पतीच्या अंतयात्रेत टिटवे उचलणाऱ्या आणि अग्नी देणाऱ्या सावित्रीबाई इतिहासातील प्रथम स्त्री आहेत यासारखे त्यांचे सर्व निर्णय क्रांतिकारक आहेत म्हणून आज तरुण पिढीपर्यंत त्यांचे क्रांतिकारक विचार, त्यांचे कार्य, त्यांच्या जीवनचरित्राचे पुन्हा-पुन्हा पारायण करण्याची गरज आहे. काल्पनिक पोथ्यांची पुस्तके देण्याऐवजी सावित्रीबाईंची पुस्तके ऐकमेकांना भेट देण्याची आज गरज आहे त्यामुळे सावित्रीबाई सर्वांना नव्याने कळतील, नव्याने भेटतील आणि नव्याने प्रेरणा देतील असे मनापासून वाटते.

"सर्वांचे उपकार फिटतील परंतु आपल्या जन्मदात्या मातोश्रीचे उपकार फिटणार नाही." ७ या म्हणीप्रमाणे सावित्रीबाईंचे अनंत उपकार समाजातील स्त्री पुरुषांवर आहे म्हणून आज प्रत्येक स्त्रीने सावित्री मी होणार हा ध्यास घेतला पाहिजे आणि आपण स्वतः सक्षम होवून आपल्या पोटच्या गोळ्याला ठामपणे सक्षम करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## निष्कर्ष :-

१ ) स्त्रियांच्या परिस्थिती मध्ये शिक्षणाने परिवर्तन घडवण्याचा कृतीशील प्रयत्न.

२ ) १ जानेवारी १८४८ मध्ये मुलींची पहिली शाळा काढून शैक्षणिक क्रांती करण्यास शुभारंभ.

३ ) सावित्रीबाईंच्या प्रत्येक कार्यातून त्यांच्या कृतीशील विचारांचे स्मरण.

४) साहित्यिक म्हणून 'सुबोधरत्नाकर' आणि 'काव्यफुले' या काव्यसंग्रहाद्वारे क्रांतीचे पाऊल.

५) पहिल्या शिक्षिका व पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून सामाजिक विषमता व शैक्षणिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न.

## संदर्भ :-

१ ) सावित्रीबाई ज्योतीराव फुले – डॉ. मा.गो माळी. चौथी आवृत्ती ऑगस्ट -२०१२
मॅजेस्टीक पब्लिशींग हाऊस ठाणे. पृ.२०, २१, २३, २४, २५, ५५

२ ) सावित्रीबाई फुले अष्टपैलू व्यक्तिमत्व – प्रा. ना.ग.पवार. प्रथमावृत्ती फेब्रु -२००४
पद्मगंधा प्रकाशन. पृ.१९,२२, ५८, ७१, ७२

३ ) सुबोध रत्नाकर कवितासंग्रह – १८५१ साली प्रसिध्द पृ .८४

४ ) डॉ. लीना सतीश निकम यांचा ३ जाने. २०२० महाराष्ट्र टाईम्स मधील लेख.

❖❖❖

# महिलांचे मानवी अधिकार आणि कौटुंबिक हिंसाचार

प्रा. डॉ. सुधीर मारोतराव गोटे
गुलाम नबी आझाद समाजकार्य महा., पुसद, जि. यवतमाळ
पत्ता : झेड.पी. कॉलनी, श्रीरामपुर, पुसद ता. पुसद, जि. यवतमाळ, पी.को. : ४४५२१५
Email id - sudhirgote121@gmail.com Mob. - 9922239303

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेमध्ये मानवी हक्क आणि मुलभूत स्वातंत्र्य यांचा आग्रह धरण्यात आला असुन त्याच्या स्थापनेसाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यामुळे मानवी हक्काचे महत्व अधोरेखीत होण्यास खुप मदत झाली आहे. मानवी हक्क किंवा अधिकार हे मानवाच्या जिवनाचे अविभाज्य भाग आहेत. प्रत्येक व्यक्तीला मनुष्य प्राणी या नात्याने हे हक्क नैसर्गिकरित्या प्राप्त झालेले आहेत. म्हणुन मानवी व्यक्तीमत्वाचा विकास करून घेणे शक्य होणार नाही. इतकेच नव्हे तर हक्काशिवाय व्यक्तीला चांगल्या प्रकारचे जिवन जगणेही शक्य होणार नाही. अशा सर्व गोष्टींचा विचार करून संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ ला मानवी अधिकाराचा जाहिरनामा घोषित केला आहे.

प्रत्येक माणसाला जिवन जगण्याचा सामाजिक प्रतिष्ठेचा आणि सुरक्षिततेचा अधिकार आहे. मानवाच्या स्वाभाविक प्रतिष्ठेचा आणि गुणवत्तेचा आदर करणे हा मानवी अधिकाराचा आधार आहे. ते एक मुल्य आहे. भारतीय राज्यघटनेने ही हा एक अधिकार आहे. ही संकल्पना मांडलेली आहे. मुलभूत अधिकाराच्या कलमामध्ये कुठल्याही जाती, धर्म, लिंग इ. बाबत भेद केलेला नाही. आंतरराष्ट्रीय मानवाधिकाराच्या सनदेमध्ये कलम ३ व ४ नुसार देखील जिवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा व सुरक्षिततेच्या अधिकाराला पाठिंबा देतात. तसेच ५ व्या कलमामध्ये कुण्याही व्यक्तीला यातना, अमानुष क्रुरता किंवा मानहानीची वागणूक भोगता कामा नये असे म्हटले आहे. अनेक लेखकांची मानवाधिकाराच्या व्याख्या केलेल्या आहेत. त्याचा सार खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) मानवाधिकार हे नैसर्गिक अधिकाराचे आधुनिक आणि धर्मनिरपेक्ष आहे.
२) मानवी अधिकार हा असा अधिकार आहे जो व्यक्तीला जन्मापासुनच प्राप्त झालेला आहे.
३) व्यक्तीच्या सन्मानपुर्वक जगण्याला आणि त्याच्या व्यक्तीमत्व विकासाकरिता अपरिहार्य आहे.
४) मानवाधिकाराच्या उपभोगाकरिता विशिष्ट परिस्थितीच्या निर्मितीची आवश्यकता आहे.
५) मानवी अधिकाराचा संबंध व्यक्तीच्या मुलभूत गरजांच्या पुर्ततेशी असल्यामुळे त्याचा समावेश राज्यांनी आपल्या राज्यघटनांमध्ये करणे अपेक्षीत आहे.
६) जात, धर्म, पंथ, वंश, लिंग या आधारावर कुठल्याही राज्यपाल हे अधिकार हिरावुन घेण्याचा अधिकार नाही.
७) मानवाधिकार हे व्यक्तीला इतर व्यक्तीपासुन तसेच राज्याच्या सत्तेपासुन हिंसाचारापासुन संरक्षरणाचे कवच आहे.

इत्यादी बाबींचा समावेश मानवाधिकारामध्ये करण्यात आला आहे. यादृष्टीने विचार करता महिलांच्या मानवी हक्काची व मानवी प्रतिष्ठेची जपणुक करण्यासाठी त्यांना स्वातंत्र्य आणि समानता पुरूषांच्या बरोबरीने मिळणे गरजेचे आहे आणि हे जर साध्य करावयाचे असेल तर महिलांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास अशी धोरणे आखली पाहिजेत. ही धोरणेही अशी असावीत की ज्या योगे महिलांना त्यांच्या सुप्तशक्तीची जाणीव होईल आणि सर्व क्षेत्रात समानता, स्वातंत्र्य अनुभवण्यासारखी परिस्थिती निर्माण होवु शकेल. अनेक वर्षापासुन समाजशास्त्रज्ञ आणि स्त्रीसुधारक स्त्री समस्यांचा व गुणात्मक बदलांचा अभ्यास करित आहे. समाजात असलेल्या रूढी, परंपरा, अभिवृत्ती आणि यातुन स्त्रियांना सहन करावी लागणारी असमानता याचा विचार करतात. तर काही विवाह वारसा हक्क यासंदर्भात महिलांना मिळालेले अधिकार व कायदा आणि त्यांचा सार्वजनिक क्षेत्रातील सहभाग याचा विचार करतात. या सर्व शास्त्रज्ञ आणि अभ्यासक यांच्या अभ्यासातुन भारतीय महिलांच्या संदर्भात विविध प्रकारचे कायदे आणि अधिकार असतांना सुध्दा जे वास्तव समोर आले आहे ते या शोधनिबंधाच्या माध्यमातुन मांडण्याचा प्रयत्न करित आहे.

## भारतीय महिलांच्या संदर्भात असलेली वास्तविकता :

महिलांच्या बाबतीत असलेले मानवाधिकार मुल्ये रसातळाला जात आहे. या ठिकाणी स्त्रियांच्या संदर्भात विचार केल्यास असे लक्षात येते की, प्रदीर्घकाळ शोषित, वंचित व आपल्या हक्कांपासुन हजारो मैल दुर असणाऱ्या स्त्रिच्या विकासाला बाधा येत आहे. पारतंत्र्यात स्त्री गुलाम होती. आपल्या हक्कांपासन वंचित होती. स्वातंत्र्यातही ती गुलाम आहे. हक्कापासुन वंचित आहे. आज स्त्रियांवरित अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. स्त्री—भृणहत्या, हुंडाबळी, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार, सामुहिक अत्याचार या आणि अशा कितीतरी घटना आपणास सांगता येतात. मानवी हक्कांपासुन स्त्रियांना वंचित ठेवणारा समाजातील पुरूषप्रधान वर्ग हाच जबाबदार आहे असे दिसुन येते. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अहवालानुसार मानवी अधिकारांचे उल्लंघन महिलांच्या जन्मापुर्वी पासुनच सुरूवात होते. जन्मापुर्वीच महिलांच्या संदर्भात जबरदस्तीने गर्भधारणा गर्भपात तसेच गर्भावस्थेच्या दरम्यान होणारे विविध प्रकारचे अत्याचार, स्त्रीभृण हत्या इत्यादी माध्यमातुन महिलांचे होणारे शोषण सुरूच असते. बाल्यावस्थेतही आई—वडिलांकडून खाण्यापिण्याचे भेदभाव, मारपीट तसेच व्यक्तीविकासाकडे लक्ष न देणे या बाबी नित्याच्याच असतात. जेव्हा मुली किशोरावस्थेमध्ये येतात लग्नाची घाई, बलात्कार, वेश्यावृत्ती, लैंगिक शोषण इ. प्रकरणे समोर येतात. मानवाधिकराचे उल्लंघन हा प्रकार विवाहाच्या नंतरही निरंतर चालुच राहते. उदा. हुंडयाकरिता मानसिक छळ, शारिरीक छळ, हत्या तथा आत्महत्या, मानसिक व शारिरीक शोषण आणि पारिवारिक हिंसा या माध्यमातुन महिलांच्या अधिकाराचे उल्लंघन त्यांच्या जन्मापासुन तर वयाच्या ६०—६५ किंवा त्यानंतरही सुरूच राहते. भारतामध्ये महिलांच्या अधिकारांचे होत असलेले उल्लंघन यांचा अभ्यास केल्यास असे दिसुन येते की, दिवसेंदिवस अत्याचाराच्या प्रमाणामध्ये वाढच होत आहे. बलात्कार, हुंडाबळी, अपहरण, अत्याचार, छेडछाड, लैंगिक शोषण, अनैतिक व्यापार, अभद्र वागणूक, हुंडयाकरिता अत्याचार इ. ची आकडेवारी पाहिली असता त्यात दिवसेंदिवस वाढ होतानाच दिसते. जसे २००० मध्ये महिलांची शोषणाची आकडेवारी १४१३७२ होती तर २०१० मध्ये या आकडयात वाढ होवुन ही संख्या २१३५४९ इतकी झालेली दिसते तर २०२० मध्ये नक्कीच यामध्ये वाढ झालेली आहे. म्हणजेच भारतामध्ये या अत्याचाराच्या घटना म्हणजे फार मोठे आव्हान आहे . कारण एकुण लोकसंख्येच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणाऱ्या महिलांवर अत्याचार म्हणजेच फार शोचनीय बाब आहे.

विभिन्न राज्याच्या अत्याचारांच्या आकडेवारीवरून असे लक्षात येते की, विविध राज्यामध्ये महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण वेगवेगळे आहे. जसे मध्यप्रदेश, पश्चिम बंगाम, आसाम, महाराष्ट्र, राजस्थान या राज्यात सर्वात जास्त आहे. तर अपहरणाचे प्रमाण उत्तरप्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल या राज्यात अधिक आहे. कौटुंबिक हिंसाचार पश्चिम बंगाम, आंध्रप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र राज्यात अधिक प्रमाणात दिसुन येते. महिला उत्थानाकरिता संविधानामध्ये तरतुद आहे. त्यांच्याकरिता कायदे सक्षमपणे मांडलेले आहे. महिला आयोग व इतर महिलांच्या संघटना भारतभर सक्रिय असतांना सुध्दा महिलांच्या अत्याचारामध्ये वाढच होत आहे. त्यामुळे सामाजिक जाणीवा तशा प्रकारच्या निर्माण करणे, लैंगिक शिक्षणावर भर देणे, सामाजिक जागृती घडवुन आणणे सारखे प्रयत्न केल्यास स्त्री अत्याचाराच्या घटना कमी होवु शकतात.

## निष्कर्ष :

मानवी अधिकारामध्ये जसे कुठल्याही आधारावर व्यक्ती—व्यक्तीमध्ये फरक करता येत नाही. म्हणजेच सर्वांना सारखा अधिकार दिलेला आहे. त्याप्रमाणे भारतीय राज्य घटनेमध्ये मुलभूत अधिकाराच्या माध्यमातुन समान अधिकाराची निर्मिती केलेली आहे. त्यामुळे कायदे जरी सक्षम असले तरी ती राबविणारी व्यवस्था सक्षम होणे आवश्यक आहे. यासोबतच सामाजिक जाणीवा शिक्षण, रोजगार इ. बाबतीत पुरूषी मानसिकतेत बदल करणे आवश्यक आहे. यामुळे महिलांवरील अत्याचाराच्या घटनांत घट होतांना दिसेल व आपला देश महिला सक्षमीकरणात पुढे राहील.

## संदर्भ ग्रंथ सूची :

१) शर्मा डॉ. कृष्णकुमार : मानवाधिकार एवं कर्तव्य, अर्जुन पब्लिशिंग हाऊस.
२) मेहेत्रे डॉ. स्मीता : भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, साईनाथ प्रकाशन.
३) कौशीक आशा : मानवाधिकार और राज्य, आविष्कार पब्लिशर्स डिस्ट्रीब्युटर्स, जयपुर.

❖❖❖

# जागतिकीकरणाचा वंचित महिलांवर झालेला प्रभाव

प्रा. संतोष एल. जाधव
गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविदयालय, पुसद
Emai – santoshljadhao@gamil. com. Mob - 9822939317

भारतात १९९० च्या सुमारास जागतिकीकरणाला सुरुवात झाली. ह्या काळात देशावरचे विदेशी कर्ज एवढे वाढले होते की जागतिक बँक आंतरराष्ट्रीय नाणे निधी ह्या खाजगी जागतिक संघटनांनी भारताला आणखी कर्ज देणे नाकारले व कर्ज मिळवण्यासाठी भारतावर काही अटी लादल्या. ह्या अटींमध्ये भारताने आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये काही धोरणात्मक बदल करून तिला विदेशी कंपन्यांसाठी खुले करणे समाविष्ट होते. अर्थव्यवस्थेमधील ह्या बदलांना "आर्थिक सुधारणा" असे म्हटले गेले. त्यात जागतिकीकरणासोबतच उदारीकरण व खाजगीकरण ह्यांचा पण समावेश होतो. ह्यांनाच एकत्रितपणे खा.ऊ.जा. धोरण असे संबोधले जाते. संजय भास्कर जोशी यांच्या मते, मुख्यत: व्यापारासाठी विविध देशांनी एकमेकांना जोडून घेत एकमेकांच्या भूमीत खुलेपणाने व्यापार करण्यासाठीची व्यवस्था निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय. मो. वि. भाटवडेकर यांनी नोंदविल्याप्रमाणे, 'देशात खुला व्यापार, गुंतवणुकीसाठी मोकळी बाजारपेठ आणि तंत्रज्ञान व कुशल व्यावसायिकांना देशांतर करण्यास सुलभ कायदे कानून अशी जागतिक व्यवस्था म्हणजे जागतिकीकरण होय.

अमेरीकेचे तात्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी नव्या आर्थीक जागतीक व्यवस्थेची मांडणी केली. हा विचार जगभर विस्तारीत केला. जागतीकीकरण म्हणजे एक प्रकारचा आर्थिक साम्राज्यवाद आहे. विकसित देशांनी अविकसित देशावर लादलेली एक आर्थीक गुलामगीरी आहे. जागतीकीकरणाची मुळे ही श्रीमंत राष्ट्रांच्या व्यापारी अप्रत्यक्ष व्यापुन टाकले आहे. मानसापेक्षा आधुनिक यंत्र तंत्रांच्या बळावर सामर्थ्य संपन्न देश विस्तारात दडलेली आहे. जागतीकीकरणाच्या प्रक्रियेत पृथ्वीवरील मानवी जीवन प्रत्यक्ष व जगाला आर्थीक, सामाजिक दृष्टीने कमकुवत बनवत आहे. जागतीकरणाच्या प्रक्रियेत भांडवलाला केंद्र बिंदु बनविण्यात जागतीक बॅक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, उत्तर अमेरीका मुक्त व्यापार करार या संस्था प्रयत्नरत आहेत.

जागतीकीकरणामुळे जगावर अधिराज्य गाजविण्याची मोठया राष्ट्रात जी स्पर्धा लागलेली आहे. त्यामुळे बाजार व्यवस्थेचा विस्तार वाढला. जागतीकीकरण ही समाजशास्त्रीय अगदी अलीकडच्या संकल्पना आहेत. जागतीकीकरणाचे समर्थक पारंपारीक समाजशास्त्रावर टिका करतात त्याच्या मते पारंपारीक समाजशास्त्रात जुन्या संकल्पनांचा अभ्यास होतो. त्यामुळे राज्य–राष्ट्रीय स्तरावरील संकल्पनाच नाही. जागतीकीकरण एका अर्थाने जागतीक साम्राज्यवाद आहे आणि तो विविध माध्यमाव्दारा प्रसारीत केला जातो.

जागतीकीकरणामुळे संपूर्ण मानवी समाज प्रभावीत झाला आहे. फक्त धर्म, संस्कृती किंवा राष्ट्रालाच आव्हाण दिले असे नाही तर समाजाच्या अंतर्गत व बाहय ढाच्याला आव्हान दिले आहे. पांरपारीक प्रश्न उपस्थित करून नव्याच्या स्वीकाराची रचना निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधात वाढ होतांना आढळते. १७८० मध्ये जेरनी बेनधान यांनी प्रथमच आंतरराष्ट्रीय या शब्दाचा वापर केला. अर्थात याचा वापर १९४४ मध्ये करून जागतीकीकरण हा शब्द पहिल्यांदा शब्दकोषात वापरण्यात आला. १८ व्या शतकात औधोगीक क्रांती झाली. ज्यामुळे नवनविन यंत्र सामुग्री व उघोगधंदयांची वाढ झाली. व्यापारी, मानवी संबंध, जिवनशैली, एवढेच नव्हे तर सामाजिक, आर्थीक, धार्मीक, सांस्कृतीक या संकल्पनेमध्ये क्रांतीकारक बदल झाला. मोठमोठया उघोग धंघात मालाची, वस्तुची निर्मिती प्रचंड वाढली. पुढे साम्रज्यवाद विकसीत झाला. ब्रिटीशांच्या व युरोपमधील देशाच्या अधिपत्याखाली जगातील विविध देश होते. उदा. भारत, वेस्ट इंडिज, आफ्रिका, इत्यादी देशातून माणसे नेण्यात आली. कामगार व गुलाम म्हणून ठेवण्यात आले. त्यांच्या भरोषावर आपली उत्पादन क्षमता वाढविली. अधिकाअधिक वस्तू व मालाच्या उत्पादनासाठी निसर्गाची नासाडी झाली. व्यापाराचे धोरण अवलंबित मागास व गरीब देशाला आपली हुकमी बाजार पेठ मानण्यात आले. त्यामधून अमाप पैसा कमविण्यात आला.

जागतीकीकरण एक सामाजिक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये भूगोलव्दारा सामाजिक आणि सांस्कृतीक व्यवस्थेला दाबले जाते. ज्यासाठी लोक या गोष्टीसाठी जागरूक होवू लागतात की, त्यांचा पश्चप्रवण होत आहे. आर्थीक सल्लागार परिशदेचे अध्यक्ष डॉ. सी. रंगराजनच्या मते माहीती संकल्पना, तंत्रज्ञान, वस्तू, सेवा, भांडवल, वित्त व

लोक यांच्या विविध देशात होणा–या परिचलनातुन अर्थव्यवस्थाचे व समाजाचे एकात्मिकरण करणे म्हणजे जागतीकीकरण होय.

## जागतीकीकरण व महीला –

भारताने स्वातंत्र्यानंतर महिलांना पुरुषांच्या बरोबरीने मतदानाचा अधिकार दिला, पण ख–या समानतेबद्दल बोलायचे झाले तर भारतात स्वातंत्र्य मिळून इतक्या वर्षानंतरही महिलांची स्थिती लक्षात घेण्यासारखी आहे. येथे अशा सर्व महिला दिसतात, ज्यांनी सर्व प्रकारच्या भेदभावाला न जुमानता प्रत्येक क्षेत्रात स्थान मिळवले आहे आणि प्रत्येकाला त्यांचा अभिमान वाटतो. पण या रांगेत त्या सर्व महिलांचाही समावेश करण्याची गरज आहे, ज्यांना आपल्या घरात आणि समाजात महिला असल्यामुळे दररोज विषमतेला सामोरे जावे लागते. घरातील मुलगी, पत्नी, आई किंवा बहीण असो किंवा समाजात मुलगी असणे. दैनिक वर्तमानपत्रेमुलींची छेडछाड, बलात्कार यांसारख्या बातम्या वाचायला मिळतात, पण या सगळ्यात फक्त एक स्त्री आहे म्हणून ज्या महिलांचा त्यांच्याच घरात छळ होत आहे.

इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या आणि प्रतिभा देवीसिंह पाटील राष्ट्रपती होत्या . काँग्रेसच्या शीला दीक्षित , तामिळनाडू अध्यक्षा जयललिता , पश्चिम बंगाल तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी आणि बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्षा मायावती यांनी चांगलेच नाव कमावले आहे . काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांचा याआधीच जगातील सर्वात शक्तिशाली महिलांमध्ये समावेश करण्यात आला आहे. जर देशाची संसदपाहिलं तर सुषमा स्वराज आणि मीरा कुमार, द्रौपदी मुर्मु याही भारतीय राजकारणात प्रसिद्ध आहेत. कॉर्पोरेट क्षेत्र, बँकिंग क्षेत्र यांसारख्या क्षेत्रात इंद्रा नूयी आणि चंदा कोचर यांसारख्या महिलांनीही आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. यापैकी काही यशानंतरही आजही महिलांचे यश अर्धवट भाजलेल्या समानतेमुळे कमी आहे. 'महिला समानता दिन' दरवर्षी २६ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो , पण दुसरीकडे आजही महिलांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग आणि टक्केवारी कमी आहे.

## महिला साक्षरता

साक्षरतेत महिला अजूनही पुरुषांच्या मागे आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार, महिलांच्या साक्षरतेच्या दरात १२ टक्के वाढ झाली आहे, परंतु केरळमध्ये , जिथे महिला साक्षरता दर ९२ टक्के आहे, बिहारमध्ये महिला साक्षरता दर अजूनही ५३.३ टक्के आहे.

दिल्ली महिला आयोगाच्या सदस्या रुपिंदर कौर म्हणाल्या की, "बदल आता दिसत आहे. जिथे पूर्वी महिला घराबाहेर पडत नव्हत्या, आता त्या त्यांच्या हक्कांबद्दल बोलत आहेत. त्यांना त्यांचे हक्क माहित आहेत आणि त्यासाठी त्या काम करत आहेत. "लढाई देखील." दिल्ली विद्यापीठाच्या दौलत राम कॉलेजचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. मधुरेश पाठक मिश्रा सांगतात की, "महाविद्यालयांमध्ये मुलींची संख्या वाढल्याने त्यांना आता हक्क मिळत असल्याचे दिसत आहे. पण एक शिक्षक म्हणून जेव्हा मी विशेषतः लहान शहरांतील मुली पाहिल्या. मला धक्का बसला जेव्हा मी मुलींचा फक्त लग्नासाठी शिक्षण घेण्याचा कल पाहिला. आजही समाजाची मानसिकता पूर्णपणे बदललेली नाही.याला मुली देखील मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत.

निसर्गानेच स्त्री आणि पुरूश या दोन जाती निर्माण केल्या आहेत. मनुष्य जन्मापासुन ते मृत्युपर्यंत स्त्रियांना हिन लेखल्या जाते. हे एक ऐतीहासिक सत्य आहे. परंतु हे काही पुर्ण संत्य नाही. कारण जन्माच्या आदोगर गर्भावस्था आणि मृत्यूनंतर ते अंत्यसंस्कार याच्या बाबतीत धर्मीशस्त्रज्ञांनी कलेले नियम ही स्त्रियांना प्रत्येक काळात प्राचिन काळापासुन ते आजपावेतो हीन लेखणारीच आहे. इतिहास पुर्व संस्कृतीमध्ये स्त्रियांचे उत्पादनातील योगदान अत्यंत मोलाचे होते. कृशी प्रधान समाजाला स्त्रियांची सफलता पवित्र माणली गेली होती. अपत्य जन्माला घालण्यामागे पुरूषांचे महत्व लक्षात आल्यानंतर स्त्रीयांना अंकित ठेवणे आणि संरक्षण देणे अशी दुहेरी पध्दतीने समाज उभारण्याची सुरूवात झाली. या काळाच स्त्रियांच्या मातृत्वाच्या क्षमतेबद्दल वाटणारे गुढ अथवा दरारा कमी झाला.

स्त्रीयांना स्वतःचा जोडीदार स्वयंवराव्दारे निवडीचे स्वातंत्र्य असलेल्या काळातही एका परीटाच्या सांगण्यावरून सितेचा त्याग करणारा राम, भर राजसभेत द्रौपदीला विवस्त्र करणारा दर्योधन कर्ज फेडण्यासाठी तारामतीला विकणारा हरीषचंद्र इत्यादी अनेक उदाहरण दिसुन येतात.

महीला हया समाज जिवनातील महत्वाच्या घटक आहेत. महीलाला बाजुला यारून आपल्याला सर्वांगीण प्रगती करता येणार नाही. महीलांना आपल्या हक्क व अधिकारची जाणीव झाली. त्या शिक्षणामुळे अर्थाजनासाठी घराबाहेर यायची संधी मिळाली. कौंटूबीक जबाबदा—या पार पाडतांना स्त्रिला बरीच मेहनत व तडजोड करावी लागली. पितृसत्ताक कुटूंबपध्दतीमुळे स्त्रियांचा दर्जा, मुलांचे संगोपन, पालन पोशन इत्यादी प्रभाव, उपभोग्य वस्तू, हिंसा व्यक्तीवादी विचार सरणी व लैंगीक शोषन, स्त्रियांचे मृत्यृचे वाढलेले प्रमाण १००० स्त्रियांमागे स्त्रियांचे कमी प्रमाण चिंताजनक आहे. वर्तमान परिस्थिती पाहता स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोनातुन बदल झालेला आहे. शिक्षणाचा वाढता प्रसार व प्रचार, व्यक्तीवादी, विचारसरणीवादी, चित्रपट, फॅशन, पोषाख पध्दती, जीवन पध्दती यामध्ये अमुलाग्र बदल झालेला आहे. रोजगार वा नौकरी निमित्ताने स्त्रिया घराबाहेर पडत आहे. सर्वच क्षेत्रामध्ये महीला प्रामुख्याने आढळतात.

महीला पुरूशांच्या खांदयाला खांदा देवून प्रत्येक क्षेत्रात काम करीत असतांना आपल्याला दिसत आहे. न्याय, समानता व आरक्षणाच्या गप्पा जागोजागी होत आहे. स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपले अस्तित्व निर्माण करीत आहे. पण एकाकीपण, स्त्रीभ्रृणहत्या, देहविक्रीय, एड्स, घरकाम यासारख्या अनेक कामांना त्यांना तोंड दयावे लागत आहे. जसे की, कौंटूबीक अत्याचार, परित्याग, विधवापण त्यासोबतच आजही स्त्रिया सुरक्षित नाही. ३ ते ५ वर्शाच्या मुलीकडे सुध्दा आज पुरूषांची वाईट नजर पडत आहे. यातुनही अनेक समस्या निर्माण होत आहे. ते बदलायला आजचा समाज तयार नाही. तीने घराबाहेर जावून काम करावे, तिथल्या जबाबदा—या चोखपणे पार पाडाव्या पण ते करीत असतांना तीने घरातील कामे सुध्दा व्यवस्थित पार पाडावी अषी कुटूंबातील प्रत्येक सदस्यांची इच्छा असते. सोबतच मुलांकडे लक्ष देणे, त्यांना वेळेवर शाळेत पाठविणे, त्यांचा अभ्यास घेणे त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे आणि कुटूंबातील इतर सदस्यांची काळजी घेणे सोबतच एक स्त्री म्हणून सामाजिक जबाबदारी असते तीही त्याला पार पाडावी लागते. या सर्व जबाबदा—या पार पाडतांना ती शारीरीक आणि मानसिक दृष्टया थकून जाते. आणि कुटूंबातील व्यक्तीच्या मदतीची अपेक्षा करते पण तिची अपेक्षा पुर्ण होत नाही यातुन कौंटूबीक कलहाला सुरूवात होते. कौंटूबीक वादाचा परिणाम पती—पत्नीवर व इतर सदस्यावर पडतो. व यातुन वादाचे प्रमाण वाढत जातात. आणि अशा कौंटूबीक वादाचे रूपांतर विलगीकरणामध्ये होते. विलगीकरण पती किंवा पत्नी दोन्ही कडूनही होवू शकते. पण स्त्री जर कुटूंबाहेर निघाली असेल तर परितक्त्या म्हणून तीची समाजात गनना होते. व अशा परितक्त्या स्त्रियांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. विष्व स्वास्थ संघटनेच्या अहवालानुसार देशात प्रत्येक ६ स्त्रियामधून एक स्त्री ही कौटूंबीक हिंसाचाराची शिकार होते. क्राईम रेकॉर्ड ब्युरो ऑफ इंडीया च्या अनुसार प्रत्येक दिवशी देषात ५०० हुन अधिक स्त्रीया पतीव्दारे केल्या जाणा—या हिंषेला बळी पडतात. यापैकी कित्येक स्त्रीया आत्महत्येचा प्रयत्न करतात. सेंटर ऑफ वुमेन डेव्हलपमेंट स्टडीज नवी दिल्ली त्याप्रमाणे शिक्षित स्त्रिया स्वत:च्या अधिकाराविशयी जागृत होत नाहीत. परिणामी संघर्ष आणि हिंसाचाराला सुरूवात होते. परिणामी परित्याग आणि घटस्फोटासारख्या सामाजिक समस्या मोठया प्रमाणात भेडसावत आहेत.

## अध्ययनाचे उद्देश —

१) वंचित महीलांच्या कौटूंबीक स्थिती अभ्यासणे.
२) वंचित महीलांच्या समस्यांची स्थिती अभ्यासणे.
३) वंचित महीलांच्या सामाजिक स्थिती अभ्यासणे.
४) वंचित महीलांच्या शैक्षणिक स्थिती अभ्यासणे.

## उपकल्पना/गृहीतकृत्य —

१) वंचित महीलांचा कौटूंबीक दर्जा सर्वसाधारण आहे.
२) वंचित महीलांना अनेक समस्या निर्माण होतात.
३) वंचित महीलांचा सामाजिक दर्जा निम्न आहे.
४) वंचित महीलांची शैक्षणिक स्थिती खालावलेली आहे.
५) वंचित महीलांना समाजातील तिरस्कारांना सामोरे जावे लागते.
६) वंचित महीलांसाठी असणा—या कायघात्मक तरतुदी असमाधानकारक आहे.

## संशोधनाच्या मर्यादा —

कोणत्याही विषयाचे संशोधन करतांना संशोधनाची व्याप्ती ठरविणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनात पुसद येथील मसाला या लघु उदयोगामध्ये काम करणा—या महीलांचा अभ्यास करण्यात आला असुन ५० उत्तरदात्याची निवड केली आहे.

## नमुना निवड —

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनाकरीता सभाव्यता नमुना निवडीमधील साधा यादृच्छिक नमुना निवडी अंतर्गत लॉटरी पध्दत या तंत्राचा उपयोग केला आहे.

## निष्कर्ष —

१) वंचित महीलांचा कौटुंबीक दर्जा सर्व साधारण आहे.
२) वंचित महीलांची आर्थीक स्थिती सर्व साधारण आहे.
३) महीलांचा समाजिक दर्जा निम्न आहे.
४) महीलांच्या समस्याला विविध कारणे जबाबदार आहेत.
५) वंचित महीलांना सामाजिक तीरस्काराला सामोरे जावे लागते.
६) वंचित महीलांमध्ये आर्थीक स्वावरलंबी असणा—याचे प्रमाण कमी आहेत्र
७) वंचित महीलांमध्ये समाधानी नसणा—या महीलांचे प्रमाण जास्त आहे.
८) वंचित महीलांमध्ये शासकीय योजनांचा लाभ न घेणा—या महीला जास्त आहे.

## संदर्भ ग्रंथसूची —

१) प्रा. अनुराधा पाटील — सामाजिक कायदे तरतुदी आणि यंत्रणा, मुक्त विघा केंद्र, पुणे.
२) डॉ. सुधा काळदाते — भारतीय समाज आणि समस्या
३) डॉ. प्रदीप आगलावे — संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विघा प्रकाशन, नागपूर
४) डॉ. माधवी रेणावी — समाजशास्त्र आणि भारतीय सामाजिक प्रश्न, साईनाथ प्रकाशन, पुणे.
५) श्री. डी. एस. कोरे — कौंटूबीक न्यायालय कायदा१९८४, सांकेत प्रकाशन, औरंगाबाद.
६) महीला बालविकासाच्या विविध योजना, बाल विकास आयुक्तालय, पुणे.
७) श्री. किशोर राऊत — जागतीकीकरणाचा ग्रामिण समाजावर होणारा परिणाम, अजिंक्य प्रकाशन, अमरावती.

❖❖❖

# 'सर्व प्रश्न अनिवार्य' कादंबरीतील भाषिक सौंदर्य

प्रा. पुरुषोत्तम एस. निर्मळ
श्री संत गजानन महाराज कला महाविद्यालय,
बोरगाव मंजू, ता.जि. अकोला ४४४ १०२
मोबाईल ९९२११३२७६४ ई–मेल : psnirmal2608@gmail.com

## प्रस्तावना

रमेश इंगळे उत्रादकर हे विदर्भातील एक प्रसिद्ध कादंबरीकार असून पेशाने शिक्षक आहेत. त्यांची 'सर्व प्रश्न अनिवार्य' ही अतिशय प्रसिध्द अशी कादंबरी आहे. वर्तमान शिक्षणव्यवस्थेत घडून येणारे बदल, परीक्षा पद्धतीतील गोंधळ, शिक्षण क्षेत्रात होणारा राजकीय व्यक्तींचा हस्तक्षेप शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात, प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांची होणारी घुसमट त्यांनी आपल्या २०११ मध्ये प्रकाशित झालेल्या 'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीतून वर्तमान शिक्षण व्यवस्थेतील परीक्षा पद्धतीतील गैरप्रकाराचे चित्रण केले आहे. आजच्या काळात परीक्षेला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. परीक्षेत मिळालेल्या गुणांवरून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाते. त्यामुळे परीक्षेत होणारे गैरप्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. हाच 'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीचा मुख्य आशय आहे

रमेश इंगळे उत्रादकरांच्या 'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीची भाषा ही अस्सल वऱ्हाडी बोलीभाषा असून बुलढाणा जिल्ह्याच्या ग्रामीण परिसरात बोलल्या जाणाऱ्या भाषिक वैशिष्ट्यांनी ही कादंबरी नटलेली असल्याने मराठी वाचनांसमोर एखादा प्रसंग जिवंतपणे उभे करण्याचे सामर्थ्य रमेश इंगळे उत्रादकरांच्या भाषाशैलीत आहे.

'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीतील बहुतांश संवाद हे वऱ्हाडी बोलीभाषेतील असून निवेदनाकरिता प्रमाणभाषेचा वापर केलेला आहे. वर्तमान परीक्षा पद्धतीतील विविध प्रसंगांना अधिक उठावदारपणे रमेश इंगळे उत्रादकरांनी आपल्या कादंबरीतून चित्रित केले आहे. विचार व्यक्त करण्याचे प्रमुख साधन म्हणून भाषेला मानवी जीवनात अतिशय महत्त्व आहे. भाषेशिवाय जीवन जगणे अत्यंत कठीण आहे. सुरेंद्र ग्रामोपाध्ये यांनी संपादित केलेल्या 'भाषा व्यवहार व भाषा शिक्षण' या ग्रंथात अरुण फडके यांच्या 'भाषिक शुद्धतेचे महत्त्व आणि स्वरूप' या भाषाविषयक लेखात प्र. न. जोशींनी भाषेची व्याख्या खालील प्रमाणे सांगितली आहे. प्र.न.जोशी यांच्या मते, ''भाषा म्हणजे 'बोलणे' ह्या संस्कृत धातूपासून 'भाषा' हा स्त्रीलिंगी शब्द तयार झाला. मनातील विचार आणि कल्पना व्यक्त करण्यासाठी मुखावाटे निघालेल्या ध्वनींचा सार्थ समूह म्हणजे भाषा''[१] अशी भाषेची व्याख्या सांगितलेली आहे. मानवी मेंदूमध्ये भाषा संपादन करण्याचे सामर्थ्य असते. त्यामुळेच मनुष्य समाजात राहून आपले विचार व्यक्त करू शकतो. डॉ स.गं. मालशे म्हणतात, ''दर बारा कोसावर भाषा बदलते, भाषा ही सतत बदलणारी गोष्ट आहे. ती कालपरत्वे, वेळपरत्वे, प्रसंगपरत्वे आणि व्यक्तीपरत्वे बदलत असते.''[२] वऱ्हाडी बोलीभाषेची अनेक वैशिष्ट्ये 'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीतून दिसून येतात. महाराष्ट्राच्या विविध प्रदेशात मराठी भाषेची विविध रूपे आणि भाषा उच्चारण्याच्या पद्धती दिसून येतात. एखादी व्यक्ती बोलत असताना त्या व्यक्तीच्या भाषेवरून ती व्यक्ती महाराष्ट्राच्या कोणत्या प्रदेशातील आहे हे सांगता येते.

**बीज शब्द** – परीक्षा, प्रश्न, शिक्षण, वऱ्हाडी बोली, वाक्यरचना, म्हणी, वाक्प्रचार, शिव्या, संक्षिप्त रूपे, इंग्रजी शब्द, अभ्यस्त शब्द, प्रत्यय.

## १) वाक्यरचना

छोटी –छोटी वाक्ये 'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. साधी, सोपी वाक्यरचना करून वऱ्हाडी बोली तसेच प्रमाणभाषेतील वाक्यामुळे कादंबरीतील संवाद अधिक उठावदार वाटतात. शिक्षकांनी वापरलेली प्रमाणभाषा आणि विद्यार्थ्यांनी वापरलेली वऱ्हाडी बोलीभाषेची रूपे कादंबरीला एका वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम करतात. कादंबरीतील वऱ्हाडी बोलीभाषेतील भाषणाचा एक नमुना,

''आज पालक दिन हाये. म्हणजे पोरंहो तुमचा दिवस हाये. म्हणा. आज आमचा दिवस हाये. शाब्बास –शाब्बास. तर आज तुमचा दिवस हाये. पंडित नेहरूनं हा तुमचा दिवस सुरू केला. नेहरूले गुलाबाचे फुलं अजूक तुमच्यासारखे शेंबडे भोंगळे पोरं खूप आवडत. इतके आवडत इतके आवडत की ते रस्त्यान चाल्ले आन त्याहीले जर कुठे गुलाबाचे फुल दिसले तं ते गाडी थांबवायले लावत आन ड्रायव्हरले सगळे फुलं तोडून आणायला लावत.

(सर्व प्रश्न अनिवार्य, पृष्ठ १२) वऱ्हाडी बोलीभाषेतील लहान लहान वाक्यांमधून बालकदिनाचे महत्त्व विशद केले आहे. वऱ्हाडी बोलीभाषेतील भाषणाचे तीन नमुने शेषराव घुबे नावाच्या शिक्षकांनी सांगितले आहेत.

## २) 'सर्व प्रश्न अनिवार्य' कादंबरीतील म्हणी

भाषेला एक वेगळे सौंदर्य प्राप्त करून देणाऱ्या ज्या विविध गोष्टी आहेत त्यामध्ये म्हणींचा समावेश प्रामुख्याने होतो. म्हणींच्या खजिण्यामुळे कादंबरीतील भाषाशैली अधिक प्रभावी आणि अस्सल वाटते. महाराष्ट्रातील ख्यातनाम वऱ्हाडी कवी डॉ. विठ्ठल वाघ यांच्या 'वऱ्हाडी म्हणी आणि लोकधर्म' या ग्रंथात कोशकार वि.वि.भिडे यांनी म्हणींची शास्त्रीय व्याख्या केली आहे. ज्यात काही अनुभव, उपदेश, माहिती, सर्वकाली सत्य किंवा ज्ञान गोवलेले आहे, जे अल्पशब्दात्मक आहे, ज्यात काही चटकदारपणा आहे आणि लोक संभाषणात वगैरे जे वारंवार योजतात असे वचन किंवा वाक्य म्हणजे म्हण होय''[३] वि.वि. भिडे यांची म्हणींची व्याख्या मराठी भाषेतील म्हणींचे वैशिष्ट्य स्पष्ट करून म्हणींची भाषेतील सार्वकालीकता वर्णन करते.

वा.गो. आपटे यांनी आपल्या 'विस्तारित शब्द रत्नाकर' या शब्दकोशातून 'म्हण' या शब्दाचा अर्थ ''प्रचलित बोधपर वाक्य'' असा सांगितलेला आहे. मराठी भाषेला म्हणींची फार मोठी परंपरा आहे .ग्रामीण भागातील समाजात म्हणींचा अधिक वापर होताना दिसतो. 'सर्व प्रश्न अनिवार्य' या रमेश इंगळे उत्रादकरांच्या कादंबरीतून म्हणींचा मोठ्या प्रमाणात वापर झालेला दिसून येतो.

— हा सूर्य अन् हा जयद्रथ, पृ. १०
— धर्म करा आन चावडी चढा, पृ. ६२
— इकडं आड तिकडं इहीर, पृ. ७६
— आंथरून पाहून आपून आपले पाय पसरावं, पृ. १४१
— सगळं कळतं पण वळत नाही, पृ. २६५
— शहाण्याला शब्दाचा मार, पृ.१७७
— टाळी एका हातानं वाजत नाही, पृ. १९५
— तळं राहतो तो पाणी चाखतो, पृ. २०१
— एकमेका साह्य करू अवघे धरु सुपंथ, पृ. २३६
— विद्या परम दैवतम्, पृ. २३६
— अति तिथं माती, पृ. २५०
— दोन—चार पाय तुटल्यानंतर गोम काही लंगडी होत नाही, पृ. २५३

इत्यादी वैविध्यपूर्ण म्हणींमुळे 'सर्व प्रश्न अनिवार्य' कादंबरीच्या वाङ्मयीन सौंदर्यात महत्त्वपूर्ण भर पडलेली दिसून येते.

## ३) वाक्प्रचार

म्हणींप्रमाणेच विविध वाक्प्रचार ही रमेश इंगळे उत्रादकरांच्या 'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीतून आलेले दिसतात. कादंबरीमध्ये आलेल्या वाक्प्रचारांमुळे कादंबरीचे भाषिक सौंदर्य अधिक प्रगल्भ झाले असे म्हणता येईल. 'दु:खाची कुऱ्हाळ कोसळणे', पृष्ठ १६, 'हतबल होणे' (पृष्ठ २२), 'जीव दु:खात टाकणे', (पृष्ठ २७), 'दुधाची तहान ताकावर भागवणे' (पृष्ठ ५३), 'हमसून हमसून रडणे' (पृष्ठ ५२), 'किंमत मोजावी लागणे' (पृष्ठ ५३), 'आभाळ कोसळणे' (पृष्ठ ५३), 'वारं पाहून उपणणे' (पृष्ठ ५३), 'डंका वाजणे', (पृष्ठ ६३), 'अब्रूची लक्तरे वेशीवर टांगणे' (पृष्ठ ६५), 'काथ्याकूट करणे' (पृष्ठ ६८), 'सुखातला जीव दुखात टाकणे' (पृष्ठ १३३), 'कैचीत सापडणे' (पृष्ठ ९५), 'पराकोटीला जाणे' (पृष्ठ १३१), 'कानाडोळा करणे' (पृष्ठ १३२), 'तारांबळ उडणे' (पृष्ठ १४७), 'झोपेचं सोंग घेणे' (पृष्ठ १६६) इत्यादी वाक्प्रचारांच्या भांडारामुळे कादंबरीतील बोलणाऱ्याच्या मनातील आशय अधिक प्रभावीपणे बिंबवला जाऊन भाषेला माधुर्य प्राप्त होते.

## ४) शिव्या

एखाद्या व्यक्तीला शिवी देणे हे सभ्यपनाचे लक्षण नसले तरी आजही ग्रामीण भागात दोन व्यक्तींचे किंवा दोन समूहाचे वाद झाल्यास शिव्यांचा वापर होताना दिसतो. दिल्या जाणाऱ्या शिव्या ह्या अश्लील वाटत असल्या

तरी ग्रामीण परिसरातील समाजाच्या भाषा व्यवस्थेचा तो एक भाग आहे. रमेश इंगळे उत्रादकरांच्या 'सर्व प्रश्न अनिवार्य' कादंबरीतून 'झवाडीच्या' (पृष्ठ १०५), 'मादरचोद' (पृष्ठ १०५), 'भोसडीचे' (पृष्ठ १०५), 'हरामखोर' (पृष्ठ १८२) इत्यादी शिव्या कादंबरीतून आलेल्या दिसतात.

## ५) कादंबरीतील संक्षिप्त रूपे

प्रत्येक गोष्टीत मनुष्य शॉर्टकट शोधण्याचा प्रयत्न करतो. मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्यामुळे भाषेच्या बाबतीत मनुष्य शॉर्टकट मार्ग अवलंबताना दिसतो. भाषेची संक्षिप्त रूपे कादंबरीतून आलेली दिसतात. त्यामध्ये डी.एड., बी.डी.ओ., बी.ई.ओ., एम. एस. इ.बी., एस. पी., ए.टी.एम., बी. ए., बी.एड. अशा अनेक संक्षिप्त रूपांचा वापर कादंबरीत झालेला आहे.

## ६) कादंबरीतील इंग्रजी शब्द भांडार

मराठी भाषेत संस्कृत, उर्दू, कानडी, हिंदी, फारसी, अरबी, इंग्रजी अशा अनेक भाषेतील शब्द रूढ झालेले दिसून येतात. मराठी साहित्यात विशेषत: कादंबरीतही आणि इतर भाषेतील शब्द कमी अधिक प्रमाणात आलेले आढळतात. यासंदर्भात 'भाषा व्यवहार व भाषाशिक्षण' या सुरेंद्र ग्रामोपाध्ये यांनी संपादित केलेल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत रा.ग. जाधव लिहितात, ''भाषा उत्क्रांत होत येते, ती विकसनशील असते अन्य भाषेतील शब्द, संज्ञा, संकल्पना ती आपल्या प्रकृतीप्रमाणे व परिस्थितीप्रमाणे स्वीकारत असते.''[५] मराठी कादंबरी सुद्धा याला अपवाद नाही. 'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीमध्ये बरेच शब्द इंग्रजी शब्द आलेले आहेत. मोबाईल, ऑफिस, फोटो, पॉईंट, सेंटर, स्कॉलरशिप, प्रेस्टिज पॉईंट, आयडिया, प्रॉब्लेम, बॅनर, अल्फाबेटिकली, सिलेक्ट, ॲडजेस्ट, गुड मॉर्निंग, इंटरेस्ट, पेपर्स, फिल्डींग, हेडमास्टर, सॉरी, सिस्टीम, टाइमपास, ॲडमिशन, अर्जंट, स्ट्राइक, सिरियस, क्लियर, कॉलेज, कंडक्टर, कलेक्टर, सिग्नल, गॅरंटी, लिडर, थँक्यू, सप्लीमेंट्री, मार्कशीट, ऑटोमॅटिक, पॉकेट बुक, मार्क्स, फाउंडर, कमिटी, कॅन्डीडेंट, टाइम टेबल, कस्टडी, डायरेक्ट, जनरेशन, बॅलन्स, कम्प्युटर, सस्पेन्स, ट्रेनिंग, सेटिंग, सर्टिफिकेट, कंपाउंड, केबिन, ऑर्डर, फर्निचर, असिस्टंट, डायरेक्ट, सब्जेक्ट, शॉर्टकट, इन्व्हिजीलेटर, गाईड्स, नोट्स, पॅकेज इत्यादी इंग्रजी शब्द भंडार कादंबरीत आलेले आहे.

## ७) वऱ्हाडी शब्द भांडार

ग्रामीण भागातही साक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसून येत असले तरी ग्रामीण भागात वऱ्हाडात राहणाऱ्या समाजात व्यवहार करताना वऱ्हाडी बोलीभाषा वापरली जाते. 'सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीतून बरेच वऱ्हाडी शब्द आलेले दिसून येतात. तुमाले (तुम्हाला), रगत (रक्त), इरोध (विरोध), इनाकारन (विनाकारण), आमाले (आम्हाला), इहीर (विहीर), आमी (आम्ही), वावर (शेत), सायेब (साहेब), मले (मला), जनमभर (जन्मभर), इनंती (विनंती), इद्यापीठ (विद्यापीठ), इश्वास (विश्वास).

## ८) अभ्यस्त शब्द

मराठी साहित्यात कमी अधिक प्रमाणात अभ्यस्त शब्द वापरले जातात. अभ्यस्त शब्दांमुळे मराठीचा शब्दसंग्रहात  मोलाची भर पडली. मराठी भाषा समृद्ध झाली. अशा अभ्यस्त शब्दांची व्याख्या सांगताना डॉ.द.वि. पुंडे लिहितात, ''रुपिमांची पुनरावृत्ती होऊन जो शब्द तयार होतो त्याला अभ्यस्त शब्द म्हणतात.''[६] द. दि. पुंडे यांच्या अभ्यस्त शब्दाच्या व्याख्याने रूपिमांच्या पुनरावृत्तीमुळे निर्माण होणारा शब्द हा भाषा विस्तारात महत्वाचा आहे. कावरा –बावरा, जिकडं तिकडं, एकटं –एकटं, अधून मधून, तत्त्व –बित्व, मूल्य –फिल्य, आचार विचार,  इकडे तिकडे, उरले–सुरले, वळखी – पाळखी, सरळ सरळ, उलट– सुलट असे अनेक अभ्यस्त शब्द कादंबरीतून आलेले आहेत.

## ९) प्रत्यय प्रक्रिया

रमेश इंगळे उत्रादकरांच्या –सर्व प्रश्न अनिवार्य' या कादंबरीतील शब्दांना 'हे' आणि 'बी' हे दोन प्रत्यय मोठ्या प्रमाणावर लागलेले दिसून येतात.

संयुक्तिकहे, आपलेचहे, ठीकहे, चुकीचाहे, पोरगंहे, सुटीहे, माणूसहे, सुरूहे, धरूनहे, सामीलहे, अडचणहे, शाळेवरहे, करतोहे, महत्त्वाचेहे, घेतलाहे, राहायचहे, वेगळीहे, मिळवायचाहे, घेतलाहे, फरकहे, सरळहे, सापडलोहे, ऐकनाहे, जबाबदारीहे, लपतोहे, झालीहे, सांगतोहे, नक्कीचहे, शिक्षणसेवकहे, करताहे, धावताहे, माहितहे अशा अनेक शब्दांमधून 'आहे' ऐवजी 'हे' हा प्रत्यय आलेला आहे. तर काही शब्दांना 'बी' हा प्रत्यय लागलेला दिसून येतो.
उदाहरणार्थ, शब्दबी, तिखटमीठबी, शब्दाचीबी, काहीबी, कोणतीबी, थोडसंकबी, कुठंबी असे 'बी' प्रत्यय आलेले शब्द कादंबरीच्या शब्दसौंदर्यात भर घालतात.

## संदर्भसूची

१) ग्रामोपाध्ये सुरेंद्र (संपा), 'भाषा व्यवहार व भाषा शिक्षण', मौज प्रकाशनगृह, गिरगाव, मुंबई, पहिली आवृत्ती, १७ जानेवारी, २००६, पृष्ठ ७

२) मालशे डॉ. स.गं., पुंडे डॉ. द.दि., सोमण डॉ.अंजली, 'भाषाविज्ञान परिचय', पदमगंधा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २६ जानेवारी, २००५, पृष्ठ ८४

३) वाघ डॉ. विठ्ठल, 'वऱ्हाडी म्हणी आणि लोकधर्म', लोकवाङ्मय गृह, प्रभादेवी, मुंबई, पहिली आवृत्ती, १ मे, १९९७, पृष्ठ ३

४) आपटे वा.गो. 'विस्तारित शब्द रत्नाकर' विस्तार भावे ह.अ., वरदा प्रकाशन प्रा. लि., पुणे, द्वितीयावृत्ती, मार्च २०००, पृष्ठ ५६४

५) जाधव प्रा. रा. ग., प्रस्तावना, 'भाषा व्यवहार व भाषाशिक्षण', ग्रामोपाध्ये सुरेंद्र (संपा.), मौज प्रकाशनगृह, गिरगाव, मुंबई, पहिली आवृत्ती, १७ जानेवारी, २००६, पृष्ठ २०

६) पुंडे, डॉ. द.दि. 'रूपिमआणि पदविचार, भाषाविज्ञान परिचय', (संपा.), मालशे डॉ. स.गं . पुंडे, द.दि., सोमण डॉ. अंजली, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, २६ जानेवारी, २००५, पृष्ठ ५७

## आधारभूत ग्रंथ

१) इंगळे उत्रादकर रमेश, 'सर्व प्रश्न अनिवार्य', शब्द पब्लिकेशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, डिसेंबर २०१५,
(कंसातील पृष्ठ क्रमांक या आवृत्तीतील आहेत)

❖❖❖

# नोकरी करणाऱ्या महिलांचा दर्जा, कार्यस्थिती व सोयीसुविधा

प्रा. डॉ. महेंद्र अजाबराव पखाले
गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविदयालय, पुसद
जि. यवतमाळ. (महाराष्ट्र राज्य)
Email: vardhamap@rediffmail.com Cell # ९८५०६९०८००

भारतातच नव्हे तर संपूर्ण जगाचा इतिहास पाहिला असता असे दिसून येते की, स्त्रियांना पुरुषांपेक्षा कनिष्ठ दर्जा दिला गेलेला आहे. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकिय, शैक्षणिक इत्यादी सर्व क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व आढळते व सर्वच क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी होती. निसर्गत: स्त्रिया अबला आणि दुर्बल आहेत अशी मानसिकता निर्माण करण्यात आली होती. त्यामुळे वर्षानुवर्षे स्त्रियांचे शोषण करण्यात आले. परंतू आजच्या काळात सामाजिक बदल दिसून येत आहे. कोणताही विकास हा स्त्रियांनी आपली भूमिका बजावल्याशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. आपल्या देशाच्या लोकसंख्येच्या अर्ध्याहिश्याचे प्रतिनिधित्व स्त्रिया करतात आणि म्हणून विकास कार्यक्रमातील त्यांची भागीदारी अपरिहार्य आहे. समाजात सामाजिक विषमता असली तरी स्त्रियांच्या सामाजिक दर्जात मोठया सुधारण घडून आल्याने आज स्त्रिया उच्च पदे भूषवित आहेत. आणि त्यांच्यामुळे आज अनेक घरे तेजाळून निघाली आहे व देशाच्या विकासात स्त्रिया मोठा वाटा उचलित आहेत.

## भारतातील स्त्रियांची स्थिती :—

भारतीय स्त्रियांना अनेक स्थित्यंतरातून जावे लागते. अनेक चढउतार पाहिले आहेत. वैदिक काळात त्यांची देवता म्हणून पुजा होत असे. मुस्लीम काळात त्यांचा दर्जा अगदीच खालावला तर ब्रिटीश राजवटीत त्यांना गुलामांचे गुलाम म्हणून पाहिले जात असे. स्वातंत्र्यानंतर पुन्हा ही लाट अनूकूल झाली आणि बहूतांशी सामाजिक कायदयांमुळे त्यांनी प्रगती केली आहे हे नाकारता येणार नाही. तांत्रिक प्रगतीमुळे म्हणा किंवा उत्क्रांतीच्या प्रगतीमुळे म्हणा, शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक क्षेत्रात ही प्रगती बऱ्याच प्रमाणात झाली आहे. स्त्रिया हया आज विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवितांना दिसतात त्या डॉक्टर्स, इंजिनिअर्स, पत्रकार, शिक्षक, प्रशासक, न्यायाधिश, मंत्री, राजदूत, राष्ट्रपती इत्यादी पदापर्यंत येऊन पोहचल्या आहेत.

नोकऱ्यांचा विचार केला तर भारतीय पोलीस सेवेत ९ टक्के स्त्रिया आहेत. भारतीय प्रशासन सेवेत स्त्रियांचे प्रमाण ७.५ टक्के आहे. तर व्यवस्थापकिय क्षेत्रात ५.८ टक्के पदावर आहेत. स्त्रियांना आर्थिकदृष्टया कोणावरही अवलंबून राहावे लागू नये याची खात्री करुन घेण्याचे प्रयत्न सुरु असले तरी त्याचा फारसा उपयोग झालेला दिसत नाही. स्त्रियांना बाहेरील नोकरी आणि घरातील काम अश्या दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यामुळे आर्थिक स्वातंत्र्याची फळे चाखण्याइतका मोकळा वेळ त्यांना मिळत नाही. बऱ्याच वेळा ती आपल्या पगाराची घरात येईपर्यंत केवळ विश्वस्त असते पण घरात आल्यावर तिचा पगार कुटूंबाच्या मिळकतीचा हिस्सा ठरविला जातो म्हणजे तिला आर्थिक स्वातंत्र्यापासूनही वंचित राहावे लागते.

भारतातील बहूतेक कुटूंबात स्त्रियांना शिक्षणाचे स्वातंत्र्यसुद्धा मिळत नाही. प्राथमिक निर्णय घेण्याचा सुद्धा अभाव असतो. आपले जिवनमान उंचावण्यासाठी तिला झिजावे लागते. कुटूंब नियोजनासारख्या निर्णयात तिची बाजू ऐकून घेतल्या जात नाही. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना कमविणे आणि कुटूंबाची काळजी या दोन्ही भूमिका एकाच वेळी निभावण्याचे दडपण असल्याने स्त्रियांना व्यावसायिक आघाडीवर बऱ्याच तडजोडी करणे भाग पडते.

भारतीय समाज संरचनेत स्त्रियांची असलेली लोकसंख्या स्त्रियांचे पारंपारिक स्थान, त्यांचा दर्जा, त्यांना पार पाडाव्या लागणाऱ्या भूमिका त्यांचे एकूणच समाजाशी असलेले संबंध व त्याचे समाजव्यवस्थेवर होणार परिणाम त्या दृष्टीने स्त्रियांच्या दर्जाचा विचार केला जातो. समाजात व्यक्तीचे असलेले स्थान म्हणजे दर्जा समाजातील कोणत्याही व्यक्तीचा दर्जा ठरवितांना त्या दर्जाशी कोणती हक्क व कर्तव्य निगडीत आहेत आणि ते हक्क व कर्तव्य कशा प्रकारे आचरणात आणले जातात या गोष्टींचा विचार करावा लागतो. स्त्रियांना कोणते अधिकार व हक्क उपलब्ध आहेत त्यांनी कोणती कर्तव्य पार पाडली पाहिजेत त्यांच्यावरील बंधने कोणती इत्यादी बाबींवर स्त्रियांचा दर्जा अवलंबून असतो. प्रत्येक समाजातील स्त्रिचा दर्जा हा निश्चितच समान असणार नाही तो जातीपरत्वे भिन्न असू शकतो.

## स्त्रियांच्या दर्जात झालेला बदल :—

स्त्रियांच्या दर्जात दृश्य आणि अनुकूल बदल मोठया प्रमाणावर दिसून येतात. लिंगभेदे कायदा आणि सामाजिक दडपण यांच्याद्वारे दुर केला जात आहे. कोणविसाव्या शतकात सुरु झालेल्या सामाजिक सुधारणांच्या चळवळीने स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणाऱ्या अनेक कायदेशिर सुधारणांना गती दिली. या कायद्यात इतर तरतुदीबरोबरच स्त्री भृणहत्या, बालविवाह, विधवा पूनर्विवाह, सतीप्रथा इत्यादी संबंधित तरतुदींचा समावेश होता. स्त्रियांना विकासान्मुख करण्यासाठी पुढे टाकलेले एक पाऊल होते. तरी हे कायदे अपेक्षित बदल घडवून आणण्यात यशस्वी ठरले नाहीत. अशा प्रकारच्या सामाजिक कायद्याच्या बाबतीत आवश्यक असलेली स्त्रियांची भूमिका समजून घेण्याच्या दृष्टीकोनातील बदल अतिशय संथपणे घडत आहेत.

## समाजाचा स्त्रियाबद्दलचा दृष्टीकोन :—

समाजाचा स्त्रियाबद्दलचा दृष्टीकोन हा त्यांच्या प्रगतीत बाधा आणतो. तिला समाजात व कौटूंबिक प्रगतीत सहभागी होऊ देत नाही. स्त्रियांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवले जाते. तिला पोषक वातावरण व संधी मिळत नाही. सामाजिक परिस्थितीप्रमाणे राजकिय, धार्मिक बंधने आणि कमकुवतपण, कष्टमय जीवन हया बाबी स्त्रियांच्या समस्या वाढवितात. आज स्त्रियांना संरक्षण देणारे कायदे ही निर्माण झाले आहेत. भारतीय संविधानाने समान अधिकार ही दिले आहेत. हे कायदे स्त्रियांना संरक्षण देण्याचे व त्यांचा दर्जा उंचावण्याचे कार्य करतात. परंतू आजही या कायद्याची अंमलबजावणी होतांना दिसून येत नाही.

## नौकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या व कार्यस्थिती :—

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर अनेक स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या अनेक स्त्रियांना नोकऱ्या सुद्धा उपलब्ध झाल्या. जिल्हा परिषद, पंचायत समिती, शिक्षण संस्था, बॅंक, विद्यापीठे, पोलीस, प्रशासनातील विविध पदावर त्या पुरुषांच्या बरोबरीने नोकरी करतांना दिसतात. परंतू यातून स्त्रियांच्या समस्यांची गुंतागुत वाढली. शहरातील आणि ग्रामिण भागातील नोकरी करणाऱ्या महिलांच्या अनेक समस्या आहेत.

१९९१ च्या जनगणनेनुसार अहवालाने असे निदर्शनास आले आहे की, शहरी आणि ग्रामीण भागातील घरातील चार भिंतीच्या बाहेर येवून काम करणाऱ्या महिलांच्या संख्येत उल्लेखनिय वाढ झालेली दिसून येते. महिलांना नोकरी का हवी असते? त्यामागची त्यांची प्रेरणा पुरुषांपेक्षा भिन्न असते. पहिले महत्वाचे कारण म्हणजे पैशाची गरज, त्याशिवाय पतीचे अपूरे वेतन, पतीचे आजारपण त्याचा अकाली होणारा मृत्यू, पतिने आधार न देणे, पतिने केलेला त्याग यामुळे स्त्रिया घराबाहेर नोकरी करण्यास उत्सूक असतात. जवळजवळ ९० टक्के महिलांना आर्थिक कारणांसाठी नोकरी करावी लागते. त्याशिवाय भविष्यातील सुरक्षितता, व्यक्तीगत सन्मान व आकांक्षा, स्वाभिमानाचे समाधान, सामाजिक संबंध वाढते राहणीमान यामुळेही स्त्रिया नोकरी करतात. नोकरी करण्यासाठी जी प्रेरणा असते त्यामागे विविध कारणे आहेत. पण विविध क्षेत्रात काम करतांना आज स्त्रियांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते ते पुढील प्रमाणे —

(१) दहेरी भूमिका : नोकरी करणाऱ्या स्त्रीला घरची व नोकरीतील अशी दुहेरी भूमिका पार पाडावी लागते. ही दुरेही भूमिका पार पाडताना स्त्रीला स्वत:च्या आत्म—प्रतिमेचा प्रभाव बराच जाणवत असतो. स्वत:बद्दल उच्च दर्जाची प्रतिमा बाळगणाऱ्या महिलांना असे वाटते की, आपल्या व्यक्तिमत्वात सुधारणा झाली आहे. तर स्वत:बद्दल कनिष्ठ प्रतिमा बळगणाऱ्या महिला असा विचार करतात की, नोकरीचा तिच्या व्यक्तिमत्वावर चांगला प्रभाव पडलेला नाही. हया दोन्ही प्रकारच्या भूमिका पार पाडताना काम करणाऱ्या महिलांना भूमिका — संघर्षातून जावे लागते. कौटूंबिक संबंध, मुलांचे. पालनपोषण, सक्रिय व निष्क्रिय रूपात भूमिका पार पाडणे यावर त्याचा प्रभाव पडतो. प्रभावशाली व्यक्तिमत्वाच्या स्त्रियांपेक्षा लज्जाशील व नम्र स्वभावाच्या महिलांना आपली भूमिका पार पाडताना अधिक समस्यांशी सामना करावा लागतो. या भूमिकासंघर्षात पत्नीच्या नोकरीबाबतचा पतीचा दृष्टिकोण काम करण्याचे प्रेरणा, महिलांचे व्यक्तिमत्व या सर्वांचा परिणाम प्रकर्षाने होत असतो. या भूमिकासंघर्षात पतीचा दृष्टिकोन फार महत्वाचा असतो. तो दृष्टिकोण जर निरोगी असेल तर त्या स्त्रीला काम करणे सोपे जाते नाहीतर तिला अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते.

(२) कौटुंबिक जबाबदारी : नोकरी करणाऱ्या महिलांना कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तिला वेळेचे नियोजन लागते. उपलब्ध वेळेत, कामाची आखणी करावी लागते. मुलांची देखभाल घरच्या जबाबदाऱ्या आर्थिक हातभारासाठी नोकरी हे सर्व करताना तिची खूप धावपळ होते. शहरातल्या धावत्या व गतिमान जीवनात तिला मुले लहान असताना शाळेत सोडावे लागते, मुलांला पाळणाघरात ठेवावे लागते, ते जमले नाही तर पर्यायी व्यवस्था करावी लागते. अशावेळी पती व घरातील इतर कुटुंबातील व्यक्ती यांचे तिला सहकार्य असेल तर तिचे जीवन सुसहय होते. नाहीतर तिला खूप शारीरिक व मानसिक ताणातून मार्गक्रमणा करावी लागते.

(३) भूमिका–समायोजन : नोकरी करणाऱ्या महिलांना घरी आणि नोकरीच्या ठिकाणी स्वत:ला समायोजन करावे लागते. समायोजन म्हणजे परिस्थितीशी जुळवून घेणे एका परिस्थितीतून दुसऱ्या परिस्थितीत जाणे, विविध भूमिका कौशल्यपूर्वक करणे होय. नोकरी करणाऱ्या महिलांना अनेक गोष्टीशी सामना करावा लागतो. कौटुंबिक समायोजन आणि नोकरीतील समायोजन अशा दुहेरी पेचात ती सापडते. नोकरीतील समायोजन हे कौटुंबिक समायोजनापेक्षा अधिक उच्च दर्जाचे असते. नोकरीचा प्रकार, तेथील सेवा काळ, भविष्यातील योजना हे सर्व घटक नोकरीतील समायोजनातं महत्त्वाचे ठरतात. तर कौटूंबिक समायोजन हे कुटुंबाचा आकार, प्रकार, सासरकडील, व्यक्तीचे सहकार्य तसेच स्वत:चे मूल्यांकन या घटकावर अवलंबून असते.

(४) स्त्रियांची कोंडी : नोकरी करणाऱ्या स्त्रिया जर महत्वकांक्षी असतील तर तिच्या महत्वाकांक्षा पुरुषप्रधान संस्कृतीत तिचे अधिकारी नि सहकारी पूर्ण करून देत नाहीत. त्याचा परिणाम फार वाईट होते. काही वेळेला स्त्रियांची अब्रू लुटली जाते. तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविले जातात. ती काही वेळेला कौटुंबिक सुखालाही पारखी होते. यामुळे तिची एक प्रकारे मानसिक व सामाजिक कोंडी होते आणि तिला जीवन जगणे असहय होते.

नोकरीत काम करीत असतांना, तिला नोकरीच्या ठिकाणी सन्मानाने वागविले जात नाही.'माणूस' म्हणून तिच्याकडे पाहिले जात नाही. ती एकटी असेल, तर तिच्याकडे वाईट नजरेने पाहिले जाते. ती कुमारी किंवा विधवा असेल तर तिला अनेक नजरांशी वखवखलेल्या लागतो. एखाद्या यंत्राप्रमाणे ती घरात व बाहेर काम करीत असते. काही वेळेला हया दुहेरी जबाबदाऱ्या पार पाडतांना स्वत:ची कोंडी झाल्यामुळे, ती स्वत:च्या अस्तित्वालाही विसरून जाते.

(५) आर्थिक समस्या : नोकरी करणाऱ्या बऱ्याचशा महिला या आर्थिक गरजेपोटी नोकरी करतात. त्या जरी आर्थिक दृष्टया स्वावलंबी झाल्या असल्या तरी समाजात, त्यांची नोकरी लोकांना दिसते. त्यांना कठोर परिश्रमातून जावे लागते. बऱ्याचशा कुटुंबात, विवाहीत महिलांना आपल्या पगाराचे पाकीट पतीला द्यावे लागते. तर कुमारिकांना ते आपल्या पालकांना द्यावे लागते. त्यांना फक्त चहासाठी व काम करण्याच्या ठिकाणी जा ये करण्यास पैसे मिळतात. अर्थात, हे प्रमाण फार अल्प आहे. पण समाजातील नोकरदार महिलांची ही स्थिती आहे.

(६) बढतीबाबत अन्याय : नोकरी करणाऱ्या महिलांना कामाच्या ठिकाणी भेदभाव केल्याचे आढळते. बरोबरच्या सहकाऱ्यांप्रमाणे त्यांना समान वेतन मिळत असेल तरी उच्च पदांच्या बढतीच्या बाबतीच्या बाबतीत त्यांना डावलले जाते. यामागे स्त्रियांबद्दलचा समाजात रूजलेला पूर्वग्रह कारणीभूत आहे आणि उच्च पदासाठी आवश्यक असणारे प्रशासकीय, तांत्रिक व औद्योगिक प्रशिक्षण हे काही महिलांनाच मिळू शकते. बढती बाबतच्या अन्यायामुळे तिच्यावर एका प्रकारचा मानसिक आघात होतो. तर काही वेळेला कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे तिच्यावर एका प्रकारचा मानसिक आघात होतो. तर काही वेळेला कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे महिला उच्च पदे स्वीकारण्यास तयार होत नाहीत ही सुध्दा वस्तुस्थिती आहे.

(७) स्त्रिया म्हणून नोकरीत नकार : खाणीत, उद्योगधंदे, वनस्पतीची लागवड, काही सहकारी बँका इ. ठिकाणी, महिलांसाठी संरक्षक कायदे असल्यामुळे खर्च वाढेल म्हणून स्त्रियांना नोकरी नाकारली जाते. त्यांचे कामाचे तास, काम करण्याची क्षमता, प्रसुतीनंतरचे फायदे, त्यांची काम करण्याची क्षमता, पाळणाघर इ. खर्चामुळे खाजगी मालक स्त्रियांना नोकऱ्या देण्यास नाखूष असतात.

## अध्ययनाचे महत्व :

संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य घटक आहे संशोधनामुळे घटना व त्याच्या दुष्परिणमाची जाणीव होते. प्रस्तुत अध्ययन हे नोकरी करणाऱ्या महिलांवर आधारित असून स्त्रियांच्या कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, नोकरी विषयक समस्या व त्यांना कितपत स्वातंर्त्य आहे या विषयीची माहिती प्राप्त होते. तसच स्वातंर्त्य प्राप्तीनंतर लोकांच्या विचारामध्ये कितपत परिवर्तन  झाले. आधुनिक युगामध्ये स्त्री पुरुषातील भेद आहे किंवा नाही भेद कमी झाल्यास त्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करू शकतात. याबाबत माहिती प्राप्त होते तसेच नोकरी करणाऱ्या स्त्रियांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोण व नोकरीमध्ये येणाऱ्या अडचणी व त्यांची कार्यस्थिती व शासनाचे स्त्रियाबद्दलचे धोरण इत्यादीची माहिती होण्यास मदत होते. याविषयी माहिती गोळा केल्यास समाजातील लोकांना अभ्यासाच्या दृ ष्टीकोनातून निश्चितच फायदा होईल.

## प्रस्तुत शोध निबंधाचे उद्देश :

(१) नोकरी करणाऱ्या महिलांचा दर्जा अभ्यासणे.
(२) कौटूंबिक भूमिका पार पाडतांना व्यावसायिक कार्यस्थितीवर होणारा परिणाम अभ्यासणे.
(३) नोकरी करतांना कार्यस्थिती विषयक बाबींचा अभ्यास करणे.
(४) सोयी सुविधांचा अभ्यास करणे.

## गृहितकृत्य :

(१) नोकरी करणाऱ्या महिलांच्या दर्जामध्ये आजही फारसा बदल झालेला दिसून येत नाही. आजही पुरुषी मानसिकता व दुय्यमतेची भावना दिसून येते.
(२) कौटूंबिक भूमिका पार पाडतांना व्यावसायिक स्थितीवर प्रतिकूल परिणाम होते.
(३) नोकरी करतांना अनेक समस्या निर्माण होतात.
(४) नोकरीच्या ठिकाणी सोयी सुविधांचा अभाव दिसून येतो.

## नमूना निवड :

सदर शोधनिबंधासाठी वर्धा जिल्हयातील ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ७० आरोग्य केंद्रातील ४८ नोकरी करणाऱ्या महिलापैकी ४० महिलांचा संभाव्यता नमूना निवड पध्दतीतील लॉटरी पध्दतीचा उपयोग करून निवड करण्यात आली. आणि नोकरी करणाऱ्या महिलांचे तथ्य संकलन करण्याकरीता संरचित मुलाखत अनुसूचीच्या तसेच निरीक्षणाच्या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात आले.

## विश्लेषण :

समाजातील स्त्रियांना आजही समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन हा संकुचित व दुय्यम दर्जा देणारा आहे असे दिसून येते. आजही कुटूंबात व समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जातो. नोकरी करित असूनही बऱ्याच स्त्रियांना आर्थिक व्यवहार करण्यास मुभा नाही असे २९ नोकरी करणाऱ्या महिलांचे मत (६०.४१टक्के) आहे. तर कौटुंबिक भूमिका पार पाडतांना ३६ महिलांना म्हणजे ७५ टक्के महिलांना व्यावसायिक स्थितीवर परिणाम होतो असे मत व्यक्त केले तर अनेक महिलांना व्यावसायाच्या ठिकाणी अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. नोकरी करित असलेल्या ठिकाणी त्यांना अनेक अडचणी निर्माण होतात. नोकरीच्या ठिकाणी सोयी सुविधांचा अभावामुळे त्यांच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात व मानसिक संतुलन बिघडते. नोकरीच्या ठिकाणी स्त्रियांना सुरक्षितता वाटत नाही. पुरूषांची मानसिकता बदलल्यास त्यांना त्यांचा विकास करण्यास प्रोत्साहन मिळेल.

## निष्कर्ष :

(१) नोकरी करणाऱ्या स्त्रियांपैकी अनेक स्त्रियांना आजही कुटूंबात व समाजात दुय्यम दर्जा दिला जातो.

(२) नोकरी करणाऱ्या स्त्रियांना कौटूंबिक भूमिका व व्यावसायिक अशा दोन्ही भूमिका पार पाडाव्या लागल्यामुळे त्यांच्या अरोग्यविषयक समस्या निर्माण होतात.

(३) पुरुषी मानसिकता बदलल्याशिवाय स्त्रियांचा पूर्णपणे विकास शक्य नाही.

(४) आजही स्त्रियांना कौटूंबिक, सामाजिक व धार्मिक कार्यात सहभागी करून घेतल्या जात नाही. (५) व्यावसाकिय भूमिका पार पाडतांना कौटूंबिक व व्यावसायिक कार्यावर प्रतिकुल परिणाम होतो.

(६) नोकरी करतांना कार्यालयामध्ये किंवा कार्यालयाच्या ठिकाणी पुरेशा सोयी सुविधा अभावी अनेक समस्या निर्माण होते.

(७) नोकरीच्या ठिकाणी काम करित असतांना स्त्रियांना असुरक्षितता जाणवते.

(८) नोकरीमध्ये आजाही पडल्यास त्यांना आजारपणाची रजा व आजारपणाचे फायदे मिळत नाही.

## उपाययोजना :

(१) नोकरी करणाऱ्या महिला असो किंवा कोणत्याही महिला असो त्यांना कुटूंबात व समाजात समानतेच्या दर्जाने वाढविले पाहिजे कुटूंबात तेव्हाच त्यांचा विकास होईल.

(२) ग्रामीण तसेच शहरी भागातील स्त्रियांना पुरेशे संरक्षण मिळाले पाहिजे कोणत्याही व्यक्तीचा विकास हा सुरक्षित वातावरणावर होतो.

(३) स्त्री ही अर्थाजनामध्ये व कौटुंबिक विकासामध्ये महत्वाची भूमिका पार पाउत असल्यामुळे ती आज ताठ मानाने व स्वाभिमानाने जिवन जगते. त्यामुळे समाजातील लोकांनी आपल्या दृष्टीकोनात बदल करावा जेणेकून स्त्रियांचे समाजामध्ये स्थान वाढेल.

(४) स्त्रियांना सामाजिक, धार्मिक बंधनातून मुक्त केल्यास स्त्री आपला व कुटूंबाचा उध्दार करण्यास सक्षम होईल त्यामुळे पुरूषी मानसिकता बदलण्याची गरज आहे.

(५) नोकरीच्या ठिकाणी स्त्रियांना पाहण्याचा दृष्टीकोन बदलला व तिच्या अधिकारापासून तिला वंचित न ठेवता तिला असणारे सर्व लाभ देण्यात यावे.

(६) नोकर करणाऱ्या ठिकाणाचे वातावरण चांगले असावे, राजकारणी व्यक्तींनी संधीसाधूपणा करता कामानये ही वृत्ती बाजूला सारून स्त्रियांना संरक्षण देऊन व त्यांचा स्वाभिमान जागविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## संदर्भ

(१) अहूजा राम, सामाजिक समस्याएँ, रावत पब्लीकशन, नई दिल्ली, १९९४.

(२) बोधनकर, अलोणी, सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९४.

(३) दुबे सरला, अपराध का समाजशाप, विवेक प्रकाशन दिल्ली.

(४) कवि माधवी, महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९९.

(५) खैरनार दिलीप, आधुनिक भारतातील सामाजिक समस्या, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

(६) लोटे रा.ज., भारतातील सामाजिक समस्या, पिंपळापुरे पब्लीकेशन, नागपूर.

(७) मेश्राम, सुरेश, प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, कृष्णचंद्र एजन्सी, नागपूर, २००३

(८) संगवे विलास, भारतातील सामाजिक समस्या, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७१

❖❖❖

# विदर्भातील रामदासी संप्रदायाचे स्वरूप व कार्य

**डॉ. प्रगती संजय ढोक**
114, शिल्पा सोसायटी, नरेंद्र नगर, नागपूर 15
Email:- pragatidhok02@gmail.com Mob. No. 9552984776

## प्रस्तावना

आज जगात मानवाने भौतिक विज्ञानाच्या साहाय्याने अत्युच्च शिखर गाठले आहे. प्रगत तंत्रज्ञानामुळे आज समाज ऐहिक सुखसोयींनी समृद्ध झाला आहे; पण त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला मानवी जीवन अत्यंत स्वैर, दिशाहीन व उच्छृंखल झाले आहे. अशा समाजाला विशेषतः भावी तरुण पिढीला योग्य, स्पष्ट, तर्कशुद्ध बुद्धिनिष्ठ विचारांनी नवीन दिशा प्रेरणा देऊन चारित्र्यसंपन्न, धर्मनिष्ठ, जीवन जगणारी नवीन पिढी तयार करण्यासाठी ऐहिक उत्कर्षाच्या विचारांची गरज असते आणि असे विचार समाजामध्ये असलेल्या विचारवंताकडून समाजाला मिळत असतात. या विचारवतांमध्ये प्रामुख्याने संतांचा उल्लेख करावा लागेल. कारण संत हेच समाजाला मार्गदर्शक अशी मूल्ये समाजात प्रस्थापित करण्याचे काम करीत असतात. सखोल, सशक्त आणि समृद्ध असे विचार संतकाव्यातून प्रक्षेपित केले जातात ज्यामध्ये भक्ती, उपासना व मानवकल्याण हे प्रमुख सूत्र असलेले दिसते. हेच कार्य करणारे सोळाव्या शतकातील राष्ट्रगुरू समर्थ रामदास स्वामी यांचे कार्य आजही कसे मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे व त्याची समाजाला आजही किती नितान्त गरज आहे, हे पटवून देणे ही या प्रबंधामागची भूमिका आहे.

महाराष्ट्राच्या उज्ज्वल संतपरंपरेमध्ये अत्यंत सार्थ शक्तिशाली समाजाला प्रेरणा व स्फूती देऊन समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करणारे, समाजातील तरुणांना शक्तीची उपासना देणारे एक अत्यंत भव्यदिव्य व्यक्तिमत्त्व म्हणजेच श्री समर्थ रामदास स्वामी होय! कारण आज आपणास स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे झाली तरी समर्थांच्या आदर्श विचारप्रणालीची गरज तीव्रतेने भासते आहे. समर्थांनी त्या काळात जी विचारप्रणाली मांडली ती मुलत: परकीय सभेच्या आक्रमणापासून स्वकीयांचे रक्षण करण्यासाठी दिशादर्शक अशी होती. आज हीच विचारप्रणाली स्वकीय समकालीनांच्या आतंकवादी स्वार्थमूलक दुष्ट प्रवृत्तीपुढे ठामपणे उभी राहण्यासाठी काळाची गरज बनली आहे. आज सारा समाज क्षणिक सौख्यासाठी चंगळवादाच्या आणि स्वप्नरंजनाच्या आहारी जाऊन आदर्श जीवन जगणे विसरला आहे. त्यामुळे त्याचे अस्तित्वच आज धोक्यात आले आहे. त्यामुळे आज समाजाला समर्थ रामदास स्वामींच्या आचार-विचारांची व कार्याची नितान्त आवश्यकता आहे.

समर्थांनी जे कार्य सोळाव्या शतकामध्ये केले ते केवळ त्या काळातच योग्य होते असे नाही, तर आजच्या काळात या कार्याची अत्यंत गरज आहे असे लक्षात येते. कारण आजच्या काळात असलेला स्वार्थीपणा, मतलबीपणा, चंगळवाद, भ्रष्टाचार या आणि अशा अनेक प्रकारच्या समाजातील घातक प्रवृत्तींना आळा घालायचा असेल, तर समाज सुदृढ असणे आवश्यक आहे. निकोप असणे आवश्यक आहे.

आज जीवनाच्या विविध वेशन अगदी शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्री- अनाचार, भ्रष्टाचार माजलेला दिसत आहे. आज अश्रद्धा, भौतिकता, जातीयवाद, प्रातिकता, संकुचितपणा या समाजविघातक शक्तींनी समाजाला पछाडले आहे. यासाठी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विवेकाला मूळ स्थान आहे. समाजाचे संघटन आणि पुर्नरचना करण्यासाठी विवेकासह नीति मूल्यांची जपणूक अपरिहार्य ठरते.

आज व्यक्तिगत जीवन असो, सामाजिक जीवन असो, राष्ट्रीय जीवन असो. एवढेच काय पण जागतिक जीवन असो, सर्व स्तरावर पद्धतशीर प्रयत्न आणि नियोजन हवे आहेत. यासाठी समर्थांची 'यत्न तो देव जाणावा' ही उक्ती आदर्शरूप आहे. प्रयत्नासाठी सामर्थ्य हवे आणि सामर्थ्यसाठी प्रयत्न हवे. हे परावलंबित्व समर्थ साहित्यातून दिसून येते. श्रीराम, हनुमान आणि छत्रपती शिवाजी महाराज या लोकांचा आदर्श समाजाने आपल्यापुढे ठेवल्यास त्याच्यातील सद्‌गुणांची ओळख समाजाला होईल आणि ते आपल्या अंगी अंगीकारण्यासाठी समाज प्रयत्नशील राहील. कारण सद्‌गुणसंपन्नही व्यक्ती समाज वा राष्ट्र यांच्या इहपर उत्कर्षांचा पाया आहे.

समर्थ साहित्याचा अभ्यास केल्यास समर्थांचे उद्‌धिष्ट केवळ धर्मप्रवण लोकांना परमार्थाकडे लावणे हे नसून समाजच पालटावा. ही क्रांतिकारक प्रेरणा त्यांच्या वाङ्मयातून दिसून येते. आज समाज सुधारण्याची क्रांती आणण्याची गरज आहे. समर्थांच्या विचारांचा, कार्याचा, कवितेचा, जीवनाचा मागोवा घेऊन हे कार्य करता येईल.

आजच्या काळात भारतामध्ये स्वातंत्र्य असले तरी स्वराज्य मात्र नाही: आणि स्वराज्य होण्यासाठी समाजामध्ये चांगल्या व्यक्ती पाहिजेत व्यक्ती चांगली असेल तरच समाज चांगला राहील आणि समाज बागला असेल तर राष्ट्र चांगले राहील. सारा समाज क्षणिक सौख्यासाठी चंगळवादाच्या आहारी गेला आहे. समाज मनाने बलहीन, पराक्रमहीन, आचरणाने स्वार्थी व लाचार बनला आहे. त्यासाठी समाजामध्ये उदान वृत्तीची निःस्वार्थी माणसे आवश्यक असतान आणि अशी माणसे तयार करण्यासाठी समर्थांनी संपूर्ण भारतभर मठस्थापना केली आणि स्वत:चा संप्रदाय स्थापन केला.

समर्थ परिभ्रमणाच्या काळात ज्या गावात जात तेथील गावकऱ्यांच्या मदतीने हनुमंताची मंदिर बांधीत व त्यांच्यासारखे बलदंड व कणखर व्हा असा उपदेश करीत. आपल्याच मायभूमीत अध्यात्माच्या नावाखाली आपला समाज लाचारीचे दीनवाणे आणि गुलामीचे जीवन जगतो, हे अतिशय दुःखद व तितकेच चीड आणणारे होते.

विदर्भ म्हणजे त्या काळचा वऱ्हाड प्रांत मोगलांच्या राज्यात मोडत होता. दिल्लीच्या बादशहातर्फे सुभेदार व इतर प्रमुख अधिकारी औरंगाबाद, एलिचपूर व बऱ्हाणपूर येथे वास्तव्यास असून, राज्यव्यवस्था संपूर्ण मुसलमान नोकरशाहीच्या हातात होती. मूर्तिभंजनाचे व मंदिर विध्वंसाचे कार्य जोरात चालू होते. अशा परिस्थितीत समर्थांच्या मठाद्वारे हिंदू धर्मप्रसाराचे व धार्मिक एकीकरणाचे कार्य हे अत्यंत प्रशंसनीय होते. आजही वऱ्हाडात-विदर्भात अनेक शहरात आणि गावोगावी समर्थ संप्रदायाच्या शाखा, उपशाखा पसरलेल्या आहेत. बहुतेक ठिकाणी अशा मठातून दासनवमी, रामनवमी, हनुमानजयंती इत्यादी उत्सवाच्या द्वारे धर्मजागरणाचे कार्य अव्याहतपणे चालू आहे.

समर्थाच्या शिष्य आणि प्रशिष्यांनी स्थापन केलेल्या मठ-मंदिरातून समर्थाचा संदेश

उपासनेचा मोठा आश्रय । उपासनेविन निराश्रय । ।
उदंड केले तरी जयो । प्राप्त नाही ।।

हा दिला जातो

## सोळाव्या शतकातील विविध संप्रदाय

अशा प्रतिकूल परिस्थितीत समर्थांनी आपल्या संप्रदायाची स्थापना केली, त्या वेळी महाराष्ट्रात विविध संप्रदाय होते. त्यात वारकरी संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, दत्त संप्रदाय, नाथ संप्रदाय, समर्थ संप्रदाय होते.

## वारकरी संप्रदाय

संत ज्ञानेश्वरमाउली ही यादवांचे राज्य देवगिरीला ज्या वेळी होते त्या वेळी उदयास आली. अठरापगड जातीचे संत वारकरी संप्रदायात होते. वारकरी पंथाची ध्वजा त्यांनी सातत्याने उंचावली. 'ज्ञानदीप लावू जगी' ही संत नामदेवाची महत्त्वाकांक्षा वारकरी संप्रदायातील सर्वांनी पूर्ण केली.

वारकरी संप्रदायात कितीतरी संत होऊन गेलेत. पण तरीही ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम ही वारकरी संप्रदायातील चार संतमंडळी अन् समर्थ रामदास स्वामी हे पचसंत' म्हणून महाराष्ट्रात मान्यता पावले आहेत. ज्ञानेश्वरमाउलीने ज्ञानेश्वरी-अमृतानुभव या ग्रंथाद्वारे सामान्य जनतेच्या हृदयावर विचारसरणी उसवली. वारकरी संप्रदायाने हिंदू संस्कृती. हिंदवी संस्कार, स्वाभिमान लोकांन जागविला अन् पंढरीची वारी ही लोकस्थितीचे परीक्षण अन् उपाययोजना करणारी ठरली.

## नाथ संप्रदाय

हा संप्रदाय अत्यंत कडक शिस्तीचा व सोवळेओवळे असलेला आहे. नारायण-मच्छिंद्रनाथ गोरखनाथ गहिनिनाथ - निवृत्तिनाथ अशी या संप्रदायाची परंपरा आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाल या ग्रंथरचना निवृत्तिनाथप्रसादे केल्या आहेत व यातूनच या संप्रदायाचे मोठेपण दिसून येते.

## समर्थ संप्रदाय

१२ वर्षे तीर्थाटन करून विचारात क्रांती घडलेल्या समर्थांना लोकोद्धारासाठी व स्वधर्मस्थापनेसाठी प्रत्यक्ष कार्याद्वारे लोकस्थिती सुधारण्याची नितान्त आवश्यकता वाटू लागली. व्यक्तीच्या अथवा समाजाच्या पारमार्थिक जीवनाला स्वातंत्र्याचे अधिष्ठान असलेच पाहिजे. व्यक्ती पारतंत्र्यात खऱ्या अर्थाने जीवनमुक्त होऊच शकत नाही, ही जाणीवही त्याच्या अंतकरणात सतत जागृत होती. देशाच्या इतर प्रांतापेक्षा महाराष्ट्र त्यांना त्या दृष्टीने अनुकूल वाटला व शके १५६६ म ये समर्थांनी कृष्णातीरी शहाजीराजांच्या देखमुखीच्या गावी आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली व आपल्या संप्रदायाची उभारणी केली. स्वधर्माला समाजाच्या निष्कलंक चारियाची, संघटित जीवनाची आणि प्रयत्नवादाची नितान्त आवश्यकता असते. म्हणून स्वधर्म हे अतिम साध्य डोळयासमोर ठेवून व सर्वगुणसंपन्न अशा प्रभू रामचंद्राला दैवत मानून त्यांनी कार्यास प्रारंभ केला.

विविध ठिकाणी त्यांनी मारुतीची स्थापना केली. पुढे चाफळला श्रीरामाचे मंदिर उभारले. चाफळ ही श्रीसमर्थांची कर्मभूमी होय. येथूनच त्यांनी सर्व देशभर पसरलेल्या संप्रदायाची सूत्रे हलविली, समर्थांचे सर्व भारतभर हजारों शिष्य निर्माण झाले. सर्व शिष्यांनी निदान तीन वर्षांत एकदा येथे येऊन वृत्तान्त निवेदन केला पाहिजे, असा त्यांचा दंडक होता.

## महानुभाव संप्रदाय

वारकरी संप्रदायाच्या समकालीन असलेला संप्रदाय म्हणजे महानुभाव संप्रदाय महानुभाव संप्रदायाचे प्रमुख चक्रधर स्वामी. हे मूळचे गुजरातचे त्यांचा जन्म इ. स. ११९४ साली झाला. चक्रधर हे गुजरातमधील असूनही त्यांनी महानुभाव संप्रदायाचा प्रचार महाराष्ट्रभर केला जिवांचा उद्धार केला 'सूत्रपाठाला'

महानुभावात वेद म्हटले त्यात महानुभावाचे खरे तत्वज्ञान आहे. स्वतंत्र, नित्य, अनादी व अनंत या यार वस्तुदेवता या नित्यमुक्त आहेत. प्रपंच अनित्य आहे. कार्यप्रपंचाची निर्मिती पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते व सत्व, रज, तम हे त्रिगुण आहेत. चक्रधर स्वामींनी आत्मज्ञान, भक्ती आणि गुरुकृपा याला महत्त्व दिले आहे

## दत्त संप्रदाय

श्रीपादवल्लभ आणि नृसिंहसरस्वती हे या संप्रदायाचे प्रणेते असून, या संप्रदायाचे लोक त्यांना दत्तअवतार समजत होते. यानी आचारप्रधान धर्मपालनाचा निष्ठा समाजात उत्पन्न केली. आचाराच्या संदर्भात त्यांनी सोवळेओवळे, जातीतील उच्च-नीचता याला जास्त महत्त्व दिले. दत्तउपासना अत्यंत कठोर अन् कर्मठपणा यांना धरूनच होती. दत्त म्हणजे ब्रह्मा, विष्णू, महेश यांचे एकरूप सत्य, तम, रज या तीन गुणाचे ऐक्यदर्शक एकरूप असे दत्त या संप्रदायाचे प्रमुख देवत आहे.

श्रीरामचंद्र, हनुमान आणि तुळजाभवानी ही समर्थ सांप्रदायिकांची तीन प्रमुख उपास्यदैवते होत. श्रीरामचंद्र हे सांप्रदायिकांचे प्रमुख दैवत आहे. म्हणून यास "रामदासी संप्रदाय असेही म्हणत. समर्थ हे श्रीरामाचेच नाव आहे म्हणून समर्थ संप्रदाय असेही म्हणतात. हनुमंत हे शक्तीचे, बुद्धीचे आणि समर्पित भक्तीचे एक प्रतीकच आहे. त्यामुळे समर्थ सांप्रदायिकांच्या उपासनेत रामचंद्रांच्या बरोबरीने हनुमंताच्या उपासनेला महत्त्व प्राप्त झाले. समर्थांनी आपल्या संप्रदायाचे तत्वज्ञान जीवनदृष्टी आचारधर्म आणि उपदेश या सर्व गोष्टींचे निरूपण आपल्या 'दासबोध' या ग्रंथात केले आहे. त्यामुळे समर्थ संप्रदायात या ग्रंथाला प्रमाण ग्रंथ म्हणून समर्थांच्या हयातीतच मान्यता मिळालेली होती. भिक्षा हे समर्थ सांप्रदायिकांचे खास वैशिष्ट्य मानावे लागेल. समर्थ रामदास स्वामींचे साहित्य दासबोध, रामायण, करुणाष्टके, मनाचे श्लोक, परचक्र निरूपण, अस्मानी-सुलतानी, आनंदभुवन या सर्वांचा आढावा घेण्यात आला आहे.

## विदर्भातील रामदासी संप्रदायाचे कार्य

## संप्रदायाची आजची स्थिती

समर्थांनी जे मठ आणि संप्रदाय वाढविला त्याला सुमारे ४०० वर्षे झालीत व काळानुरूप नवीन जीवनपद्धती बदलली. आधुनिक तंत्रज्ञानामुळे आताच्या पिढीत फार बदल झालेत. धार्मिक संस्थामध्येही बदल झालेत. समर्थांनी जे मठ स्थापन केले होते त्याच्याही कार्यात बदल झालेत. काळानुरूप त्यात बदल होऊन मठांचे मंडळ झालेत जसे उपासना मंडळ, आध्यात्मिक मंडळ, भजन मंडळ वगैरे. आजही समर्थांच्या संप्रदायाचे स्वरूप जरी बदलले असले तरी त्याचे कार्य मंडळाद्वारे सुरू आहे.

सज्जनगडावर १९५२ मध्ये श्रीधर स्वामी व इतर काही समर्थभक्तानी समर्थाचे कार्य वर्तमानकाळात लोकांसमोर आणि लोकांच्या मदतीला यावे यासाठी श्रीसमर्थ सेवा मंडळाची कार्यस्थापना केली. या समर्थ सेवा मंडळाच्या माध्यमातून पुढे विविध पातळीवर जनसंपर्क वाढविण्यासाठी व समर्थविचारांचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी हे मंडळ कार्यरत झाले. समर्थांची पारंपारिक, साप्रदायिक भिक्षाफेरी या मंडळांनी सुरू केली. महाराष्ट्राच्या विविध भागात दरवर्षी समर्थपादुकांचा दौरा करून आलेल्या भिक्षेतून गडावर अन्नदानाचे कार्य सुरू झाले. समर्थांच्या साहित्याचा लोकांना परिचय व्हावा आणि त्याचा अभ्यास करून समाजप्रबोधन व्हावे, यासाठी 'समर्थ विद्यापीठ' स्थापन झाले. महाराष्ट्राबरोबरच इतर

प्रांतातही समर्थ संप्रदायाचा प्रसार होताच तेथील मठांना पुनरुज्जीवित करण्याचे कार्य त्या त्या भागातील समर्थभक्तांनी सुरू केले,

या सर्व उपक्रमात विदर्भही मागे नव्हता. विदर्भामध्ये अनेक ठिकाणी समर्थ सांप्रदायिक मठ होते. पण, आज काळाच्या ओघात त्याचे स्वरूप बदललेले दिसून येते. आज विदर्भातील गावागावांत समर्थ संप्रदायांची अनेक मंडळे संप्रदायाचे कार्य करण्यात प्रभावीपणे पुढे आलेले दिसून येतात.

## नागपूर

1) समर्थ सेवा मंडळ, नागपूर

सज्जनगडावरील श्री समर्थ सेवा मंडळाची शाखा म्हणून १९८२ ला नागपूरमध्ये गडावरील मान्यवरांच्या उपस्थितीत श्री समर्थ सेवा मंडळ, नागपुर ची स्थापना झाली आणि समर्थ सेवा मंडळाचे उपक्रम आणि अभ्यासक्रम यातून नागपूरमध्ये समर्थविचारांचा प्रसार आणि प्रचार करण्याचे कार्य सुरू झाले. यामध्ये सांप्रदायिक भिक्षाफेरी, उपासना, समर्थ विद्यापीठाचे अभ्यासक्रम, पत्राद्वारा अभ्यासक्रम दासबोध सखोल अभ्यासक्रम, गुरुपौर्णिमा उत्सव, दासनवमी उत्सव, श्रीमत् दासबोधाची सामूहिक पारायणे, दासबोध हस्तलिखित, दासबोधांतर्गत विविध प्रकारची शिबिरे, समर्थ स्थापित मारुती आणि ठिकाणं यांच्या सहली इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. नागपूर शहराचा विस्तार मोठा असल्यामुळे प्रत्येक भागामध्ये वेगवेगळे समूह तयार होऊन त्या त्या भागामध् ये दासनवमी उत्सव, गुरुपौर्णिमा उत्सव, दासबोधाची पारायणे, उपासना अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये प्रामुख्याने खालील मंडळ आहेत-

२) हनुमान नगर सार्वजनिक उत्सव मंडळ

३) समर्थ वाचनालय,

४) वीर हनुमान मंदिर (व्यास), नरेंद्रनगर

५) मेडिकल कॉलनी, भगवाननगर ५) पांडे ले-आऊट, खामला

७) मारुती देवस्थान ट्रस्ट, रामदासपेठ

८) रिंग रोड, प्रतापनगर

९) धरमपेठ

या व्यतिरिक्त खालील ठिकाणी श्री समर्थ सेवा मंडळाची स्थापना करून  दासबोध वाचने, प्रचार व प्रसार होतात.

वर्धा, मालेगाव, लाखनी, यवतमाळ, गोंदिया, भंडारा, कारंजा मठ, रामटेक, अकोला, मूर्तिजापूर, बुलढाणा, साखरखेडी, बडनेरा, रहाटगाव, अमरावती.

## निष्कर्ष

1) विदर्भात समर्थ संप्रदायाचे बरेच मठ असले, तरी त्यांची स्थिती आज फार चांगली नाही हे लक्षात येते. तिथे काही कार्यही होत नाही.
2) विदर्भात असलेल्या मठापैकी काही मठ आजही चांगल्या परिस्थितीत अस्तित्वात आहेत व त्यांचे कार्यही चांगल्या प्रकारे चालू आहेत.
3) विदर्भातील मठातील जे समर्थ शिष्य होते, त्यांचे साहित्य आजही उपलब्ध आहे.

4) आज विदर्भात समर्थ संप्रदाय मठाच्या स्वरूपात जरी अस्तित्वात नाही असे वरवर आढळून येत असले, तरी मंडळांच्या स्वरूपात हा संप्रदाय अस्तित्वात आहे.
5) विदर्भात जी समर्थांची मंडळे आहेत ती खूप मोठ्या प्रमाणात समर्थविचारांचा प्रसार व प्रचार करत आहेत व आजही समर्थ संप्रदायाचे कार्य खूप मोठ्या प्रमाणात होत आहे

## संदर्भ ग्रंथ सूची


- आळतेकर, समर्थ चरित्र, श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड
- अकरा लघुकाव्ये - श्रीसमर्थ सेवा मंडळ सज्जनगड प्रथमावृत्ती १९८८
- अभंगगाथा - प्रकाशक विश्व हिंदु परिषद विदर्भ प्रदेश, नागपूर
- आपटे के. वा., दासबोधातील तत्वज्ञान प्रकाशक सौ. माया के. आपटे, प्रथमावृत्ती २००७
- करंदीकर, नामजोशी, साक्षेप समर्थांचा, स्नेहल प्रकाशन, शनिवारपेठ, पुणे
- गोसावी, र. रा., श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय, व्हिनस प्रकाशन, पुणे.
- गोगटे, डॉ. वामन, राघवाचा धर्म गाजो, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती प्रथम सन २००५.
- चिंचोळकर सुनील, शिष्य समर्थांचे, शिल्पा प्रकाशन
- चिंचोळकर सुनील, चिंता करितो विश्वाची, प्रकाशन श्री. गंधर्व वेदप्रकाश पुणे, प्रथमावृत्ती सन २००४.
- चिंचोळकर सुनील, समर्थ रामदासांची साहित्यदृष्टी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीमंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती सन २००९.
- चिटणीस, प्रा. डॉ. रा. वा. रामदासांची काव्यसृष्टी एक अभ्यास, गुरूकूल प्रतिष्ठान पुणे, प्रथमवृत्ती २००४.
- चव्हाण गणेश, पूर्व विदर्भातील संतपरंपरा, विसा बुक्स, नागपूर प्रकाशन २०१०
- जोशी डॉ. मधुकर रामदास, समग्र समर्थ साहित्य, प्रकाशक ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर, मुंबई, सुमंगल प्रेस प्रा. लि. प्रथमवृत्ती सन १९९८.


❖❖❖

# मराठी व्रतकथांचे समाजजीवनात महत्त्व

प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर
मराठी विभाग प्रमुख
मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ
मो. नं. ९४२२८१६२२६

## सारांश

निसर्गास अनुकूल मानवाचे आचरण होण्यासाठी आदिमकाळात व्रताचरणाची सुरुवात झाली. हे व्रताचरण दीर्घकाळ टिकावे यासाठी व्रतकथा आल्या. व्रतकथा काही प्रमाणात मानवीजीवनास निरर्थक असल्या, तरी व्रतकथांमधून मानवीजीवनास आवश्यक मूल्ये, नैतिकता, संस्कार इत्यादींचे जतन, संवर्धन व नवीन पिढीत संक्रमण होते. व्रतकथा सामाजिक व सांस्कृतिक विकासात मोलाचे योगदान देत असल्यामुळे व्रतकथांमधील निरर्थकता वगळून त्या टिकून राहणे आवश्यक आहे.

## प्रस्तावना

निसर्गास अनुकूल मानवाचे आचरण होण्यासाठी आदिमकाळात व्रताचरणाची सुरुवात झाली. हे व्रताचरण दीर्घकाळ टिकावे यासाठी व्रतकथा आल्या. व्रतकथांमधून शाश्वत मूल्यांचे तसेच सांस्कृतिक घटकांचे जतन, संवर्धन व संक्रमण पुढील पिढीत होत गेले. व्रतकथांमधील कौटुंबिक बोध नातेसंबंधाच्या दृढीकरणास साहाय्यभूत ठरला. व्रतथांमध्ये मानवाच्या अहंकाराचे वर्णन करून अहंकार मानवास लयास नेतो हे मानवीमनाला पटवून दिले. मानवाला सामाजिक बनविण्यात तसेच कुप्रवृत्तीपासून दूर करून नैतिक आचरणाचे पाठ देण्यास व्रतकथा हातभार लावतात का? मानव व समाज यांच्या विकासप्रक्रियेत व्रतकथांचा वाटा दिसतो का? याचा शोध घेण प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे.

## बीजशब्द

व्रतकथा, नैतिकमूल्ये, संकट निरसन, सांस्कृतिक अभिसरण, सामाजिकरण

## सांस्कृतिक घटकांचे जतन, संवर्धन व संक्रमण

निसर्गामध्ये जीवनाला अनुकूल बदल करून, म्हणजेच काही संस्कार करून मानव आपला जीवनरथ चालवित आला आहे. संस्काराच्या या प्रक्रियेतूनच संस्कृतीचा जन्म झाला. मानवीजीवनास पोषक मूल्ये, प्रतीके, विधी, परंपरा इत्यादी अंगांनी संस्कृती बहरत गेली. मानवी आचरणाचा ती एक भाग बनली. आचरणाचा भाग असणाऱ्या संस्कृतीची रुजवण नवीन पिढीत होण्यासाठी व्रतकथांची निर्मिती आदिमांनी केली.

व्रतांची महती सांगणाऱ्या आणि संकट निरसनात शेवट साधणाऱ्या या व्रतकथा समाजजीवनात एक विशिष्ट स्थान निर्माण करून आहेत. व्रतकथा सांगण्या ऐकण्याच्या परंपरेमुळे सांस्कृतिक घटकांचे पुढील पिढीत संक्रमण होते. ''एकीने कहाण्या वाचायच्या आणि इतर सर्वांनी त्या ऐकायच्या या सर्व प्रक्रियेतून सांस्कृतिक अभिसरणाची सुंदर क्रिया घडते हे महत्त्वाचे.''[१] सांस्कृतिक अभिसरणाच्या दृष्टीने मानवीजीवनास आवश्यक असणारी दातृत्व, दया, प्रेम, सदाचरण, कर्तव्यपालन, प्रामाणिकपणा, विनम्रता, उदारता, निसर्ग शक्तींवरील श्रद्धा इत्यादी मूल्ये व्रतकथांमध्ये आढळतात.

संस्कृतीमध्ये प्रतीकांनाही महत्त्व असते. या दृष्टीने स्त्री व पुरुष लिंगाचे प्रतीक शिवलिंग (सोमवारची व्रतकथा, महाशिवरात्रीची व्रतकथा, हरितालिकेची व्रतकथा), अग्नीचे प्रतीक दिवा (अवसेच्या दिव्यांची व्रतकथा), भूमीच्या जननेंद्रियाचे प्रतीक वारूळ (नागपंचमीची व्रतकथा), रक्षणाच्या बंधाचे प्रतीक (रक्षाबंधन व्रतकथा), लक्ष्मीचे प्रतीक धान्य (जेष्ठागौर व्रतकथा), भूमीचे प्रतीक घट (नवरात्रीची व्रतकथा), सुवर्णाचे प्रतीक आपट्याची पाने (विजयादशमीची व्रतकथा), भाऊबहिणीच्या प्रेमाचे प्रतीक ओवाळण्याची प्रथा (भाऊबिजेची व्रतकथा), पावित्र्य व पतिव्रतेचे प्रतीक तुळस (तुळशीची व्रतकथा) इत्यादी प्रतीकांची आराधना प्राचीनकाळापासून आजतागायत

लोकजीवनात होत आलेली दिसते. मृत आईवडिलांप्रती आदर व त्यांच्या मोक्ष प्राप्तीसाठी निर्माण झालेल्या श्राद्ध विधीचा उल्लेखही पिठोरीची व्रतकथा, ऋषिपंचमीची व्रतकथा यासारख्या व्रतकथांमध्ये आढळतात.

संस्कृतीचे अंग असणारी मूल्ये, प्रतीके, विधी, परंपरा यांची गरज कालही समाजजीवनाला होती, आजही आहे आणि भविष्यातही राहणारच. मूल्ये, प्रतीके, विधी, परंपरा या सांस्कृतिक घटकांचे आजतागायत जतन, संवर्धन व संक्रमण करण्यात व्रतकथांचे मोलाचे योगदान आहे.

## नातेसंबंधात दृढीकरण

कुटुंबसंस्था सक्षम असेल तर मानव तसेच समाज प्रगती करू शकतो. आज कुटुंब व्यवस्था विभक्त झालेली दिसते. त्यामुळे होणारे दुष्परिणाम समाजापुढे आहेत. अशा परिस्थितीत कौटुंबिक नातेसंबंध दृढ करण्यासाठी व्रतकथा हातभार लावतात. व्रतकथांमध्ये संयुक्त कुटुंब पद्धती दिसते. त्यामुळे कुटुंबात असणाऱ्या व्यक्तींच्या नातेसंबंधाचा उल्लेख व्रतकथांमध्ये येतो. कुटुंबातील व्यक्तींवर आलेले संकट व त्याचे निरसन व्रतकथांमध्ये आढळते. जसे, शुक्रवारची देवीची व्रतकथा, रक्षाबंधन व्रतकथा, भाऊबीजेची व्रतकथा यामध्ये भाऊबहिणीच्या नात्याचा उल्लेख आहे. मुलगी—वडील, बहीण—बहीण या नात्याचा उल्लेख आदित्यराणूबाईच्या व्रतकथेत आहे. सासू, सून, मुलगा या नात्याचा उल्लेख रविवारच्या व्रतकथेत आहे. सासरा—सून या नात्याचा उल्लेख श्रावण सोमवारची शिवमुठीची व्रतकथा, पिठोरीची व्रतकथा, बोडणाची व्रतकथा, फाल्गुन चतुर्थी व्रतकथा, पौष रविवारातील तिसऱ्या सोमवारची व्रतकथा यामध्ये आहे. मामा—भाचा या नात्याचा उल्लेख जिवंतिकेच्या व्रतकथेत आहे. सवतीच्या नात्याचा उल्लेख सोमवारच्या कर्तव्याच्या व्रतकथेत, महालक्ष्मीच्या व्रतकथेत आहे. इत्यादी प्रकारच्या नातेसंबंधाचा व्रतकथांमध्ये उल्लेख येतो. बरेचदा या नात्यातील एक व्यक्ती इतर व्यक्तीचा तिरस्कार करतो; पण व्रतकथेच्या शेवटी त्याला आपली चूक कळून नातेसंबंध दृढ होताना दिसते. यामधून हेवेदावे न करता कुटुंबातील घटकांनी एक राहावे व स्वतःची तसेच समाजाची उन्नती साधावी यासाठी व्रतकथा हातभार लावतात.

## कृषी आणि व्रतांचा संबंध

कृषी आणि व्रतांचा संबंध आदिमकाळापासूनचा आहे. जसे, अन्न हा मानवीजीवनातील महत्त्वाचा भाग आहे म्हणून अन्नधान्य देणाऱ्या भूमीची पूजा व्रतांमध्ये दिसते. पिकांना आवश्यक असणारा सूर्यदेव (पौष रविवारची व्रतकथा, रथसप्तमीची व्रतकथा), जलदेवता (शिळासप्तमीची व्रतकथा), शेतीला साहाय्य करणाऱ्या गाईवासरांची पूजा (वसुबारसेची व्रतकथा), शेतकऱ्यांचा मित्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागाची पूजा, भूमीच्या जननेन्द्रियाचे प्रतीक म्हणून वारूळपूजा (नागपंचमी व्रतकथा), व्रतकथांमध्ये येणारे धान्य, वेगवेगळ्या पत्री, दुर्वांकूर, हरितवस्त्र यांना सुफलीकरणाचे प्रतीक मानल्या जाते. श्रावण सोमवारच्या शिवमुठीच्या व्रतकथेत येणारे तांदूळ, तीळ, जवस, मुंग इत्यादी धान्याची शिवमूठ वाहण्याचा उल्लेख आहे. हरितालिका, नवरात्र, चैत्रगौर इत्यादी व्रतकथांमध्ये मातीत धान्य पेरून निघालेल्या अंकुराची पूजा स्त्रिया करतात. यावरून लोकसंस्कृतीशी निगडित व्रते व व्रतकथांचा कृषीशी असलेला संबंध व्यक्त होतो. परंतु वैदिककाळात व्रते आणि व्रतकथा यांचा कृषीशी असलेला संबंध टाळून धर्माशी जोडल्या गेला. बळिप्रथा, वैदिक देवतांचे मोठेपण, चमत्कार अशा आशयाच्या व्रतकथा निर्माण करून व्रत व व्रतकथांचा कृषीशी असलेला मूळ संदर्भच बदलवून टाकला याची प्रचिती लोकसंस्कृतेतर व्रतकथांवरून येते. मात्र लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथांमध्ये व्रते व व्रतकथांचा कृषीशी संबंध दिसतो.

भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे आजही कृषिजीवनातील आचरणात लोकसंस्कृतीशी निगडित व्रतांना मोलाचे स्थान आहे. कृषी आणि व्रतांचा संबंध प्राचीन काळापासून आजतागाायत कायम असल्यामुळे कृषी संबंधित येणारी व्रते कायम राहील यात शंका नाही.

## मानवी मनातील अहंकाराचे दमन

अहंकार हा मानवाचा शत्रू आहे. अहंकारी माणूस त्याच्या अहंकारामुळे अधोगतीस जातो. याचे वर्णन व्रतकथांमध्ये आढळते. व्रतकथांमध्ये वाण आणि वसा याला महत्त्व असते. व्रताचरणाने वैभवप्राप्तीनंतर मानवाच्या मनाला अहंकाराचा स्पर्श होऊ नये म्हणून 'तुला रे वसा कशाला हवा? उतशील, मातशील, घेतला वसा टाकून देशील!' असे विचारताना दिसते. ज्यावेळी वसा घेताना 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही' असे वचन दिले जाते. तेव्हा व्रताचा वसा मागणाऱ्याला दिला जातो. यामधून मानवाने अहंकारी होऊ नये ही काळजी

घेतलेली दिसते. अहंकारामुळे काय अवस्था होते याचे वर्णन व्रतकथांमध्ये आढळते. आदित्यराणूबाईच्या व्रतकथेत वैभवाच्या अहंकाराने थोरल्या मुलीने व्रतकथा न ऐकल्यामुळे तिला दारिद्र्य आले, शुक्रवारच्या देवीच्या व्रतकथेत श्रीमंतीच्या अहंकारामुळे भाऊ बहिणीचा अपमान करतो. नवरात्रीच्या व्रतकथेत दैत्यासुराला वर प्राप्तीचा अहंकार होताच तो अत्याचार करतो. शेवटी त्याचा देवीच्या हाताने वध होतो. महालक्ष्मीच्या व्रतकथेत वैभवाने अहंकारी होऊन पाटमाधवराणी म्हाताऱ्या रूपात लक्ष्मीचा अपमान करते. परिणामी तिला देवीचा शाप मिळतो. राजा तिला राज्याबाहेर काढून देतो. गुरुवारच्या श्री महालक्ष्मीच्या व्रतकथेत सुरतचंद्रिका राणी वैभवाच्या अहंकाराने म्हाताऱ्या रूपातील लक्ष्मीला धक्के मारून काढून देते. त्यामुळे तिला दारिद्र्य प्राप्त होते. अशोक व्रतकथेत रावणाने अहंकारी होऊन सीतेचे हरण केले यामुळे रामाने रावणाचा वध केला. कृष्ण जन्माष्टमीच्या व्रतकथेत कंसाच्या अहंकाराचे वाईट फळ कृष्णाकडून कंसाला वध रूपाने मिळते. इत्यादी सर्व व्रतकथांमध्ये अहंकाराचे दुष्परिणाम मांडून मानवी मनाला अहंकारापासून दूर ठेवण्याचे कार्य आजही व्रतकथांद्वारे केले जाते.

## सामाजिकीकरण

समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे होय. जेवढे सामाजिक संबंध दृढ होत जाईल तेवढा समाज विकसित होत जातो. कोणतेही व्रत करताना त्या व्रताची पूर्ती व्रतकथा सांगण्या, ऐकण्यातून होते. यासाठी कोणीतरी एकीने व्रतकथा सांगायची व इतरांनी ऐकायची अशी प्रथा दिसते. चैत्रातील चैत्रगौर, जेष्ठातील वटसावित्री आषाढातील जयापार्वती आणि आषाढी एकादशी, श्रावणातील सोमवार, नागपंचमी, आदित्यराणूबाई, वर्णसठी, मंगळागौर, जिवंतिका, शीतलासप्तमी, भाद्रपदातील हरितालिका, जेष्ठागौर, गणपती, आश्विनातील नवरात्र, दसरा, गोजागिरी पौर्णिमा, दिवाळी, कार्तिकेतील तुळसी विवाह, पौषातील रविवार, मकरसंक्रांत, माघातील रथसप्तमी, महाशिवरात्र, फाल्गुनातील होळी याशिवाय वैभवलक्ष्मी, शुक्रवारची संतोषीमाता, अन्नपूर्णामाता इत्यादी व्रतकथांच्या पूर्तीकरिता व्रतकथा सांगण्या व ऐकण्यास स्त्रिया एकत्रित येतात. या एकत्र येण्यामधून आसपासच्या स्त्रियांचे संबंध दृढ होतात. मकरसंक्रांतीमध्ये वाण घेण्याकरिता अधिकांश स्त्रिया एकमेकींकडे जातात. यामुळे स्त्रियांमधील ओळख, संबंध वाढतात. एक दुसऱ्यांप्रती संबंध वाढण्यामधूनच सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग येतो अशा प्रकारे व्रतकथांच्या माध्यमातून सामाजिकीकरणाची प्रक्रिया घडते.

वैयक्तिक सुखात तल्लीन झालेला आजचा मानव समूहजीवनापेक्षा वैयक्तिक जीवनाला अधिक प्राधान्य देत आहे. त्यामुळे आजच्या मानवाला सामाजिक करण्यासाठी व्रतकथेतील सामूहिक कृती साहाय्यभूत ठरू शकते.

## मानवाला कुप्रवृत्तीपासून परावृत्त करून नैतिक आचरणाचा पाठ देणे

व्रतकथांमध्ये चांगल्या व वाईट प्रवृत्तीचे वर्णन असून चांगल्या कार्याचे फळ चांगले मिळते व वाईट कार्याचे फळ वाईट मिळते असे वर्णन असल्यामुळे मानवी मनात वाईट कार्याच्या वाईट फळाची धास्ती निर्माण होते. त्यामुळे असे वर्तन करण्यास मानव धजावत नाही. जसे, वैभवलक्ष्मीच्या व्रतकथेत वाईटमित्राच्या संगतीने जुगार आणि दारूच्या व्यसनाने दारिद्र्य आले आहे. सफला एकादशीच्या व्रतकथेत लुंपकच्या व्यभिचारी वृत्तीमुळे त्याला शाप मिळतो. पौष रविवारातील तिसऱ्या रविवारच्या व्रतकथेत म्हातारीच्या सुनेने खोटे बोलल्यामुळे तिच्या घरचे अन्न नाहिसे होते. अपरा एकादशीच्या व्रतकथेत ब्रजध्वजाला वाईट कृत्याचे फळ मिळते. पाशांकुशा एकादशीच्या व्रतकथेत क्रोधनला कामवासनेमुळे शाप मिळतो. अधिकमासाच्या व्रतकथेत थोरल्या जाऊला तिच्या वाईट वर्तनाचे फळ मिळते. या सर्वांवरून वाईट कार्याचे फळ वाईट मिळते असे दिसते. व्रतकथांआधारे या तत्त्वाचा मानवीमनावर परिणाम होतो व मानव कुप्रवृत्तीपासून परावृत्त होतो. त्याच्या हातून वाईट वर्तन घडत नाही.

व्रतकथांद्वारे सांस्कृतिक घटकांचे जतन, संवर्धन व संक्रमण करण्यात, नातेसंबधाचे दृढीकरण करण्यात व्रतकथांचे मोलाचे योगदान दिसते. कृषी आणि व्रतांचा संबंध लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथांमधून दिसतो. मानवीमनाला अहंकारापासून दूर ठेवण्याचे कार्य व्रतकथांद्वारे होते. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देणे, मानवाला कुप्रवृत्तीपासून परावृत्त करून नैतिक आचरणाचा पाठ देणे इत्यादी समाजदृष्टीने महत्त्वाचे कार्य लोकसंस्कृतीशी निगडित व काही लोकसंस्कृतेतर व्रतकथांद्वारे होते. व्रतकथांच्या वरील कार्यांवरून चांगल्या गोष्टी कुठल्या, समाजाचे हित कशात आहे, विकासासाठी आवश्यक काय आहे हे सर्व प्राचीन समाजाला कळत असल्याने त्यांनी व्रताचरण सुरू केले. ते दीर्घकाळ कायम राहावे यासाठी व्रतकथा आल्या. त्याचे पालन होऊ लागले. त्यामुळे समाज सक्षम, विकसित झाला. हे कार्य व्रतकथांनी केले. म्हणजेच त्यांचे समाजजीवनात अनन्यसाधारण महत्त्व काही अंशी आजही आहे. फरक एवढा की, आज इतर बाबी समाजजीवनात दाखल झाल्या.

## व्रतकथांची उपयुक्तता व निरर्थकता

समाजजीवनाशी संबंधित कोणत्याही घटकांना दोन बाजू असतात. एक समाजाला उपयोगी बाजू तर दुसरी समाजाला निरर्थक बाजू. अशा घटकांचा अभ्यास करताना अभ्यासकाला या दोन्ही बाजूंची चिकित्सा करावी लागते. व्रतकथा ह्या समाजजीवनाशी संबंधित आहेत. प्राचीन काळापासून आजतागायत मानवी मनात खास करून स्त्रीमनात आपले स्थान निर्माण करणाऱ्या आणि व्रताचरणाचा एक भाग असणाऱ्या व्रतकथांचा अभ्यास करताना समाजजीवनास त्यांची उपयुक्तता व निरर्थकता यांची चिकित्सा महत्त्वाची ठरते. या चिकित्सेवरून व्रतकथा समाज जीवनात टिकून राहणे गरजेचे आहे किंवा नाही हे ठरविण्यास साहाय्य होते.

## व्रतकथांची उपयुक्तता

समाज जीवनास उपयुक्त असणाऱ्या खालील बाबींचा समावेश व्रतकथांमध्ये दिसतो.

१) व्रतकथांद्वारे सांस्कृतिक अभिसरणाची क्रिया घडते. यामध्ये प्राचीन संस्कृतीमधील समाजावश्यक मूल्ये, प्रथा, प्रतीके, रीतिरिवाज, पद्धती इत्यादी संस्कृती घटकांचे जतन, संवर्धन व पुढील पिढीत संक्रमण होते.

२) व्रताचरणात एकीने व्रतकथा सांगायची व इतरांनी ऐकायची याला महत्त्व असल्यामुळे व्रतकथा सांगण्या व ऐकण्याकरिता स्त्रिया एकत्र जमतात. यामुळे स्त्रियांना एकमेकींच्या सहवासात भावनेची मोकळिकता साधण्याची संधी मिळते. विचारांचे आदानप्रदान होते.

३) व्रतकथांमध्ये कुटुंबाचे, त्यावरील संकटाचे, संकट निरसनाचे वर्णन असते. कुटुंबातील आई—वडील व मुलगा—मुलगी, बहीण—बहीण, भाऊ—भाऊ, भाऊ—बहीण, मामा—भाचे, पती—पत्नी, सासू—सासरे व सून, सवत—सवत इत्यादी कौटुंबिक नात्यांचा उल्लेख व्रतकथांमध्ये येतो. बरेचदा या नात्यातील एक व्यक्ती इतर व्यक्तीचा तिरस्कार करते, पण व्रतकथेच्या शेवटी त्याला आपली चूक कळून नातेसंबंध दृढ झाल्याचे वर्णन आढळते. हेवेदावे न करता कुटुंबातील घटकांनी एक राहावे व स्वतःची तसेच समाजाची उन्नती साधावी हा बोध व्रतकथा देतात.

४) शाश्वत मूल्यांचे मानवी जीवनातील महत्त्व आदिमांनी ओळखून ती मानवीमनात रुजविण्याचा प्रयत्न व्रतकथांद्वारे केला. त्यामुळे आदर्श व शाश्वत मूल्ये लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथांमध्ये अधिक प्रमाणात आढळतात. व्रतकथांनी समाजजीवन आदर्श बनविले. तसेच आदर्श अशा संस्कृतीची जोपासना आजतागायत केली.

५) एखाद्या पाठशाळेत मूल्यशिक्षणाचे धडे दिले जावेत तसे धडे व्रतकथांनी समाजाला दिले. शाळा नव्हत्या तेव्हा लोकशिक्षणाचेच कार्य व्रतकथांनी केले. लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथांनी आजतागायत लोकसंस्कृती जिवंत ठेवली असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये.

६) व्रतकथा केवळ शिकवण देऊन थांबत नाहीत, तर जबाबदारी व कर्तव्याची जाणीव करून देऊन चांगले वर्तन करवून घेण्याची कामगिरी करण्यास कारणीभूत ठरतात.

७) प्रबोधन काळामध्ये मराठी संतांनी व समाजसुधारकांनी सदाचार व सद्वर्तनाचे धडे दिले. ही बाब फार अलिकडची. आदिमकाळात मात्र हे कार्य व्रताचारांनी म्हणजेच पर्यायाने व्रतकथेने केले. मानवीसमाजाचे नैतिक पोषण करणे व समाजस्वास्थ सांभाळणे ही व्रतकथांची महत्त्वाची फलश्रुती आहे.

८) व्रतकथांमधून पाप—पुण्याचा व त्यांच्या परिणामांचा पगडा मानवीमनावर निर्माण होतो. त्यामुळे अपकृत्य करण्यास मानवीमन सहसा तयार होत नाही.

९) तत्कालीन समाजजीवन समजून घेण्यास व्रतकथा आधारभूत ठरतात. व्रतकथांद्वारे तत्कालीन समाजाचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास अभ्यासता येतो.

१०) व्रतकथांमध्ये प्राण्यांना चारा, पाणी, त्यांची योग्यप्रकारे देखभाल, प्रसंगी प्राण्यासाठी स्वतः देह देण्याची तयारी इत्यादींचे वर्णन आहे. यातून भूतदयेचा संस्कार नवीन पिढीस होतो.

११) अहंकाराचे दुष्परिणाम सांगून तसे आचरण न करण्याचा सल्ला व्रतकथांमध्ये आहे. सदाचरण व सद्मार्गाने सुख प्राप्त होते व असे सुख चिरंतन टिकते. याचा बोध लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथांमधून होतो.

१२) काम, क्रोध, मोह, द्वेश यांच्या आहारी गेल्यास कशी वाईट अवस्था होते, याचे वर्णन व्रतकथांमध्ये आढळते. अशा वर्णनांद्वारे षड्रिपूंपासून मानवीमनाला दूर करण्याचे कार्य व्रतकथांद्वारे होते.

१३) व्रते आणि व्रतकथा सामूहिक कृतीतून घडणारी क्रिया असल्यामुळे एकमेकांशी सहकार्याची भावना वाढते. मानवीसंबंधाचा विकास करून सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्याचे कार्य व्रतकथांच्या वाण आणि वसा याद्वारे होते.

१४) व्रतकथांमध्ये वड, पिंपळ, आवळा, तुळस, बेल इत्यादी वृक्ष आणि दुर्वा तसेच सोळा प्रकारच्या वनस्पतीच्या महत्त्वामुळे स्त्रियांचा पर्यावरणाशी संबंध जोडला आहे. हे वृक्ष तथा वनस्पती पूजेव्यतिरिक्त तोडण्यास स्त्रिया मनाई करतात. यामुळे पर्यावरण संतुलनास व्रतकथा हातभार लावतात.

१५) प्राणी, वृक्ष व इतर नैसर्गिक घटाकांचे मानवीजीवनातील महत्त्व आदिमांनी ओळखले होते. आदिमांनी नैसर्गिक घटकांच्या कृतज्ञतेतून त्यांची आरधना व्रताचरणाद्वारे सुरू केली. आजही व्रतकथांमध्ये येणारी वृक्षपूजा (वड, पिंपळ, आवळा, तुळस इत्यादी), प्राणीपूजा (गाय, बैल, वासरू, नाग), लिंगपूजा (शिवलिंग), निसर्गशक्तींची पूजा (सूर्य, जल, अग्नी, पृथ्वी) इत्यादी पूजाविधी व्रतकथांचे आदिम लोकसंस्कृतीशी संबंध व्यक्त करतात.

१६) व्रतकथांमध्ये उपवास व आहाराचे घातलेले निर्बंध मानवी आरोग्यास लाभदायक ठरतात.

## व्रतकथांची निरर्थकता

समाजजीवनास निरर्थक असणाऱ्या खालील बाबींचा समावेश व्रतकथांमध्ये आढळतो.

१) आदिमांचा व्रते व व्रतकथांच्या निर्मितीमागे असलेला नैसर्गिक घटकांप्रती कृतज्ञतेचा व्यापक दृष्टिकोन वैदिकांनी बदलला. वैदिकांनी व्रतकथांना धार्मिक अधिष्ठाण दिले. व्रतकथांच्या माध्यमातून स्त्रियांना धर्मकार्यात अडकवून ठेवले. यासंबंधी डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात, ''कहाणीचे माहात्म्य विषद करणे आणि स्त्रियांना धर्मकार्यात गुंतवून ठेवणे अशा क्लुप्त्यांचा वापर येथे केलेला आहे.''[२] यामुळे लोकसंस्कृतीमध्ये पुरुषांपेक्षा श्रेष्ठ असणारी, पुरुषांच्या बरोबरीने काम करणारी स्त्री ब्राह्मणकाळात गृहकार्य व धर्मकार्यात गुंतून पडली. घराबाहेरील तिचे कार्य सिमित होत जाऊन कुटुंबातील घटकांची देखभाल करणे, त्यांच्यावर संकटे येऊ नये यासाठी धार्मिक व्रताचरण करणे असे मर्यादित झाले.

२) एकदा वसा स्वीकारलेली व्यक्ती त्याच्यापासून दूर जाता कामा नये याची काळजी व्रतकथांमध्ये घेतलेली दिसते. उतशील मातशील, घेतला वसा टाकशील तसेच व्रतभंग केल्यास जबर शासन अशी भीती व्रतकथांमध्ये आहे. उदा. थोरल्या बहिणीने व्रतकथा न ऐकल्यामुळे तिच्यावर आलेले संकट (आदित्यराणूबाईची व्रतकथा), शेतकऱ्याने जमीन नांगरल्यामुळे आणि नागकुळे नष्ट झाल्यामुळे नागिणीने शेतकऱ्याला केलेला दंश (नागपंचमीची व्रतकथा), रजस्वला दोषामुळे पतीचा बैलरूपात व पत्नीचा कुत्रीरूपात जन्म (ऋषिपंचमीची व्रतकथा), व्रतात वारंवार खंड ठेवणाऱ्या भावाला दारिद्र्य (ललितापंचमीची व्रतकथा), व्रतासाठी चुरमा न पाठविता पाचशे रूपये पाठविणाऱ्या राणीला राज्याबाहेर जावे लागण्याचा प्रसंग (सोळा सोमवारची व्रतकथा), व्रताचे पालन योग्य न केल्यामुळे पाटमाधवराणीला राज्याबाहेर जाण्याचा प्रसंग (महालक्ष्मीची व्रतकथा) इत्यादी सर्व व्रतकथेतील प्रसंगांवरून व्रतभंग करणाऱ्यास जबर शिक्षा होते असा इशारा व्रतकथांमध्ये दिसतो. येथे व्रताचरणातून ज्यांना फायदा होतो त्यांनी जाणीवपूर्वक ही भीती व्रतकथांमधून निर्माण केली असावी.

३) व्रताचरणाने सुख, ऐश्वर्य, वैभव प्राप्त होते असे वर्णन व्रतकथांमध्ये मांडून मानवाचा श्रमापेक्षा दैवी शक्तींवर विश्वास निर्माण होतो. यामुळे मानवाची श्रमशक्ती घटते व तो दैववादी होतो.

४) लोकसंस्कृतेतर व्रतकथांमधील अनेक प्रसंग व वर्णने समाजजीवनास पोषक मूल्यास घातक ठरणारे आहेत. उदा. स्त्रीचे अपहरण (अशोक व्रतकथा), पाराशर सारख्या ऋषीची व्याभिचारी वृत्ती (गुरुपौर्णिमा व्रतकथा), प्राण्यांवर अत्याचार (गोपद्याची व्रतकथा), बळीप्रथा (शिळासप्तमीची व्रतकथा), भाऊबहिणीच्या प्रेमाच्या नात्याला काळिमा फासणारे कंसाचे वर्तन (श्रीकृष्ण जन्माष्टमीची व्रतकथा), व्याभिचाराचे व वासनेचे वर्णन (शुभ्र बुधवारची व्रतकथा) इत्यादी. वरील प्रसंग व वर्णने लोकसंस्कृतीपासून आजतागायत आदर्श असणाऱ्या भूतदया, प्रेम, कर्तव्यपालन, सहानुभूती, सदाचरण इत्यादी मूल्यांवर प्रहार करते. वाईट वर्तनाला दुजोरा देते.

५) वैदिकांनी लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथांमध्ये स्वत:स अनुकूल बदल केले. हे बदल करताना तसेच वैदिक देवतांचे श्रेष्ठत्व व्रतकथांमधून साकारताना नकळतपणे वैदिकांच्या क्रूर मानसिकतेचा प्रभाव व्रतकथांमधील पात्रांच्या कृतीतून व्यक्त होतो. जसे, वैदिक देवता विष्णूद्वारे कपटाने वृंदाचे पावित्र्यहरण

(तुळशीची व्रतकथा), बळीराजाला पाताळात घालण्याचे कपट (बलिप्रतिपदेची व्रतकथा, परिवर्तनी एकादशी व्रतकथा), चंद्राची व्याभिचारीवृत्ती चंद्रासमोर ब्रह्मा आणि देवांचा गुरू बृहस्पती यांची हतबलता (शुभ्र बुधवारची व्रतकथा), इंद्राची युद्धातील कमकुवतता (रक्षाबंधन व्रतकथा, नवरात्र व्रतकथा, पौष रविवारातील पाचव्या रविवारची व्रतकथा), ब्रह्माचा अहंकार (भैरव व्रतकथा) इत्यादी. यामुळे व्रतकथांमधून वैदिकदेवता विष्णू, ब्रह्मा, देवांचा गुरू बृहस्पती, इंद्र यासोबतच नैसर्गिक घटक चंद्र यांच्या चारित्र्यासंदर्भात नवीन पिढीत संभ्रम निर्माण होऊ शकतो.

६) व्रतकथांमध्ये बऱ्याच ठिकाणी ब्राह्मणाचे श्रेष्ठत्व, ब्राह्मण कुटुंबाचा उल्लेख, ब्राह्मणाला दान देण्याचा उल्लेख आढळतो. यामुळे पूर्वापार चालत आलेल्या व्रतकथांमध्ये पुरोहितांनी त्यांना अनुकूल बदल करून व्रतकथांना त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन बनविले.

७) व्रतकथांमध्ये पाप—पुण्याचा उल्लेख असल्यामुळे नकळत चुकीचे वर्तन घडलेल्या व्यक्तीच्या मनात धास्ती निर्माण होऊन तो पापाच्या दडपणात आयुष्यभर जगतो.

८) पतिनिष्ठेच्या वर्णनाप्रमाणे पत्निनिष्ठेचे वर्णन व्रतकथांमध्ये नाही. उलट बहुपत्नित्वाचे वर्णन बऱ्याच व्रतकथांमध्ये आढळते. पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व व्रतकथांमधून व्यक्त होते. पुरुषप्रधान संस्कृती जोपासणाऱ्या वैदिकांनी वैदिकधर्माचा प्रसार व प्रचारासाठी व्रतकथांमध्ये केलेला फेरबदल यासाठी कारणीभूत असावा.

९) काही व्रतकथांमध्ये पूर्वजन्मीच्या पापकर्माचे वाईट फळ पुढील जन्मी भोगण्याचे वर्णन आलेले आहे. यामुळे पुनर्जन्माची खोटी भीती व्रतकथांमधून व्यक्त होते.

१०) एकदा मृत पावलेला व्यक्ती जिवंत होत नसतो. पण व्रतकथांमध्ये मृतव्यक्ती जिवंत झाल्याची वर्णने आढळतात. जसे, वटसावित्री, नागपंचमी, वर्णसठी, जिवंतिका, शीतलासप्तमी, ललितापंचमी, पिठोरी, भौम, शिळासप्तमी, सोमवती इत्यादी व्रतकथांमध्ये मृत व्यक्ती जिवंत झाल्याची वर्णने आहेत.

११) व्रतकथांमध्ये चमत्काराची अवास्तवता आढळते. व्रतकथांमधून स्वर्ग—नरक या कल्पनेचा पगडा मानवी मनावर निर्माण होतो.

१२) सामाजिक ऐक्य भंग करणाऱ्या जाती प्रथेचा उल्लेख व्रतकथांमध्ये आहे.

१३) भारतीय स्त्री त्यागी वृत्तीची आहे. ती सर्व जीवन कुटुंबासाठी खर्च करते. पण ती तशीच राहावी या गोतावळ्यातून तिने बाहेर येऊच नये अशी व्यवस्था व्रतकथांमधील संकट व संकट निरसनातून साधलेली दिसून येते.

## निष्कर्ष

वरील विवेचनावरून असे म्हणता येते की, व्रतकथा काही प्रमाणात मानवीजीवनास निरर्थक असल्या, तरी व्रतकथांमधून मानवीजीवनास आवश्यक मूल्ये, नैतिकता, संस्कार इत्यादींचे जतन, संवर्धन व नवीन पिढीत संक्रमण होते. व्रतकथा सामाजिक व सांस्कृतिक विकासात मोलाचे योगदान देत असल्यामुळे व्रतकथांमधील निरर्थकता वगळून त्या टिकून राहणे आवश्यक आहे.

## संदर्भ

१) संपादक प्रा. जोशी बी. आर., 'डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड ३', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पहिली आवृत्ती, २००७, पृ.२०८.

२) डॉ. शिंदे विश्वनाथ, 'लोकसाहित्य मीमांसा भाग दुसरा', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, पहिली आवृत्ती, १५ ऑगष्ट २००६, पृ.१३५.

❖❖❖

# शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबऱ्या

प्रा. डॉ. विजयकुमार खंदारे
मराठी विभागप्रमुख
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव–दाभाडे,
ता. मावळ, जि. पुणे – ४१०५०७
मोबा. ९४२२५६९२४९ मेल : hodmarathi@gmail.com

सन १९६० नंतर मराठी कादंबऱ्यांतून नव्या जाणिवा व्यक्त होऊ लागल्या. कादंबरीच्या आशयात विविधता आली. अभिव्यक्तीचे नवेनवे प्रयोग होऊ लागले. याकाळातील कादंबऱ्या मानवी जीवनाचा खोलवर जाउन शोध घेउ लागल्या. माणसाचे आत्मभान, एकाकीपणा, तुटलेपणाची जाणीव, जीवनाची अनाकलनीयता व्यक्त करण्यासाठी कादंबऱ्या अवतरू लागल्या. कादंबऱ्यांना चरित्रात्मक, प्रादेशिक, ग्रामीण, दलित, स्त्रीवादी अशी नामाभिधाने मिळाली. सन १९७० नंतर अरूण साधू यांची 'मुंबई दिनांक' सारखी राजकीय कादंबरी प्रसिद्ध होताना दिसते. आजची कादंबरी गुंतागुंतीचा आशय व्यक्त करू लागली आहे. ती बहुरूपीनी आहे. जीवनाचा कोणताही भाग तिला वर्ज्य नाही, हे आजच्या कादंबऱ्यांवरून लक्षात येते. या धर्तीवर डॉ. शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबऱ्यांचा विचार पुढीलप्रमाणे मांडता येईल.

सन १९६० नंतर मराठी वाङ्‌मयात अनेकविध प्रवाहांची निर्मिती झाली. त्यात प्रामुख्याने ग्रामीण व दलित साहित्यप्रवाहाची जोरकसपणाने चर्चा झाली. या चर्चेतील एक विचार म्हणजे 'दलित लेखकांना कादंबरी लिहिता येत नाही किंवा दलित साहित्यामध्ये कादंबरीलेखन कमी प्रमाणात झाले' अशी टीका केली गेली. पहिल्या पिढीतील दलित लेखकाने काही कादंबऱ्या लिहिल्या. एक–दोन कादंबऱ्यांची चर्चा देखील झाली. अण्णा भाउ साठे यांची 'फकिरा', बाबुराव बागुल यांची 'सूड' ही उदाहरणे म्हणून सांगता येतील. दलित लेखकांनी चांगल्या कादंबऱ्या दिल्या नाहीत, असाही एक सूर उमटताना दिसतो. पण नंतरच्या काळात अशोक व्हटकर 'मेलेलं पाणी', नामदेव कांबळे 'राघववेळ', ना. म. शिंदे 'जातीला जात वैरी' अशा काही कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल. असे असले तरी कादंबरीचा एक स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार म्हणून दलित साहित्यात म्हणावा तितका रूजला नाही.

या चर्चेनंतर शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबऱ्यांच्या वेगळेपणाची चर्चा करता येईल. आतापर्यंत त्यांनी आठ कादंबऱ्या लिहिल्या आहेत. वेगळेपणा त्यांच्या कादंबऱ्यांमधून दिसून येतो. वेगळया शैलीने त्यांनी कादंबरीलेखन केले आहे. असे असले तरी दलित व दलितेत्तर समीक्षकांनी त्यांच्या कादंबऱ्यांची म्हणावी तितकी दखल घेतली नाही. 'अक्करमाशी' या आत्मकथनापुरतीच त्यांची चर्चा झाली. पण जेव्हा त्यांच्या 'सनातन' या कादंबरीला राष्ट्रीय स्तरावरचा 'सरस्वती सन्मान' हा पुरस्कार मिळाला त्यानंतर मात्र त्यांची चर्चा होउ लागली.

दलित साहित्याची चर्चा होताना त्यातल्या अनुभवाची, सामाजिक प्रश्नांची चर्चा होते. पण कलागुणांची, भाषांची कधीच चर्चा होताना दिसत नाही. त्यामुळे दलित साहित्याची योग्य समीक्षा झाली असे म्हणता येत नाही, ही उणीव आहे. शरणकुमार लिंबाळे यांची 'उपल्या' ही चार प्रकरणात विभागलेली कादंबरी आहे. चारही प्रकरणात चार वाङ्‌मयप्रकारांचा उपयोग केला आहे. या प्रयोगाकडे कोणाचेही लक्ष गेले नाही. 'हिंदू' कादंबरीमध्ये आत्मकथा आणि कादंबरी या दोन प्रकारांचा वापर करून लेखन केले. 'हिंदू'मध्ये लिंबाळे यांनी केलेल्या प्रयोगाची आणि राजकीय प्रतिनिधित्वाची चर्चा झालीच नाही. लिंबाळेंच्या हिंदूवर कोणी बोलले नाही. नेमाडेंच्या 'हिंदू'पेक्षा अनेक मूलभूत प्रश्न लिंबाळेंची 'हिंदू' कादंबरी निर्माण करते. इकडे कोणीच लक्ष देत नाही. समीक्षकांनी जात ओलांडून कोणाची समीक्षा केलेली दिसत नाही.

चित्रपटामध्ये रिमेकिंग होते. जसे हिंदीमधल्या जुन्या 'देवदास' या चित्रपटावर परत नवीन 'देवदास' हा चित्रपट तयार केला. लिंबाळे यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले होते की, ''मी कादंबऱ्यांमध्ये कधी कधी रिमेकिंग तंत्राचा वापर करतो. जसे की, अरूण साधू यांनी 'बहिष्कृत' ही कादंबरी लिहिली तोच धागा पकडून मी 'झुंड' ही कादंबरी लिहिली आहे.'' उच्च जातीचा लेखक दलित जीवनावर कशी कादंबरी लिहितो आणि दलित लेखक दलित जीवनावर कशी कादंबरी लिहितो याची चर्चा व्हायला पाहिजे. पण समीक्षकाचे याविषयाकडेही लक्ष गेलेले दिसत नाही.

मराठी कादंबऱ्यांमध्ये लोकप्रिय कादंबऱ्या मोठया प्रमाणात लिहिल्या गेल्या. अशा लोकप्रिय कादंबऱ्यांचा वाचकवर्गही मोठा आहे. बाबा कदम, सुहास शिरवाळकर यांनी मनोरंजनपर कादंबऱ्या लिहिल्या. लिंबाळे यांनीही

लोकप्रिय साहित्याचा आधार घेउन 'ओ' ही कादंबरी लिहिली आहे. दलित कादंबरीही लोकप्रिय साहित्याप्रमाणे लिहिता येउ शकते का? लोकप्रिय साहित्यातील लोकसाहित्याचा वापर करता येउ शकतो का? याचाही लिंबाळे यांनी विचार केला आहे. लिंबाळे केवळ कादंबऱ्या लिहीत नाही तर वेगळे लिहित्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे. नवीन वाटा त्यांनी शोधल्या. कादंबरीचा पारंपरिक वाङ्‌मय प्रकाराची मोडतोड करून नवीन लेखक करण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हा या गोष्टीची चर्चा अॅकॅडेमिकमध्ये होणार नाही, तर कोठे होणार?

शरणकुमार लिंबाळे यांनी 'शृखंलात्मक कादंबऱ्यांचे' लेखक करून दाखविले आहे. जसे 'उपल्या', 'हिंदू', 'बहुजन' या त्यांच्या शृंखलात्मक कादंबऱ्या होय. असा प्रयोग यापूर्वी कोणा दलित लेखकाने केलेला दिसून येत नाही. तो लिंबाळे यांनी करून दाखविला. दलित साहित्याचे समर्थन करणे, दलित साहित्य समृद्ध करणे. दलित साहित्यामध्ये जे नाही म्हणतात त्याविषयीच लेखन करणे, दलित साहित्यामध्ये उणिवा भरून काढण्याचे काम जर प्रामाणिकपणाने कोणी केलेले असेल तर ते म्हणजे शरणकुमार लिंबाळे होत.

देशाला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्ष पूर्ण झाली. या वर्षात लोकशाहीचा कसा विकास झाला आहे, याचा मराठी कादंबरीकार अभावानेच विचार करताना दिसतात. लिंबाळे यांच्या कादंबऱ्या या सामाजिक असण्याबरोबरच त्या राजकीय कादंबऱ्या आहे. त्याची चर्चा होणे गरजेचे होते. आपण लोकशाही देशात राहतो, तेव्हा राजकीय अधिकाराची चर्चा करणे गरजेचे ठरते. विशेषतः दलितांच्या हक्क अधिकाराची, मानवाधिकाराची चर्चा निकोप समाजस्वास्थ्यासाठी होणे गरजेचे आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पंच्याहत्तर वर्षात केवळ राजकीय घराणे निर्माण झाले. सत्ता ही खालच्या वर्गापर्यंत आलीच नाही. याचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न 'रामराज्य' या कादंबरीत लिंबाळे यांनी केला आहे. देश, स्वातंत्र्याची पंच्याहत्तर वर्ष साजरा करत असताना त्याचे निमित्त साधून ही कादंबरी लिहिली आहे. यामध्ये त्यांनी रोखठोक भाष्य केलेले आहे.

भीमा कोरेगावच्या ऐतिहासिक लढयाला दोनशे वर्ष पूर्ण झाल्याचे निमित्त साधून लिंबाळे यांनी 'सनातन' ही कादंबरी लिहिली आहे. लिंबाळे हे कार्यकर्ते लेखक आहेत. समाजातल्या महत्त्वाच्या घडामोडीवर ते आपल्या लेखनातून प्रतिक्रिया देतात, भाष्य करतात. समकालीन व्यवस्थेवर लेखन करणारा हा एकमेव लेखक आहे. समकालीन जीवनाचा वेध ज्या जाणिवांनी घेतलेला आहे, तो मराठीतल्या इतर लेखकांनी घेतल्याचे जाणवत नाही.

दलित साहित्यामध्ये ऐतिहासिक कादंबरीचा अभाव होता. भि. सी. शिंदे यांनी 'अमृतनाक' सारखी कादंबरी लिहिली, पण ही ऐतिहासिक कादंबरी वाटत नाही. लिंबाळेंसारखा दलित लेखक ऐतिहासिक कादंबरी लिहू शकतो, हे 'सनातन'ने दाखवून दिले. इतिहास व ललित लेखनाचा वापर करून नाकारलेल्या समाजाची पुनर्रमांडणी करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. इतकेच नव्हे, दलित लेखक आपल्या जातीच्या पलीकडे जाऊन वेदना, दु:ख मांडताना दिसत नाही. पण लिंबाळे यांनी यामध्ये आदिवासींचेही चित्रण केलेले आहे. त्यांच्या प्रश्नांची मांडणी यात केलेली आहे. हे त्यांचे अभ्यासपूर्ण लेखन आहे. 'सनातन'मधील लेखन हे अभ्यासपूर्ण आहे. दोनशे पानात शे—दोनशे वर्षांचा इतिहास मांडण्याची ताकद लिंबाळे यांच्या लेखनात आहे. म्हणूनच त्यांच्या प्रतिभेची दखल राष्ट्रीय पातळीवर घेणे भाग पडले. मराठी वाचक, लेखक, शिक्षक, संशोधक म्हणून हा लिंबाळे यांचा वाङ्‌मय पसारा आणि त्यामागील तपशील समजून घेणे महत्त्वाचे आहे. लिंबाळे हे किती प्रतिभावंत महान लेखक आहे, हे समजून घेता येऊ शकते.

## संदर्भ:


१. शरणकुमार लिंबाळे, 'उपल्या', प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट १९९९, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे.
२. शरणकुमार लिंबाळे, 'हिंदू', प्रथमावृत्ती १५ नोव्हेंबर २००३, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे.
३. शरणकुमार लिंबाळे, 'झुंड', प्रथमावृत्ती २६ जानेवारी २००९, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे.
४. शरणकुमार लिंबाळे, 'ओ...', प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २०१५, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे.
५. शरणकुमार लिंबाळे, 'बहुजन', प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २००७, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे.
६. शरणकुमार लिंबाळे, 'रामराज्य', प्रथमावृत्ती १५ सप्टेंबर २०१९, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे.
७. शरणकुमार लिंबाळे, 'सनातन', तृतीयावृत्ती २२ नोव्हेंबर २०१९, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे.


❖❖❖

# विठ्ठल वाघांची अस्सल वऱ्हाडी ग्रामीण कविता

**डॉ. गजानन भाऊराव घोंगटे**
श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय,
वनोजा, ता. मंगरूळपीर जि. वाशिम
मो.: 9822406115, ई-मेल: ghongategajananb@gmail.com

**गोषवारा:**

विठ्ठल वाघांची कविता ही शेतशिवारात रमणारी कविता आहे. या कवितेचे ऋणानुबंध शेतीमातीशी जुळलेले असल्यामुळे ती खऱ्या अर्थाने ग्रामीण कविता ठरते. त्यांच्या कवितेतून घडणारे निसर्गाचे दर्शन मानवी मनाला भूरळ पाडणारे आहे. या कवितेची शब्दकळा अस्सल वऱ्हाडी असल्याने तिच्यात आपसुकच गावरान गोडवा निर्माण झाला आहे. ग्रामीण सण-उत्सव, रीतीभाती लोकपरंपरा, सुभाषिते आदींच्या यथोचित वापरामुळे ही कविता ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविण्यात यशस्वी झाली आहे. यष्टीकडून समष्टीकडे होणारा या कवितेचा प्रवास वैशिष्ट्यपूर्ण आहे. वऱ्हाडी कवितेला विठ्ठल वाघांनी वैभव प्राप्त करून दिले आहे.

**बीजशब्द:**

कृषिनिष्ठ जाणिवा, भावकविता, सर्जनशील कविता, मोहित करणारा निसर्ग, राजकीय दंभावर प्रहार, वऱ्हाडी बोलीचा समयोचित वापर.

**प्रस्तावना:**

बहिणाबाई चौधरी, आनंद यादव यांच्यानंतर अस्सल ग्रामीण कवी म्हणून विठ्ठल वाघ यांच्या नावाचा उल्लेख करावा लागतो. ग्रामीण कवितेमध्ये जो जिवंतपणा बहिणाबाई चौधरी व आनंद यादव यांनी पेरला तो विदर्भात वऱ्हाडी बोलीच्या अनुषंगाने अवतरला. वऱ्हाडी माती आणि वऱ्हाडी बोली दोन्हींमध्ये असणारे माधुर्य लोकगीताचा ताल, लय व भाव घेऊन बहरायला लागले. ग्रामीण कवितेच्या वाटचालीत विदर्भात देविदास सोटे, विठ्ठल वाघ, शंकर बडे ही महत्वाची नावे आहेत. वऱ्हाडी कवींनी खास वऱ्हाडी ढंगाने काव्यरचना करुन काव्य गायनाच्या माध्यमाने कविता रसिकमनापर्यंत पोहचविली याचे, शिलेदार विठ्ठल वाघ आहेत. त्यांच्या तिफन या कवितेने मराठी मनाला भुरळ घातली. ग्रामीण जनजीवन सुखदु:खासह, व्यथा विवंचनेसह लोकगीताच्या ठसक्यात लोकांसमोर मांडले.

**विषयविवेचन:**

ग्रामीण जीवनानुभव अभिव्यक्त करताना विठ्ठल वाघांच्या प्रतिभेला भरती येते. "विठ्ठल वाघ यांची कविता ग्रामीण जीवन अभिव्यक्त करण्यात यशस्वी झाली आहे. 'साय' आणि 'काया मातीत मातीत' या संग्रहातील कविता विनोद अथवा चमत्कृतीपासून अलिप्त असून हळूवारपणे ग्रामीण जीवनाचा प्रत्यय घडवते. प्रेम आणि ग्रामीण निसर्गात त्यांची कविता रमलेली असली तरी त्यातील नाट्य मनोवेधक आहे. त्यांच्या कवितेला निसर्ग, रानातील पिकाला, मातीला, माणसाला, प्राण्याला एकाच पातळीवर आणतो. त्यांची लोकप्रिय झालेली कविता 'तिफन' याचे उदाहरण होय.

काया मातीत मातीत तिफन चालते तिफन चालते
ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते

तिफन चालते
नंदी बैलाच्या जोळीले सदाशीव हकालते
वटी बांधून पोटाले पाराबती अुनारते
वटी पोटाले बांधते झोयी काटीले टांगते
झोयी काटीले टांगते त्यात तानुलं लळते
त्यात तानुलं लळते ढग बरसते
तिफन चालते'

मातीचा, निसर्गाचा, पावसाचा, ढगांचा, जनावरांचा आणि शेतकरी कुटुंबाचा हा एकजीव गोतावळा, त्यांचे परस्पर संबंध याचे सुरेख नाट्य प्रा. विठ्ठल वाघ यांनी या कवितेतून उभे केले आहे. लोकगीत आणि गेयात्मकता यांच्या समन्वयाने त्यांची कविता ग्रामीण मनाशी एकरूप झाली आहे."[1] सुज्ञ वाचकाला हे मत पटण्यासारखेच आहे.

विठ्ठल वाघांनी आपल्या कवितेतून निसर्ग आणि माणसाला समपातळीवर आणून ठेवले. निसर्गाच्या विविध छटा आणि मानवी जीवनातील विविध प्रवृत्ती यांचा समन्वय त्यांनी प्रस्थापित केला. माणूस निसर्गाचेच एक रूप आहे व निसर्गात माणसाचे प्रतिबिंब आहे. असा सुरेख संगम त्यांनी आपल्या काव्यातून निर्माण केला. त्यांच्या तिफन या कवितेतून त्यांनी ग्रामीण संस्कृतीचे यथोचित चित्रिकरणच केले आहे. विठ्ठल वाघांच्या कवितेतून ग्रामीण जीवन व निसर्ग यांचे समृद्ध चित्र उभे राहते. बहिणाबाई चौधरीनंतर ग्रामीण जीवनाशी घट्ट अनुबंध असणारी कविता म्हणून विठ्ठल वाघांची कविता उभी राहते.

ही कविता राजा हाल आणि बहिणाबाई चौधरीच्या कवितेशी नाते सांगते. "राजा हाल आणि लोकमाता बहिणाबाई चौधरी यांच्यानंतर विठ्ठल वाघांचे ग्रामीण कवितेतील योगदान मौलिक स्वरुपाचे आहे. अठराव्या शतकात युरोपमध्ये 'रॉबर्ट बर्न्स' या कास्तकार कवीने स्कॉटीश भाषेला जसे संजीवन दिले तसे हाल आणि बहिणाबाईनंतर लोकभाषेला विठ्ठल वाघांच्या कवितेने नवजीवन दिले. लोकभाषा ह्या लोकगीत नि लोकगायकांच्या माध्यमातून जिवंत राहिल्यात. लोकगीतांची निर्मिती थांबली... लोकगायकांची वहिवाट ओस पडली. तेव्हा वाघांनी लोकगीतांशी जवळीक साधणारी नि लोकगायकांशी साधा साधणारी काव्यनिर्मिती करून मराठी ग्रामीण कवितेत नवचैतन्य निर्माण केले."[2] अल्पावधीतच त्यांची कविता रसिकमान्य झाली.

ग्रामीण जनजीवन, निसर्ग यात असणारा गावरान गोडवा अनुभवसंपन्न असायला हवा तरच ग्रामीण कविता संस्कृतीशी अनुरुप राहील. नागरी संस्कृतीत राहून केवळ फॅशन म्हणून ग्रामीण भाषेत कविता लिहिल्याने त्याकवितेला ग्रामीण बोलीभाषेचा, जीवनाशयाचा स्पर्श असणार नाही. राजा हाल व बहिणाबाई यांनी ग्रामीण माती व माणूस दोन्हीशी अतूट नाते ठेवून काव्यलेखन केल्याने जी ग्रामीण कविता त्यांना उभी करता आली त्या मंदिराला वाघांनीच कळस चढविला असेच म्हणावे लागेल. ग्रामीण भावविश्व त्यांनी कोरीव कलाकृतीप्रमाणे प्रतिमा वापरून काव्यसौंदर्य कोरले आहे. तिला लोकगीताचा परिसस्पर्श असल्याने वाघांची कविता आपली वेगळी लय व बाज घेऊन लोकरांगेत प्रवाहित झाली. मधुकर वाकोडे तर विठ्ठल वाघांच्या कवितेचे नाते बर्न्सशी जोडतात. "एडवर्ड अल्बर्ट हे बर्न्सविषयी म्हणतात, He has a matchless gift catching traditional airs and wedding them to words of simple and searching beauty... And these tunes were born in the blood of the scottish peasent. हेच वर्णन विठ्ठल वाघांना तंतोतंत लागू पडते. वऱ्हाडी शब्दसंपदेतून ग्रामीण जीवन व निसर्ग त्यांनी बेमिसाल उभा केल्याने त्यांच्या कवितेचे आगळेवेगळेपण डोळ्यात भरते. त्यांच्या कवितांना स्वरसाज चढवावा लागत

नाही तर त्या कविताच जन्माला येताना त्यांच्या रक्तातील अंगभूत धून घेवूनच येतात. विठ्ठल वाघांनी त्यांच्या अवतीभवतीच्या समुहाची बोली समर्थपणे पचवून अतिशय ताकदीने तिचे अस्तित्व टिकविण्यास मदतच केल्याने बर्न्सचे स्मरण होते, कारण Burns captured the dialect of his fellows and gave it permanence. भाषा व्यवहाराबाबत दोघांत कमालीचे साम्य आढळते."[3] बर्न्सशी केलेली विठ्ठल वाघांची तुलना संयुक्तिक वाटते.

लोकदु:खाशी, लोकसंवेदनांशी, समरस होणारा नव्हे तर त्या दु:खाला जगणारा, जाणणारा त्यात पोळणारा माणूस त्या दु:खाची पोत जाणू शकतो. वाघांनी ग्रामीण आनंदाचे कारंजे, दु:खाचे चटके व वऱ्हाडी बोलीचा खट्याळपणा आत्मसात केला आहे. त्यामुळेच ते लोकसंवेदनांशी एकरूप होऊ शकले व त्यांच्या आविष्काराने कवितेच्या प्रातांत उंची गाठली. वाघांनी लोकानंद, लोकदु:ख, लोकनाद गुणगुणला आहे, त्यामुळेच एक लयबद्ध धून त्यांच्या कवितेत अवतरताना दिसते.

कृषक व स्त्री ही मुळातच सर्जनशील, सौंदर्यनिर्मिती हा तर स्त्रियांचा मूळ स्वभाव. वाघांच्या कवितेत या दोन्हींचा प्रत्यय येतो. प्रामुख्याने कृषिचा. "कृषि आणि कृषकांप्रमाणे वाघांची कविता ही सर्जनशील कविता आहे. तिफन/वावर/पऱ्हाटी/पानी/ढगामुचूक अभाय इ. कवितांमधून कृषिविषयक जीवनानुभवाचे अतिशय प्रत्ययकारी दर्शन त्यांनी घडविले. कृषिविषयक भावानुभवाने त्यांच्या कृषि रचनातील आशय निश्चितच नव्हे तर विस्तारितही झाल्याने त्यांच्या कवितेला सकस साहित्यमूल्य प्राप्त झाले आहे."[4] साहित्यमूल्याच्या बाबतीत त्यांची कविता उजवी ठरते.

विठ्ठल वाघ हे ग्रामीण भागातील कृषि परंपरा लाभलेल्या कुटूंबात जन्माला आलेले. कृषकाची जन्मजात दु:खे, त्याच्या आनंदाचे क्षण, सुगीची उधळण त्यांच्या रक्तात भिनलेली, त्यामुळेच त्यांची कविता निसर्गासारखीच मुलभूत वाटायला लागते. विठ्ठल वाघांची कविता ग्रामजीवन व शेतीच्या अवतीभवती आणि लोकांच्या सभोवताल पिंगा घालत असते. "विठ्ठल वाघ यांची कविता शेतकरी जीवन, शेतीचा परिसर आणि लोकरीती, श्रद्धाभाव, ग्रामजीवनातील शृंगार या आशयद्रव्यावर विकसित झालेली आहे. वऱ्हाडी बोली आणि लोकगीतांचे नादसौंदर्य यामुळे ग्रामीण कवितेच्या क्षेत्रात वाघ यांची कविता आपले स्वतंत्र स्थान निर्माण करते. शेतकऱ्यांची दु:खे, ग्रामीण सत्ता, व्यवस्था आणि लोकजीवन यांच्या आविष्कार प्रखर भूमिका वाघ घेतात. ग्रामीण जीवनातील शृंगार, सौंदर्यभावना यांच्या आविष्करणात हळवी कोवळीकता स्वीकारतात. 'वैदर्भी', 'साय', 'काया मातीत मातीत' (1991), 'कपाशीची चंद्रफुले' (1999), 'पंढरीच्या वाटेवर' (2001), 'वृषभसूक्त' (2003) या काव्यसंग्रहातील सौंदर्यवादी जाणिवांबरोबरच सामाजिक-कृषि-सांस्कृतिक जाणिवा प्रकट झालेल्या दिसतात. ग्रामीण निसर्गाच्या अनुभूतींना सौंदर्यवादी जीवनदृष्टीने ते सामोरे जातात. पऱ्हाटीच्या नख्खीतून आला कापूस फुलून| पाची बोटांवर किस्न लोनी राहेला झेलून|| अशा ओळींतून कापसाचे उमलणे कृष्णकथेचे मिथक होऊन जाते."[5] लोकसंकेताचे दर्शनही त्यांच्या काव्यात घडते.

वाघांची कविता सामाजिक बांधिलकी सोबत, सांस्कृतिक दायित्व याचाही विचार करताना दिसते. त्यांच्या अनेक कवितांमधून त्यांनी ग्रामस्थ माणूस, ग्रामस्थ स्त्री व परिसरातील निसर्ग या सर्वांशी स्वत:ला जोडून घेतले आहे, म्हणून वाघांची कविता ही अस्सल ग्रामीण वऱ्हाडी कविता वाटते. ग्रामीण जीवनाशी ऋणानुबंध असणारा हा कवी आहे. त्यामुळेच त्यांची कविता यष्टीकडे न राहता समष्टीकडे वाटचाल करताना दिसते. "थोडक्यात विठ्ठल वाघांची कविता म्हणजे लोकानुभवाला, लोकभाषा, लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकगीत यांच्या अंगाने आविष्कृत करणारी लोककविता आहे. गीतानुकूल रचना ही जशी कविता म्हणून तिची मर्यादा आहे. तशी लोकानुभवाचा, आविष्कार म्हणून हीच रचना या कवितेचं सामर्थ्यही आहे. आत्मविष्कारी कवितेचे तसेच नवकवितेत आढळणारे विविध घटक या कवितेत नसले तरी

ग्रामीण लोकजीवनाला सर्वांगानं आविष्कृत करण्याचं सामर्थ्य तिच्यात निश्चित आहे. या सामर्थ्यांमुळेच ही कविता लोकप्रिय ठरली आहे. मराठी ग्रामीण कवितेतील विठ्ठल वाघांच्या कवितेतचे स्थान या वैशिष्ट्याने निश्चितच आगळे ठरले आहे."[6] त्यांनी आपल्या कवितेत ग्रामसंस्कृतीचे दर्शन घडविले आहे.

विठ्ठल वाघांची कविता केवळ लोकगीताच्याच अंगाने जात नाही तर सुभाषितासारखी लोकसंवाद साधते व लोकप्रबोधनही करते. लोकांना जे हवे ते सारेच या कवितेतून उपलब्ध होते. "लोकगीतांची स्वाभाविक लय ग्रामजीवनातील संकेत, लोकगीते यांचा आढळ प्रामुख्याने त्यांच्या कवितेतून येतो. सुभाषितवजा रचना हे त्यांच्या काव्याचे आणखी एक वैशिष्ट्य. वऱ्हाडी बोलीमध्ये काव्यरचना करणाऱ्या विठ्ठल वाघांच्या कवितेतून निसर्ग, ग्रामजीवन अधिक वास्तव स्वरूपात चित्रित होते. त्यांच्या कवितेला लोकगीताची लय लाभलेली आहे. लोकसाहित्याचा अभिजात संस्कार प्राप्त असलेली त्यांची कविता लोकसमुहाचे समग्र आकलन मांडण्याचा यशस्वी प्रयत्न करते."[7] वाघांच्या कवितेतून लोकगीताची लय तर येतेच सोबतच संत तुकाराम जसे आपल्या अभंगातून सुभाषिते पेरायचे तसे वाघही आपल्या कवितेतून सुभाषिते सांगतात, त्यामुळे लोकसाहित्याची लोकरंजन व लोकप्रबोधन ही उद्दिष्ट्ये साध्य होतात.

येळकाईच्या पाल्यानं
येते जखम भरूनं
घाव मनाचा मिटेना
मांगं पस्तावा करूनं'
'दोरी कष्टाची लावून
रई कर्माची फिरते
ताहा इर्जनाचं दुध
लोणी पायटून होते.'

स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत बरीच स्थित्यंतरे झालीत पण ग्रामीण शेतकऱ्याची दैन्यावस्था पूर्णपणे नाहीसी झाली नाही. कधी निसर्ग तर कधी बाजारपेठ त्याला चटके देत राहिली. "विठ्ठल वाघांच्या कवितेत कृषकांच्या दैन्यावस्थेचे अधिक वास्तवपूर्ण चित्रण व त्यांच्याविषयी कणव अधिक स्वयंस्फुर्तपणे व्यक्त केली जाते. स्वराज्य आले पण तरीही असंख्य कृषकांचे दु:ख, दैन्य मात्र कायम राहिले. स्वातंत्र्य मिळून आता कितीतरी वर्ष झाली. ह्या काळात राजकीय, सामाजिक व कृषि जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. गोट्या बदलल्या पण शेतकरी बळीराजाचा डाव बदलला नाही. त्यांच्या दु:खात, दारिद्रयात काही फरक पडला नाही आणि हाच कष्ट करणारा शेतकरी वाघांच्या काव्याचा केंद्रबिंदू आहे. ह्या ग्रामीण समाजजीवनातले दु:ख पाहून कवी व्यथित होतो व मग त्यांच्या अनुभूतीचा शब्दरूप आविष्कार घडतो. तो 'ऋतू', 'खापराचे दिवे', 'तिफन', 'मेंढरं', 'पऱ्हाटी' ह्या कवितांमध्ये दिसतो.

'किती तपे उलटून गेली पण ताप कमी झाला नाही.
उन्हातून निघालो पण सावली अजून सापडली नाही.'

भावनोत्कटता हा वाघांच्या काव्याचा विशेष गुण त्यांची प्रतिमासृष्टी व अनुभवसृष्टी यात अभिन्नत्व भासावे असे जिव्हाळ्याचे नाते आहे.''[8] विठ्ठल वाघांची ग्रामीणनिष्ठा व कृषिनिष्ठा प्रामाणिक आहे. दोन्हीशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. ग्रामीण जीवनाबद्दलची त्यांची कणव ही अंत:करणातून आलेली आहे. म्हणून त्यांच्या कविता ग्रामीण कारूण्याची आसवे वाटतात. ग्रामीण जीवनवास्तव त्यांच्या हृदयाला बोचतं आणि ते शब्दरूप घेऊन बाहेर पडतं. त्यांची कविता ही कधी वास्तवाची फुले तर कधी वास्तवाचे निखारे वाटायला लागते.

विठ्ठल वाघांची कविता ग्रामीण जीवनवास्तव मांडताना ती केवळ शेती व निसर्गाभोवती फिरत राहात नाही तर ग्रामीण संस्कृतीत लक्ष्मी संबोधल्या जाणाऱ्या स्त्रीच्या विविध भावछटा ते आपल्या कवितेतून रंगवतात. हे भाव विविध संदर्भात त्यांच्या कवितेत आपल्याला भेटतात कधी वयात आलेली मुलगी म्हणून तर कधी विवाहानंतर गाव सोडून जाणारी सौभाग्यवती म्हणून-

'गाव सोळून चालली तुवा पालखीत पाय
मैना उळून गेल्यानं माहा उदास पिपय'

## समारोप:

विठ्ठल वाघांनी आपल्या कवितेतून जिवंत ग्रामीण वास्तव मांडले. त्यांची कविता ग्रामीण जीवनातील विविध भावछटा अभिव्यक्त करते. वऱ्हाडातील शेतकऱ्यांची स्वातंत्र्यानंतरही होणारी ससेहोलपट ते बेमालूमपणे मांडतात. त्यांच्या कवितेला लोकगीताची चाल, नाद, ताल व लय आहे. कधी ती संत साहित्यासारखी सुभाषिते बोलत जाते. वऱ्हाडी कवितेला वाघांनी अतुलनीय समृद्धी मिळवून दिली आहे.

## निष्कर्ष:

1) विठ्ठल वाघ यांची कविता लोकगीताशी नाते सांगते.
2) विठ्ठल वाघांची कविता ही भावकविता आहे.
3) विठ्ठल वाघ यांची कविता ग्रामीण जीवनातील दु:ख, दैन्य, दारिद्रय व व्यथा-विवंचना अभिव्यक्त करते.
4) विठ्ठल वाघांच्या कविततेतून अभिव्यक्त होणारा निसर्ग हा मानवी मनाला मोहिनी घालणारा आहे.
5) विठ्ठल वाघ यांची कविता राजकीय व सामाजिक दंभावर प्रहार करते.
6) वऱ्हाडी बोली ही या कवितेचे बलस्थान आहे.

## संदर्भ:


1) फडके, डॉ. भालचंद्र, किरवले, डॉ. कृष्णा: 'ग्रामीण साहित्य', य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक. एप्रिल 1996, पृ. 85-86.
2) वाघ, विठ्ठल: 'काया मातीत मातीत', (डॉ. मधुकर वाकोडे यांची प्रस्तावना), देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि., आवृत्ती दुसरी, 1994, पृ. 8.
3) तत्रैव: पृ. 8-9
4) तत्रैव: पृ. 11
5) पगार, डॉ. एकनाथ: 'ग्रामीण वाङ्मय 1995-2000,' 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड सातवा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.
6) सार्वेकर, डॉ. कैलास: 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास', मेहता प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली: 1999, पृ. 198.
7) कुंभार, प्रा. भैरव, कदम, प्रा. मन्दा (संपा.): 'जित्राब', मराठी ग्रामीण कविता, हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापुर, प्रथम आवृत्ती: 1994, पृ. 101.
8) गावंडे, माया: 'वऱ्हाडी कवितेतील प्रतिमा', अप्रकाशित प्रबंध, (अमरावती विद्यापीठ, अमरावती), पृ. 203.


❖❖❖

# मानवी जीवनाच्या समृद्धतेसाठी वैज्ञानिक दृष्टीकोनाची मौलिकता विशद करणारा विज्ञान काव्यसंग्रह : 'जीवनाचे गणित'

**डॉ. भगवान जालमसिंग साबळे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी
भारतीय महाविद्यालय, मोर्शी जि. अमरावती
भ्रमणध्वनी क्रं.: ९५४५६४३१५३ bhagwan.j.sable@gmail.com

## प्रास्ताविक :

विदर्भातील जेष्ठ कवी प्रा. देवबा शिवाजी पाटील ह्यांनी रचलेला 'जीवनाचे गणित' या विज्ञान काव्यसंग्रहाचे आकलन करताना मनस्वी आनंद होत आहे. त्यांनी कथा, काव्य, कादंबरी, समीक्षाग्रंथ विशेषत: बालसाहित्य रचलेले असून वैज्ञानिक लेखसंग्रह, विज्ञान काव्यसंग्रह, विज्ञान बालकुमार कथासंग्रह लिहिणारे विज्ञान साहित्यिक म्हणूनही त्यांनी मराठी साहित्यात ओळख निर्माण केलेली आहे. त्यांचा नूकताच विज्ञान दिनाच्या औचित्याने दि. २८ फेब्रुवारी २०२३ रोजी 'जीवनाचे गणित' हा विज्ञान काव्यसंग्रह प्रकाशित झालेला आहे.

'जीवनाचे गणित' हा विज्ञान काव्यसंग्रह लिहिण्याचे हेतू विशद करताना ते या काव्यसंग्रहाच्या मनोगतात म्हणतात की, 'दैनंदिन जीवनात पदोपदी आपली व विज्ञानाची नेहमी गाठ पडत असते. दररोज आपल्या जीवनात अनेक बहुविध घटना घडीत असतात. आपण रोजच विज्ञान वापरत असतो, जगत असतो. परंतु या सर्व बाबींकडे वैज्ञानिक दृष्टीकोनातून कसे बघावे, विज्ञानाची कास धरून, त्याची आपल्या जीवनाशी सुयोग्य सांगड घालून आलेला वर्तमान आनंदाने कसा स्वीकारावा हे या काव्यासंग्रहातील कवितांमधून काही अंशी कळेल असे मला वाटते.'१ कवीने विशद केलेल्या या काव्यसंग्रह लेखनाचा हेतू या काव्यसंग्रहातील कवितांचे आकलन करताना साध्य होतांना दिसते. वैज्ञानिक दृष्टीकोनाची कास धरून मानवी जीवनास समृद्ध बनवावे, समाजातील अंधश्रद्धा दूर सारून वास्तव ज्ञानाचे अनुकरण करावे, नव्हे मानवी जीवन आणि विज्ञान यांचे अतूट नाते अधोरेखित करणा-या कवितांनी हे काव्यसंग्रह समृद्ध झालेले असून मानवी जीवनाचे व समाजातील विसंगतीचे विविध भावपदर कवीने मार्मिकपणे उलगडले आहे.

## वैज्ञानिक दृष्टीकोनाने मानवी जीवन समृद्ध :

'जीवनाचे गणित' हया विज्ञान काव्यसंग्रहातील 'माझी कविता' हया पहिल्या काव्यातच विज्ञानावर डोळस श्रद्धा ठेवून अंधश्रद्धेचा नाश व्हावा जेणेकरून रोजचे जगणे सुकर होईल असा मनोदय कवीने व्यक्त केला. यासंदर्भात कवी असे म्हणतात की,

"माझी कविता, वैज्ञानिक सिद्धांत,
खूप उपयुक्त, जीवनात
माझी कविता, विज्ञान चिंतन
निरीक्षणाकलन, वाढविते

माझी कविता, सरळ विज्ञान
वास्तव ज्ञान, प्रेरक” **२**

मानवी जीवन समृद्ध होण्यास समन्वयशिलता व वैचारिकतेची सांगड घालणे औचित्याचे ठरेल असे कवी निक्षून सांगतात. विज्ञान हे मनाचे संतुलन, तर्कबुद्धी, चौकस बुद्धी वाढविते. सत्यविज्ञानाने अंधश्रद्धांचे निराकरण करते म्हणूनच हया काव्यसंग्रहातील  विज्ञान कविता श्रेष्ठ ठरतात.

## दैनंदिन जीवनातील विज्ञान :

आपण जो दिनक्रम आचरतो त्या प्रत्येक गोष्ठीत विज्ञान आहे. ह्या विज्ञानाची सांगड मात्र आपल्या जीवनात घालता आली पाहिजे. कारण शास्त्रज्ञांनी बहुविध शोधांनी मानवी जीवन कष्टमुक्त नि सुखसंपन्न केले आहे. म्हणूनच ‘विज्ञानयुग’ या कवितेत कवी असे म्हणतात की,

“जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी
विज्ञान आहे, रोजच्या जीवनी”         (विज्ञानयुग)

परंतु हे विज्ञान समजून घेतले तर मानवी जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल असा विश्वास कवीने व्यक्त केलेला आहे.

## विज्ञानाचे सजीव सृष्टीवर उपकार :

पृथ्वीवरील जीवानानुकूल वातावरणामुळे सजीव सृष्टी सुखा-सुखी जीवन जगत आहे. यासंदर्भात ‘आपली पृथ्वी’ या काव्यात कवी म्हणतात की,

“पृथ्वीवर आहे, नैसर्गिक इंधन, खनिज संपत्ती, रत्ने मौल्यवान
बहुविध सजीव, विविध वनस्पती, पृथ्वीवरच, सारे जगती”     (आपली पृथ्वी)

परंतु स्वतःच्या स्वार्थासाठी मानव पर्यावरणाचा -हास करीत आहे. याचे बिकट परिणाम मानवास सोसावे लागत आहे. म्हणूनच मानवाने या भूतलावरील नैसर्गिक साधन संपत्तीचा सदुपयोग करावा.

## विज्ञानावर निष्ठा :

विज्ञानाने मानवास भरभरून दिले आहे. परंतु त्याचा सदुपयोग व्हावा, भौतिक सुखसुविधेच्या अतिरेकी वापराने मानवास हाणीच होणार आहे. म्हणूनच विज्ञानावर निष्ठा ठेवून विज्ञानाची डोळसपणे भक्ती करावी यानेच नवनिर्मिती साध्य होणार आहे. म्हणूनच ‘विज्ञानाची भक्ती’ या कवितेत कवी असे म्हणतात की,

“विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान, विज्ञान म्हणजे सत्यान्वेषण
ज्ञान जाणण्याची, दृष्टी विज्ञान, विज्ञान सांगते, सृष्टीचे नियमन”         (विज्ञानाची भक्ती)

भौतिक ज्ञानाचा व्यवहारात सदुपयोग करावा, विवेक बुद्धीने जीवनाचे कल्याण साधावे, जेणेकरून मानवी जीवनात सौख्य निर्माण होईल असा सकारात्मक विचार या काव्यामधून अधोरेखित होतो.

## निसर्ग घडामोडीचा तर्कनिष्ठ अभ्यास :

मानवी जीवन व विज्ञान यांचा समन्वय जसा मौलिक आहे तसाच मानवी जीवन व निसर्ग यांचे अतूट नातेही मौलिक आहे. निसर्ग घडामोडींचा तर्कनिष्ठ अभ्यासाने जीवनात समन्वय साधावा यासंदर्भात ‘विज्ञान’ या काव्यात कवी म्हणतात की,

"निसर्ग घडामोडीचा, वास्तव अभ्यास
विज्ञान करते, तर्कनिष्ठ खास" (विज्ञान)

तर 'निसर्गतत्व' या काव्यात कवी म्हणतात की, "निसर्गातील हे तत्व सत्य, जीवनातही येत असते नित्य" यास्तवच सुख-दुख हे ऊन-सावलीच्या खेळाप्रमाणे आहे. हे जाणले तर जीवनातील अनेक संकटांवर आपल्याला सहज मात करता येईल. म्हणून निसर्ग नियमांना दैनंदिन जीवनात अंगवळणी पडून आत्मसात केल्यास मानवास बाहय शक्तीशी समन्यव साधून जीवन सुकर करता येईल असा सकारात्मक भाव या काव्यांमधून व्यक्त होतो.

## विज्ञानाने मानवाची डोळसवृत्ती विकसित :

विज्ञानाने मानवास ज्ञान तर दिलेच शिवाय अनेक भौतिक सुख-सुविधेने मानवी जीवन सुखासिन झालेले आहे. सारासार विचार करण्याची डोळस वृत्ती विज्ञानाने प्रगल्भ झालेली आहे. म्हणून 'कोण बरं कोण बुरं ?' या काव्यात कवी म्हणतात की,

"तीच विद्दा, तेच ज्ञान, सारे शिकती तेच ज्ञान
विद्देने होती शहाणे, ज्ञानी होती विज्ञानाने" तर याच काव्यात ते पुढे असेही म्हणतात की,
"कोण बरं कोण बुरं ?, मानव कां विज्ञान ?
हा करुनी मनी विचार, सुधारावे मानवाने वर्तन" (कोण बरं कोण बुरं ?)

विज्ञानास जाती, धर्म, पंथ, भाषा याचा भेद नाही तर विज्ञानास समस्त सारखे असते. वैज्ञानिक दृष्टीकोनाने मानवास जीवनातील अडचणींवर मात करता येत, या अडचणींची उकल करता येते. नव्हे, प्रगती-अडचणी ह्या जीवनरूपी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे भाष्य कवीने 'गती-घर्षण' या काव्यातून केलेले आहे. तर 'गुरुत्वाकर्षण' या काव्यामधून गुरुत्वाकर्षणाच्या नियमाची मानवी जीवनासंदर्भात उकल करताना ते म्हणतात की,

"गुरु म्हणजे ज्ञान; घालवणारे अज्ञान, 'गुरुत्व' म्हणजे कल्याणकारी ज्ञान
गुरुत्वाकर्षण म्हणजे आकर्षण, ख-या विद्देचे, शुद्ध ज्ञानाचे" (गुरुत्वाकर्षण)

या काव्यामधून कवीने मानवास आकर्षण असावे ते ख-या विद्देचे व शुद्ध ज्ञानाचे व ज्ञान गुरुमुळेच प्राप्त होऊ शकते हे सोप्या शब्दात विशद केले आहे.

## गतिमान जीवन :

आजच्या धकाधकीच्या जीवनात मानवास अनेक दृष्टीने ससेहोलपट व दमछाक होते. याचाच दुष्परिणाम प्रकृती स्वास्थावर होतो. म्हणून कवी 'गतीचा नियम' या काव्यात कवी म्हणतात की,

"गतीचा नियम नाही खोटा
व्याधी - उपाधीत बसतो तोटा" (गतीचा नियम)

तर 'पंखा-कालचक्र' या काव्यातून कवी असा संदेश देतात की,

"खंडीत होण्याआधी, विद्दुत पुरवठा, काळासोबत चला, पुढेच सर्वदा" (पंखा-कालचक्र)

बदलत्या काळ-वेळानुसार मानवी जीवनातील परिवर्तन अंगिकारले पाहिजे अन्यथा जीवनात प्रगती साधता येणार नाही. याचाच प्रत्यय "क्रिया-प्रतिक्रिया' या काव्यात येतो तो असा,

"क्रिया-प्रतिक्रिया, समान-विरुद्ध, सांगतो गतीचा, नियम शुद्ध

गतीचा नियम, होतो सत्य, प्रेमानेच राही जीवन शांत" (क्रिया-प्रतिक्रिया)

प्रेम, सदभावना, सदविचाराने मानवी जीवनास शांतता लाभते. म्हणूनच समान-विरुद्ध, क्रिया-प्रतिक्रियेचा सकारात्मकतेने विचार करावा. जेणेकरून जीवन सुखी व समृद्धी बनेल. त्याचप्रमाणे बदलत्या जीवनशैलीने खान-पान बदलले अन त्याचा दुष्परिणाम मानवी प्रकृतीवर झालेला आहे. म्हणूनच कवीने 'विज्ञानी मानव' या कवितेत आहाराच्या बाबतीत सजगता, सावधानता बाळगावी असा विचार मांडतांना ते म्हणतात की,

"खातो विष, पितो विष, घेतो श्वासात दूषित हवा
कसे राहिल छान आरोग्य, तुझे रे विज्ञानी मानवा ?" (विज्ञानी मानव)

मानवी जीवनात समतोलपणा असेल तरच अनेक प्रकाराच्या संकटांना तोंड देता येतो.म्हणूनच आपल्यातील उर्जेस सकारात्मक वळण देणे औचित्याचे होईल असा विचार 'उर्जा' या काव्यातून व्यक्त होतो तो असा,

"उर्जेचे करता, विवेकी रुपांतर
जीवन प्रगत, होते अपरंपार" (ऊर्जा)

## विज्ञानाने मानवी जीवनाचे परावलंबित्व :

विज्ञानाने आजमितीला मानवास प्रत्येक गोष्टीत सहाय्यताच केलेली आहे. परंतु यामुळे मानवी जीवन परावलंबी बनले आहे. यासंदर्भात कवी 'विचार-वाचन' या काव्यात म्हणतात की,

"कराग्रे चाले संगणक, करमध्ये टीव्ही रिमोट
करमुले तो मोबाईलम, सदा दर्शनम संभाषण" (विचार-वाचन)

परंतु या सुविधांनी मानवी जीवनाची व्यस्तता वाढलेली आहे. याचे अनेक दुष्परिणाम मानवास भोगावे लागत आहे. यासंदर्भात याच काव्यात कवी म्हणतो की,

"संगणके बुद्धी पांगळी, टीव्हीने नेत्र आंधळी
मोबाईलने कान बहिरे, लुळी झाली गात्रं सारे" (विचार-वाचन)

एवढेच नव्हे, तर मती कमकुवत व शरीर अशक्त झाले आहे. यासाठी सारासार विवेकाने मार्ग काढून सुविचाराने, वाचनाने मन-बुद्धीचा विकास होईल असा विचार या काव्यातून व्यक्त होतो. तर दैनंदिन जीवनातील गृहोपयोगी वस्तुंच्या वापराने कष्ट करण्याची सवय सुटली व याचा दुष्पपरिणाम शरीर स्वास्थावर होताना दिसतो असे विचार 'सुविधा' या काव्यामधून व्यक्त होतात. तसेच सोसियल मिडीयाच्या परिणामाने जीवनात ताण-तणाव वाढलेत, नाती-गोती दुरावालित, संकुचितपणा, स्वार्थीपणा, हव्यास वाढलेला आहे. यासंदर्भात 'साधने' या काव्यात कवी असे म्हणतात की,

"फेसबुक, टवीटर, युट्यूब, सर्च इंजिन
टीव्ही नि मोबाईल, बनले मनोभंजन" (साधने)

मुळात विज्ञान - तंत्रज्ञानाने मानवाने ज्ञान प्राप्त करावे तसेच भौतिक साधनांचा सदुपयोग व्हावा. परंतु याचा दुष्परिणाम तरुण पिढीवर होताना दिसतो. यातून वेळीच सावधानता बाळगली नाही तर याची भिषणता मानवास भोगावी लागणार आहे.म्हणूनच विज्ञानाची कास धरून संयमाने मानवी जीवनात समन्वयता आणल्यास जीवन सुखी बनू शकते. याचा प्रत्यय 'चुंबक' या काव्यातून येतो तो असा,

"संसारी ध्रुवांनी, ठेवावी एकजूट, ध्रुवासमान, चुंबकीय सतत
झाले जरी, कितीही मतभेद, तुटू न द्यावी, जीवनी साथ" (चुंबक)

चुंबकाचा गुणधर्म जर मानवी जीवनात उतरविला तर संसारात मतभेद होणार नाही. असा विचार कवीने विशद केलेला आहे.

## वैज्ञानिक दृष्टीकोनाने मानवी जीवनात समन्वयता साधावी :

मानवाने बुद्धीसामर्थ्याच्या जोरावर विज्ञानाचा चमत्कार घडविला अन याच विज्ञानाने मानवी जीवन व्यवहारासंदर्भात अनेक प्रकारची आवाहने निर्माण केलीत. परंतु मानवी बुद्धी सामर्थ्याने या विज्ञानाचा उपयोग विधायक कार्यासाठी केल्यास निश्चितच मानवाचे कल्याणच होणार आहे. अन याचाच सकारात्मक परिणाम सामाज जीवनातही होणार आहे. म्हणूनच मानवाने समता, बंधुता नांदावी यासाठीही झटले पाहिजे असे असे मत 'द्रावणाचे तत्व' या काव्यात कवीने अधोरेखित केले ते असे,

"द्रव पदार्थाचे रेणू, असता सारखेच
एकमेकात ते मिसळती तेव्हांच" (द्रावणाचे तत्व)

हाच सिद्धांत समाजजीवनासही लागू पडतो. म्हणूनच सा-यांनी हर्ष उल्हासाने, मिळून-मिसळून राहिले तर समाजातील कलह नष्ट होऊन समाजोन्नती घडेल असा विश्वास कवीने व्यक्त केलेला आहे. तर 'जीवनाचे गणित' या काव्यात कवी म्हणतात की,

"जीवनाचे गणित, टप्प्या-टप्प्याने
सोडवावे सदा, शांत डोक्याने" (जीवनाचे गणित)

यातच मानवी जीवनाचे हित दडलेले आहे.श्रद्धा नि शिल, समाधानाची बेरीज करावी, द्वेष, मत्सराची वजाबाकी करून कष्टास मनोरंजनाची साथ दयावी अन सदगुणांचा सदा वर्ग करून निंदा चुगल्यांचा लघुत्तम काढावा असा सकारात्मक विचार कवीने या काव्यातून विशद केलेला आहे. तर याच काव्यात ते पुढे असेही म्हणतात की,

"विचार, अनुभव, चिंतन याचे घनफळ
जीवनात देते, कर्तव्य बळ" (जीवनाचे गणित)

याच कर्तव्य बळावर मानव प्रगती साधू शकतो, समाजजीवनात सौख्य, शांतता प्रस्थापित करु शकतो. यास जोड असावी ती वैज्ञानिक दृष्टीकोनाची यानेच समाजजीवनातील समस्यांचे निराकरण करून यशाचे, सदभावनेचे, सामर्थ्याचे, कल्याणाचे, मानवाच्या सुखी जीवनाचे रहस्य दडलेले आहे असा विचार या काव्यसंग्रहातील काव्यांमधून अधोरेखित होतो. या काव्यसंग्रहाच्या सामर्थ्याबद्धल व कवीच्या लेखनशैलीबद्धल विचार मांडतांना 'ज्ञानेश्वर गायके' असे म्हणतात की, "या सर्व कवितेत विज्ञान हा विषय जरी प्रामुख्याने असला तरी भवतालच्या अनेक छटा कवितेत दिसतात. फक्त 'यमक साधणारा' हा कवी नसून प्रत्येक विषयाच्या गाभ्यापर्यंत पोहचण्याची शक्ती अन सृजनाच सामर्थ्य घेऊन लिहिता झालेला प्रतिभावंत कवी आहे. ह्या सा-या कविता जीवनाभिमुख व कल्पनेला चालना देणा-या आहेत. विज्ञानांच्या प्रतिकांतून व प्रतिमांद्वारे जीवनाचा सखोल अर्थ त्यांमधून प्रतीत होतो." ३ अन हेच या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य होत. म्हणूनच प्रा. देवबा पाटील यांच्या विज्ञान कविता मानवी जीवनास वैज्ञानिकतेची कास धरून मानवी जीवन सुखी, समृद्धी बनवू शकते असा विचार अधोरेखित करीत असतानाच दैनंदिन दिनचर्येतील विज्ञानाची पारख करून त्यातील मानवी हिताच्या गोष्टींचा, विचारांचा अंगीकार करावा जेणेकरून मानवी जीवन सार्थकी ठरेल असा आशावाद अभिव्यक्त केला.

**निष्कर्ष :**

मराठी साहित्यात विज्ञान साहित्याची वेगळी ओळख आहे. विज्ञान साहित्यिकांनी वैज्ञानिकतेची महती विशद करतानाच वैज्ञानिकतेच्या आहारी गेल्याने होणारे दुष्परिणामही अधोरेखित केलेले आहे. 'जीवनाचे गणित' या काव्यसंग्रहातही विदर्भातील जेष्ठ कवी प्रा. देवबा शिवाजी पाटील ह्यांनी 'विज्ञानाने, विज्ञान साहित्याने माणसाच्या विचारशक्तीला विशिष्ट वळण लागते, मनाला चिंतनाची सवय जडते व माणसाची विश्लेषण शक्ती वाढते.' असा मनोदय व्यक्त केलेला आहे. तसेच मानवाने दैनंदिन जीवनात घडणा-या गोष्टींकडे वैज्ञानिक दृष्टीकोणातून कसे बघावे, विज्ञानाची कास धरून आपल्या जीवनाशी सुयोग्य सांगड घालून वर्तमान आनंदाने कसा स्वीकारावा यासंदर्भात या काव्यसंग्रहातून यथोचित भाष्य केलेले आहे. म्हणूनच या काव्यसंग्रहातील वाङ्मयीन मूल्यांबद्धल विचार व्यक्त करताना 'क. वि. नगराळे' असे म्हणतात की, "विज्ञान समजून सांगणे किंवा वैज्ञानिक दृष्टीकोणाचा प्रसार करणे हे या संग्रहाचे उद्दिष्ट नाही तर मानवी जीवनावर विज्ञान, तर्कशुद्ध विकास यांचे वर्तमान अथवा भविष्यावर होणारे परिणाम यांची काव्यात्मक मांडणी कवी देवबा पाटील यांनी केली आहे आणि ते वाङ्मयीनदृष्ट्या संयुक्तिक आहे." **४** हे ह्या विज्ञान काव्यसंग्रहाचे फलित होय.

'जीवनाचे गणित' या काव्यसंग्रहातून विज्ञानाने मानवी जीवनाचा झालेला विकास, वैज्ञानिक दृष्टीकोनातून मानवी जीवनातील समस्यांवर करावी लागणारी मात, मानवी उर्जेचा सकारात्मकतेने वापर करावा व जीवनाचे सामर्थ्य वाढवावे असा सकारात्मक विचार अधोरेखित होतो. शिवाय जीवनाचे गणित सोडविताना संयम, संसाराप्रतिचे चुंबकीय आकर्षण, शरीरस्वास्थाची काळजी, वैज्ञानिक व भौतिक साधनांचा ज्ञानार्जनासाठी उपयोग करावा, नवप्रसारमाध्यमांचा सदुपयोग करावा, निसर्ग नियमांना अवगत करूणे कसे हिताचवह आहे. तसेच मानवी मेंदूचे सामर्थ्यता विशद करतानाच त्यायोगे सभोवतालच्या स्थिती-गतिचे निरीक्षण करून 'जीवनाचे गणित' मांडावे नव्हे, विज्ञान हे आपल्या रोजच्या जगण्यात आहे त्याचा डोळसपणे स्वीकार करून जीवन सुखी व समृद्धी बनवावे असा सकारात्मक विचार या विज्ञान काव्यसंग्रहातील कवितांमधून अभिव्यक्त होतो.

**संदर्भ सूची :**


**१)** प्रा.पाटील देवबा शिवाजी, 'जीवनाचे गणित', कृष्णायन प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती - दि.२८ फेब्रुवारी २०२३, पृ. क्रं. ५.

२) तत्रैव, पृ. क्रं. ९.

**३)** गायके ज्ञानेश्वर, खामगाव यांनी दि.२४/०४/२०२३ रोजी दै. दखनी स्वराज्य या वृत्तपत्रात लिहिलेला लेख 'आयुष्याच्या वाळवंटातील हिरवळीच्या कविता - जीवनाचे गणित.'

**४)** नगराळे क. वि., घाटंजी यांनी दि.२३/०४/२०२३ रोजी दै. देशोन्नती, रविवार स्पंदन पुरवणी या वृत्तपत्रात लिहिलेला लेख 'जीवनदृष्टीचा प्रत्यय विज्ञान दृष्टीतून घडविणारा विज्ञान काव्यसंग्रह : जीवनाचे गणित.'


❖❖❖

# दलित कवितेतील: नकार, विद्रोह आणि आत्मशोध

**प्रा. डॉ. साजिद के. शाह**
सहायक प्राध्यापक तथा मराठी विभाग प्रमुख,
श्री डॉ. आर. जी. राठोड कला व विज्ञान महाविद्यालय,
मूर्तिजापूर, जिल्हा- अकोला.
मो.न.९८५०३९४५७१, ८७८८६००८५६ Email: shahsajid7047@gmail.com

**सारांश :-**

दलित कविता १९६० नंतर उदयास आलेली असली तरी, तिची पाळेमुळे प्राचीन मराठी कवितेत दिसून येतात. याचा पहिला आविष्कार संत चोखामेळा यांच्या संतवाणीत आढळतो. जातिप्रथेचे, जातीहीनतेचे दुःख त्यांनी आपल्या रचनांमधून मांडले आहे. त्यांच्या रचनेत कोठेही आक्रस्ताळेपणा दिसत नाही. त्यांनी संयमित भाषेत आपले दुःख मांडलेले आहे. त्यानंतर महात्मा फुले यांचे दलित साहित्याला महत्त्वपूर्ण योगदान आहे. दलित साहित्य हा केवळ साहित्यातला एक प्रवाह राहिला नाही, तर समाजपरिवर्तनाची ही एक महत्त्वाची चळवळ ठरली. ही चळवळ आंबेडकरी विचारांनी दिलेल्या आत्मभानातून उभी राहिली. संपूर्ण दलित समाजाला या चळवळीने मोठी ताकद दिली, शब्द दिला. दलित कविता नकार, विद्रोह आणि आत्मशोध यावर आधारित आहे. " डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या कार्याचा, त्यांच्या विचारांचा परिणाम म्हणजे दलित साहित्य..."[१] दलित कविता, बाबासाहेब आंबेडकरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच त्यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करीत प्रवास करीत आलेली आहे. दलित साहित्य हा सामाजिक परिवर्तनाचा लढा आहे. माणसाला माणूस म्हणून अधिकार मागणारा हा संघर्ष आहे.

**बीज शब्दः-** दलित साहित्य, स्वातंत्र्य, समता, बंधुता, नकार, विद्रोह, आत्मशोध इ.

**उद्दिष्टेः-** दलित कवितेचे स्वरुप, नकार, विद्रोह, आत्मशोध इत्यादी समजून घेणे.

**गृहितकेः-** दलित कवितेतून दलित समाजाचा वास्तविक जीवनानुभव व्यक्त होतो.
दलित कविता सामाजिक परिवर्तनाचा लढा आहे.

**संशोधन आराखडा:-** प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. त्यासाठी वर्णनात्मक विश्लेषण पद्धती वापरण्यात आली.

**साहित्याचे पुनर्विलोकन:-** प्रस्तुत शोधनिबंधासाठी ग्रंथ, पुस्तके, दैनिक वृत्तपत्रे, मासिके, इंटरनेट इत्यादींचे पुनर्विलोकन करण्यात आले.

## प्रस्तावना:-

' साहित्य' ही समग्र जीवनाला व्यापून टाकणारी अभिव्यक्ती आहे. जीवनासंबंधी एक मूल्ययुक्त दृष्टिकोण साहित्यात निर्माण होत असतो. साहित्यात मानवी जीवनाच्या वृत्ती-प्रवृत्तींचा आविष्कार होत असतो. साहित्य समग्र मानवी जीवनाला आविष्कृत करण्याचे प्रभावी माध्यम आहे. पृथ्वीतलावरील प्रत्येक मानवी समाज आपल्या भावभावना साहित्यातून व्यक्त करीत आलेला आहे. ज्याने जे भोगले, जे अनुभवले ते मौखिक व लिखित पद्धतीने व्यक्त झालेले आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या व विविध संस्कृतींचा समुच्चय असलेल्या, विविध समूहांचे प्रतिबिंब विविध भाषांमधून अभिव्यक्त होत आले आहे. त्यापैकीच मराठी भाषेतील साहित्य आहे. 'मराठी साहित्य' महाराष्ट्राच्या अस्मितेचा सर्वात महत्त्वपूर्ण घटक आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीला उज्वल ठेवणारा वारसा आहे. मराठी साहित्याच्या प्रवाहामधील 'दलित साहित्य' हा अविस्मरणीय साहित्यप्रवाह राहिलेला आहे. दलित साहित्याचा प्रवाह मराठीमध्ये १९६० च्या दशकात रूढ झाला. प्रस्थापित

साहित्यव्यवहाराला सर्वार्थाने छेद देणारा आणि दलित समाजाच्या सामाजिक दुःखाला अत्यंत सशक्तपणे मांडणाऱ्या या प्रवाहाने चाकोरीबद्ध अशा मराठी साहित्य विश्वात क्रांतिकारक बदल घडवून आणला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र वैचारिक अधिष्ठानातून आकाराला आलेल्या या प्रवाहाने केवळ मराठीच नव्हे तर एकूणच हिंदुस्थानी साहित्यालाही एक नवे वळण दिले. हे वळण साहित्यक्षेत्रातील एखाद्या विशिष्ट वर्गातील पारंपरिक वर्चस्वाला छेद देणारे तर होतेच, पण त्याचबरोबर या प्रवाहाने संकेतबद्ध आणि संकुचित अशा वाड्.मयीन सिद्धांताच्याही मर्यादा उघड केल्या. आक्रमक आणि जिवंत भाषेतून व्यक्त झालेल्या दलित साहित्याच्या अभिव्यक्तीने सामाजिक उद्वेगाला, अस्वस्थतेला समोर ठेवले. " व्यवस्थेविरुद्ध बंड झाले की, नवे संदर्भ, नवी मूल्य जीवनाला व त्याचबरोबर साहित्याला लाभत असतात. या बंडाची एक ऐतिहासिक कामगिरी दलित साहित्याने वा आंबेडकरी साहित्याने केली आहे."[२] असे अविनाश डोळस यांनी आपले मत व्यक्त केली आहे. ते यथार्थ वाटते.

जातीधर्माच्या अहंकारात अडकलेल्या उच्चवर्णियांना वास्तवाची जाणीव करून देत स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तत्वत्रयीचा आग्रह धरून नवसमाजनिर्मितीची आस बाळगणाऱ्या या प्रवाहाने मराठी साहित्याला कल्पकतेच्या कलावादी दालनातून बाहेर काढले. वैचारिकदृष्टय़ा दूषित असलेल्या धर्मग्रंथाची चिकित्सा केली. या सगळय़ा साहित्य व्यवहाराच्या मागे अर्थातच ज्ञाननिष्ठा आहे ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची. " विषम व्यवस्था आणि त्याविरुद्धचे असमाधान यामुळे समाजमनात वेदना आणि विद्रोहाने पेट घेतला. याचे स्वरूप म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळातील वाड्.मयीन प्रवाह होत."[३] यातीलच एक प्रवाह म्हणजे दलित साहित्य आहे.

## नकार, विद्रोह आणि आत्मशोध :-

दलित साहित्यात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वविचारातून विद्रोहाचा आविष्कार झाला. हा विद्रोह सामाजिक प्रतिष्ठेसाठी तर आहेच आहे, पण त्याचबरोबर परिवर्तनासाठीही महत्त्वाचा ठरला. " दलित साहित्य हे केवळ सौंदर्याच्या कुंजात रमणारे साहित्य नाही. त्यातील नकार, विद्रोह ह्यांच्या स्फोटक जाणिवांमुळे ज्वालाग्राही बनलेले आहे. ही ज्वालाग्राही जाणिव सर्वंकष क्रांतीचे स्वप्न पाहणारी आहे."[४] आत्मकथन, कविता आणि नाटकांनी दलित साहित्याला एक वेगळी ओळख दिली. कथा, कादंबऱ्या आणि समीक्षेनेही लक्ष वेधून घेतले. नवनिर्मितीचे असे आविष्कार खूप टोकदारपणे उमटत राहिले, परिणामी साठ-सत्तर ते नव्वदपर्यंतचा काळ हा दलित साहित्याच्या विद्रोहाने भारावलेला दिसतो. " कथा, कादंबऱ्यांहून कवितेची परिणामकारकता अधिक तीव्र असते."[५] असे मत वसंत आबाजी डहाके यांनी व्यक्त केले आहे. याला दलित कविता अपवाद नाही.

दलित कवितेमधून व्यक्त झालेली अभिव्यक्ती सहज व तितकीच प्रखर होती. अशी जी अभिव्यक्ती झाली ती मराठी साहित्यासाठी सर्वार्थाने नवी होती. शतकानुशतके सामाजिक, आर्थिक परिस्थितीने जी अमानुष अवहेलना या समाजाच्या वाटय़ाला आलेली होती, या अमानुषतेविषयीचा एक स्वाभाविक प्रक्षोभ होता. नकार आणि विद्रोहातून आकाराला आलेला हा प्रक्षोभच दलित साहित्याचे वैशिष्टय़ ठरले.

जीवनवादी समाजाभिमुखता हे एक वैशिष्टय़ सांगता येईल आणि याचे मुख्य कारण म्हणजे सामाजिक चळवळी आणि साहित्य यांच्यातल्या एकत्वामुळे या प्रवाहाने अत्यंत सामर्थ्याने आपल्या जगण्याचे किंवा दलितत्वाचे दर्शन घडवले असे म्हणता येते. स्वातंत्र्योत्तर काळाच्या दोनेक दशकानंतर जे सामाजिक परिवर्तनाचे पडसाद महाराष्ट्रात उमटायला लागले त्यामागे दलित साहित्यातील विद्रोह हा विशेष कारणीभूत ठरला. " दलित साहित्याच्या चळवळीची जाणीव मूल्यगर्भ जाणीव आहे. ती बाह्यजीवनातील व मनोजीवनातील विसंगतीचा प्रत्यय आणून देणारी आहे." [६] हा विद्रोह सामाजिक विधायकतेसाठी होता, आत्मसन्मानासाठी होता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नव्या युगजाणिवांचा होता. साहित्याच्या सर्वच प्रकारातून हा विद्रोह प्रकटला. विशेषतः कवितेतील अभिव्यक्ती अधिक टोकदार होती. मुळात हा विद्रोह व्यक्त करण्याची गरज दलित साहित्यिकांना का वाटली? याचा विचार करणे गरजेचे वाटते. निर्मिती कोणतीही असो, त्या निर्मितीच्या मुळाशी एक विशिष्ट प्रकारची मूल्यव्यवस्था असते. ही मूल्यव्यवस्था

समाजनियंत्रण करत असते. असे नियंत्रण मग समाजातल्या विविध संस्थांवर येऊ लागले की माणसाच्या स्वाभाविक जगण्यावर, त्याच्या नैसर्गिक हक्क आणि अधिकारावरही निर्बंध लादले जाऊ लागतात. असे घडू लागले की, 'विद्रोह' अपरिहार्य ठरतो. या विद्रोहातच संघर्षाची बीजे दडलेली असतात. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव दलित जीवनावर व साहित्यावर पडलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि नेतृत्वामुळे एकूणच दलित समाजामध्ये आत्मभानाची जाणीव निर्माण झाली.

डॉ. आंबेडकरांनी दलित साहित्यिकांना आवाहन केले होते. याचा निर्देश करणे गरजेचे वाटते. ते म्हणाले होते, " मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की, उदात्त जीवनमूल्ये आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कृत करा. आपले लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका, तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखनी आपल्या प्रश्नापुरती बंदिस्त करू नका. तिचं तेज खेडय़ापाडय़ातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या देशात उपेक्षितांचं, दलितांचं, दुःखितांचं फार मोठं जग आहे, हे विसरू नका. त्यांचं दुःख, त्यांची व्यथा समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा, त्यातच खरी मानवता आहे."[७] डॉ. आंबेडकरांच्या या भूमिकेमुळे एकूणच दलित साहित्याला एक मोठे पाठबळ मिळाले. त्याशिवाय त्यांच्या सर्व राजकीय चळवळीमुळे-मग ती चळवळ धर्मांतराची असो की अन्य कोणतीही, दलित साहित्याचे रूप प्रखर बनत गेले. जुन्या जीवनमूल्यांशी केवळ वरवरचा संघर्षच केला नाही, तर या मूल्यांना नाकारण्याचीच भूमिका व्यक्त झाली. दलित साहित्यातील विद्रोह त्या अर्थाने खूप महत्त्वाचा आहे. नामवंत समीक्षक भालचंद्र फडके यांनी विद्रोहाचे केलेले विश्लेषण यादृष्टीने पाहण्यासारखे आहे. दलित लेखकाला नवा माणूस अभिप्रेत असल्यामुळे त्याची भाषा विद्रोहाची आणि सम्यक क्रांतीची असल्याचे त्यांनी म्हटले आहे. विद्रोहाची भूमिका या लेखकांना का घ्यावी लागली, तर समाजव्यवस्थेने व्यक्तीविकासाला वाव दिला नव्हता. खरेतर महाराष्ट्रात अनेकदा या स्वरूपाचे विद्रोही स्वर उमटले होते, पण दलित साहित्यातला विद्रोह हा खूप वेगळा होता. फडक्यांनीच म्हटल्याप्रमाणे 'विद्रोह' हा मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी असतो. एक मूल्यसमूह नाकारून नवा मूल्यसमूह अस्तित्वात यावा म्हणून विद्रोहाचा असतो. म्हणून मूल्यभाव नसेल तर विद्रोहाला काहीही अर्थ नसतो. याचाच अर्थ असा की, जिथे जिथे प्रतिगामी वृत्ती वाढत जाते, जिथे जिथे मानवतेची विटंबना होते; तिथे तिथे विद्रोह जन्माला येतो. दलित साहित्यातला हा विद्रोह 'स्वत्व' शोधासाठी आहे. 'गोलपिठा'त नामदेव ढसाळ म्हणतात,

" नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये.
लुटू नये, काळा गोरा म्हणू नये, तू ब्राह्मण, तू क्षत्रिय,
तू वैश्य, तू शुद्र असे हिणवू नये.
एक तीळ सर्वांनी कुरडून खावा, माणसावरच सूक्त रचावे, माणसाचेच गाणे गावे माणसाने."

तर यशवंत मनोहर 'भीमरावजी आंबेडकर' या कवितेत स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही दलित, शोषितांवर होणारे अन्याय, अत्याचार पाहून म्हणतात,

" आमची लक्तरलेली आयुष्य शिवलीस, तो सुईदोरा कुठे ठेवलास?
अरे, या बेशरम अत्याचारांना फाडताना आम्ही विजयी होऊ, असे शस्त्रसाठे कुठे ठेवलेस?"

ज्योती लांजेवार आपल्या 'माया' कवितेत म्हणतात,

" देऊ केलेलं उष्टं अन्न स्वाभिमानानं नाकारताना
तू शिकून आंबेडकरावानी हो जो बापा."

दलित कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी तर आहेच, पण त्याचबरोबर बाबासाहेबांचा संदेश घेऊन सामाजिक क्रांतीच्या लढ्यात रणशिंग फुंकणारी ही आहे. दलित कवितेला अधिक समर्थ करण्याचे काम बाबुराव बागुल यांनी केले. शोषित-पीडित माणूस त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू होता. देश, देव, धर्म, संस्कृती यापेक्षा माणूस श्रेष्ठ आहे. माणसाचे महत्त्व आणि त्याचे मोठेपण व्यक्त करताना ते म्हणतात,

" वेदा आधी तू होतास
वेदाच्या परमेश्वरा आधी तू होतास
तूच सूर्याला सूर्य म्हटले
आणि सूर्य, सूर्य झाला
तूच चंद्राला चंद्र म्हटले
आणि चंद्र, चंद्र झाला
अवघ्या विश्वाचे नामकरण तू केलेस."

अशा व्यापक मानवतावादाच्या भुमिकेतून दलित जीवनाचे चित्रण यांच्या कवितेतून आलेले आहे. दलित साहित्याने सामान्यातल्या सामान्य माणसाला नायकत्व दिले. त्याला स्वाभिमानाने उभे केले. दलित कवितेतून दलित जीवनाचे अनेक पदर आविष्कृत झाले. भूक आणि अस्पृश्यतेसह विविध स्वरूपाच्या अन्याय आणि अत्याचाराची चर्चा पहिल्यांदाच दलित साहित्याने घडवून आणली. दलित साहित्य हे मुक्ती लढ्यातून उरलेले साहित्य आहे. यासंदर्भात फ.मुं. शिंदे म्हणतात, " मुक्तीलढ्यातून स्फुरलेले साहित्य किती अस्सल आहे, असतं हे दलित साहित्यात दिसून येते. विश्वात्मकता हा साहित्याचा धर्म मानला तरी दलित साहित्यातील विश्वात्मकता भारतीय साहित्यात सापडणार नाही."[८]

नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, राजा ढाले, अर्जुन डांगळे, दया पवार, वामन निंबाळकर, त्र्यंबक सपकाळे यांच्यासह अनेक कवींनी कवितेतून जी अभिव्यक्ती केली ती इथल्या संस्कृती आणि परंपरेच्या विरोधातील होती. " ज्या समाजव्यवस्थेने व ज्या विचारव्यवस्थेने आपले अस्तित्व नाकारले होते, आपल्याला नाकारले होते, आपली प्रतिमा विकृत करून ती प्रमाण मानली होती, ती नाकारने हा विद्रोहाचा आविष्कार आहे."[९] 'पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ट...' असे म्हणण्याचे धाडस या कवितेने केले. बंडाची ही एक अपरिहार्य ठिणगी होती. इतकी टोकदार अभिव्यक्ती मराठी कवितेने पूर्वी पाहिली नव्हती. एका मूक समूहाचा हा आक्रोश होता. हा विद्रोह अनेकांच्या पचनी पडण्यासारखा नव्हता हे खरे, पण तरीही प्रस्थापित मूल्यांचा निषेध करणाऱ्या या प्रवाहाचे जोरदार स्वागत झाले. कारण सामाजिक परिवर्तनासाठी आणि शोषणमुक्त समाजव्यवस्थेसाठी हा विद्रोह आवश्यकच होता. साठोत्तरी दलित कवितेतून व्यक्त झालेला हा विद्रोह अत्यंत प्रामाणिक आणि एका विशिष्ट भूमिकेतून आलेला होता. नामदेव ढसाळ ते प्रज्ञा पवार असा दलित कवितेचा जवळपास पाच दशकांचा प्रवास आपण पाहिला तर तो खूप वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे दिसते. प्रत्येक दशकात या कवितेने नवे रूप धारण केले असले तरी 'विद्रोह' मात्र कायम राहिला आहे. आज खूप मोठ्या प्रमाणात कविता लिहिली जात आहे हे खरे, मात्र पूर्वसुरींचा प्रभाव टाळून व्यक्त होणारे कवी किती? असा प्रश्न आपल्यासमोर उपस्थित होतो. दलित साहित्यातील आत्मशोध महत्त्वाचा घटक आहे. "आत्मशोध म्हणजे लेखक आणि त्याच्या भोवतालचे वास्तव यामधील नातेसंबंध."[१०] अशी आत्मशोधाची व्याख्या दत्ता भगत यांनी केली आहे.

दलित लेखकांच्या पहिल्या दोन पिढय़ांनी अत्यंत सशक्तपणे लेखन केले. आज काळ बदलला आहे. शिक्षणासह सर्वच क्षेत्रात सामाजिकदृष्टय़ा समानता आली असली तरी छुप्या स्वरूपात 'जात' अजूनही अस्तित्वात आहेच आणि जातीसह इतर प्रश्नही कायम आहेत. उलट आज सर्वच समाजात जातीय आणि धार्मिक अस्मिता अधिक टोकदार झाल्याचे चित्र आहे. अर्थात आता हे प्रश्न केवळ दलितांचेच आहेत असेही नाही. जागतिकीकरणोत्तर काळाने सर्वांपुढेच काही पेच निर्माण केले आहेत आणि त्याविषयीची प्रतिक्रिया उमटत आहे. मात्र जी ठळक ओळख साठ-सत्तरच्या दशकात दलित साहित्याने निर्माण केली होती ती मात्र आज काहीशी पुसट झाली आहे. बदलत्या काळाबरोबर विद्रोहाचे स्वरूपही बदलत आहे. कारण मुख्य प्रवाहाला आणि प्रस्थापित अभिरुचीला धक्का देण्याचे जे काम आधी झाले ते आज अपवादानेच होताना दिसते.

## समारोप:-

मराठी साहित्यात महत्वाचा आणि स्वतंत्र प्रभाव टिकवून असलेला दलित साहित्य प्रवाह. फुले-आंबेडकरी विचारधारेने प्रेरित साठोत्तरी काळात साहित्य, समाज, संस्कृती, नकार, विद्रोह, आत्मभान, बांधिलकी या घटकांना कवेत घेत दलित कविता जोरकसपणे अवतरली. तिच्यातील मूल्याधिष्ठितेमुळे तिला एक वेगळे सौंदर्य प्राप्त झाले. साठोत्तरी काळात अवतरलेली फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेची ही कविता, तिच्या आगेमागेच कवितेतील प्रयोग आणि खेळ यालाच नवता आणि क्रांती मानणाऱ्या लघुअनियतकालिकांच्या चळवळीतून आकार घेत असलेल्या समाजविन्मुख, वाचकविन्मुख कवितेच्या पार्श्वभूमीवर, मराठी कवितेतील मुख्य प्रवाह ठरून, मराठी कवितेला समाजाभिमुख करण्यास पूरक ठरली. दलित वाङ्मयाचा उदय १९६० नंतर झाला. चीड आणि बंड ही चळवळीची दोन प्रमुख वैशिष्ट्ये होती; तर वेदना विद्रोह आणि नकार ही या साहित्यातील महत्त्वाची तत्त्वे होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञाननिष्ठा, न्याय आणि लोकशाही ही मूल्य दलित साहित्याचा मूलाधार आहेत. उच्च जात व कनिष्ठ जात अशी विषमता असून 'दलिततत्व' हे या विषमतेचे अपत्य आहे. दलितांवर या विषमतावादी समाजव्यवस्थेने पिढ्यांपिढ्या अन्याय केला. त्याला विरोध करण्यासाठी साहित्यकलेला दलितांनी त्यांच्याविरुद्ध लढण्याचे एक हत्यार बनविले आहे. त्यामुळे दलित लेखकांची जबाबदारी या विषमतेविरुद्ध लेखन करून लढा देणे ही आहे, असे हा साहित्यप्रवाह मानतो.

## निष्कर्ष:-

१) दलित साहित्य १९६० नंतर निर्माण झालेला महत्त्वपूर्ण साहित्यप्रवाह आहे.
२) दलित कवितेवर शाहू-फुले-आंबेडकर विचारांचा प्रभाव आहे.
३) दलित कविता नकार, विद्रोह आणि आत्मशोध या त्रयीवर आधारित आहे.
४) दलित कविता स्वातंत्र्य-समता-बंधुता या मूल्यांचा पुरस्कार करणारी आहे.
५) दलित कवितेचे स्वरूप पारंपरिक कवितेपेक्षा पूर्णत: भिन्न आहे.
६) दलित कविता समष्टीचा आविष्कार आहे.

## संदर्भग्रंथ सूची:-


१) कोतापल्ले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, पृष्ठ क्रमांक ५
२) डोळस अविनाश, आंबेडकरी विचार आणि साहित्य, पृष्ठ क्रमांक १८
३) लिंबाळे शरणकुमार, साठोत्तरी वाङ्.मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती २०९६, पृष्ठ क्रमांक ५
४) संपा. डॉ. कुंभार प्रकाश, दलित साहित्य: काही विचार काही दिशा. कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती २००२, पृष्ठ क्रमांक १६
५) डहाके वसंत बाबाजी, कवितेविषयी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ति १९९९,पृष्ठ क्रमांक २५१
६) मुक्तिबोध शरदचंद्र, दलित साहित्य एक अभ्यास, पृष्ठ क्रमांक१३४
७) डॉ.आंबेडकर बाबासाहेब, विदर्भ साहित्य संघ, नागपूर. १९५६ स्मरणिका पृष्ठ क्रमांक ८
८) शिंदे फ.मुं. संघर्षाचा धर्म, दलित साहित्य चर्चा व चिंतन- संपा. गंगाधर पानतावणे. पृष्ठ क्रमांक १६७
९) डॉ. पानतावणे गंगाधर, साहित्य प्रकृती आणि प्रवृत्ती, पृष्ठ क्रमांक ४०
१०) भगत दत्ता, दलित साहित्य, पृष्ठ क्रमांक ३९


❖❖❖

# 'मराठी कथा दर्शन' मधील विज्ञान कथा

**डॉ. नांगरे कार्तिकी विजयकुमार**
श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा
द्वारा-संजीवनी मेडीकल्स,
मु.पो.चांदा, ता.नेवासा, जि.अहमदनगर 7719804448

वैज्ञानिक सत्याला आधारभूत मानून त्याच्या भविष्यकालीन परिणामाचे कल्पनाचित्र रेखाटणारे साहित्य म्हणजे विज्ञान साहित्य. विज्ञान साहित्य हे आविष्कार, अभिव्यक्ती, भाषा, रचना या बाबतीत ललित साहित्याचा आकृतीबंध अनुसारित असताना वैज्ञानिक संकल्पना आणि सिद्धांत यांना अधोरेखित करते.स्पष्टीकरण देते.साहित्य आणि विज्ञान यांचा हा संबंध परस्पर पोषक असतो.विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मानवी जीवनात जे बदल झाले त्याचे वास्तव प्रतिबिंब तर विज्ञान साहित्यात पडतेच परंतु भविष्यात या बदलांचा प्रवास कसा होऊ शकतो याची दृष्टीही हे साहित्य देते.यातूनच विज्ञानाच्या भविष्यकालीन प्रगतीला मार्गदर्शन मिळते.सहाय्य होते.म्हणूनच विज्ञान साहित्यातील कल्पनाचित्रे काही वर्षात प्रत्यक्षात आल्याची पहावयास मिळतात.

उदा. मानवाचा अंतराळ प्रवास रेखाटणारी विज्ञान कथा अगोदर लिहिली गेली आणि त्यानंतर मानवाने अंतराळ प्रवासाचे स्वप्न सत्यात उतरवले. म्हणूनच अ.ना.पेंडणेकर म्हणतात," भक्कम शास्त्रीय पुरावा आणि बुद्धिनिष्ठ अंदाज यावर विज्ञान कथा आधारलेली असते.विज्ञान ज्या मार्गाने सत्याचा शोध घेते त्या मार्गाचा आदर विज्ञान कथेचा लेखक करतो.जे घडले नाही पण जे घडण्याचा संभव आहे ते तो दाखवतो.जे कधीच घडणार नाही,पण जर ते घडले तर कशाप्रकारे घडेल त्याचे चित्रण लेखक करतो.तो कल्पनाशक्तीच्या मदतीने संभवनीयतेच्या अस्तित्वात शिरतो.विज्ञान कथेतील प्रवास आहे कडून जर कडे असतो."[१]

'मराठी कथा दर्शन' या डॉ.शिरीष लांडगे,डॉ.सुनिताराजे पवार,डॉ.शांताराम चौधरी यांनी संपादित केलेल्या कथासंग्रहात चार भविष्यवेधी विज्ञान कथा आल्या आहेत.या अफाट विश्वात मानवाचे अस्तित्व अगदीच नगण्य आहे.निसर्गाच्या एका छोट्याशा तडाख्याने तो सैरभैर होतो.('अथेन्सचा प्लेग' लेखक-जयंत नारळीकर)आपल्या बुद्धीच्या जोरावर निसर्गाला अंकित करू पाहणारा क्षुद्र मानव आपापसातही स्पर्धा करतो.आपले वर्चस्व सिद्ध करण्याच्या नादात आपण आपलाच घात करीत आहोत याची जाणीव 'पुढल्या हाका'(सुबोध जावडेकर)आणि 'एक शहर मेले त्याची गोष्ट' (लीना मेहंदळे) या कथा करून देतात.खरं तर मानव स्वतःच निसर्गाची एक श्रेष्ठ निर्मिती आहे परंतु आपणच निसर्गाचे चालक आहोत या थाटात तो प्रतिसृष्टी निर्माण करतो.मानवाने निर्मिलेली ही प्रतिसृष्टी किती भ्रष्ट आणि निम्न दर्जाची असते याचा प्रत्यय'एका यंत्रमानवाच्या मनाचा शोध'(लेखक-निरंजन घाटे)या कथेतून येतो.

विज्ञान कथा लेखक आपल्या प्रतिभेच्या दृष्टेपणामुळे भविष्यकाळाचा सटीक वेध घेत असतो जयंत नारळीकर यांची 'अथेन्सचा प्लेग'ही कथा याचे उत्तम उदाहरण आहे.खगोलशास्त्रज्ञ असणाऱ्या नारळीकरांनी इ.स.1985 मध्ये ही कथा लिहिली. कोविड-19 या विषाणूमुळे निर्माण झालेल्या करोनाच्या परिस्थितीशी विलक्षण साम्य दाखवणारी ही कथा आहे.पृथ्वी जवळून जाणाऱ्या कॉमेट रोज या धूमकेतूचा अभ्यास करण्यासाठी राजन,अब्दुल आणि विल्सन हे तीन अंतराळवीर दीड महिन्याचा प्रवास करून कॉमेट रोजच्या

कक्षेत जातात.धुमकेतूने सोडलेल्या पदार्थाचे नमुने गोळा करून आणायचे हा या अंतराळ यात्रेचा उद्देश असतो.खरं तर CS-2 चा यानचालक राजन आणि अंतराळवीर अब्दुल या मोहिमेवर नाराज आहेत.यान स्वयंचलित असल्यामुळे करण्यासारखे काहीही काम नाही.अंतराळ प्रवासात धाडस दाखवून कर्तबगारी करण्याचे दिवस राहिले नाहीत,अशी राजनची तक्रार आहे.यंत्राकडे नुसते बघता बघता ती आपल्याला हिप्नोटाईझ करतील की काय? आपली अवस्था अंधार कोठडीतील कायद्याप्रमाणे भयंकर झाली आहे अशी खंत राजन अब्दुलला बोलून दाखवतो. धुमकेतूने सोडलेल्या पदार्थाचे नमुने गोळा करण्यासाठी अंतराळात गेलेल्या अब्दुलला 25 मिनिटातच मळमळ होते,चक्कर येऊ लागते,हृदय व नाडीचे ठोके भराभर पडू लागतात,ब्लड प्रेशर वेगाने वाढते त्यामुळे विल्सन आणि राजन त्याला यानाच्या आयसोलेशन चेंबर मध्ये ठेवतात.जवळच्या स्पेस स्टेशन नंबर 16 वरून त्वरित वैद्यकीय मदत मागवण्यात येते.परंतु 13 डिसेंबर 2180 रोजी म्हणजे अपघातानंतर आठ दिवसात अब्दुल चे निधन होते.

अब्दुलच्या मृत्यूचे रहस्य उकलण्यासाठी वरिष्ठ शास्त्रज्ञांची एक समिती नियुक्त करण्यात येते.या समितीत निष्णात डॉक्टर,अंतराळ शास्त्रज्ञ,जीव शास्त्रज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ यांचा समावेश होता.डॉक्टर विनोद हा रोगांवर अभ्यास करणारा महत्त्वाचा तज्ञ असला तरी मळमळ, डोकेदुखी, घसा, जीभ, लाल भडक होणे, अनियमित दुर्गंधीने भरलेला श्वास, शिंका, खोकला, ओकारी, शरीर उष्ण होणे, फोड, रॅश, तहान डायरीया, वाढती अशक्तता आणि मृत्यू ही लक्षणे पाहून तोही संभ्रमात पडतो. कारण ही लक्षणे कुठल्याही एका रोगाच्या साच्यात बसत नव्हती. परिस्थितीजन्य पुराव्यानुसार कॉमेट रोज मधून निघालेल्या वस्तूतच या रोगाचे कारण असावे असे रॉबर्ट लीचे मत होते.हे पडताळून पाहण्यासाठी माणूस किंवा प्राण्यावर प्रयोग करून माहिती घेणे जीवशास्त्रज्ञ फॅरेल्लीला महत्त्वाचे वाटत होते. हा रोग पृथ्वीवर पसरला तर त्यावर निदान उपचार करण्यासाठी हे आवश्यक आहे हे विनोदने ही लक्षात आणून दिल्यानंतर त्या दृष्टीने पाऊले उचलण्यात आली.कॉमेट रोजने मागे सोडलेल्या पदार्थांमध्येच या रोगाचा व्हायरस होता.पृथ्वी बाहेर लांबच्या ठिकाणी या व्हायरसचा जन्म झाला असणार यावरून पृथ्वीपलीकडेही जीवसृष्टी आहे हे सबळ पुराव्यांनी सिद्ध होत होते. हा धूमकेतू ख्रिस्त पूर्व इ.स. 430 मध्ये पृथ्वी जवळ आला त्यावेळी अथेन्स शहरात प्लेगची साथ पसरली या साथीचा मुकाबला अथेन्स संस्कृतीला करता आला नाही या या विषाणूंचा सामना आत्ताच्या संस्कृतीला करता येईल का? असा प्रश्न वाचकांसमोर निर्माण करणारी ही कथा एक उत्कृष्ट विज्ञान कथा ठरते.प्रास्ताविकामध्ये संपादक लिहितात, “विज्ञान कथांतून लेखकांच्या प्रतिमेचा, द्रष्टेपणाचा प्रत्यय येत असतो. त्याचा प्रत्यय 'अथेन्सचा प्लेग' या कथेतून येतो. जयंत नारळीकर हे एक खगोल शास्त्रज्ञ आहेत. ते विज्ञान कथाकार आहेत. त्यांच्या कथालेखनापूर्वी मराठीत अद्भुत, कल्पित, चमत्कृतिपूर्ण विज्ञान कथा लिहिल्या गेल्या. नारळीकरांनी विज्ञानाला मराठी साहित्यात सुप्रतिष्ठित केले. विज्ञान कथेला वाङ्मयीनदृष्ट्या सिद्धही केले.”[२]

नैसर्गिक आपत्ती बरोबरच मानवाच्या स्वार्थी,संधीसाधू आणि वर्चस्व सिद्ध करण्याच्या वृत्तीमुळे माणूस स्वतःसाठीच संकट निर्माण करतो.शस्त्रास्त्र निर्मिती करणाऱ्या कारखान्याचे नियंत्रण करणाऱ्या कंपनीच्या अमेरिकेतील बोस्टन मधील ऑफिसात विनय गुप्ते एका महत्त्वाच्या पदावर कार्यरत होता.पत्नी रेणू,मुले रोहित आणि अमेय असे त्याचे चौकोनी कुटुंब होते.मूळचा भारतीय असणारा विनय पंधरा वर्षांपूर्वी ग्रीन कार्ड मिळाल्यापासून मनाने पूर्णतः अमेरिकन झाला होता.रेणूंना-त्याच्या बायकोन अमेरिकन जीवनपद्धती पूर्णपणे आत्मसात केली होती.त्याची मुले तर अमेरिकेतच जन्माला आली होती.भारताशी असलेलं त्यांचं नातं हळूहळू तुटत चाललं होत. गेल्या चार वर्षात त्याला भारतात जाणंही जमलं नव्हतं.दहा-बारा वर्षांपूर्वी शस्त्रास्र बनविण्याच्या कंपनीत नोकरी घेतली तेव्हा सुरुवातीच्या काळात त्याचे मन त्याला

खात असे.काळाच्या ओघात हळूहळू ही जाणीव बोथट होत गेली.कंपनीच्या अधिपत्याखाली येणाऱ्या कारखान्यांना मनुष्यबळ व इतर सामग्री व्यवस्थितपणे मिळते की नाही हे पाहणे हेच विनयचे काम होते.शिवाय हे मटेरियल मॅनेजमेंट करताना प्रत्येक कच्च्या मालाला एक सांकेतिक नाव किंवा कोडनंबर दिलेला असे.आर.डी.एक्स.म्हणजे सिक्स फोर एट वन. या व अशा कोडवर्डमुळे विनयची अवस्था दृष्टी आड सृष्टी अशी झाली होती.आपल्या हातून काय घडतय हे डोळे उघडून पहायची संधी पूर्वी इराक युद्धाने त्याला दिली होती.इराक युद्धात ठार झालेल्या निरपराध नागरिकांचे आणि हात पाय तुटलेल्या बालकांचे फोटो 'लाईफ'आणि'टाईम' मध्ये पाहून त्याला गलबल्यासारखं झालं होतं.पण लगेचच अमेरिकेच्या वेगवान जीवनात तो हे विसरून गेला.

विनयच्या या कंपनीने डीसीएच फोर टू टू प्रकल्पापासून त्याला दूर केले आणि त्याच्या जाणीवला पहिला धक्का बसला.प्रकल्पाबद्दल अधिक माहिती मिळवता,प्रकल्पात कोणताही भारतीय सहभागी नसून हा प्रकल्प भारत विरोधी असल्याची विनयची खात्री झाली.इथं काम करत असलेले भारतीय त्या प्रकल्पाला विरोध करतील या भीतीनेच तुम्ही ही खबरदारी घेतली असे त्याने आपला बॉस डग्लसला स्पष्टपणे सांगितले.तेव्हा 'भारतविरोधी प्रकल्पात सहभागी होताना तुझ्या सद्सद्विवेक बुद्धीची टोचणी तुला लागली नसती? कुड यु हॅव पार्टिसिपेटेड इन इट होल हार्टेडली?' या डग्लसने विचारलेल्या प्रश्नाने त्याच्या अंतर्मनाला जागे केले.येथे तयार केलेली बंदुकीची गोळी सैन्यात भरती झालेल्या त्याच्या शाळा सोबत्याच्या छातीचा वेध घेईल किंवा एखादे क्षेपणास्त्र पुण्यातील त्याच्या घरावर पडून त्याचे वृद्ध आई-वडील,भाऊ-सौरभ किंवा भावजई-अपर्णा, त्यांच्याकडे येणारे नवीन बाळ यांना ठार करील या विचाराने तो हादरला आणि या प्रकल्पालाच नव्हे तर शस्त्रास्त्र निर्मितीलाच विरोध करण्याचा त्याने निर्णय घेतला. विनयचा हा प्रवास अ-संवेदनशीलता ते वेदनशीलता, अनैतिक-नैतिक अशा द्वंद्वातून शाश्वत मूल्यांकडे जाणारा आहे. जागतिक वातावरणाशी नाते सांगणारी ही कथा माणसामाणसांतील प्रवृत्तींचा वेध घेत शांततेचे महत्त्व प्रतिपादन करते. वैश्विक शांततेसाठी कृतियुक्त सहभागाची आवश्यकता स्पष्ट करणारी ही कथा चिरंतन, शाश्वत मुल्यांचा निर्देश देते.[३]

'एक शहर मेले त्याची गोष्ट' या कथेतून लीना मेहंदळे यांनी औद्योगिकीकरण,आधुनिकीकरण आणि यांत्रिकीकरण यांच्या अतिरेकामुळे मानवाला कोणत्या संकटांना सामोरे जावे लागू शकते याचे शब्दचित्र रेखाटले आहे. सोळाव्या शतकापासून एकविसाव्या शतकापर्यंत होणारी मानवाची प्रगती आणि अधोगती रेखाटताना सृष्टी चक्रातील प्रत्येक घटक वनस्पती किती महत्त्वाची आहे याची जाणीव या कथेतून व्यक्त होते.

सोळाव्या शतकात तीनशे-चारशे वर्ष आयुर्मान लाभलेल्या झाडाच्या आणि विविध वृक्षवेलीच्या सानिध्यात निसर्ग आयुष्यसन्मूख आयुष्य जगणाऱ्या हरियाणाच्या वस्तीत चामड्याच्या वस्तू बनवणारे कारागीर होते.त्यासाठी लागणारा हिरडा वस्तीच्या पूर्वेकडे असणाऱ्या घनदाट जंगलातून मिळायचा.एवढेच नव्हे तर वस्तीतील लोकांच्या अनेक छोट्या मोठ्या गरजा याच जंगल आणि गावाशेजारील शेतीतून पूर्ण व्हायच्या.हळूहळू वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविणे अशक्य झाले आणि म्हणूनच हरियाणे निवडक चाळीस परिवारांसह दुसरीकडे चंदरपूर गाव वसवले. हे करीत असताना मूळ वस्तीतील जैव विविधतेचा वसा त्याने मधुकरच्या आईच्या साह्याने नव्या गावात रुजवला कारण मानवाला मृत्यूच्या खाईत नेणाऱ्या महामारीवरचा उपाय याच झाड,वेली,तृणांकडे होता.सोळाव्या आणि सतराव्या शतकात आलेल्या रोगाच्या साथीवर मधुकरच्या आईने व तिचा शिष्य चंदर यांनी याच जंगलातील वनस्पतीच्या-असोकाच्या साह्याने मात केली.

काळाच्या ओघात चंदरपूर या खेड्याचे मोठ्या शहरात रूपांतर झाले चाळीस परिवारांनी वसवलेल्या गावाची लोकसंख्या चाळीस लाखाच्या घरात गेली. चंदरपूर आता देशाची तिसरी राजधानी बनली. वाढत्या लोकसंख्येला अधिक जागा आणि मोठ्या रस्त्यांची गरज भासू लागली. त्यासाठी शेकडो वर्षापूर्वीची झाडे कापण्याची आवश्यकता निर्माण झाली.काही मोजक्यात विचारी लोकांचा विरोध मोडून झाडे कापण्याचा निर्णय प्रत्यक्षात आला कारण झाडांबरोबर संवाद साधण्याची क्षमता एकविसाव्या शतकातील मानवाने गमावली होती. म्हणूनच एकविसाव्या शतकात आलेल्या महामारीला चंदरपूर तोंड देऊ शकले नाही. तेथील सगळे लोक मृत्यू पावले किंवा दुसरीकडे निघून गेले. त्यानंतर अनेक वर्षांनी माणसांना हरीयाची गोष्ट समजते. रोग निवारणातील वृक्षांचे महत्त्व लक्षात येते. माणसे चंदरपूर शहरात वृक्षारोपण करू लागतात. ही कथा भूत, वर्तमान व भविष्याचा वेध घेत जैवविविधतेचे, वृक्ष संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करते.पृथ्वीवरील पर्यावरणीय समतोलाचे महत्त्व स्पष्ट करते.

'एका यंत्रमानवाच्या मनाचा शोध' ही निरंजन घाटे यांची विज्ञान कथा सदानंद आणि यंत्रमानव अशा मोजक्याच व्यक्तीचित्रणामधून आकार घेते यंत्रमानव हा स्मरणशक्ती, कार्यशक्ती ज्ञानार्जन, ग्रहणक्षमता या सर्व बाबतीत मानवापेक्षा श्रेष्ठ आहे. संपर्कात आलेल्या मानवाला प्रश्न विचारून स्वतःमध्ये सुधारणा घडवून आणणे असा कार्यक्रम यंत्रमानवाच्या मेंदूत भरला असल्यामुळे तो सदानंद व त्याच्या बायकोला सतत प्रश्न विचारत असे. यानुसार त्याने सदानंदला मानवी मनाबद्दल प्रश्न विचारला तेव्हा सदानंदने त्यालाच मानवी मनाबद्दल माहिती मिळवायला सांगितली आणि त्याने ती मिळवली! ही पण त्या माहितीचा योग्य अर्थ तो लावू शकला नाही. 'यंत्रमानवाला मन का नसतं?' या प्रश्नाचं उत्तर देताना सदानंद म्हणतो, "बेटा, तुझ्या डोक्यात यांत्रिक संगणक आहे.तो पहिल्यांदा निर्माण झाला त्याला अजून शंभर वर्ष पूर्ण व्हायची आहेत.मानवी मेंदूमागे गेल्या ४ अब्ज वर्षांत झालेली सजीव उत्क्रांती आहे. तेव्हा तुला जर 'मन' हवेच असेल तर ३।।-४ अब्ज वर्ष वाट बघ.तोपर्यंत तू टिकलास, तर तुला तुझ्या प्रश्नाचं उत्तर नक्की मिळेल असं वाटत. आम्हाला मात्र ते मिळालेलं नाही हे लक्षात ठेव. दुसर म्हणजे, ह्या उत्क्रांतीने मानवाला नको ते विसरायला आणि हवं तेच स्मरणात ठेवायला शिकवलं. जोपर्यंत तुम्ही हे शिकत नाही, तोपर्यंत तुम्ही कितीही माणसांसारखे दिसलात तरी ते वरवरचं साम्य असेल,"[४]

मानव ही निसर्गाची एक उत्तम निर्मिती आहे हे सांगणारी ही कथा आणि मराठी कथा दर्शन मधील सर्वच कथा विज्ञानाच्या मर्यादा दाखवून देतात.

## संदर्भ


१. 'विज्ञान साहित्य आणि संकल्पना' संपा. व.दि.कुलकर्णी, निरंजन घाटे निहार प्रकाशन, प्र.आ.ऑक्टो.९० पृ.क्र.१
२. 'मराठी कथा दर्शन'संपा. शिरीष लांडगे,सुनीता राजे पवार,शांताराम चौधरी रुद्र प्रकाशन, प्र.आ.डिसेंबर २०२० पृ.क्र.११
३. तत्रैव पृ.क्र.१२
४. तत्रैव पृ.क्र.६२


❖❖❖

# साठोत्तरी मराठी ग्रामीण साहित्याचे विशेष

**प्रा. डॉ. सुषमा शंकरराव प्रधान**
मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंबड,
जिल्हा , जालना.
मो . नं. 9405485502 Em - drsushamapradhan@gmail.com

मराठी साहित्याच्या क्षेत्रात ग्रामीण साहित्याने आपली वेगळी ओळख 1925 पासून दाखवून दिली 1945 पासून ग्रामीण साहित्य बदलत गेले पुढे ग्रामीण साहित्य चळवळ नावारूपाला आलेली दिसते. ग्रामीण साहित्याच्या वेळेला पुढे नेण्याचे काम महात्मा फुले यांनी केलेले आहे. "स्वतंत्र तर काळात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार झपाट्याने झाला अभ्यासक्रमाच्या निमित्ताने किंवा आवड म्हणून साहित्य वाचले जाऊ लागले. ज्यामुळे त्यांना आपलं गाव, आपली माणसं, आपल्याशिवाय आपली माती,त्यांची सुख -दुख, त्यांचे यश -अपयश इत्यादीचे दर्शन ग्रामीण साहित्यातून घडू लागले. ग्रामीण भागात जन्मलेली आणि वाढलेली पिढी त्यात होती स्वतंत्रपूर्वकाळात रुचिपालट म्हणून लिहिलेले जानपद साहित्य ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रित करण्यासाठी असमर्थ ठरले. रविकिरण मंडळ आणि रविकिरण मंडळाच्या समकालीन कवींनी ग्रामीण जीवन असे आहे असे ग्राह्य धरून ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे ग ल ठोकळ ग ह पाटील रवा दिघे यांना ग्रामीण जीवनाचा अनुभव घेता ते शिक्षण नोकरी व्यवसायासाठी शहरात स्थिरावले परिणाम परिवर्तन साहित्याच्या नोंदणी होऊ लागल्या."[1] स्वातंत्र्योत्तर शिक्षणाचा प्रचार प्रसार झाला याच कालखंडात समाजभान साहित्य निर्मितीला अधिक चालना मिळाली ग्रामीण साहित्याची कल्पना या संकल्पनेचे स्वरूप व्याप्ती सामर्थ्य मर्यादा आदी चळवळ इत्यादीचा अभ्यास ग्रामीण साहित्यात येणे महत्त्वाचे आहे साठोत्तरी ग्रामीण साहित्यात नागर ते खेड्यापाड्यापर्यंत बोलीभाषा वापरली जाताना दिसते.

साहित्यातून आलेला समाजजीवन निसर्ग वर्णन ग्रामीण भागातील वातावरण घटना प्रसंग येताना दिसतात ग्रामीण कथा कादंबरीत आधार घटक यांचा प्रतिसाद उमटताना दिसतो. संस्कृतीचा परिचय जवळून घेणारे ग्रामीण साहित्य होय संस्कृती आणि भाषा याबद्दल डॉ. द.ता. भोसले म्हणतात, "लेखकांचा ग्रामीणता असलेल्यांची वाणीत ग्रामीण साहित्य पिढीमध्ये महत्त्वाचे असते. संस्कृतीला केंद्रस्थानी म्हणून आलेले अनुभव ग्रामीण साहित्याच्या माध्यमातून त्याचा तुलनात्मक वापर झाला ग्रामीण तिचे संस्कार असलेले लेखकाचे व्यक्तिमत्व त्यातून ग्रामीण साहित्य निर्मिती होते"[2] ग्रामीण साहित्यातून वरील सर्व गोष्टी येताना दिसतात ग्रामीण साहित्यातून वास्तववाद उमटताना दिसतो व्यंकटेश माडगूळकर यांच्या बनगरवाडी या प्रादेशिक कादंबरीचे वाचकांकडून विशेषतः कौतुक झालेले दिसते गारंबीचा बापू ही प्रादेशिक कादंबरी ही विशेष गाजली शंकर पाटील यांच्या अनेक ग्रामीण कथांनाही खूप प्रसिद्धी मिळाली वेगवेगळ्या काळात विशिष्ट क्रमाने त्या बदलत गेल्या मात्र जनमानसाच्या मनावर आपली वेगळी छाप टाकून गेल्या.

अतिप्राचीन काळापासून चालत आलेली परंपरा, संस्कार, संस्कृती यांचा गाभाच मूळ ग्रामीण संस्कृतीत पहावयास मिळते .हीच ग्रामीण संस्कृती ग्रामीण साहित्यातून सहजतेने पहावयास येते. भारत देश कृषी प्रधान असल्याने कृषी प्रधानतेचेच प्रतिबिंब ग्रामीण संस्कृतीत उमटलेले दिसते र. वा. दिघे यांच्या :सराई '(1994) दिघे यांची आई आहे शेतात 1956 गो. नी. दांडेकर 'पवनाकाठच्या धोंडी'( 1955) र.वा.

दिघे 'पडरे पाण्या '(1958 )व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' (1915) इत्यादी सर्व कादंबऱ्यातून व्यक्ती वर्णाने निसर्ग, घटना,पाऊस,पारंपारिकता,दुष्काळ, प्राणी, वातावरण,खान -पान, स्वभाव धर्म इत्यादी सर्व गोष्टी अतिशय व्यापक आशयाने मांडलेली दिसतात.सोबतच राजकारण, सत्ता, संघर्ष,गाव पातळीवरचा शंकर पाटलांच्या 'टारफुला '(1964) मध्ये येताना दिसतो.

'या नभाने या भुईला
दान द्यावे आणि
जोंधळ्याच्या ताटांना
चांदणे लगडावे '

या ओळीत निसर्ग उत्कटतेने उभा आहे. ना. धो. महानोर यांच्या रानातल्या कविता कृषी जीवन संवेदना भावना घेऊन येतात. मराठी कवितेमध्ये केशवसुतांनी स्वर्ग आणि मरूभूमी म्हणजे जग यांच्या मिलनाचे स्वप्न वारंवार मांडत आहे. महानोर यांनी हेच स्वप्न वेगळ्या संस्कृती धारेच्या संस्कारातून पाहिले एवढाच फरक म्हणता येईल.आनंद यादवांच्या हिरवी जग मधील कविता आणि विठ्ठल वाघांच्या 'काया मातीत मातीत 'सारखी कविता या कलाकृती मधून कृषी प्रधानता आदीम संवेदनांच्या उत्कटत्वातून झालेली दिसेल."[3] निसर्गाचा सौंदर्यविष्कार ग्रामीण कवितेतून प्रतिबिंबित झालेला दिसतो. ग्रामीण जीवनात असणारा निरपेक्षपणा मोठ्या प्रमाणात जाणवतो.पारंपारिक तिथून अनेक समज गैरसमज रूढ होतानाही दिसतात. पारंपारिकतेने जपलेला प्रत्येक भाग ग्रामीण साहित्याचा आत्मा ठरतो होळी, गुढीपाडवा,बैलपोळा, नागपंचमी, दसरा,दिवाळी हे सर्व सण ग्रामीण भागात मोठ्या उत्साहाने पार पाडले जातात. सणाविषयीच्या असलेल्या कथा त्या त्या घटनेची निगडित असतात. बैलपोळा यासारख्या सणाला ग्रामीण भागात उत्सवाचे स्वरूप दिलेले असते सणांवर श्रद्धा असतेच,परंतू सामूहिकतेने काही उत्सवाचे आयोजनही असते. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' कादंबरीत बेदरांच्या सणाला म्हसाड,रेड,बैल,पाडी म्हालिंगा या साऱ्यांना नदीच्या पाण्यात येथे च्या आंघोळ घालून मारवा उल्हासित होतो. यादवांच्या 'गोतावळा' मधील ही परात पर भावना खरोखरीच तपासण्यासारखी आहे.लोकजीवनाच्या अंगाने सण येतो त्याची एक पारंपारिक श्रद्धा मनात परंपरेने रुजलेली असते."[4]

लोकोसवातील ही एक महत्त्वपूर्ण विशिष्टताच म्हणता येईल.त्यामुळे साहित्यकृतीचा दर्जा ही वाढत जातो मराठी ग्रामीण साहित्यात लोकसाहित्याची प्रतिबिंब ठळकपणे उमटलेली दिसते कृषी प्रधानता सामूहिक मनाच्या रूढी परंपरा समाज गैरसमज  लोकाविष्कार हे सर्व लोक साहित्याचाच एक भाग होईल. त्यांचेच प्रभावी प्रतिबिंब ग्रामीण साहित्यातून सातत्याने स्पष्टपणे होताना दिसते लोकसाहित्यातूनच मूलभूत मांडणी ग्रामीण साहित्यात होत गेली. व त्यांची मूल्य संकल्पना अधिक व्यापक होत गेली.

ऋग्वेदापासून समकालीन ग्रामीण जीवनापर्यंत ग्रामीण समाजाचे स्वरूप ग्रामीण साहित्यातून विस्तृतपणे येताना दिसतात. मराठी साहित्यात प्रादेशिक आणि ग्रामीण कथात्मक साहित्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात झालेली दिसते पेंडसे, दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथा -कादंबरीतून ग्रामजीवनाची विविध रूपे प्रकट त्यांना दिसतात. कवितेतून ग्रामीण अनुभव विश्व अविष्कृत होताना दिसते. बहिणाबाईच्या कवितेतून ग्रामीण अनुभव विश्व अविष्कृत होताना दिसते. कवितेचा आस्वाद घेता येतो. पूर्वसुरीच्या ग्रामीण कवितेविषयी आनंद यादवांच्या मनात असमाधान वाटत होते  'असमाधान' या कवितेच्या निर्मितीला प्रेरक ठरले या कवितेला नाकारलेल्या सुद्धा पूर्वपरंपरा नव्हती. "तिची बहिणाबाईची गाणी  आणि सुगीपर्यंतचे सूत्र जोडून घ्यावे लागते. ते केवळ विषय साम्यामुळेच. तिची उत्पत्ती अशी उत्तर परंपरेची निर्माण झाली नाही मात्र येथून पुढील काळात अनेक कवींनी निसंकोचपणे  आपल्या ग्रामीण

जीवनानुभवांचा आविष्कार केला या ग्रामीण काव्य निर्मितीस यादवांच्या कवितेने भूमी निर्माण करून दिली असे म्हणावे लागेल."[5] विठ्ठल वाघ, ना. धो. महानोर, शंकर पाटील, एकनाथ देशमुख, राजा मुकुंद, ग.ल. ठोकळ, गणेश कुडे, श्याम कुलकर्णी इत्यादी अनेक ग्रामीण कवींची कविता नितांत कष्ट निसर्ग जीवनानुभव यांचे वास्तव पूर्ण चित्रण करताना दिसते.

"शेती संस्कृती हा ग्रामीण साहित्याचा विभाज्य घटक आहे. मात्र आज मोठ्या प्रमाणात ग्रामीण जीवनात परिवर्तन होताना दिसत आहे. लोकशाही मुळे आज आचार -विचार बदललेली दिसतात. साखर कारखान्यामुळे यंत्र युग आले.शेतीतही यंत्राचा वापर आला.खऱ्या अर्थाने ग्रामीण माणूस अंतर्बाह्य विचाराने किती बदलला आहे हा मूळ प्रश्न आहे. समाज सुधारकांच्या चळवळीला दीडशेपेक्षा अनेक वर्ष होऊनही जातीयुद्ध अजूनही संपत नाही उलट तीव्र होत आहे. दुर्दैवाने जाती केंद्रे आणि अर्थ केंद्रे एकवटू पाहत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील संघर्ष सबल आणि दुर्बल यांच्यातील ठरू पाहत आहे. सबलांच्या झुंडी एकटा असलेला दुर्बल माणूस यांच्यातला हा संघर्ष ठरतो आहे."[6]

हा संघर्ष मराठी ग्रामीण साहित्यातून येताना दिसत नाही. जातिव्यवस्थेतील संघर्षाचे चित्र स्पष्टपणे मांडणारी 'झूल' ही कादंबरी प्रा. भालचंद्र नेमाडे यांची संख्येने कमी आहे.ग्रामीण समाजात अर्थ केंद्र जाती- केंद्र इत्यादी सर्व प्रश्न ग्रामीण लेखकांनी प्रकाश झोतात आणणे गरजेचे आहे. ग्रामीण जीवनातील वर्ण संघर्ष नागरी जीवनातही आलेला दिसतो.

"प्राचीन साहित्यातील ग्रामीण साहित्याच्या पाऊलखुणांचा वेध घेतल्यानंतर असे जाणवले की, संत साहित्यातही त्याची पाळे- मुळे दडलेली आहे. हे पटवून देताना कोत्ता पल्ले म्हणतात की, ज्या ग्रामव्यवस्थेमध्ये हे संत कवी राहतात, ती ग्रामव्यवस्था त्यांच्या काव्यातून अजाणता का होईना उत्कट प्रकटते. ज्याप्रमाणे ग्रामव्यवस्था प्रकट होते, त्याप्रमाणे ग्रामीण व्यवस्थेतून आकारित झालेले मनोविश्व ही कधी कधी संत साहित्यातून प्रकट होऊन जाते. आणि या अर्थाने ग्रामीणतेच्या काही खुणा संत वाङ्मयात सापडतात."[7] ग्रामीण साहित्यात बोलीभाषा,म्हणी,वाक्यप्रचार अधिक प्रमाणात येताना दिसते. पुढे ते शाहिरी वाङ्मयातूनही येताना दिसतात. ग्रामीण समाज व्यथा, वेदना, भूक, दारिद्र्य इत्यादी विषयी ग्रामीण साहित्यात पोट- तिडकी ने विचार मांडताना दिसतात.

जागतिकीकरणाच्या काळात ग्रामीण व्यक्तीचे विशेषतः शेतकऱ्यांचे प्रश्न अधिक गंभीर झालेले दिसतात. औद्योगिकीकरणामुळे शहरांकडे माणसांचा लोंढा वाहू लागला.परिणामी हजारो खेडी, शेती नष्ट होऊ लागली आहे.शेतीच्या जागेवर बंगले व कारखाने उभे राहिलेली दिसतात. " मानवी मनाचा शब्दरूप आविष्कार इथून तिथे एकच असला तरी,त्या त्या देशाचा इतिहास, भूगोल, धर्म, सामाजिक स्थिती, भौगोलिक परिस्थिती, संस्कृती- समाज रचना यातून तेथील जगणे विशिष्ट स्वरूपात जन्म घेत असते आणि 'वैशिष्ट्यांचा आविष्कार 'जेव्हा शब्द रूप घेतो, तेव्हा ते साहित्य अनेक अर्थाने व्यापक असे होते."[8] तसेच त्यात विशेषत्वाने भौगोलिक आणि भाषिक संदर्भ कृषी प्रधान जीवन संदर्भ परंपरांचा संदर्भ इत्यादी निर्दिष्ट केलेले असतात.

ग्रामीण माणसांच्या शोषणात अनेक वृत्ती प्रवृत्ती आढळतात. तसेच ग्रामीण कष्टकरी समाजाला संघर्ष सिद्ध करण्यासाठी आणि ग्रामीण साहित्यकार पुढे सरसावताना दिसतात. शेतकरी,शेतमजूर यांच्या समग्र जीवनासंबंधी त्यांना दुःखातून दूर करण्यासाठी महात्मा फुलेंनी सातत्याने प्रयत्न केलेला दिसतो. तसेच भारतीय समाजाची विखंडात्मक रचना शोषणाला आणि विषमतेला संधी देणारी आहे. त्यामुळे जाती-जातीमध्ये विभाजित झालेल्या समूहाने जात संपवून संघटित व्हावे, त्याशिवाय ग्रामीण जीवनात परिवर्तन अशक्य आहे. शोषण थांबविण्यासाठी समता, सामाजिक न्याय आधारित समाज असावा, हा विचार महात्मा

फुले यांच्या ग्रामीण माणसांच्या परिवर्तनासाठी राजर्षी शाहू, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बलुतेदार, शेतमजुर यांच्या शोषणा विरुद्ध स्वातंत्र्य, समता, न्यायाचा विचार मांडण्यात आला आहे. ही त्यांची चळवळ सुद्धा ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे."[9] वेगवेगळ्या चळवळीतून शेतीचा संबंध ग्रामीण जीवनाच्या संबंधी अनेक प्रश्न मानण्यात आले आहे व ग्रामीण साहित्याला एक बळ मिळत गेले. ग्रामीण ही संकल्पना ग्रामजीवनातून निर्माण झालेली आहे.वास्तव जीवनाचे प्रतिबिंब त्यातून येताना दिसते. एकूणच ग्रामीण जीवनातून फुलणारे, वास्तवतेतून साकारणारी साहित्य हा ग्रामीण साहित्य मनाला भुरळ टाकणारे ठरते.

## समारोप -

पूर्वी म्हटल्याप्रमाणे ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा संत साहित्यातील सापडतात. तसेच महानुभव संप्रदायातील कथेतही ग्रामीणता येताना दिसते. ग्रामीणत्वाचा खरा आविष्कार महात्मा फुले यांच्या लिखाणातून जाणवतो. शोषित, वंचित, कष्टकरी व्यक्ती यांच्या उद्धारासाठी त्यांनी अनेक सामाजिक कार्य केले. ग्राम व ग्रामीण जीवन हा ग्रामीण साहित्याचा केंद्रबिंदू आहे.ग्रामीण समाजाच्या जाणिवा रा. रं.बोराडे, आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले इत्यादी अनेक साहित्यिकांनी आपल्या लेखणीतून मांडल्या आहेत.

नवकथा कादंबरीतून मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग ग्रामीण साहित्याकडे वळताना दिसत आहे. या माध्यमातून तो ग्रामीण साहित्य- चळवळीशी ही निगडित आहे.अनेक समस्या वर उपाय शोधण्याचे ते काम करताना दिसतात. अनेक दिग्गज उदाहरणार्थ व्यंकटेश - माडगूळकर,शंकर पाटील, आनंद यादव,रा. रं.बोराडे,बाबा पाटील नागनाथ कोत्तापल्ले, चंद्रकुमार नलगे वासुदेव मुलाटे,भास्कर चंदनशिव, बंडू तुपे,विश्वास पाटील, प्र. ई. सोनकांबळे, ना.धो. महानोर, विठ्ठल वाघ इत्यादी लेखकांनी मराठी साहित्यात असणाऱ्या ग्रामीण साहित्यातही ग्रामीण साहित्यिकांनी अनेक वेगवेगळे विषय यशस्वीपणे हाताळले. त्यातही त्यांनी प्रगतीस साधलेली दिसते.ग्राम -जीवनाचे अनेक पैलू सूक्ष्म निरीक्षणासह वास्तव रूपात आज प्रकट होताना दिसतात. यातच त्यांची यश आहे,हे सिद्ध होते.

## निष्कर्ष -

1) मराठी मातीशी निगडित असलेले वास्तव जीवन म्हणजे ग्रामीण साहित्य होय.

2) ग्रामीण साहित्यात वापरली जाणारी बोलीभाषा अपरिहार्य स्वरूपात असते.

3) ग्रामीण साहित्याला निर्मिती मागील बदलत्या प्रेरणांना नवनवीन उद्देश घेऊन येणाऱ्या आहेत.

4) नव्या प्रवृत्ती, नवाविष्कार, नवा लेखन प्रयोग याची दखल घेण्याचे प्रवृत्ती ही ग्रामीण साहित्यावरील समीक्षेत आढळताना दिसते.

5) ग्रामीण साहित्यातील निसर्ग परस्पर संबंध साम्य भेद, सांस्कृतिक स्थान ग्रामजीवनाचे स्वरूप इत्यादी ग्रामीण साहित्य समीक्षेतही प्रतिबिंबित झालेले दिसतात.

6) ग्रामीण साहित्यातून अभिव्यक्त होणारे समाज वास्तव सामाजिक दृष्टिकोनातून निश्चितच करता येईल.

7) ग्रामीण साहित्य ग्रामीणत्वाचे उच्च कोटीचे दर्शन घडवते.

8) मराठी साहित्य व ग्रामीण साहित्य यांचे परस्पर संबंध निष्ठ स्वरूपाचे आहे.

9) ग्रामीण संस्कृती,कृषी केंद्रित ग्रामव्यवस्था, निसर्ग सन्मुखता विशेषत्वाने ग्रामीण साहित्यात विस्ताराने आढळते.

10) ग्रामीण साहित्यात ग्रामविश्व, ग्रामरचना ग्रामव्यवस्था अतिशय महत्त्वपूर्ण ठरते.

## संदर्भ -


1) सातपुते पोपट, शेळके भास्कर, कसबे मिलिंद (संपादक) : चळवळ आणि साहित्य मा.रा. लामखेड गौरव ग्रंथ, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पृष्ठ क्रमांक 212

2) भोसले डॉ. द.ता. : ग्रामीण साहित्य एक चिंतन,मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथम आवृत्ती - 1988 पृष्ठ क्रमांक 44

3) पाटील मोहन : ग्रामीण साहित्य आणि संस्कृती,स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी सुधारित आवृत्ती, 15 ऑगस्ट 2008 पृष्ठ क्रमांक 39

4) तत्त्रेव : पृष्ठ क्रमां 48

5) प्रा. नलगे चंद्रकुमार : ग्रामीण वाड्मयाचा इतिहास,रिया पब्लिकेशन्स,कोल्हापूर,आवृत्ती 29 ऑगस्ट 2013, पृष्ठ क्रमांक 152

6) डॉ. कोत्तापल्ले नागनाथ : ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती - 26 जानेवारी 2007, पृष्ठ क्रमांक 121

7) तत्रेव : पृष्ठ क्रमांक, 20

8) प्रा. नलगे चंद्रकुमार (संपादक) : ग्रामीण वाड्मयाचा इतिहास,सुरेश एजन्सी, शैलेंद्र प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती -सप्टेंबर 1996, पृष्ठ क्रमांक 187

9) डॉ. मांडवकर पवन (संपादक) प्रा. आदे राजू, डॉ. सौ. वीरा मांडवकर (सहसंपादक) : दलित ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य, सेवा प्रकाशन, प्रथम आवृत्ती- 27 फेब्रुवारी 2014 पृष्ठ क्रमांक 153


❖❖❖

# 'लाल फुलांचं झाड : आशयसूत्र'

**डॉ. गोविंद काळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद,
ता. अहमदपूर, जि. लातूर.
gk947733@gmail.com 9823843496/8329417192

मौजे उदगीर, जिल्हा लातूर येथे 22 ते 24 एप्रिल 2022 दरम्यान भरलेल्या 95 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ही भारत सासणे यांची अलीकडची ओळख आहे. सातत्याने तीन तपापासून मराठी साहित्याची सेवा करणाऱ्या मराठवाड्यातील एका महत्त्वाच्या कथाकाराची मराठवाड्यातच पार पडलेल्या अखिल भारतीय स्तरावरील साहित्य संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून निवड व्हावी ही घटना अतिशय सन्मानाची आहे. विशेषतः शासकीय सेवेत अधिकारी पदावर बरीच वर्ष सेवा करत असताना प्रत्यक्ष अनुभवात आलेल्या विविध प्रकारच्या माणसांना, घटना - प्रसंगांना सासणे यांनी आपल्या साहित्यातून चित्रित केले आहे. इथून तिथून सर्व माणसे सारखी दिसत असली तरी त्यांच्या अंतर्मनात किती उलथा पालथी सुरू असतात याचा वरवर अंदाज करता येत नाही की मनाचा तळही लागत नाही. बरेचदा अशा माणसांचं वर्तन काहीसं गूढ, अनाकलनीय असतं. एखादा साहित्यिक आपापल्या परीने अशा माणसांच्या वर्तनाचे अनेकविध कंगोरे आपल्या कलाकृतीतून टिपण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असतो. परिणामी मानवी स्वभाव, वर्तनातील गूढता आपोआपच सबंध कलाकृतीभर व्यापली जाते. आस्वादक वाचकांच्या विचार आणि कल्पनेच्या ती पलीकडे असते. अशा कलाकृतीचे वाचन आणि आस्वादन म्हणजे एका अनाकलनीय, गूढ, व्यामिश्र, गुंतागुंतीच्या प्रदेशाचा एका अपरिचिताने तितक्याच संदिग्धपणे केलेला प्रवास असतो. भारत सासणे यांच्या दीर्घकथाही याला अपवाद नाहीत. वाचकांच्या तना मनाला काबीज करून कथेच्या आशय सूत्रात त्याला गुंतवून ठेवण्याची ताकद त्यांच्या लेखणीत आहे. प्रस्तुत लेखात त्यांच्या 'लाल फुलांचं झाड' या कथासंग्रहाच्या आशयसूत्राचा थोडक्यात विचार करू.

## उद्दिष्टे -

1. भारत सासणे यांच्या एकूण लेखनविश्वाचा आढावा घेणे.
2. 'लाल फुलांचं झाड' या कथासंग्रहातील आशय सूत्रांचा विचार करणे.
3. 'लाल फुलांचं झाड' या कथासंग्रहातील कथा लेखन तंत्रांचा विचार करणे.
4. प्रस्तुत कथांचा प्रभाव अभ्यासणे.

## गृहितके -

1. भारत सासणे हे मराठवाड्यातील अत्यंत महत्त्वाचे कथाकार, लेखक आहेत.
2. 'लाल फुलांचं झाड' ही त्यांची महत्त्वपूर्ण कलाकृती आहे.
3. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक असे विविध गद्य प्रकार लीलया हाताळले असले तरी त्यांची खरी ओळख एक कथाकार म्हणूनच सर्वाधिक राहिली आहे.
4. मानवी मनोव्यापाराशी एकरूपता साधणे हे त्यांच्या प्रस्तुत कथासंग्रहातील कथांचे मुख्य आशयसूत्र आहे.

भारत सासणे यांच्या दीर्घकथा कायमच वाचकांच्या पसंतीला उतरल्या आहेत. त्यांच्या कथांमधून व्यक्त होणारा जीवनानुभव नावीन्यपूर्ण, असांकेतिक, गूढगहन व चमत्कृतिपूर्ण असतो. त्यांचे वास्तवाशी घट्ट अनुबंध जुळवलेले

असते. त्यांच्या कथांतून ग्रामीण, आदिवासी, नागर असे समाजजीवनाचे विविध स्तर सामर्थ्याने चित्रित होतात. त्यांच्या अनुभव विश्वातील सामाजिक परिसरात जगणारी, वैशिष्ट्यपूर्ण स्वभावधर्म असणारी नानाविध माणसे वाचकांना सहजरीत्या भेटतात. मानवी जीवनाची अतर्क्यता व असंगतता, मानवी नातेसंबंधांतील ताणतणाव, व्यक्तीच्या मनोविश्वातील गूढ, व्यामिश्र व अनाकलनीय गुंतागुंत, त्यांचे सूक्ष्म, अनेक पदरी चित्रण करणाऱ्या स्वभाव वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या कथा स्वाभाविकपणे दीर्घ होत जातात. त्यांच्या कथांतून व्यक्तीच्या आत्मशोधाच्या प्रक्रियेचे चित्रण जसे आढळते, तसेच स्त्री-पुरुषांतील परस्पर आकर्षणामागचे गूढ, तरल, सूक्ष्म मनोव्यापारही ते कौशल्याने चित्रित करतात.

## भारत सासणे : परिचय -

भारत जगन्नाथ सासणे यांचा जन्म मराठवाड्यातील जालना जिल्ह्यात 1951 साली झाला. अहमदनगर महाविद्यालयातून बी.एस्सी.ची पदवी घेतल्यानंतर त्यांनी शासकीय सेवेत जाणे पसंत केले. पुढे विविध शासकीय विभागात अधिकारीपदावर त्यांनी नोकरी केली. या दरम्यानच्या काळात त्यांनी लेखनही तितक्याच ताकदीने सुरू ठेवले.

**अ) कथा / दीर्घकथा** -

जॉन आणि अंजिरी पक्षी, कॅम्प/ बाबीचं दुःख, लाल फुलांचं झाड, चिरदाह, अस्वस्थ विस्तीर्ण रात्र, अनर्थ, रात्र, क्षितिजावरची रात्र, आयुष्याची छोटी गोष्ट, शुभ वर्तमान आदि.

**ब) कादंबरी** -

जंगलातील दूरचा प्रवास, दूर तेथे दूर तेव्हा, सर्प, राहीच्या स्वप्नांचा उलगडा, दोन मित्र आदि.

**क) नाटक / नाटिका** -

मरणरंग, नैनं दहति पावकः, आतंक, चल रे भोपळ्या, हंडाभर मोहरा आदि.[1]

वरीलप्रमाणे भारत सासणे यांचा लेखनप्रपंच समजून घेता येईल. त्यांचे लेखन जितके सामान्य वाचकांसाठी वाचनीय आहे तितकेच ते आस्वादक आणि समीक्षकांच्या पहिल्या पसंतीचे आहे. त्यांना आजवर प्राप्त झालेल्या उत्कृष्ठ वाङ्मय निर्मितीसाठी दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांची नुसती यादी वाचली तरी हे सहज लक्षात येते. वास्तविक एक साहित्यिक केवळ पुरस्कारासाठी लिहीत नसतो. "सामाजिक जीवनातील स्थितीगतीच्या संघर्षातून परिस्थितीचा जो रेटा निर्माण होतो, त्याचे परावर्तन (reflection) साहित्यातून, विशेषतः काव्यातून होते."[2] डॉ. सदा कऱ्हाडे यांचे वरील मत कविव्यापारामागील नेमकी भूमिका स्पष्ट करणारे आहे. लेखकाने पाहिलेला, अनुभवलेला परिसर त्याला लिहिण्याची उर्मी प्रदान करतो. त्याला मिळणारं वाचक, आस्वादक, अभ्यासकांचं प्रेम ही त्यानंतरची प्रक्रिया असते. पुढीलकाळात लेखकाने अधिक कसदार लिहावे यासाठी कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील कौतुकाची थाप आवश्यक असतेच असते. याला भारत सासणेही अपवाद नाहीत.

भारत सासणे यांनी नाटक, कादंबरी, कथा, दीर्घकथा या महत्त्वाच्या गद्यप्रकारात विपुल लेखन केले असले तरी ते दीर्घकथा लेखनात विशेष रमले. बाल मनावर योग्य वयात उचित संस्कार व्हावेत या हेतूने त्यांनी बालकथा, बाल नाटिकाही लिहिल्या; ज्याचे वाचक तसेच आस्वादक, अभ्यासकांनी कौतुक केले आहे. त्यांनी आपल्या लेखनातून मानवी मनाचा तळ खुबीने शोधण्याचा प्रयत्न केला हे इथे विशेषत्वाने विचारात घेतले पाहिजे.

## लाल फुलांचं झाड : आशयसूत्र -

'लाल फुलांचं झाड' हा त्यांचा तिसरा कथासंग्रह 1984 साली प्रकाशित झाला. प्रस्तुत कथासंग्रहास सन 1984 - 85 चा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा महाराष्ट्र राज्य पुरस्कार तसेच परिमल प्रकाशन, औरंगाबाद यांचाही पुरस्कार प्राप्त

झाला आहे. प्रस्तुत कथासंग्रहात 'कर्म, मनात रुजलेलं घर, लिंपण, नवा सूर्योदय, ठकाजी रामाच्या स्मरणातली रात्र, लाल फुलांचं झाड, मनातला मोर, अरण्य, जादूचा वाडा, अप्पांचा कोट, भिंत' या एकूण 11 कथा असून या कथा; संग्रह रूपात प्रकाशित होण्यापूर्वी मराठवाडा, हंस, साहित्य, चैत्रवेल मेनका, किर्लोस्कर, स्त्री आदि दिवाळी अंकातून प्रकाशित झाल्या आहेत. विलास खोले यांनी म्हटल्याप्रमाणे, "वाचकाला झपाटून टाकण्याची ताकद त्यांच्या (भारत सासणे) लेखणीत भरपूर आहे. मानवी नात्यांमधील विविधांगी गुंतागुंत उलगडण्याचा प्रयत्न करावा हा त्यांचा लेखनस्वभाव आहे."[3] वर नमूद केल्याप्रमाणे मानवी नात्यातील गुंतागुंत भारत सासणे सक्षमपणे आपल्या कथांमधून चित्रित करतात. पुढीलप्रमाणे प्रस्तुत कथासंग्रहातील कथांचे आशयसूत्र समजून घेऊ.

'कर्म' कथेतील 'ब्रह्मदेव बंडूजी' हा नायक तिशितला तरुण विवाह होत नसल्यामुळे मनातून मोडून पडला आहे. कृष्णदेव शास्त्री या जोतिषाला आपली पत्रिका दाखविण्याच्या उद्देशाने तो हरिपूर येथे येतो. तिथे त्याची भेट मुरारी नावाच्या तरुणाशी होते. मुरारी व्यवसायाने शिक्षक असला तरी आपल्या बेछूट वागण्याने आयुष्यात खूप काही गमावून बसल्याची बोच त्याच्याही मनाला सतत छळत राहते. तर दोन्ही डोळ्यांनी अंध असलेले कृष्णदेव शास्त्री आपली तरुण मुलगी सखूचा विवाह होत नसल्याचे दुःख उराशी कवटाळून आपले उर्वरित आयुष्य ओढत आहेत. आपल्या लग्नासाठी वडिलांचे चाललेले केविलवाणे प्रयत्न सतत पाहणारी सखू मनातून उध्वस्त झाली आहे. सखू आणि ब्रह्मदेव यांच्या विवाहाची पुसटशी आशा निर्माण झालेली असताना मुरारीने सखूच्या अनैतिक वर्तनाबद्दल सांगितलेल्या खऱ्या - खोट्या कथा आणि त्यास खुद्द सखूने दिलेला दुजोरा यामुळे ब्रह्मदेवच्या विवाहाची शक्यता पुन्हा मावळून जाते. प्रस्तुत कथेतील, "... पंचविशीतल्या पोरांचंही सारं स्थिरस्थावर झालेलं असतं. आपोआप! त्याला एखादी बायकोही असते... आमची तिशी उलटली. एक नोकरी धड मिळाली नाही. तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, पण मी इकॉनॉमिक्स घेऊन बी. ए. झालोय. काय उपयोग? सध्या मी एका इंजीनियरिंग कंपनीत कारकून आहे... मुंबईत किड्यामुंगीसारखं भयानक जिणं जगत आहे. लग्नाचं म्हणाल तर..."[4] धाप लागल्यागत ब्रह्मदेवची वरील प्रतिक्रिया वास्तवाचे सचित्र चित्रण करणारी आहे. सद्यस्थितीतील असंख्य शिक्षित बेकार तरुणांच्या जगण्याचे प्रतिबिंब भारत सासणे आपल्या कथांमधून प्रचंड ताकदीने रेखाटतात. ज्यात कमालीचे कारुण्य भरलेले आहे. प्रस्तुत कथेतील सर्व पात्रे नियतीच्या अधीन राहून आपले आयुष्य ओढत असलेले दिसतात. मानसिक, शारीरिक, भावनिक स्वास्थ्य न लाभलेली ही पात्रे समाजातील वास्तव पण तितक्याच दुर्लक्षित, उपेक्षित घटकाचे प्रतिनिधित्व करतात, हे इथे विशेषत्वाने लक्षात घेतले पाहिजे.

'मनात रुजलेलं घर' या कथेतील नायक बापूसाहेब आता वार्धक्याकडे झुकलेले आहेत. आयुष्यभर स्वतःच्या करिअरच्या मागे धावत राहिल्याने छोट्या छोट्या पण मनाला हव्या हव्याशा खूप साऱ्या गोष्टी करायच्या राहून गेल्याची खंत त्यांना उतारवयात वाटत राहते. आपल्या शेजारचे घर आतून बघायची त्यांची अनेक वर्षापासूनची इच्छा ते या वयात पूर्ण करण्यासाठी त्या बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करतात. " ॲट लास्ट!... त्यांनी तो दगड सर्व शक्तीनिशी त्या कुलपावर घातला. छे! ह्यात गैर काही नाही. मरण्यापूर्वी हे घर बघावं, तो आपला हक्कच आहे. ते कुलूप अपेक्षितपणे तुटून पडलं. त्यांनी दार उघडलं. आत प्रवेश केला आणि घाईने दार बंद केलं. पाठ लावून ते मोठमोठ्यांनी श्वास घेऊ लागले आणि त्यांची छाती धाडधाड उडू लागली."[5] रूढ अर्थाने अत्यंत यशस्वी, सुखी, संपन्न, विद्वान असलेल्या बापूसाहेबांना आपल्या मरणापूर्वी शेजारचे घर बघण्याची तीव्र इच्छा होती आणि ते ती इच्छा नियम तोडून पूर्ण करतात. एकूण सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात आपले कुटुंब, करिअर यामुळे मनात इच्छा असूनही खूप साऱ्या गोष्टी करायच्या राहून जातात. अशाच अतृप्त मनोवृत्तीचा वेध प्रस्तुत कथेतून भारत सासणे यांनी घेतला आहे.

'लाल फुलांचं झाड' ही प्रस्तुत कथासंग्रहातील शीर्षक कथा आहे. शाळकरी नायकाच्या शेजारी राहणाऱ्या मामीच्या जीवनाची करुण कहाणी प्रस्तुत कथेतून वाचकांसमोर येते. निपुत्रिक स्त्रीला आपल्याच घरातील लोकांकडून होणाऱ्या शारीरिक, मानसिक, भावनिक त्रासाला सतत सामोरे जावे लागते. घरात कुणाशीही मनातील दुःख सांगण्याची सोय नसलेली मामी, अंगणातील वठलेल्या झाडाशी आपले मनोगत कथन करते. त्या झाडाला नित्यनेमाने पाणी घालून निदान ते तरी बहरावे अशी मनोमन इच्छा व्यक्त करते. अखेर ते झाड पुन्हा बहरते. त्याला लाल फुलेही लागतात मात्र

तोपर्यंत मामीचा मृत्यू झालेला असतो. आजही समाजमन निपुत्रिक स्त्रीकडे तुच्छतेने पाहतो, ही वस्तुस्थिती प्रस्तुत कथेतून वाचकांच्या समोर मांडली गेली आहे.

"आपण लग्न केलं नाही. आईचा सहवासही आपल्याला मिळाला नाही. स्त्रीशी कसं वागायचं, हे आपल्याला माहीत नाही. आपण उगाच कठोर वागतो."[6] 'भिंत' कथेतील रायसाहेबांचे वरील स्वगत त्यांची नेमकी भावावस्था अधोरेखित करते. सतत कंपनीच्या कामात स्वत:ला गुंतवून ठेवणाऱ्या रायसाहेबांना कोणत्याही रूपातील स्त्रीचा सहवास नाही. परिणामी जानकीबद्दल त्यांच्या मनात उत्पन्न झालेला हळुवार भावही ते नीटपणे समजून घेऊ शकत नाहीत. अंतर्बाह्य एकटेपणाची जाणीव त्यांच्या मनाला सतत टोचत राहते. शिवाय वरचेवर हेकेखोर, एककल्ली होत जाणाऱ्या स्वभावाचा त्यांचासह इतरांनाही त्रास होत जातो.

वरीलप्रमाणे काही महत्त्वाचे दाखले घेऊन प्रस्तुत कथासंग्रहातील कथांचा नेमका आशय समजून घेता येईल. वरील कथा आणि त्यातील पात्रे वास्तव समाज जीवनाची प्रातिनिधिक चित्रे आहेत, हे इथे विशेषत्वाने विचारात घेतले पाहिजे. एक लेखक म्हणून त्यांच्या अनुभवाच्या कक्षा अधिक विस्तीर्ण आहेत. भारत सासणे कथानकातील गूढता अधिक गडदपणे चित्रित करण्यासाठी वेगवेगळ्या समर्पक प्रतिमा, प्रतीकांचा खुबीने वापर करतात. कधी धुके, कधी अंधारी रात्र तर कधी वाघाचे चित्र तर कधी वठलेलं झाड अशा कितीतरी प्रतिमा, प्रतीकांचा वापर करून कथाशयाची उंची अधिकाधिक वाढविण्यात ते कमालीचे यशस्वी झाले आहेत, हे मान्य करावे लागते. त्यांच्या कथनशैलीत कथाशयाला अनुरूप अशा आशयघन प्रतिमा, प्रतीकांचा मुख्य कथांनकाशी तरल काव्यात्म, गूढ सुसंवादी मेळ साधलेला दिसतो.

## निष्कर्ष -

एकूण भारत सासणे यांनी माणसाला केंद्रबिंदू मानणाऱ्या व मनुष्यजीवनाबद्दल अपार करुणा व्यक्त करणाऱ्या कथा लिहिल्या आहेत. म. द. हातकणंगलेकर यांनी म्हटल्याप्रमाणे, "आजची मराठी कथा विविध, विपुल, गुणसंपन्न व प्रयोगाभिमुख बनली आहे. आजच्या उदंड नाटकापेक्षा तिची आशयघनता निश्चितच अधिक आहे. आजची मराठी कथा गुणवत्तेच्या अनेक पातळ्यावर फुलते आहे."[7] आजची मराठी कथा अनेक अर्थांनी आशयघन बनली आहे, हे आता नाकारता येत नाही. भारत सासणे यांनी लिहिलेली कथा वरील विधानाशी सुसंगत आहे. इथे काही निष्कर्ष नोंदवता येतील.

1. भारत सासणे हे मराठवाड्यातील अत्यंत महत्त्वाचे कथाकार आहेत.
2. उदगीर जिल्हा लातूर येथे भरलेल्या 95 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष आहेत.
3. त्यांची कथा मानवी मनोव्यापाराशी संवादी आहे.
4. अंतर्मनात सुरू असलेली प्रचंड खळबळ ते अत्यंत ताकदीने शब्दबध्द करतात.
5. प्रस्तुत 'लाल फुलांचं झाड' मधील पात्रे नियतीच्या अदृश्य बंधनानी जखडली गेली आहेत.
6. प्रेम, मातृत्व, लग्न, पद, प्रतिष्ठा, उचित सन्मान यांची कमतरता असलेल्या पात्रांच्या निमित्ताने त्यांनी समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित पण तितक्याच अविभाज्य घटकास साहित्याच्या मुख्य प्रवाहात आणले आहे.
7. प्रस्तुत कथासंग्रहातील वातावरण काहीसे गुढ, अनाकलनीय, अस्पष्टता दर्शविणारे आहे.
8. वाचकांची तसेच आस्वादक, अभ्यासकांची उत्कंठा सतत वाढवत नेण्याचे सामर्थ्य भारत सासणे यांच्या लेखणीत आहे.
9. भारत सासणे यांची लेखनशैली आशयानुरुप गंभीर, अतर्क्य, अनाकलनीय आहे.

एकूण प्रस्तुत कथासंग्रहातील कथा मनोविश्लेषणाच्या पातळीवरून अभ्यासाव्या लागतात. मानवाचे वर्तन हे त्याच्या आंतर्मनातील विचारव्युहाचे बाह्य प्रकटीकरण असते परिणामी त्याच्या बाह्य वर्तनाची संगती लावताना त्याच्या

जाणिवेसह नेणिवेशी तादात्म्य पावणे अगत्याचे होऊन जाते. कदाचित पहिल्या वाचनातून या कथाशयाची नीट उकल होईलच असे नाही. परिणामी परतत्वस्पर्शाशी अनुसरून वाचकाने मुख्य कथानकाशी एकरूपता साधल्यास मूळ कथानकाच्या तळाशी वाचकास पोहचणे सहज शक्य होईल.

## संदर्भ सूची -


1. सासणे भारत - लाल फुलांचं झाड - (2010) - दिलीपराज प्रकाशन, पुणे - तृ. आ. - पृ. 240 - 241.
2. कऱ्हाडे डॉ. सदा - समाज आणि साहित्य - (1999) - लोक वाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई - द्वि. आ. - पृ. 7.
3. उनि. लाल फुलांचं झाड - पृ. मलपृष्ठ.
4. तत्रैव - पृ. 11.
5. तत्रैव - पृ. 51.
6. तत्रैव - पृ. 219.
7. हातकणंगलेकर म. द. - मराठी कथा रूप आणि परिसर - (1998) - सुवर्ण प्रकाशन, पुणे - दु. आ. - पृ. 21.


❖❖❖

# समकालीन मराठी भाषा

सौ. तनुजा सुरेश मुळे
संशोधक विद्यार्थी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)
ब, ३०३ वरद रेसिडेन्सी, अपूर्वाई सोसायटी जवळ, कलानगर, इंदिरानगर, नाशिक ४२२ ००९
mulay.tanuja15@gmail.com
संशोधन केंद्र : के.टी.एच.एम.महाविद्यालय, गंगापूर रोड, नाशिक
मार्गदर्शक
प्रा.डॉ.पौर्णिमा बोडके
के.व्ही.एन.नाईक महाविद्यालय, नाशिक

## १.१ प्रस्तावना :

मराठी साहित्याचा अभ्यास करतांना साधारणपणे प्राचीन, अर्वाचीन साहित्य अशी विभागणी करता येईल. त्यापैकी मराठी भाषेत साहित्य निर्मितिला सुरूवात झाल्यापासून म्हणजे संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेला साहित्यभाषेचा दर्जा दिल्यापासून ते भारतात इंग्रजी सत्तेची पायाभरणी होईपर्यंतच्या काळातील साहित्य हे प्राचीन साहित्य मानले जाते आणि त्यानंतरचे म्हणजेच इंग्रजी राजवटीपासून ते आजतागायत निर्माण झालेले सर्व साहित्य हे अर्वाचीन मानले जाते. तथापि काही अभ्यासकांनी १९४५ पर्यंतचाच काळ यात गृहित धरलेला आहे व यानंतर १९४५ ते १९६० व १९६० ते १९८५ या कालखंडातलया साहित्याला समकालीन साहित्य मानले आहे. (संदर्भ : समकालीन साहित्य, वाङमयप्रवाह य.च.म.मुक्त विद्यापीठ, प्रस्तावना पा.क्र.१)

या काळात साहित्याच्या सर्वच प्रकारात म्हणजेच कथा, कविता, कादंबरी, आत्मलेखन, नाटक यात आमुलाग्र बदल होत गेले. जीवनाची नवनवी अनोळखी क्षेत्रे साहित्यातून प्रकट होत गेली. ज्याप्रमाणे साहित्याचे स्वरूप बदलले. त्याचप्रमाणे साहित्याची भाषा देखील बदलली. पूर्वीची म्हणजेच प्राचीन काळातील काहीशी संस्कृतप्रचूर, अलंकारयुक्त, पांडित्यपूर्ण भाषा अधिकाधिक व्यवहारी होऊ लागली. तिच्या वास्तवतेचे दर्शन घडू लागले. जनसामान्यांची भाषा साहित्यभाषा बनली. ग्रामीण, दलित, स्त्रीवर्ग यांच्या बोलीभाषा सर्रास साहित्यलेखनात वापरल्या जाऊ लागल्या. परंतु १९८५ नंतरही भाषेचा हा प्रवाह सतत वाहत आहे. सतत प्रवाही असते व स्वत:त बदल घडवून आणते, तिच भाषा काळाच्या ओघात टिकते. या नियमानूसार आजतागायत मराठी भाषा सतत बदलत आहे. असे म्हणतात, दर बारा कोसानंतर भाषा बदलत असते त्याच धर्तीवर असेही म्हणता येईल की ठराविक कालखंडाच्या टप्प्यानंतरही भाषा सतत आपले स्वरूप बदलत असते. म्हणूनच प्रस्तुत निबंधात सुमारे १९९० नंतरच्या म्हणजे जागतिकीकरणाच्या काळात मराठी भाषेचे स्वरूप कसे बदलत गेले याची चर्चा केली आहे.

## १.२ उद्दिष्ट्ये :

१) समकालीन मराठी भाषेचा अभ्यास करणे.
२) १९६० नंतरच्या काळातील मराठी भाषेच्या बदलत्या स्वरूपाची चर्चा करणे.
३) जागतिकीकरणामुळे मराठी भाषेवर झालेले इष्ट—अनिष्ट परिणाम तपासणे.

## १.३ विषय विवेचन :

### १.३.१ समकालीन साहित्य :

समकालीन भाषेचा अभ्यास करण्यापूर्वी सर्वप्रथम समकालीन या शब्दाचा अर्थ समजून घेणे क्रमप्राप्त आहे. समकालीन या शब्दाचा शब्दश: अर्थ म्हणजे काळाबरोबर असणे किंवा एकाच काळात अस्तित्वात असणे. उदा.संत ज्ञानेश्वर व संत नामदेव हे समकालीन संत होते. तसेच वि.स.खांडेकर व ना.सी.फडके हे समकालीन लेखक आहेत. समकालीन ही संज्ञा काळाशी संबंधित आहे.

समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे, ज्या काळात ते निर्माण होत असते त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार, जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य.

प्रा.वसंत आबाजी डहाके यांनी केलेली ही व्याख्या सर्वसमावेशक आहे यावरून समकालीन साहित्याची संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. मदन कुलकर्णी यांची अजून एक व्याख्या या ठिकाणी जास्त वास्तवदर्शी वाटते.

''आपल्या आसपासच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती, घटना, प्रसंग, जीवन–जाणीवा, विचारप्रणाली, भावानुभूती यांचे चित्रण ज्या साहित्यात केलेले असेल ते साहित्य समकालीन ठरेल.''

या व्याख्यांचा संदर्भ घेतल्यावर असे लक्षात येते की, समकालीन असे काही असते ही आणि नसतेही किंबहूना त्या त्या काळात ते ते साहित्य समकालीन असते व समकालीन परिस्थितीचा प्रभाव तत्कालीन साहित्याच्या भाषेवर पडलेला दिसतो. उदाहरणच द्यायचे झाले तर संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांच्या कालीन भाषेचा प्रभाव त्यांच्या अभंगांच्या रचनेवर पडलेला दिसतो. १२ व्या शतकातली मराठी भाषा ही देखील आज आपणांस अवघड वाटते, त्यावर संस्कृतचा देखील प्रभाव दिसून येतो. त्यानंतर मध्ययुगीन काळातील मराठी भाषेवर अरबी, फारसी भाषेचा प्रभाव सहज दिसून येतो. इंग्रजी काळात इंग्रजी, पोर्तुगीज भाषांमधून बऱ्याच शब्दांचे आदान प्रदान झाले. स्वातंत्रवीर सावरकरांनी भाषा शुद्धिची चळवळ करून मराठी भाषेतील इतर परकिय भाषांची घुसखोरी थांबवून त्या शब्दांसाठी अस्सल मराठी शब्द देण्याची पुरेपूर मेहनत केली, तरीही हे आदान–प्रदान आजतागायत चालू आहेच.

## १.३.२ १९६० नंतरचे मराठी भाषेचे बदलते स्वरूप :

१९६० च्या दशकाच्या आसपास मराठी भाषेच्या क्षेत्रात अनेक बदल व घडामोडी घडल्या. मुळात आपणच आपली भाषा टिकवून ठेवली, वाढवली तर जगाला त्याची दखल घ्यावीच लागते यादृष्टिने भाषासंवर्धनाचे प्रयोग सुरू झाले. पूर्वी साहित्याची भाषा ही केवळ प्रमाण मराठी भाषा मानली जायची परंतु १९६० नंतर मात्र जनसामान्यांच्या बोलीभाषा, दैनंदिन व्यवहाराची भाषा ही सुद्धा साहित्याची भाषा बनली. या कामी स्वातंत्र्योत्तर काळात उदयास आलेल्या अनियतकालिकांच्या, लघुनियतकालिकांच्या चळवळीने हातभार लावला. १९६० नंतरच्या साहित्यात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्री साहित्य यांनी महत्वाचे स्थान मिळवले. प्रस्थापितांविरूद्ध बंड करीत एक चळवळ उभी केली. त्यामुळे आजपर्यंत उपेक्षित असलेली गावकुसाबाहेरील, अलक्षित भाषा साहित्यात केंद्रबिंदू बनली, परंतु यामुळे मराठी साहित्य मात्र समृद्ध होत गेले. मराठी भाषेची विविध रूपे आपल्यासमोर येऊ लागली.

ग्रामीण साहित्यातून ग्रामीण संस्कृती दारिद्रय यांचे रेखाटन करतांना ग्रामीण परिसरातील बोलीभाषा, ग्रामजीवनातील काही महत्वपूर्ण शब्द लेखनात आवर्जून वापरले जावू लागले. विविध जाती–जमातीच्या लेखकांनी आपल्या भाषेतील सौंदर्य लेखनाच्या माध्यमातून वाचकांसमोर मांडायला सुरूवात केली. त्यामुळे भाषेच्या कक्षा रूंदावल्या असे म्हणावयास हरकत नाही.

ग्रामीण साहित्याकडून प्रेरणा घेवून डोंगरदऱ्यात, अतिदुर्गम भागात जीवन कंठणाऱ्या आदिवासी बांधवांनी देखील आपले जीवन आपल्या भाषेत जगापुढे मांडावयास सुरूवात केली. दलित साहित्याच्या उदयाबरोबरच बहुजन समाजाची शोषितांची, वंचितांची भाषा प्रथमच साहित्यभाषा बनली आणि सर्वत्र हाहा:कार उडाला. अशाप्रकारे १९६० नंतरच्या काळात कथा, कविता, कादंबरी, ललित, चरित्र, आत्मचरित्र यांची भाषा बदलली म्हणूनच आपल्या समकालीन भाषेचा अभ्यास करावयाचा झाल्यास प्रामुख्याने १९९० नंतरच्या म्हणजेच जागतिकीकरणाच्या काळातल्या भाषेचा अभ्यास 'समकालीन मराठी भाषा' म्हणून करणे क्रमप्राप्त ठरते.

## १.३.३. जागतिकीकरण आणि मराठी भाषा :

१९९०च्या दशकात भारताने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभाग घेतला. पुन्हा एकदा जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण या गोंडस नावाखाली नववसाहतवादाने डोके वर काढले. पाश्चात्य राष्ट्रांनी एकप्रकारे आपल्यावर जागतिकीकरण लादलेच. बाजारीकरणाच्या या प्रक्रियेत पैसा जीवनाचा केंद्रबिंदू बनला. संगणकक्रांती, सोशलमिडिया, मॉलसंस्कृती, जागतिक पर्यटन असे अनेक बदल या काळात झाले. महाराष्ट्राची राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक परिस्थिती झपाटल्याने बदलली. या सर्व बदलांचे पडसाद अपरिहार्यपणे भाषा आणि साहित्यातून पडू लागले. या काळात कोणताही एकच एक साचा न राहता साहित्यात आशय, अभिव्यक्ती, रूपबंध व भाषा या सर्वच पातळयांवर विविधता दिसून आली.

जगतिकीकरणामुळे व संगणकक्रांतीमुळे इंग्रजी भाषेला अतोनात महत्व प्राप्त झाले. संगणकीय व्यवहाराची भाषा केवळ इंग्रजी असल्यामुळे केवळ मराठीच काय तर हिंदी आणि अनेक परकिय भाषा संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाली. नोकरी व्यवसायानिमित्त परदेशात स्थायिक झालेल्या लोकांसाठी आपली मातृभाषा दुरावली. दूरदर्शनच्या आगमनाने हिंदीचा प्रभाव वाढला. नव्याने उदयास आलेल्या शहरांमध्येदेखील मराठीची घुसमट वाढली. मराठी साहित्यसंमेलनांमधून अधून–मधून मराठीच्या भवितव्याबद्दल चिंता व्यक्त करणे यातच प्रस्थापितांनी धन्यता मानली. त्याचबरोबर इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे वाढते प्रस्थ, त्यातून अधोरेखित होत असलेले परक्या भाषेचे महत्व या सगळयांपुढे मराठीचा टिकाव लागणे अवघड आहे असे वाटत असतांनाच पुन्हा एकदा मराठी भाषेला झळाळी प्राप्त झालेली आज दिसून येत आहे. जागतिकीकरण ही जणू काय मराठीसाठी इष्टापत्तीच ठरली. अलिकडे

महाराष्ट्रात भाषेचा शासनाने मराठी भाषा संवर्धनासाठी अनेक महत्वूपर्ण निर्णय घेतले. त्यात महत्वाचे म्हणजे शासकिय व्यवहारांची भाषा मराठीच असावी यासाठी आग्रह धरला. जागतिक भाषांमधील मराठीचे स्थान ओळखून मायक्रोसॉफ्ट या कंपनीने देखील मराठीसाठी युनिकोड प्रणाली अंमलात आणली त्यामुळे संगणकावर, मोबाईलवर मराठी लिहिणे, संवाद साधणे सोपे झाले. गुगलवरही बऱ्याच गोष्टींचे इंग्रजीतून मराठीत भाषांतर करण्याचे टूल उपलब्ध करून दिले. विकीपिडीया, विकासपिडीया सारखी संकेतस्थळे मराठी भाषेत ज्ञानसंचय करू लागली. आज महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर विविध दुर्मिळ मराठी पुस्तके, विश्वकोश, शब्दकोश उपलब्ध आहे. दररोज त्यात भरच पडत आहे. आज अनेक प्रकारची साहित्य संमेलन भरत आहेत. त्यातून मराठी भाषेचा प्रचार, प्रसार पुस्तकविक्री जोर धरू लागली आहे. फक्त प्रमाण मराठी भाषाच नाही, तर बोलीभाषेला देखील आज महत्वाचे स्थान मिळत आहे. दूरदर्शन, आकाशवाणीच्या विविध वाहिन्या केवळ मराठी भाषेवर आधारित कार्यक्रम सादर करतात. ही भाषा आधुनिक मराठी आहे. यातील पात्रांच्या व निवेदकांच्या तोंडी वापरल्या जाणाऱ्या मराठी भा भाषेत हिंदी—इंग्रजीचा मुक्त वापर दिसून येत असला तरी या वाहिन्या मराठीपासून दुरावलेल्या युवावर्गाला पुन्हा एकदा आपल्या मातृभाषेकडे वळवण्यास उपयुक्त ठरल्या आहेत. मराठी जाहिरातील, विविध सामन्यांचे मराठी समालोचन, प्रादेशिक भाषांचा साहित्यात सढळहस्ते वापर हे सर्व एकप्रकारे मराठी भाषेला समृद्ध करण्यासच मदत करीत आहेत असे मानावयास हरकत नाही. आज विविध उपक्रम राबवून मराठी भाषेला उर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी झटत आहे. आज सुमारे अकरा कोटी लोक जगात मराठी भाषा बोलतात. जवळपास ७०च्या वर देशांमध्ये मराठी भाषिक पोचला आहे. तेथे गेल्यावर त्यांना जे आपल्या भाषेपासून तुटल्यासारखे जाणवले त्याचा परिणाम म्हणून त्यांनी त्या त्या देशात मराठी भाषा मंडळे स्थापन केली व अशा मंडळांमधून, घरांमधून आवर्जून मराठी भाषेचा वार सुरू केला. आपल्या मुलाबाळांना मराठी बोलता यावे यासाठीची त्यांची धडपड खरंच कौतुकास्पद आहे. आपल्या मातृभाषेचे महत्व त्यांनाच अधिक समजलेले दिसते. आज अनेक लोक विविध समाजमाध्यमातून, ब्लॉग, वेब पेजेस, मराठी संकेतस्थळ फेसबुक माध्यमांतून मराठीतून व्यक्त होतांना दिसत आहेत. त्यामुळे यापुढचे मराठी भाषेचे भविष्य नक्कीच आश्वासक असेल अशी आशा वाटते.

## १.३.४ समारोप :

या सगळ्या विचारमंथनातून लक्षात येते. भाषा ही अत्यंत प्रवाही असते. प्रत्येक काळात भाषा बदलत असते. समकालीन परिस्थितीशी भाषा सातत्याने जुळवून घेण्याचा प्रयत्न करते. किंबहूना समकालीन घडामोडींचा प्रभाव साहित्यात व साहित्यांच्या भाषेवर दिसून येतो. १९४५ नंतरचा काळ हा मराठी भाषेतील 'समकालीन साहित्याचा' मानला जातो. परंतु त्यानंतरही जागतिकीकरणाच्या रेटयात मराठी भाषा आमुलाग्र बदलली. जागतिकीकरणाच्या या युगात मराठी भाषेवर संकट आले असे वाटत असूनही एकप्रकारे मराठीसाठी इष्टापत्तीच ठरले व पुन्हा एकदा मराठी भाषेला समकालीन मराठी भाषा ही विविध अंगांनी बहरते आहे. अस्तित्वच नष्ट होण्याच्या भीतीने स्वत:ची पाळेमुळे अधिक खोलवर रूजवण्याचा प्रयत्न करीत आहे हा एक चांगला संकेत आहे.

## १.४ निष्कर्ष :

१) प्रत्येक काळात भाषा ही प्रवाही असते.

२) मराठी भाषेवर देखील त्या त्या काळातील समकालीन सामाजिक सांस्कृतिक परिस्थितीचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

३) जागतिकीकरणाच्या रेटयात मराठी भाषेत आमूलाग्र बदल झाले आहेत.

४) आधुनिक काळातील मराठी भाषेचे बदलते स्वरूप मराठी भाषेला उर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी आशादायक आहे.

## संदर्भ :

१. लवटे सुनिलकुमार, समकालीन साहित्यिक, मेहता पब्लिशिंग हाऊस जून २०१५ प्रथमावृत्ती

२. डहाके वसंत आबाजी — समकालीन साहित्य, य.च.म.मुक्त विद्यापीठ

३. वाङ्मयप्रवाह — समकालीन साहित्य—य.च.म.मुक्त विद्यापीठ

❖❖❖

# महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार

**प्रा. निलेश अरूण दूर्गे**
अर्थशास्त्र विभाग
भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय
एटापल्ली, जि.गडचिरोली
मो.नं. 9421115541 profnadurge@gmail.com

## सारांश

भारताला महात्मा गांधीजींनी देशहितासाठी सत्य, अंहिसा, समता, बंधूता, संत्याग्रह याविचाराचा पुरस्कार केला. म्हणून गांधीजींच्या विचारातील दूरदर्शीपणा आणि अपरिहार्यता दिसुन येते. गांधीजी हे अर्थतज्ञ नव्हते, परंतू त्यांचे विचार हे आर्थिक विकासासाठी उच्च सामाजिक आणि वैयक्तीक मुल्ये स्थापीत करण्यावर भर दिला. महात्मा गांधीनी देशाला आणि जगाला आर्थिक चिंतनाला नवी दिशा दिली. गांधींचे विचार आजच्या काळातील खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतीकरण यांच्या संदर्भात सुध्दा महत्वाचे आहे. "यंत्रे हे मानवाला मदत करणारी असावी, पंरतू मानसाला बेरोजगार करणारी यंत्रे नसावी", असे महात्मा गांधीचे विचार होते. गांधीच्या आर्थिक विचारात विश्वस्त, सर्वोदय, खादी व ग्रामोद्योग, यंत्र व यांत्रिकीकरण, स्वदेशी चळवळ याविचारातूनच मानवी मुल्याचा आणि देशातील आर्थिक विकास शक्य होईल, म्हणूनच महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार आणि अंहिसेचे तत्त्व आज जगासमोर अत्यंत महत्त्वपुर्ण आहे.

**बीजशब्द:-** विश्वस्त, सर्वोदय, खादी व ग्रामोद्योग, स्वदेशी चळवळ

## प्रस्तावना

राष्ट्रपिता महात्मा गांधी हे अर्थतज्ञ नव्हते, परंतू त्यांचे विचार हे आर्थिक विकासासाठी उच्च सामाजिक आणि वैयक्तीक मुल्ये स्थापीत करण्यावर भर दिला. त्यामुळे आर्थिक प्रश्नांची उत्तरे नक्की मिळतात. महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारावर जॉन रस्कीन आणि ना. गोखले यांच्या ग्रंथाचा प्रभाव होता. तसेच ओरो, टॉलेस्ट्राय आणि रस्कीन यांचा सुध्दा जवळून परिचय होता. महात्मा गांधी यांनी सर्व प्रथम दक्षिण आफ्रिरीकेतील हिंदी लोकांना न्याय मिळविण्यासाठी अंहिसात्मक लढयामुळे त्यांना नविन नेतूत्व प्राप्त झाले. त्यानंतर भारतातील ब्रिटीशानीं भारतीय जनतेवर जे अन्याय, शोषण करून भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक लूट चालू केली त्यांच्या विरोधात 1921 साली भारतात सुध्दा महात्मा गांधी यांनी ब्रिटीश सरकार विरूध्द असहकार चळवळ उभी केली. पुढे दांडी यात्रा, सविनय कायदेभंग चळवळ, चले जाव चळवळ याद्वारे भारताला स्वतंत्र मिळविण्यासाठी गांधीनी सत्य, धर्म, प्रेम, अंहिसा या तत्वाचा वापर केला. त्यामुळे आज देशात नाही तर जगात गांधीना अंहिसात्मक लढयासाठी आदर्श मानले जाते. महात्मा गांधीनी स्वतंत्र्य लढयाबरोबर जे मौलिक आर्थिक विचार मांडले आहेत. त्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे योग्य ठरते.

## संशोधनाचे उद्दीष्टये

1. भारताच्या ग्रामीण आर्थिक विकासात गांधीजीच्या विचारांचे स्थान अभ्यासणे.
2. गांधीजीची विश्वस्त आणि सर्वोदय संकल्पना अभ्यासणे.
3. गांधीजीची खादी व ग्रामोदयोग विषयी संकल्पना अभ्यासणे.
4. गांधीजीच्या स्वदेशी चळवळीचा अभ्यास करणे.

## संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधन लेखासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला असुन यासाठी महात्मा गांधीजींचे विविध ग्रंथ, पुस्तके, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्र व इंटरनेट (सकेंतस्थळ) इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

## महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार

1. **विश्वस्त संकल्पना**

महात्मा गांधी यांनी आर्थिक विषमता दुर करण्यासाठी विश्वस्त संकल्पना मांडली आहे. त्यामध्ये कोणत्याही व्यक्तीवर जबरदस्ती न करता अहिंसक मार्गाने संपत्तीचे समान वितरण करून देशातील आर्थिक विषमता दुर करता येते. गांधीच्या मते, सर्वच साधन संपत्ती ही ईश्वराच्या मालकीची आहे. त्यामुळे सर्वांची समान मालकी संपत्तीवर असावी. गांधीजीच्या मते, देशातील संपत्ती ही देशातील लोकांसाठी आहे. त्यामुळे अधिक संपत्ती असलेल्या लोकांनी त्या संपत्तीचा वापर समाजातील कल्याणासाठी करावा. विश्वस्त संकल्पनेत भांडवलशाहीला थारा नसून समाजवादी समाज रचनेला महत्व आहे. गांधीजींच्या मते, "सब भूमी गोपाल की", अर्थात सर्व संपत्ती ही समाजाची असून तिचे केवळ आपण विश्वस्त आहोत. गांधीजीनी सामाजिक कल्याणाबरोबर आर्थिक विकासाला सुध्दा महत्व दिले. आर्थिक समानतेच्या तत्त्वानुसार श्रीमंतांनी आपल्या मालकीच्या अनावश्यक वस्तू अतिरीत पैसा याकडे विश्वस्त म्हणून पहावे. ज्यामुळे देशातील श्रीमंतांनी आपल्याजवळील अतिरीक्त असलेल्या संपत्तीचा उपभोग हा गरिबांच्या हित कल्याणासाठी करवा यातून महात्मा गांधी यांच्या साधी राहणी आणि उच्च विचार सरणी यांचे योग्य दर्शन दिसून येते.

**2. सर्वोदय**

महात्मा गांधी यांनी जॉन रस्किनचे "Un to this Last" या पुस्तकाचे भाषांतर गुजराती भाषेत गांधीजींनी सर्वोदय या नावाने पुस्तक लिहिले- या पुस्तकांमध्ये सर्वोदय म्हणजे सर्वांचे कल्याण, सर्वांचे हित होय. सर्वोदय या संकल्पनेमुळे समाजातील गरीब- श्रीमंत, मालक-मजूर, जमीनदार-शेतकरी यांच्यामध्ये संघर्ष न राहता सर्वांना स्वातंत्र्य, समानता प्राप्त करून ऐक्य निर्माण होईल असे सांगितले आहे. गांधीजींनी सर्वोदयामध्ये मुख्यता अन्याय जुलूम यांचे उच्चाटन करण्याचे अभिप्रेत सांगितले आहे. गांधीजींनी समाजवादी आणण्यासाठी अहिंसक मार्गाने सर्वोदयाची कल्पना सांगितली आहे. यामध्ये सर्व धर्म, सर्व जाती, पंत यामध्ये सलोखा निर्माण होईल. वर्ग विरहित समाज रचना निर्माण करताना उत्पादन, वितरण, तंत्रज्ञान आणि विज्ञानाचा वापर होईल. परंतु आधुनिक प्रगतीमध्ये आंधळेपणाने धावणे योग्य नसेल. व्यक्ती स्वातंत्र्य व प्रेरणा जिवंत राहतील व सर्वांना समान उत्पन्न वितरण देता येईल. पण अतिरिक्त

साठवणूक व आर्थिक शोषण टाळून यामध्ये समाजातील सर्व जनतेचे कल्याण साधले जाईल. केवळ आधुनिक प्रगतीला आधार न देता शाश्वत विकासाची मूल्यावर भर दिले जाईल. ज्यामुळे सर्व जनतेचे कल्याण साध्य होईल असे सर्वोदयाची संकल्पना महात्मा गांधींनी मांडली.

**3. खादी व ग्रामोद्योग**

गांधीजींच्या मते, भारताचा विकास करण्यासाठी प्रत्येक खेडे ही आर्थिक दृष्ट्या संपन्न असावी, त्यासाठी खेड्याची रचना व्यवस्थापन व नियोजनबद्ध असावी. खेड्यातील आरोग्य, आहार, शिक्षण, उपासमार, दारिद्र्य, बेकारी यासारख्या समस्या सोडवण्यासाठी ग्रामीण भागात खादी उद्योग व ग्रामोद्योग निर्माण झालेले पाहिजे. खेड्यामध्ये उद्योग सुरू केल्यास खेडी स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर बनून स्वतःच्या गरजा खेड्यातच पूर्ण होऊ शकतील. गांधीजींनी ग्रामोद्योगातील खादी व चरखा हे केवळ सूतकातण्याचे यंत्र नाही तर ग्रामीण समृद्धीचे प्रतीक आहे तसेच गांधीजींनी खादीला अहिंसेचे प्रतीक मानले होते. त्यासाठी खादी ही चरख्यावर तयार करणारे वस्त्र आहे. त्यामुळे चरख्याला सूर्यमालेतील सूर्याची उपमा दिली आहे आणि इतर ग्रामोद्योग सुद्धा सूर्यभोवती फिरणारे सूर्यमालेतील ग्रह असल्यामुळे सूर्यासारखे शक्तिमान असतात. म्हणूनच ग्रामोद्योग सुद्धा शक्तिमान असतील यावरून गांधीजींनी खादी व ग्रामोद्योगाला एक वेगळे महत्त्व प्राप्त करून दिले. आजच्या स्थितीत मात्र ग्रामीण भागातील उद्योग कमी होताना दिसून येते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या स्पर्धेत खादी व ग्रामोद्योगाला आपले अस्तित्व टिकवणे कठीण जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगार मोठ्या प्रमाणात वाढताना दिसून येते. ही बेरोजगारी दूर करण्यासाठी आज केवळ स्वदेशी म्हणून खादी व ग्रामोद्योगाला चालला दिली तर नक्कीच ग्रामीण भागातील ग्रामोद्योगातून नव्याने रोजगार निर्माण करता येईल.

**4. स्वदेशी चळवळ**

गांधीजींनी ग्रामीण भागातील लघु आणि कुटीर उद्योगांना संरक्षण देण्यासाठी स्वदेशी चळवळीला मुख्य आधार मानले. भारतातील ब्रिटिशाविरुद्ध जनसामान्य नागरिकांच्या लढा स्वदेशी चळवळीमुळे उभारता आला. त्यामुळे ब्रिटिशांच्या मालावर बहिष्कार टाकने सहज शक्य झाले. ब्रिटिशांनी भारतातील माल ब्रिटनमध्ये पक्क्या मालात रूपांतर करून परत भारतात येऊन विकत होते. ज्यामुळे भारतातील उद्योगातील वस्तू हे ब्रिटनच्या यांत्रिकीकरणातील वस्तूशी टिकाऊ धरू शकत नाही, हे गांधीजीच्या लक्षात आल्यावर गांधीजींनी स्वदेशी चळवळी राबवून देशातील खादी, उद्योगासारख्या कुटीर उद्योगाला चालना दिल्यामुळे देशातील ग्रामीण भागातील उद्योगधंदे नव्याने सुरू होण्याची चालला मिळाली. भारतामधील ग्रामीण भागातील लोकांना रोजगार संधी उपलब्ध होऊन लोकांचे दुःख, दारिद्र्य, आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली. आजही जागतिकीकरणाच्या युगात स्वदेशीचा वापर असल्यास देशातील ग्रामीण उद्योगांना संरक्षण, ग्रामीण भागातील रोजगार सुरक्षित ठेवण्यास आणि ग्रामीण भाग समृद्ध ठेवण्यास मदत होईल.

**5. यंत्र व यांत्रिकीकरण**

गांधीजींनी देशाच्या आर्थिक विकासासाठी यांत्रिकीकरणाला विरोध केला. परंतु गांधीजींचे यांत्रिकीकरणाविषयीचे वेगळे मत समजणे महत्त्वाचे आहेत. गांधीजींच्या मते यांत्रिकीकरणामुळे मूठभर लोकांकडे धनसंपत्ती जमा होते. कारखानदार वर्ग अधिक श्रीमंत होत जातो, तर कामगार वर्ग अधिक गरीब होत जाते यातून देशात आर्थिक विषमतेची दरी वाढत जाईल. गांधीजींच्या मते, ज्या देशात मुबलक

प्रमाणात श्रमिक आहे. त्या भागात यांत्रिकरणाला विरोध दर्शविला. कारण यांयांत्रिकीकरणामुळे देशातील श्रमिकांचा रोजगार धोक्यात येऊन बेरोजगार संख्या वाढ होते. त्यामुळे गांधीजींनी यांत्रिकीकरणाला विरोध दर्शविला. परंतु गांधीजींनी यंत्राचा वापर विवेक पूर्ण होण्यावर भर दिला. गांधीजींच्या मते, "यंत्र हे माणसाला मदत करणारी असावी. परंतु माणसाला बेरोजगार करणारी यंत्रे नसावी" असे मत व्यक्त केले.

## निष्कर्ष :-

**1-** महात्मा गांधींच्या विचारानुसार, ग्रामीण भागातील आर्थिक विकास हाच देशातील आर्थिक समृद्धी आणि राष्ट्र उभारणी करता महत्त्वाचे आहे.

**2-** आजही देशाला सर्वांगीण विकासासाठी गांधीजींच्या विश्वस्त संकल्पनेची गरज असून देशात आर्थिक विषमता दूर करता येते.

**3-** गांधीजींनी सर्वोदय संकल्पनेतून देशातील जनतेचे कल्याण साध्य होण्यावर भर दिला.

**4-** ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योगांना भरभराट होऊन खेडी स्वयंपूर्ण होण्यासाठी खादी आणि इतर ग्राम उद्योगावर भर दिला.

**5-** स्वदेशी चळवळीत खादी उद्योगासोबत ग्रामीण उद्योगाला संरक्षण मिळवून नव्याने ग्रामीण भागात रोजगार निर्मितीला चालला मिळाली.

## संदर्भ:-

1- नांदवडेकर डॉ.व्हि.डी., आर्थिक विचाराचा इतिहास, बी.ए. पार्ट 3 अर्थशास्त्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती 2017 (दूर शिक्षण केंद्र)

2- यादव चंद्रभान, ग्रामीण विकास का आधार- कृषी, कुरूक्षेत्र मासिक, मार्च 2019, पृष्ठ 56

3- कुलकर्णी बी.डी.ए.,ढमढेरे एस.व्ही., आर्थिक विचार व विचारवंत, डायमंड पब्लिकेशन, पुणे 2008

4- ठक्कर प्रा.के.एच., अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर सप्टेंबर 2005

5- कवीमंडळ डॉ.विजय, आर्थिक विचारांचा विकास, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर सप्टेंबर 1990

6- चव्हाण डॉ.पंजाब, मूल्य व्यवस्था गांधी विचार, निर्मल प्रकाशन, नांदेड

7- भटकर प्रा.व्ही.एच., निंबाळकर प्रा.निलेश, बोचे प्रा.डॉ.प्रिया, ग्रामीण विकासाचा मार्ग पंचायतराज, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

8- https://mr.wikipedia.org/wiki/महात्मा_गांधी

9- https://www.arvindguptatoys.com/arvindgupta/mar-gandhi-gaurav.pdf

❖❖❖

# वर्तमान संदर्भात संत गाडगेबाबा यांचे सामाजिक विचार

प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके
सहयोगी प्राध्यापक
यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर जि. वाशिम
Pramoddevke66@gmail.com mo.no.9604674723

## गोषवारा :

संत गाडगेबाबांनी अंधश्रध्देवर तडाखेबंद प्रहार केले. आपल्या खेडयापाडयातील समाज अंध्दश्रध्देच्या मगरमीठीत सापडला आहे. हे बाबांनी ओळखले. आजारी पडलेल्या मुलाला डॉक्टरांकडे घेवून न जाता गावातल्या देवऋषीकडे घेवून जातांना पाहिले. देवाच्या नावाखाली मुक्या जनावरांना बळी देतांना पाहिले. हे सर्व पाहूनच बाबांनी लोकांना विज्ञानाच्या जगात नेवून सोडले. अंधश्रध्दाळू मनात ज्ञानविज्ञानाच्या श्रध्दा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.. बाबांचे कीर्तन म्हणजे अंध्दश्रध्देवर उघड प्रहार होता. पिढयानपिढया समाजाच्या मनात रुजलेल्या अंधश्रध्दाना काढून टाकण्याकरिता बाबांनी आयुष्यभर प्रयत्न केले. खऱ्या अर्थाने गाडगेबाबा लोकशिक्षणच देत होते. समाजातिल सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक प्रश्न अत्यंत पोडतिडकीने व प्रखरपणे मांडतांना दिसून येतात.

**बीजशब्द :** अंध्दश्रध्दा, बुवाबाजी जातीभेद, शिक्षण सामाजिक, धार्मीक, सांस्कृतिक, व्यसनमुक्ती, मुर्तिपुजा

## प्रस्तावना :

महाराष्ट्राला संतांची व्यापक अशी परंपरा लाभली आहे. या संतानी देशातील समाजसुधारणेच्या कार्याला गति आणि दिशा देण्यांचे कार्य केले. देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतीक इतिहासामध्ये सर्व संतांचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. मरगळलेल्या, ग्लानी आलेल्या समाजाला खडबडून जागे करुन खरा नीतीधर्म सांगून आचारणात आणण्याचे व्यापक, सत्वशील कार्य संतांनी केले. संत गाडगेबाबांनी अनेक देवदेवता, त्यांची अर्थशुन्य पूजा, भल्याभल्या उपासनेच्या पध्दती, अंधश्रध्दा देवाच्या नावाने चालणारे ढोंग आणि अन्याय, जातीव्यवस्थेमुळे वाढणारी विषमता अशा अनेक सामाजिक दोषांवरती फार त्वेषाने प्रहार केले.

## उद्देश :-

१) संत गाडगेबाबांचे सामाजिक कार्य स्पष्ट करणे.

२) गाडगेबाबांच्या शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक विचारांचा अभ्यास करणे.

३) गाडगेबाबांच्या अंधश्रध्दा अस्पृश्यता, जातीभेद, शिक्षण कार्याचा विचार करणे

## विषय विवेचन :-

आजच्या वर्तमान काळात सामाजिक जीवन अतिशय गतीमान झाले आहे. त्यामुळे सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न निर्माण झाले आहेत. आणि या प्रश्नाचे समयोचित उत्तर संताच्या प्रबोधनातून, त्यांच्या साहित्यातून सापडले. जीवनाला आत्मीक समाधान प्राप्त करुन देण्याचे सामर्थ संत साहित्यात

आहे. हे निर्विवाद आधुनिक काळात मृतप्राय समाजाला संजीवनाची अमृतकला प्राप्त करुन देण्यांचे कार्य गाडगे बाबांनी केले.

**(1) अंधश्रध्दा व रूढीप्रीयता यावर कठोर टिका.**

गाडगेबाबानी आपल्या भजन कीर्तनतून प्रवचनातून सर्वसामान्य जनतेला अनेक थोर साधु संताच्या अंभगातील दाखले देवून वाईट चालीरीती दूर करुन सर्वसामान्य जनतेची अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला आणि आपले अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्य सतत सुरू ठेवले.

**शेंदुर माखोनिया धोंडा**

**पाया पडती पोरे रांडा**

गाडगेबाबा आपल्या भजन किर्तनातून लोकांना सांगतात की. तुम्ही शेंदूराने माखलेल्या दगडाला देव मानून आणित्यांच्या सतत पाया पडून त्याला नवस करण्यातच आपल्या जीवनाचे सार्थक मानू नका. दगडाच्या या मातामाय, मरीमाय, म्हसोबा या देवता नसून हे सर्व ढोंग आहे. खरा देव हा मणुष्याच्या आत्म्यातच आहे. आणि आत्म्याचे शांतीकरण हे सर्वात महान कार्य आहे. म्हणून बाबा लोकांना उपदेश करतात. तुम्ही दगडाच्या मुर्तीपुजेच्या या ढोगांतून बाहेर या आणि वर्षानुवर्ष ज्या वाईट चालीरीती प्रथा परंपरा आहेत त्यामध्ये स्वतःला सोडविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करा तिच तुमची खरी पूजा आहे.

गाडगेबाबानी आपल्या बालपणी ग्रामदेवतेचे पूजा पाहिली होती. देतोबा, खंडोबा, म्हैसोबा, मरीआई या देवतांना प्रसन्न करण्यासाठी दिलेले पशुबळी ते उघडया डोळ्यांनी पाहत होते. बक-यांचा तो केविलवाणा आवाज कापणा-याचे रक्ताने बरबटलेले हात गाडगेबाबा विसरत नव्हते. गावोगावी भटकंती करुन ठिकठीकानच्या यात्रेत हजारो कोंबडया बक-याचे बळी दिले जात त्याला बाबांनी विरोध केला. भटकंतीच्या काळामध्ये बाबा उपराई गावाच्या शादालबुवाच्या यात्रेत गेले. तेथे त्यांना दर गुरुवारी पंधराशे बक-यांचे बळी देण्यात येत असल्याचे दिसले. पूर्णामायचे पाणी सगळे लाल होऊन जात असे. अकोला जिल्हयातील दोनद जळगाव जिल्हयातील वडदा, सोलापूर जिल्हयातील मरीआई, मराठवाडयातील वाखरीला सटवाई, नाशिक जिल्हयातील चंदनपूरचा खंडोबा या साऱ्या देवतापूढे प्राण्यांचे बळी जात असे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयातील समाज हा ग्रामदेवतेच्या पाठीमागे लागून मुक्या प्राण्यांची हत्या करत होता. तिर्थ म्हणून दारु प्राशन करत होता. हे बाबानी उघडया डोळयांनी पाहिले. हा सर्व प्रकार पाहिल्या नंतर बाबांच्या अंगावर शहारे येत असत.मुक्या प्राण्यांची हिंसा बंद करायची हे त्यांनी निश्चयपूर्वक ठरविले आणि या सा-या दंभढोंगावर कीर्तनातून प्रहार केले.

**2) व्यसनमुक्ती**

गाडगेबाबांच्या काळात दारु, गांजा, भांग, अफीम, चरस इ. व्यसने प्रचलीत होती. पैकी दारू ही सर्वाधिक लोकप्रिय व्यसन होते. या व्यसनानेअनेक कुटुंबाची हलाखीची अवस्था करणारे त्यांचे वडील दारु व्यसनाने ग्रासीत होते. हा स्वानुभव त्यांनी बैचेन करता झाला, त्यातून त्यांनी दारुबंदी मोहीम सर केली. त्यासाठी बाबांनी अनेक उदाहरने देवून लोकांना असे सागितले.

**दारु ही विषासमान बिघडवी हृदयस्थान**

**म्हनोनी हे व्यसन घातक सर्वांशी**

**सर्पदंशे एकदा मरण मद्य विषाचा हा परिणाम**

**ते अधोगतीशी कारण**

गाडगेबाबा लोकांना उपदेश करीत दारु ही विषासमान आहे. ज्या प्रमाणे मणुष्याने विष पिल्यास तो मरण पावतो. त्याप्रमाणे दारुही मणुष्याला कणाकणाने झिजविते व मनुष्याच्या अद्योगतीस कारणीभूत होते. दारूडयाला दारुच्या व्यसनापासून मुक्त करुन त्याचे दारुपासून जीवन बदलून त्याला पुन्हा

माणसाप्रमाणे जगण्यासाठी दारुबंदी झाली पाहीजे, ही दारु बंदी शासनाव्दारे होईल तेव्हा होईल. पण समाजातील सभ्य लोकांनी एक होवून ती घडवून आणिली पाहिजे.याच प्रयत्नात गाडगेबाबा अविरत जीवन भर कार्य करत राहले. दारुबंदीचे प्रचार कार्य करीत असतांना बाबाच्या कार्यास आणखीन चालना मिळावी म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री यांनी बाबाना एक मोटारगाडी सुध्दा उपलब्ध करुन दिली होती. अशा रीतीने बाबांनी आपल्या असंख्य अनुयायी आणि राजकीय नेत्यांच्या सहकार्याने आपले समाज प्रबोधनाचे कार्य आरंभ करुन समाजातील अनेक अनिष्ठ रुढीचा बिमोड केला.

**3) शिक्षणाचे महत्व**

समाजजीवनातील दृष्ट प्रवृत्ती, व्यसने, विलासीपणा आणि अंधश्रध्दा दूर करण्यासाठी गाडगेबाबांनी शिक्षणावर अधिक भर दिला. शिक्षणाची गरज सांगतांना याचा किर्तनातून समाजाला संदेश देत असत की शिक्षणाशिवाय माणूस धोंडा अर्धपोटी राहा. पण मुलांना शिक्षण द्या कारण शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. अज्ञ समाज सावकारकडून लुबाडला जातो. यासाठी गाडगेबाबांनी आवाज उठविला, ते म्हणत ज्याला शिक्षण नाही तो खटाऱ्याचा बैल आहे म्हणून मुलाला शाळेत घातल्याबिगर राहू नका विदया मोठ धन आहे. साऱ्या समाजाला विदयेचे महत्व सांगताना बाबा म्हणत चौऱ्यांशी रोगावर शिक्षण हा एकच रामबाण उपाय आहे. अशिक्षित माणसात आणि जनावरात काही फरक नाही. अशिक्षित माणसाला सावकार बुडवितो. सरकारी नौकर दरडावतो लबाड लोक बुडवितात. तुम्हांला स्वाभिमानाचे जीणे जगावयाचे असेल तर माझ्या मायबापांनो शिक्षण घ्या असा संदेश गाडगेबाबांनी कीर्तनातून समाजातील लोकांना केला. गाडगेबाबांना शिक्षणाचे महत्व त्यांनी तारुण्यात पदार्पण केले तेव्हाच कळले आणि आपल्या गृहत्यागानंतर भजन कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण प्रसाराच्या कार्याला सुरुवात केली. गाडगेबाबा हे विदयेचे ज्ञानाचे उपासक होते, त्यांच्या वेळी समाजीतील बहुसख्य लोक शिक्षणापासून वंचित होते. शिक्षणाचे महत्व त्यांनी अनेक उदाहरणे देउन लोकांना पटवून त्या शिक्षाणातून नवसमाज निर्मीतीचा प्रयत्न केला ते समाजातील सर्वसामान्यांना सतत उपदेश करीत तो असा

विदया मोठ धन आहे, जेवनाच ताट मोडा
बायकोला लुगड कमी भावाच घ्या
मोडक्या घरात राहा, पण मुलाला
शिक्षण दिल्या शिवाय राहू नका

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. या डोळयाने माणसाला नवी दृष्टी येते, असे बाबांना वाटायचे त्यामुळे शिक्षण क्षेत्रात फार मोलाचे कार्य त्यांनी केले.

**4) जनसेवा हिच ईश्वर सेवा**

जनसेवा हिच ईश्वर सेवा असे मानून मानवपूजा हा गाडगेबाबांच्या विचारप्रणालीचा मध्यबिंदु होता. त्यामुळे देवाच्या शोधात देवळाकडे जाण्याची गरज नसून दरिद्री नारायनाच्या रुपात त्याला पाहण्याची गरज आहे. असे बाबांचे मत आहे. ते म्हणायचे खरा देव ओळखा व त्याचीच पूजा करा. देव तिर्थात किंवा मूर्तित नाही. तो तुमच्या समोर दरिद्री नारायनाच्या रुपाने प्रत्येक्ष उभा आहे. त्याचीच प्रेमाने सेवा करा. म्हणून बाबा म्हणतात.

१. भुकेल्यांना जेवन द्या.

२. तहानलेल्यांना पाणी द्या.

३. उपडयानागडयांना वस्त्र द्या.

४. गरीब मुलांमुलीना शिक्षणासाठी मदत द्या.

५. बेघरांना आश्रय द्या.

६. अंध पंगू रोग्यांना औषधोपचार द्या.

७. पशुपक्षी मुक्या प्राण्यांना अभय द्या.

८. बेरोजगारांना रोजगार द्या.

९. गरीब तरुण तरुणीचे विवाह करुन द्या.

१०. दुःखी व निशाना हिम्मत द्या.

हाच आजचा रोकड धर्म आहे.हिच खरी भक्ती व  देव पूजा आहे, अशी त्यांची धर्म कल्पना होती.

हे विचार त्यांनी आपल्या कीर्तनामधून लोकांना पटवून दिले.

## निष्कर्ष

१) श्री संत गाडगेबाबा यांचे ध्येय भजन किर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करणे हे होते.

२) अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न त्यांच्या किर्तनामधून दिसून येतो.

३) प्राण्यांची हत्या करू नये असे त्यांच्या प्रबोधनातून दिसून येते.

४) शिक्षणाचे महत्व त्यांनी समाजाला कीर्तनाच्या माध्यमातून पटवून दिले हे सुध्दा दिसून येते.

५) कोणतेही व्यसन कीती वाईट असते. हे दारुच्या उदाहरणाने लोकाना पोटतीडकीने पटवून दिले.

६) संतगाडगेबाबाहे नुसते बोलते सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते हे त्यांनी केलेल्या कार्यावरुन दिसून येते.

७) सरळ, साधी, सुबोध पण आशय भाषा हे त्यांच्या भाषेचे वैशिष्टे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथसूची

१) दांडेकर गोपाल निळकंठ  :- श्री गाडगे महाराज

२) प्राचार्य भगत रा.तु.:- लोकशिक्षणाचे शिल्पकार

३) नाचवने श्रीकृष्ण :- श्री गाडगेबाबांची अमृतवाणी (शेवटचे कीर्तन)

४) उमाळे दास नामु :- संत गाडगेबाबांनी समाजास पाजलेले बोधामृत

५) जवंजाळ अशोक :- थोर मानव पूत्र डेबुजी.

६) ठाकरे प्रबोधनकार के.सी. :- श्री गाडगेबाबा.

७) श्री घोंगटे रा.सु. :- श्री गाडगेबाबांचा संदेश.

❖❖❖

## Form IV

**(See Rule 8)**

**Statement about ownership and other particular about the Journal**

## Research Journal of India

| | | |
|---|---|---|
| **1. Place of Publication** | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre (DBMRC), Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401** |
| **2. Periodicity** | - | **Annual** |
| **3. Printer's Name** | - | **Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.)** |
| **4. Publisher's Name** | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| **Nationality** | - | **Indian** |
| **Address** | - | **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401** |
| **5. Editor's Name** | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| **Nationality** | - | **Indian** |
| **Address** | - | **Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal** |

**We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.**



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**





KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

Email: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For Research centre: researchjournalofindia@gmail.com

marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE



| | | | |
|---|---|---|---|
| **Annual Subscription** | - | **Individual / Institutional** | **₹ 500/-** |
| **Account Details : Bank** | - | **Bank of Maharashtra** | |
| **Branch** | - | **Azad Maidan Road, Yavatmal** | |
| **IFSC code** | - | **MAHB0000047** | |
| **MICR code** | - | **445014001** | |
| **A/c No.** | - | **60175373000** | |
| **A/C Name** | - | **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre** | |

p - ISSN 2349-9370

9 772349 937002

e - ISSN 2582-4848

9 772582 484004



**(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)**